
म. ग्र. स. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ६९०



RFFBK-0023197

नयना आचार्य

संदर्भ
2 3920
9
सवारु
890

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUL 1981
22 JUL 1981
2 AUG 1981
18 OCT 1981
28 OCT 1981
5 NOV 1981
1 DEC 1981
17 JAN 1982
24 JAN 1982
27 JUN 1982
24 OCT
26 OCT 198
5 DEC 198
23 JAN 1983
1 MAY
11 SEP
5 OCT
6 DEC 1984
JAN 1985

५०००-४-८०

REFBK-0023197

# पुन्हा एकदा...
# लाल ताऱ्याकडे

सौ. नयना आचार्य

नवचैतन्य प्रकाशन, भाईंदर, ठाणे

# पुन्हा एकदा...
# लाल ताऱ्याकडे

प्रकाशिका / सौ सुप्रिया श मराठे,
नवचैतन्य प्रकाशन,
लेले वाडा, राम मंदिर रोड, भाईंदर (प) जिल्हा ठाणे.
पिन कोड क्र. ४०११ ०१
© सौ नयना आचार्य
५, नटराज सोसायटी, ठाणे शहर, जिल्हा ठाणे
मुखपृष्ठ / ग तु बांदोडकर
छायाचित्रे / सौ नयना आचार्य
मुखपृष्ठ छपाई / बॉम्बे सर्वोदय प्रेस, माहिम, मुंबई
मुद्रक / सौ शामला अनंत चिंचणीकर,
माधवी मुद्रण, ४४३, शिवाजीनगर, पुणे ५
मूल्य / बावीस रुपये प्रकाशन / १९८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९०
२३९८७
१५५१८
मुक्त प्रवास
ठाणे (स्थळ प्रत)

# १ : प्रास्ताविक

---

प्रवासाची मला अत्यंत आवड बालपणापासून मनाने असंख्य भराऱ्या मारायची संवय पण प्रवासाला एकट्याने कसे जाणार ? निदान पूर्वी तरी शक्य नव्हते अन् घरची सोबत मिळत नव्हती कारण तशी आवड नव्हती प्रवासातली दगदग आणि खाण्याचे हाल सोसूनही प्रवासाची मजा लुटायला रक्तातच जरा भटकेपण असावे लागते

तशी प्रवासी सामुग्री घरात तयार असे थैल्या डब्यापासून पत्ते वगैरे खेळाचे सामान होते डबे, थर्मास व पिशव्या दर सुटीत भरल्या जात पण जवळपासचे नदीझरे, बागा, आमराया, मंदिरे असे पिकनिक स्पॉटस् निवडून जायचे म्हणजे तयारी मी खपून करायची, थोडे निसर्गसौंदर्य पाहायचे पण मुख्य कार्यक्रम म्हणजे अखंड चरणे, गवतावर लोळणे. ( मात्र गवताऐवजी पुऱ्या भाजी व नाना खमंग प्रकार खाणे ) पत्ते वगैरे बैठेच खेळ खेळत मनमुराद कुचेष्टात्मक गप्पा हाणणे हाच असे अखेर यातून भारताचे विविध हवामानाचे व सौंदर्याचे प्रदेश पाहून होत ना पैसे व सुट्या अशाच खपत सरकारी खर्चाने प्रथम वर्गाने काश्मीर पाहता येत होते तेथेही कुणी हौस दाखवीना तेव्हा ठरवले, आता एकटीनेच आपला छंद भागवावा आता आपणाला अनुभव व प्रौढपणा आहे. आत्मविश्वासाने हिंडले की धोका नाही

अशी जरा भ्रमंती करायला गेले प्रवास, फोटोग्राफी, लेखन, वाचन या माझ्या प्राणप्रिय आवडी पण नशीब असे की, जेव्हा या चारी गोष्टींना शरीर समर्थ होते तेव्हा योग नाही आला कधी आवाक्याबाहेर उचललेल्या जबाबदाऱ्या आड आल्या कधी पैसा कमी पडायचा अन् अजूनही पडतोय तरीही ह्या आवडी पुऱ्या करताना शरीराची साथच आता अपुरी पडावी नी अशाच वेळी सधी मिळाव्यात हा योग ! दात नि चण्याचाच हा न्याय !

तर गंगाही पार न केलेली मी एके दिवशी हवेत झेप घेते ती थेट गगा, हिमालय, नीपर, मास्कवा, ओलाडून नीव्हा नदीच्या मुखाशी थेट उत्तर ध्रुवाला भिडणाऱ्या बाल्टिक समुद्राचे तुषार अगावर घेते, हे तसे असभवनीयच म्हणायचे, पण अखेर उत्कटतेने हव्या त्या गोष्टीसाठी तशीच जिद्द आळगावी लागते हेच खरे ! प्रत्येक गोष्टीची पैशाशिवाय इतरही बरीच किमत मोजावी लागते इतर काही गोष्टींचा त्याग केल्याशिवाय एखादी मोठी गोष्ट मिळत नाही माझ्या स्नेही अँड सौ शकुतला पराजपे आहेत त्यानी चहा पिता पिता बिस्कीट मोडावे इतक्या सुलभतेने मला विचारले, ' नयनाबाई, रशियाला येता का ? ' इस्कस ' तर्फे ग्रुप निघतो आहे मी एकटीच जाणार आहे कारण आमचे पराजपे-साहेब आधीच जाऊन आलेत तेव्हा मला ओळखीची सोबतही होईल आणि हॉटेलमध्ये रूमपार्टनर म्हणून ओळखीची मैत्रिण असणे बरे '

त्यावेळी मी बाईंना विचार करते म्हटले पण बहुदा मनाने त्याक्षणी ठाम निश्चय केला असला पाहिजे नाहीतर नुसता होकार असता तर अडचणींचे अनेक डोगर व अना-पेक्षित खड्डे यामधून मी पार पडलेच नसते.

मुख्य अडथळा शरीराचाच होता पाठीच्या दुखण्याने प्रवासामध्ये धोक्याच्या जवळ-पास त्रास व्हायचा तरीही विमानप्रवासात त्रास नसतो, अशी समजून करून घेऊन मनाने मोठ्या निग्रहाने इतराच्या शकाना उत्तरे दिली मनाचे अवसान उसने आणता येते पण पैसा मात्र रोख मोजावा लागतो ज्यावेळी मी खरोखर जाण्याची विधायक तयारी करू लागले त्यावेळी माझ्या खात्यावर फक्त अकराशे रुपये शिल्लक होते खर्चाचे अदाजपत्रक चौदा हजारापर्यंत होते हे म्हणजे मुगीने मेरु पर्वत चढण्यासारखे होते शिवाय नुकतीच मी व्यवहारचातुर्याच्या अभावामुळे हजारो रुपयाच्या केलेल्या एका उलाढालीत ठार फसले होते. या प्रकरणाचा ताप माझ्या कुटुंबियानाही भोगावा लागला होता तेव्हा माझ्या व्यवहारशून्यतेच्यामुळे मी गळ्यापर्यंत चिखलात अडकले होते त्यातून वर निघण्यास किमान अर्धा लाख रौप्य मुद्राची निकड होती. अशा वेळी हातात अकराशे रुपये असताना चौदा हजारांचे बेत तर सुरू केले !

यावेळी मनाने दोन गुरु केले आचार्य अत्र्यानी हातात काही पैसा नसताना टी डी च्या पदविकेसाठी इग्लडला जाण्याचे ध्येय बाळगले ध्येयाचा विचार तीव्र असला की मार्ग निघतो तसा त्यांना मिळाला व मलाही दुसरे गुरु आकाशवाणीचे रविद्र पिगे !

त्यांनी आमच्या साहित्य-रसिक मडळात भाषण करताना म्हटले होते,

' लेखकांनी लेखनावर मिळालेला पैसा शक्यतो विविध भागात प्रवास करून अनुभव-विश्व विस्तृत खोल करण्यामागे आणि ग्रंथखरेदीमध्ये वेचावा '

ह आठवून मी इस्कसचे आजीव सदस्यत्व घेतले दौऱ्यासाठी हजार रुपये भरून नाव नोंदवले त्यानतर पैशाच्या जमवाजमवीला लागले जवळजवळ तिकीट हाती येईपर्यंत मी कुणालाच अवाक्षराने कळवले नाही कारण मन अनुभवाने कातर व पापशकी बनलेले ! वाटायचे, कष्टाने धडपडून मिळवलेला घास तोंडापाशी नेताच हिरावला जातो यावेळी जर मी जाण्याची प्रसिद्धी केली असती आणि ऐनवेळी जर जाणे रद्द झाले असते तर नत-रची फजिती सहन करणे माझ्या जखमी मनाला सोसले नसते प्रत्येकाने वेगवेगळ्या अर्थाने " काय हो ? तुमच्या रशियाच्या दौऱ्याचे काय झाले ?" असे म्हटले असते, आणि मला मरणप्राय दुःख झाले असते

प्रथम पासपोर्ट ! ऐकून ऐकून त्याबद्दल मनात धसकाच होता पण इथे सुखद धक्का बसला परांजपे वकीलानी फॉर्म भरण्याची अचूक माहिती दिली सुप्रसिद्ध लेखिका, त्यावेळच्या आमदार, सौ कुसुम अभ्यकर यांचे हातून मला एक पुष्पहार घालून माझा सत्कार केला गेला होता एका सभेमध्ये लेखिका या नात्याने माझी कदर करून त्यानी मला पास-पोर्टवर सही शिक्के दिले पासपोर्ट ऑफिसर श्री कुलकर्णी यांनीही मी लेखिका आहे हे ऐकल्यावर फारच सौजन्याची वागणूक दिली व फक्त दोन खेपात पासपोर्ट माझ्या हाती आला तेवढ्यामध्ये एक बांधा आलाच होता कायदेशीर तरतुदीप्रमाणे पासपोर्टधारक परदेशात असताना मृत झाला तर त्याचा मृतदेह स्वदेशी आणण्याची हमी सरकारला स्टॅम्पपेपरवर द्यावी लागते

खर म्हणजे विमानाने जाण्याची भीती मी मुळीच धरली नव्हती तरीपण विमानात पाऊल टाकण्याआधीच प्रेताच्या विल्हेवाटीचे कागदपत्र तयार करायचे म्हणजे गमतच वाटली श्री कुलकर्णी म्हणाले, ' शक्यतो तुमचे पती किंवा तुमचे पुत्र यांचा बाँड द्या कारण प्रेतसस्कार तेच करणार असतात सोबत त्यांचे इन्कमटॅक्स क्लियरन्सचे सर्टिफिकेट जोडा '

अजून मी माझा बेत घरातही उच्चारला नव्हता मुलगा परप्रांतात होता आणि ' ह्यां ' च्या पगारावर इन्कमटॅक्स नाही करपात्र पगारवाले भाऊ आहेत पण पुढे फजिती नको म्हणून मी त्यांच्याकडे गेले नाही माझ्या साहित्याची चाहती माझी प्रिय मैत्रिण सौ साधना अमृते ही तयार झाली तथापि प्रेताच्या भानगडीत बाईमाणूस नको म्हणून तिच्या पतींनी हे फॉर्म भरले

खरी कसोटी पुढेच ! पैशाची जुळवाजुळव ! मी या काळात अतिशय धावपळ करत असल्यामुळे फारसे लिहूही शकत नव्हते फक्त ' रिक्षावाला ' ही कादबरी लिहीली.

तथापि चार कादंबऱ्यांचे बाकी राहिलेले पैसे मी हे कारण सांगताच प्रकाशकांनी चटकन् दिले. ओळखीच्या प्रकाशकांनी माझ्या या दौऱ्याला सदिच्छा म्हणून मी नेहमीप्रमाणे पुढे देणार असणाऱ्या लिखाणाचे ॲडव्हान्सेस् दिले याचवेळेला ' ह्याची ' ऑफिसची काही बिले आली होती तीही मीच गिळली किरकोळ येणे वसूल केले अखेर १९८० मध्ये एक पै मिळू शकणार नाही इतकी निपटानिपट केली तेव्हा गाडी दहा हजारापर्यंत रखडत आली व आपण आता जाणार असे मला वाटू लागले

न दिसणारे अनेक खर्च होतेच वाटखर्चाला लागणाऱ्या सव्वादोनशे डॉलर्ससाठी सुमारे दोन हजार रुपये हवे होते जादा खरेदीसाठी इकडूनतिकडून डॉलर्स जमवणे हा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. कारण कस्टम ड्यूटी भरावी लागेल इतक्या चैनीच्या वस्तू खरेदी करणे मला परवडणारे नव्हते आणि आवश्यकही वाटत नव्हते प्रवासासाठी भपकेदार साड्या वगैरे खरेदी केली नाही तरी अतिथंड प्रदेशाला आवश्यक ते गरम कपडे वगैरेसाठी आणखी तीन-चार हजार उरलेल्या दिवसात जमवायचे होते

स्कायलॅब पडून गेल्यावर आता जिवंत आहोत असे बघून पैशाच्या तयारीला लागले. अजूनही सरकारची अस्थिरता, निवडणुकांचा संभव, युद्धाचा संभव, यामुळे जाणे रद्द होण्याची धाकधूक होतीच.

मनाला धीर यावा म्हणून भीतभीत दोघा साम्यवादी साहित्यकांचा सल्ला घेतला पहिले म्हणाले,

' अहो, एवढ्यात कशाला रशियाला जाता ? तुम्ही मोठ्या लेखिका व्हा नेहरू पारितोषिकासारखे किंवा असे एखादे बक्षिस मिळावा त्या सरकारकडूनच तुम्हाला जायची संधी मिळेल '

तशी संधी मिळेपर्यंत माझे पाय शाबूत राहातील याची मला खात्री नव्हती मृत्यूने एक घंटा वाजवून मला सूचना दिली होती आता मिळतील तेवढे दिवस हवेहवेसे आणि महत्त्वाचे तेवढेच करायचे होते

दुसरे सज्जन म्हणाले, ' छे छे ! त्या थंड देशात तुम्ही मुळीच जाऊ नका चंद्रपूरच्या थंडीत गार पाणी पायावर ओततात तुमच्या पायात पेटका आला मग हा उत्तरध्रुवाकडचा प्रदेश ! इथे काय होईल ?'

मी मनात म्हटले, काय होईल ते होवो इतपत बरी आहे तोवरच दूरचे प्रदेश पहावेत आणखी थकल्यानंतर मग नको आपला देश केव्हाही पहाता येईल

युरोपची माहिती असलेल्या काही परिचित लेखकांना माहिती विचारायला गेले ते आश्चर्य करीत म्हणाले, ' अहो, एवढा पैसा कुठून आणलात ? कारण तुम्ही काही नोकरी करून लिहित नाही ' मी म्हटल, ' पैसा नाहीच जवळ पण जो मिळवला होता त्यातील एक पैसुद्धा खर्च न करता अगर एका पैशाचीही चैन न करता सारा साचवला होता एकाच

हेतूने– परदेशप्रवास करावा मुलगा परदेशी गेल्यावर किंवा परदेशात रहाणाऱ्या तरुणाला जावई करून सून किंवा लेकीच्या बाळंतपणाला परदेशात जाऊन त्या निमित्ताने विदेश यात्रेची हौस भागविणे माझ्या नशिबात नाही आर्थिकदृष्टया अशक्य अशाच गोष्टीचा ध्यास मी घेतला आहे आणि त्यासाठी माझी पै पै ठेवली होती परंतु माझी व्यवहारामधे जी फसवणूक झाली ती निस्तरून पुन्हा पाय रोवून उभे रहाण्यासाठी सारी बचत गेली तेव्हा आता अविचारानेच मी हा हट्ट करते आहे'

ते म्हणाले, 'मग ऐवढे हजारो रुपये खर्चायचेय तर त्या रशियात कशाला जाताय? तिथे तुम्हाला मजा करायला मिळणार नाही'

मी म्हटले, 'मजा म्हणजे काय?'

'मजा म्हणजे मनमुराद फिरणे, खाणे, पिणे, वेगवेगळे करमणुकीचे प्रकार पहाणे. युरोप अमेरिकेत जा खूप चैन करता येईल'

'परदेशात मिळणारी उंची चैन म्हणजे उंची सिगरेटस्, दारू, नॉनव्हेज, जुगार, कॅब्रे, सेक्सशोज् आणि विलासाच्या वस्तू खरेदी करणे! कपड्यालत्त्याची खरेदी मी करणार नाही इतर पहाण्याची, पिण्याची व खाण्याची चैन मला नकोच आहे नॉनव्हेजच काय पण अंडेही खाण्याची मला माहिती नाही व इच्छा नाही मद्य पिणे सोडाच, पण मी चहाही पीत नाही तेव्हा सोव्हिएट देशामध्ये चैन करता येणार नाही याचे मला दुःख वाटत नाही उलट पोलादी पडद्याआड असे ह्या जगाचे जे वर्णन केले जाते त्यात जाण्याची संधी मिळते आहे ती मी घेणार व डोळसपणे निरीक्षण आणि अभ्यास करणार'

ठाण्याचे कवि व आमच्या साहित्य रसिक मंडळातील मार्गदर्शक वसंतराव वैद्य यांना मी सोव्हिएट सरकारच्या निमंत्रणावरून भारत सरकारतर्फे महाराष्ट्रातील विविध व्यवसायिक प्रतिनिधींचे जे शिष्टमंडळ अभ्यासदौऱ्यावर जात आहे त्यात लेखिका म्हणून माझी निवड झाली हे ऐकल्यावर खराखुरा आनंद झाला, वसंतराव एक ज्येष्ठ साहित्यिक म्हणून मला त्यांच्याबद्दल फार आदर जेव्हा जेव्हा आम्ही भेटलो तेव्हा तेव्हा आमच्या साहित्यचर्चा झालेल्या आमच्या बोलण्यात राजकारण कधीही आले नाही त्यांची मते त्यांनी माझ्यावर लादली नाहीत अगर प्रचारही केला नाही स्त्रीलेखिकांनी स्त्रीजीवनाचे चित्रण निर्भयपणे स्वतःला जाणवते तसे खरेखुरे करावे ही दृष्टी मात्र त्यांनी दिली.

अशाच प्रकारे मी अभ्यासदौरा करणार म्हटल्यावर वसंतरावांनी मला तेथील समाजजीवन, अर्थव्यवस्था, स्त्रीजीवन, त्यांची कर्तबगारी, शिक्षण व संस्कृती याचे कसे निरीक्षण करावे वगैरे बहुमोल सूचना केल्या बराच वेळ चर्चाही केली, त्यांच्या सूचना ही मला एक बहुमोल भेटच मिळाली मी आल्यानंतर त्यांना दोन–तीन वेळा भेटले व मी पाहिलेली माहिती जेव्हा त्यांना तपशीलवार दिली तेव्हा त्यांना माझ्यापेक्षाही आनंद झाला दुर्दैवाने हे पुस्तक लिहिताना मात्र ते हयात नाहीत!

अशा प्रकारे मी जमवा-जमव करीत असताना इस्कसतर्फे आम्हाला दौऱ्याचे वेळापत्रक, जाणाऱ्याची यादी वगैरे मिळत होते. आमच्यामध्ये आमदार, खासदार, नगराध्यक्ष, शेतकरी, प्रोफेसर, डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यावसायिक वगैरे सर्व होते लेखिका मी एकटीच होते (त्यामुळे मी बराच भावही खाल्ला माझी नुकतीच प्रकाशित झालेली तीन-चार पुस्तकेही मी नेली होती. त्यावरही वाटेमधे सर्वांच्या उड्या पडत ) हळूहळू अशी तयारी करीत असता अचानक बाँब आला आमचे बजेट जवळजवळ चार हजारांनी वाढले कारण पेट्रोलचे दर वाढले म्हणून खच्चून लादलेल्या उटावर ही नुसती काडीच नव्हे तर ओंडका पडला होता. आता मात्र माझ्या तोंडचे पाणी पळाले कारण आता पैसे उत्पन्न करण्याचा मार्गच खुटला होता वैतागाने एक मन म्हणू लागले,

'अखेर ह्या विदेशप्रवास वगैरे सगळ्या चैनीच ! गर्भश्रीमंतानीच त्या कराव्यात आपल्यासारख्या पांढरपेश्या पगारदारांनी पै ला पै जोडून असे काही करायचे म्हटले की आपले ईप्सित हुलकावण्या देत दूर पळते अजून बोभाटा केला नाही तोवर हा विचार काढून टाकावा झाल' पण दुसरे मन ही कल्पना सोडीना ते पुन्हा चार हजार कसे उभे करावे, याचाच विचार करू लागले. एका टी व्ही ची रक्कम ही पेट्रोलची दरवाढ खात होती नाईलाजाने मग ह्यांचा सल्ला विचारला. आमच्या दोघांच्या नावांची फिक्स डिपॉझिटची रक्कम होती ती उचलली आणि मग सारे पैसे भरणा करून तयारीवर अखेरचा हात फिरवू लागले माझे अनुभवविश्व समृद्ध करण्यासाठी मी आर्थिकदृष्ट्या कफल्लक होऊन जात होते

गणेश चतुर्थीच्या दिवशी मी नातलगात ही बातमी दिली आठ-दहा दिवस उरले होते अर्थात जाण्याच्या तारखा तीन वेळा बदलल्या तितके वेळा नातलगाना फोन करावे लागत शेवटच्या पधरवड्यात बरीच धावपळ झाली त्यातून इस्कसचे ऑफिस ज्या इमारतीत आहे, तिची लिफ्ट सायकाळी बद असे सहा जिने चढ-उतार करावे लागत या जिन्यामुळे व धावपळीमुळे पुन्हा सकट आले माझे गुडघे सुजले हाडं कट्‌कट् वाजू लागली गुडघ्याखालचा पाय उचलला जाईना. मी घाबरले डॉक्टरांकडे जावे तर ते एवढ्या प्रवासाला परवानगीच देणार नाहीत ही भीती ! तरी गेलेच डॉक्टर पी एस रामाणी ग्रेट आहेत त्यानी मला न घाबरवता माझे उलट अभिनदन केले मला औषधे लिहून दिली व परदेशात घेण्यासाठी खास गोळयाही लिहून दिल्या आठ दिवसात पाय बरे होतील असा धीर दिला

मग रोज मुलुंडला जायचे तिथल्या जनरल हॉस्पिटलमध्ये थेरपी ट्रिटमेट घ्यायची. गरमागरम पातळ मेण गुडघ्यावर लावायचे चटके बसून रडूही येई पण ते दाबावे लागे

एकूण सर्वच प्रकारचे चटके बसून माझ्या निश्चयाची जणू कसोटी लागत होती.

अखेर अखेरच्या क्षणीही १७ सप्टेंबर ७९, पहाटे ऐवजी दुपार ठरली नोकरीवाले नातलग येऊ शकले नाहीत फक्त बहीण व मेव्हणे माझ्या मुलाला घेऊन सांताक्रूझला आले. विमानाची वेळ दुपारी तीन वाजताची होती मी सकाळी आठलाच दही–भात खाऊन निघाले कारण विमानतळावर बऱ्याच तरतुदी पार पाडाव्या लागतात. मी आमदार निवासांतून निघणाऱ्या बसने जाणार होते निघताना नेहमीच्या केमिस्टकडे नेहमी मिळणारी औषधे अजिबात मिळेनात तशीच लोकलने निघाले ह्यांनी मला आमदार निवासातून सुटणाऱ्या बसमधे बसवले भाऊ ती सुटेपर्यन्त थांबले व हे औषधे मिळवून सांताक्रूझला येतो असे म्हणून पुढे गेले आतापर्यंत अधेरी–मुलुड रस्त्यावरून विमानतळ पाहिलेला ! विमानतळाव बऱ्याच किचकट बाबी असतात पराजपे वकिलांनी मला माहिती देऊन त्या भराभर पुऱ्या केल्या विमान अपघाताचा चांगला एक लाखाचा विमा उतरवला. अवघे दहा रुपये भरून.

'दहा रुपयात मिळणारा हा मटका फारच फायदेशीर आहे' मी प्रकट उद्‌गारले.

'अहो बाई, तुम्हाला लाखाचा मटका फुटण्यासाठी आमचे सर्वांचे जीव घालवणार का ?' काही सहप्रवासी म्हणाले

'ते मटका म्हणजे, जीव गेलाच तर हे एक लाख विमाचे. अने एक बे लाख एअर कपनी बी देल' आमचे ग्रुपचे दुय्यम पुढारी व्होराजी म्हणाले अन् साऱ्याचीच मने हलकी-फुलकी झाली कस्टमकडे जाताना सर्वांचा निरोप घेतला एक क्षण मन गलबलले दुसऱ्या क्षणी पुढे निघाले

कस्टमचे सोपस्कार सुलभ गेले कारण मी सोने वगैरे काहीही गुंजभर मौल्यवान धातू घेतला नव्हता दरेक विमानतळावर मौल्यवान वस्तू फॉर्ममध्ये डिक्लेअर करा, त्याची किंमत लिहा, वगैरे कटकटी नव्हत्या वेटिंग हॉलमधे आम्ही बसलो असताना समोर विमानतळावर एक मोठे विमान उतरले त्यावर सी सी. सी पी. असे लिहिले होते याचा अर्थ यु एस एस आर म्हणजे हे विमान रशियन होते क्षणभर वाटले, हेच आपले विमान पण नाही आम्ही रुपयाच्या चलनात एअर इंडियाची तिकिटे काढली होती. ह्या विमानातून उतरले दस्तुरखुद्द कोसिजीन महाशय ! रशियन संघराज्याचे अध्यक्ष ! शिडीखाली जमिनीवर त्यांचे आपल्या सरकारतर्फे औपचारिक स्वागतबिगत झाले आणि मग तो ताफा काळ्या गाड्यांतून मुंबईत रवाना झाला त्यानंतर आम्हाला मोटारीने विमानाशी सोडले विमानाच्या आत शिरले तेव्हा विमान खरोखर केवढे असते ते कळले शिडीच्या शेवटच्या पायरीवरून हात हलवला दारामध्ये हवाई-सुंदरीने शुद्ध हिंदीत नमस्ते म्हटले अर्थात हवाई सुंदरी हा शब्द अन्वर्थक वाटला नाही 'एअर होस्टेस' च खरा आमच्या हवाई यजमानिणी बाध्याने बऱ्या होत्या अजंठा हेअर स्टाईल केलेल्या होत्या. पौराणिक लेण्याची चित्रे छापलेल्या भडक रेशमी साड्या नेसल्या होत्या पण त्या

साड्याना खुलवणारे रग मात्र त्याचे नव्हते कदाचित भारत 'काला आदमी' चा देश आहे हे परदेशी लोकाना ठाम पटावे म्हणून ही अलीकडची निवड असावी

आमचा बर्ड पर्सर हा मात्र लख्ख गोरा समुद्री रगाच्या डोळ्यांचा व भलताच देखणा होता वागणेही गोड दरवाजे बंद झाले खूप वेळाने धावपट्टीवर एक चक्कर मारून विमान पुन्हा ताटकळले दुसरे विमान उडाल्यावर मग आमचे विमान जोरात धावू लागले काही क्षणातच आम्ही हवेत तरगू लागलो दोन तास आमच्यासाठी ताट-कळणारे नातलग परतण्यास मोकळे झाले पश्चिम समुद्रावर एक जोरदार गिरकी घेऊन भिवडी नाशिकवरून विमान दिल्लीकडे झेपावले

❀ ❀

# २ : राजधानी मास्कोमधे

---

विमानात मला खिडकी मिळाली नव्हती आम्ही चौघी एक-एकट्या बायका असून जवळजवळ नव्हतो शकुंतलाबाई परांजपे यांना पश्चिमेकडील खिडकी मिळाली होती माझ्या शेजारी कोणी अपरिचित पुरुष होते प्रथम बसताना पर्सर बर्वे यांनी सांगितले की आपापल्या सीट क्रमांकावरच बसा जर कदाचित विमान कोसळले अगर काही अपघात झाला तर सीट क्रमांकावरून मृतदेह ओळखायला सोपे जाते घ्या ! म्हणजे उडण्यापूर्वीच अपघाताची दुसरी उठाठेव तिसरी उठाठेव तिसऱ्या हवाई कर्मचाऱ्याने सुरू केली ती म्हणजे विमानातील ऑक्सिजन संपल्यास काय करावे ? विमान समुद्रात पडल्यास काय करावे ? शिडी न आल्यास कसे उतरावे ? वगैरे. तथापि मरणाचा इतके वेळा उच्चार झाल्याने त्याचे काहीच वाटले नाही प्रत्यक्ष विमान उडताना पोटात ढवळणे, गरगरणे काहीच झाले नाही नतरही मला कानात कापूस घालणे, डोके बांधणे वगैरे प्रकार करून चेहरा वेडाविद्रा करण्याची वेळ आली नाही विमानाने जी तिरपी झेप घेतली त्यावेळी मुंबई ते वसई दरम्यानचा हिरवागार किनारा आणि समुद्राच्या निळ्याभोर पाण्याच्या तळाला असलेली तपकिरी वाळू दिसली वरून लख्ख सूर्यप्रकाश होता म्हणून असेल पण खळबळणारा समुद्र वरून शांत दिसला. त्याचा तळ

कसा दिसला हा चमत्कारच आहे! मला खिडकी नव्हतीच शिवाय माझी जागा पंखा-
वर येत होती तेव्हा बर्वेला विचारून मी पखापासून दूर मागल्या सीटवर बसले सरबत
प्यायल्यामुळे प्रसन्न व थड वाटत होते हवाई तरुणीने दिलेले चॉकलेट चघळीत मी डोळे
भरभरून खालची दृश्ये पहात होते फार थोडा काळ हिरवी झाडी व दऱ्याखोरी दिसली
उच डोंगर वरून अर्थातच चपटे वाटत विंध्य सातपुडा तेवढे डोळ्यात भरले. नद्या काळ-
पट पेन्सिलीच्या रेघेसारख्या दिसल्या रस्ते, शेते आणि गावेही आखीव चित्राप्रमाणे छान
दिसत सरळ ट्रॅकमुळे रेल्वे ओळखू येई नर्मदा नदी उच-उच तटामुळे ओळखू आली
एक प्रचड धरण दिसले त्याचे पाणी वाळवीच्या मार्गाप्रमाणे चहुबाजूच्या खाचातून
विखुरले होते. कुणी म्हणाले हे 'गांधीसागर धरण असावे मला वाटले हे फुटलेले
मोर्वीचे धरण असावे जलाशय फुटून पाणी कडेकोपऱ्यातून अडकले असावे इतका वेळ
उजवीकडेच कोपऱ्यात ढग होते आता विमान उच जाऊ लागले अन् एकदम एक छान
इद्रधनुष्य दिसले आपल्याला खालून अर्धेच इद्रधनुष्य दिसते म्हणून त्या कसाकृतीला
आपण धनुष्य म्हणतो हे धनुष्य नसून कडेच होते तो सपूर्ण वर्तुळाकृती सप्तरगी निसर्ग-
विलास पाहताना मला फारच आल्हाद वाटला आता खाली कापसासारखे पांढरेशुभ्र
ढगच ढग तरगत होते आणि त्याच्यावरून स्वच्छ प्रकाशात आम्ही चाललो होतो आता
खालचे काही दिसत नव्हते तरी ढगांच्या ढिगावरून तरगल्याचा आनद घेत गप्पा मारीत
आमचा चहा झाला आमच्या ग्रुपमधे आम्ही त्रेचाळीस प्रवासी, चव्वेचाळीसावा मॅनेजर
सक्सेना आणि पुढे त्यान दिल्लीला चार सरदारजी शेनकी कॉलेजचे विद्यार्थी घेतले असा
आमचा अठ्ठेचाळीस जणांचा ग्रुप होता इद्रधनुष्याच्या कमानीमधून जाताना वाटले
आपण स्वर्गसोपानच चढत आहोत खाली शुभ्र ढगाचा क्षीरसागर आहे अन् हे विमान
म्हणजे गरुड आहे

एवढ्यामधे आमच्या आनदाला थोडे गालबोट लागले भोवताल‌ून प्रचड काळे
राक्षस आल्याचा भास झाला. विमान तर तीस हजार फुटावर होते मग हे उंचावरले
पावसाचे ढग असावेत ढग दाट झाले. पावसाच्या थेंबामधूनच विमान चालले होते प्रचड
वेगवान वारा उलटासुलटा वहात होता विमान गचके खात होते पोटामधे खड्डे पडत.
विमानाचे पख हे खेळण्यातल्या विमानाप्रमाणे अखड बद चपटया नळीसारखे नसतात ते
बिजागरीने जोडलेले मोठे मोठे पत्रे असतात. विमान गचकत खाली जाताना ते उघडून
हवा वर लोटली जाई बहुधा गाराही पडत असाव्यात बेल्ट बांधण्याची सूचना मिळाली
बर्वेने मधोमध उभे राहून सूचना दिली, 'आम्ही कठीण हवामानाला तोंड देत आहोत.
विमान एका पातळीत रहात नाही तेव्हा कोणीही जागा सोडू नका सावध रहा जरा
वेळाने वादळवारा मदावला परतु मधल्या अर्ध्या तासात निसर्गाने आपल्या रौद्रतेची
चुणुक दाखवली कापसाच्या ढिगावरून अलगद जात होतो मजेत मधल्या अर्ध्या वादळी
तासात वाटले की, खेडेगावातल्या एखाद्या उखडलेल्या कच्च्या दगडाळ रस्त्यांवरून खिळ-

खिळच्या एसटीने भरधाव जाताना जसे गचके बसतात तसे बसत आहेत बोटीतून आल्या-वर ज्याप्रमाणे तो भास पुढे होत राहतो तसे हे विमानाचे गचके पुढे तीन-चार दिवस डोळे मिटले की भासत रहात.

वादळाचा हिसका अनुभवल्यानतर विमान दिल्लीच्या जवळ आले होते. खाली हिरव्यागार चटया पसराव्या तशी समृद्ध पजाबची शेती दिसत होती दिल्लीच्या सुदर इमारती दिसल्या किल्ला व कुतुबमिनार ओळखू आला आणि झर्रकन विमान दिल्लीला उतरले अर्ध्या तासाने तेथून उडालो आता प्रवासी पुष्कळ होते. विमानाच्या तोडावर उन होते पस्तीस हजार फुटावरच्या ढगाच्याही वर आम्ही होतो पश्चिम क्षितिजावर पोपटी सोनेरी भगवे रग उधळले होते. आम्ही सूर्याच्याच पाठोपाठ चाललो होतो त्यामुळे ती सायकाळ सहा ते सात एवढी एकच तास न चालता तब्बल चार तास पुरली खूप सावकाश सावकाश सूर्यकिरण नाहीसे झाले पश्चिमेचा नारिंगी सधीप्रकाश तीन तास तसाच दिसत होता आमचे विमान ताश्कंदवरून न जाता पाकिस्तान, अफगाणिस्थानातून गेले. सुलेमान पर्वतावरून एकतीस हजार फुटावर तर काराकोरम पर्वतावरून पस्तीस हजार फुटावर विमान होते क्वचित खालील ढगाचा पुज विरळ होई आणि अगदी पुसट असा भूभाग दिसे त्यातलेही एखादे चिमुकले खेडे ओळखू येई हिमालयाच्या श्रेणीमधून जात असता मी फारच रोमांचित झाले होते तेवढ्यात आमचे मॅनेजर सक्सेना आले

'तुम्ही लेखिका आहात ना ? चला गमत दाखवतो ' असे म्हणून त्यानी मला जनता क्लासमधून स्पेशल क्लासच्या पलीकडे वैमानिकाच्या केबिनमधे नेले विमानाच्या निमुळत्या नाकात तिथे वैमानिक बसले होते सक्सेनाने माझा त्यांच्याशी परिचय करून दिला त्यांच्या सकुचित जागेत त्यांनी मला सामावून घेतले आणि मोठ्या उत्साहाने सुले-मान व काराकोरम पर्वत, गझनी व समरकद ही शहरे दाखविली यानतर विमानाने सूर्याचा पाठलाग सोडला व सरळ उतर धरली खूप धुके भूपृष्ठावर तरगत होते अधार पडल्यावर मी माझ्या जागी परत आले सक्सेना व ते वैमानिक यानी माझ्या जिज्ञासेला जो सहकार दिला होता त्याने मी भारावून गेले होते व आनदलेही होते रशियन भूमीवरून आम्ही चाललो होतो वस्ती अत्यत विरळ शिवाय धुके क्वचित क्वचित दिव्यांची निशाणी दिसे तर काही गावातील रस्ते व मोटारीही दिसत कुठेतरी एक प्रचड गाव लागले मोठे औद्योगिक शहर असावे. दिव्यांनी लखलखले होते दुरून दिसत होते व काही मिनिटे ते ओलाडण्यास लागली भोजन करून विमानातील रजया ओढून पुष्कळ पॅसेंजरस् झोपले होते पण मी अधारातही बाहेरच पहात होते. आमच्या वेळाप्रमाणे बारा वाजल्यावर दिव्याचा लखलखाट दिसू लागला विमान खाली आले मोठमोठे दिवे जवळ दिसू लागले. बहुधा विमानतळच असावे सामान उचलून वृद्ध आचार्य दोंदे म्हणाले "चला मास्को आले एकदा !" मीही मनात म्हणाले, "अखेर आपण युरोपला आलो तर." पण जमि-

नीला पाय टेकल्याखेरीज काही खरे नसते विमान पुन्हा उंच उडाले व हवेत घिरट्या घेत बसले माझ्या पोटात धस्स झाले आत्ता आत्ता जवळ दिसलेली झाडे सूक्ष्म कशी झाली ? दहा मिनिटांनी विमान विमानतळावर उतरले आम्ही प्रफुल्ल चेहऱ्याने विमान-तळावर भेटणाऱ्या रशियन नागरिकांकडे पाहू लागलो मी तर अगदी सस्मित चेहऱ्याने त्याच्या स्वागताला प्रतिसाद देण्यास उत्सुक होते पण आमच्याकडे कुणाही कर्मचाऱ्याने मान वर करूनसुद्धा पाहिले नाही किंवा प्रवाशांनीही कुतूहल दाखवले नाही इतर काही विमानांनी आलेल्या उतारूबरोबरच कस्टम, पासपोर्ट, सामान घेणे यांच्या रांगामधून एकापाठोपाठ एक असे उभे रहात होतो व रुक्षपणे सारे तपशील फॉर्ममध्ये भरून उपचार पाळीत होतो

पासपोर्ट तपासताना तपासनीस तरुणी कपाळाला आठ्या घालून पाहू लागली मी डोक्याचा रुमाल काढला तेव्हा तिला माझी ओळख पटली. रात्र झाली होती. तरी तेथील कर्मचाऱ्यामध्ये पुरुषाहून स्त्रियाच जास्त होत्या त्यातल्या तरुणी अतिशय बांधेसूद लख्ख गोऱ्या, गाल आणि ओठ लालबुंद असलेल्या होत्या प्रौढा चांगल्या भक्कम व जाडजूड होत्या त्या सगळ्या आपसात काम करताना कचकच बोलत होत्या अगदी चाळीतल्या नळावर भांडाव्यात अशा आवाजात बोलत होत्या सर्वत्र रशियनच बोलले जात होते या लोकांना स्वभाषेचा अत्यंत अभिमान आहे तुमची भाषा त्यांना येत असली तरीसुद्धा ते स्वतःच्याच भाषेत बोलत रहातील मास्को विमानतळ साधा वाटला कुठेही जाहिराती-साठी म्हणून चित्रे, तक्ते लावले नव्हते.

या देशात उत्पादन, संचलन, वितरण आणि भांडवल या सर्वच गोष्टी सरकारने हाती घेतल्यामुळे नफ्यासाठी खास खटपट करण्याचे प्रयत्न करावे लागत नाही उत्पादक देशभर एकच नफा तोच घेणार तो म्हणजे सरकार गिऱ्हाईक बांधलेले कारण त्यांना दुसरा माल घेण्याचा मार्गच नसतो त्यामुळे व्यापारी स्पर्धा व जाहिरातबाजी इथे नाही. तसेच किंमतीत फरक व माल लबाडीने तोलणे, किंमत कमीजास्त घेणे असे प्रकार नाहीत सर्व देशभर मालाचा दर्जा एकच असतो आणि किंमतही तीच असते

आता गिऱ्हाइकासाठी खुशामत करायची नाही म्हटल्यावर मग चित्रे, फलक हे लावण्याचा प्रश्नच उरत नाही त्यामुळे मास्को विमानतळ मेकप् न केलेल्या नटीसारखा दिसतो किंबहुना या देशातल्या स्त्रियासुद्धा भडक मेकप् करत नाहीत देवानेच त्यांना इतके अप्रतिम नैसर्गिक सौंदर्य दिले आहे की कसलेही रोगण न लावता त्या सुंदर दिसतात

तर विमानतळावर बस येईपर्यंत कुठे कॉफी मिळते का पाहू गेले पण पुढील पाऊण महिन्यात कॉफी हे एक दुर्मिळ व अत्यंत महागडे पेय आहे आहे असे आढळले इथे दारू अत्यंत स्वस्त काही हॉटेलात ती जेवणाच्या मेनूतही असे पण साधे स्वच्छ पाणी कुठेही

मिळत नसे फारच मागितले तर सोडा मिळे तो पिऊन जेवताना तांब्याभर पाणी प्यायल्याचे समाधान कसे मिळणार ? एक मात्र खरे की, येथे हवाच थंड असल्यामुळे फारशी तहान लागतच नाही दिवसभर धो-धो पाणी पिणे येथे बंद झाले त्यामुळेच बहुधा असेल येथे आल्यावर भरपूर चालूनही माझे गुडघे मुळीच सुजले नाहीत उलट बरे झाले

आम्ही मास्कोला उतरलो तेव्हा भारतीय वेळ साडेबारा झाली होती मास्कोचे मात्र रात्रीचे आठच वाजले होते सध्याकाळचे जेवण केव्हाच पचून पुन्हा भुका लागल्या होत्या आणि विमानतळावर काहीही न मिळाल्यामुळे मी चिडले होते एवढ्यात बस आली रशियामध्ये प्रवाशांची व्यवस्था करणाऱ्या इन्टुरिस्ट व स्पुटनीक अशा संस्था आहेत त्या हॉटेलांचे बुकिंग करणे, गाईड्स व बसेस् देणे आणि कार्यक्रम ठरवणे ही कामे करतात थोडक्यात प्रवासी ग्रुपचे सर्व काही त्यांच्या मर्जीवर असते आणि त्यांनी ठरविलेले कार्यक्रम व स्थळे यांची निवड 'वरून' तपासून शिक्कामोर्तब होऊन येते प्रवाशांनी ऐन-वेळी आपल्या मर्जीने अधिक काही स्थळे अगर कार्यक्रम सुचवले तरी ते समत होत नाहीत एवढेच नव्हे तर आधी आखून ठरविलेले कार्यक्रमसुद्धा रद्द होऊ शकतात विनंती आणि युक्तिवाद याचा काहीही फायदा होत नाही

तर लाल दुनियेत पाऊल टाकताच तेथील थंड अलिप्त स्वागताने आणि रिकाम्या पोटाने खट्टू होऊन मी निघाले विमानतळापासून शहर वीस मैल लांब होते सर्वत्र धुके पस-रले होते रस्त्याच्या दुतर्फा छानदार दाट झाडी होती पण दिवे आणि धुके यामुळे तिचे मूळ सौंदर्य काही नीट दिसत नव्हते कुठल्याही सुंदर स्थळाचे दर्शन उल्हसित मनाने व स्वच्छ सूर्यप्रकाशात झाले की ते गाव छान वाटते हे पूर्वरात्रीचे दर्शन पुसट ठसा उठवून गेले.

माथेरानच्या सुंदर झाडीबद्दल बराच काळ ऐकले होते तिचे पहिले दर्शन असेच रात्री झाले उलट महाबळेश्वरचे लाल रस्ते व दाट हिरवी झाडे सकाळी नऊ वाजता पाहिल्यामुळे मनावर कोरली गेली

आमची बस स्पुटनिक संस्थेची होती लक्झरी बसप्रमाणे सीटस् होत्या मानेखाली अभ्रे होते हे अभ्रे म्हणे रोज बदलून परिटघडीचे दुसरे घालतात मला ही स्वच्छता आवडली बसच्या काचा चांगल्या लांब रुंद असत त्यामुळे खूप मोठे दृश्य दिसत असे तरीही स्पुटनिकपेक्षा इन्टुरिस्टच्या बसेस् अधिक आरामदायक होत्या.

रात्रीही दुतर्फा वीस मैल पसरलेली दाट झाडी कळून येत होती मधेमधे चिमुकली टुमदार घरेही दिसत होती रस्ते खूपच रुंद आणि स्वच्छ होते त्या तुलनेने आम्ही लक्झरी बसने सचिवालय ते सांताक्रूज केलेला प्रवास आठवला या रस्त्याने येणाऱ्या परदेशी लोकांना आपल्या रस्त्याकडेची वेडीवाकडी बुजबुजलेली वस्ती व कुठेकुठे झोपडपट्टी, नाले व दुर्गंधी हे पाहून काय वाटत असेल ? बांद्रा ते सांताक्रुज रखरखीत रस्त्यावर झाडांऐवजी लोखंडी खांबावर फुलापानाची चित्रे फक्त आहेत हीसुद्धा मातबर कंपन्यांनी खाली

स्वत ची जाहिरात करून दिली आहेत खरी हिरवीगार राई कुठे आणि चित्रे कुठे ?

मास्को शहरातून गाडी जाऊ लागली दर फर्लांगास काचेने बंदिस्त केलेले स्थानक दिसे त्यावर 'एम्' असे लिहिलेले असे एम् म्हणजे 'मेट्रो' मास्को शहरातील लोकल वहातूक भुयारी रेल्वेने चालते तिचं च मेट्रो नाव आहे थोडया थोडया अतरावर तिची स्थानके आहेत. ही रेल्वे एकशे चाळीस कि मी आहे एवढा प्रचड मार्ग जमिनीखाली असल्यामुळे वरच्या रस्त्यावरील वहातूक सुरळीत चालते वहानानी बुजबुजलेले रस्ते, ट्रॅफिक जॅम व कर्णकर्कश भोंगे रस्त्यावर आढळले नाहीत सर्वत्र उत्तम फुटपाथ असल्यामुळे वहाने चागल्या वेगाने जात होती, फुटपाथवर फेरीवाल्यांचा बुजबुजाट नव्हता आम्ही शहरांतून जात असता पाण्याचे टँकर्स फवाऱ्यानी रस्ते धूत होते म्हाऊन शुचिर्भूत झालेले ते रस्ते मला फार आवडले आमच्या दोन्ही बसेस हॉटेल इगलेटवर पोचल्या. हे हॉटेल अठरा मजली आहे शिवाय ते मास्कोमधील सर्वात उच्च ठिकाण 'लेनिनहिल' हिच्यावर आहे ह्याच्या सर्वांत वरच्या मजल्यावर आम्हाला खोली मिळाली

आल्या आल्या हॉटेल काही मोठे आकर्षक वाटले नाही शिवाय काऊंटरवरच्या ललना सुदर असल्या तरी निर्विकार चेहऱ्याने पासपोर्ट घेत होत्या येथेही आम्हाला गरम पेय, जेवण, स्नॅक्स यातले काहीही मिळणार नाही असे ऐकून मी कपाळाला आठ्या घातल्या तेवढयात आणखी एक वैताग ! मॅनेजरने सांगितले, प्रत्येक खोलीत तीन माण-सांची सोय आहे आणि तिथे तुम्हाला चौघाना झोपावे लागेल आता इथे असे सांगितले होते की खोली दोघासाठी व रेल्वे कपार्टमेंट चौघाचे असेल यामुळे तसे ग्रुप करून मग निघालो होतो आमच्यापैकी तीन भगिनी पतिसह होत्या आम्ही चौघी एकेकटया मी, सौ पराजपे, आमदार कमल देसाई व आमदार सिंधु चौधरी

आता वास्तविक आमच्या ग्रुपचे प्रमुख व उपप्रमुख असताना मी डोक्यात राख घालायचे काही कारण नव्हते किंवा जोडप्याची गैरसोय होते म्हणून मॅनेजरशी हुज्जत घालण्याचे काही नडले होते का ? कमल देसाई खऱ्या शात त्या म्हणत होत्या, 'अग तू इतराची कशाला काळजी करतेस ? आपण चौघी एका खोलीत राहू प्रवासात जमवून घ्यावेच लागते

'अहो, पण हा एखाद्या कुटुबाने खाजगीरित्या केलेला प्रवास नाही कित्येक महिने आधी बुकिंग केलेले आहे ही मॅनेजरची पैसे वाचवण्याची युक्ती दिसते ' आता माझ्या-नतर इतरांनाही कंठ फुटला व ते ओरडू लागले अखेर मॅनेजरने आम्हाला दोघीदोघींना रूम दिली व इतरात तीन किंवा चार जण कोंबले नंतर कळून आले की, खरी रूम दोघां-साठीच होती तिसरा डनलॉपचा कोच होता जोडपे तेथे उतरल्यास एखाद्या मुलाला त्यावर झोपता आले असते तीन प्रौढांची ती सोय नव्हती माझ्या कुरकुरीबद्दल एकदोघींनी शेरे मारले तेव्हा मी विचारले

'आपण आपल्या चौघींपैकी तिघींनी एक खोली घेतली असती तर चौथी एकटी स्त्री किती विचित्र परिस्थितीत सापडली असती ? किंवा चौघी एका खोलीत झोपला असतो तर खाली जमिनीवर कोण झोपणार होते ? मला खात्री होती, सर्वच जणी वडचा असल्यामुळे, मी अनोळखी म्हणून मलाच तुम्ही जमिनीवर झोपवले असते आणि इथल्या थडीत जमिनीवर झोपून माझी पाठ दुखली असती '

अखेर जवळचे फराळाचे काही-बाही खाऊन, बेसिनचे पाणी पिऊन झोपलो तिकडील हॉटेलात भडक डामडौल नसला तरी सोई मात्र उत्कृष्ट आढळल्या स्वच्छ, शुभ्र अभ्रे, मऊ गाद्या, जमिनीवर गालिचे, तिरप्या तिरप्या लाकडी पट्ट्यांच्या जमिनी (लाकडी पट्ट्यामुळे भुई गार होत नाही ), खोलीला वॉलपेपर, दरवाजाच्या विरुद्ध दिशेला असलेल्या भिंतीचा संपूर्ण तीनचतुर्थांश भाग नुसत्या काचेचा त्याच्याखाली हिटर हिटरमुळे खोलीत मुळीच थंडी वाजत नाही चांगली मऊ, उंची दोन–दोन ब्लँकेटस् दिली होती परंतु ती फारशी लागली नाहीत काचेवर जे पडदे होते तेही दर्जेदार बाहेरच्या अंगाला शुभ्र जाळीदार लेसचा पडदा, त्याच्या आतून जाड रंगीत पडदा साम्यवादी देशात सर्वत्र सारखेच प्रवास-भर याच तऱ्हेच्या सुखसोई प्रत्येक हॉटेलात होत्या स्नानगृह चकचकीत व सुसज्ज होते

मास्कोत आलो परंतु अजून मास्कोचे दर्शन झाले नव्हते त्या थंड देशात झोप लवकर पुरी झाली सकाळचे सर्व आटोपले तरी साडेसहाच वाजत होते मग मी कॉरिडॉर-मधे आले चारही बाजूंना काचांचे झरोके होते त्यातून मास्कोच्या चतुःसीमा दिसत होत्या मी प्रथम घाईने चारही खिडक्यातून डोकावले मग एकेका खिडकीशी रेंगाळले एका बाजूने मॉस्को युनिव्हर्सिटी व मास्कवा नदी दिसली दुसरीकडून चर्चेसचे कळस दिसले उंच इमारती कुठेकुठे, तर कुठे चौक व बाजार दिसले कॉरिडॉरमधे कामगार स्त्रिया केर काढण्याचे यंत्र सुरू करून कामे उरकीत होत्या त्यांनी उत्साहाने माहिती पुरविली काल रात्री खत्रूड चेहरा करून खडूसपणे वागणाऱ्या बायकांसारख्या आज कोणी दिसल्या नाहीत मास्कोतील उंच लेनिनहिलवरच्या वरच्या मजल्यावरून गावाचे विहंगम दृश्य छानच दिसले वसंतराव वैद्यांनी सांगितल्याप्रमाणे गावात मधेमधे कारखाने, झोपड्या दिसतात का हे पाहिले जवळपास कुठेही कारखान्याची चिमणी किंवा तिरप्या शेड दिसल्या नाहीत गावाच्या हद्दीबाहेर दूरवर दोनचार धुराडी दिसली न्याहारीला निघताना आम्ही चाव्या देण्यासाठी मजल्याच्या मधल्या मोकळ्या जागेतील टेबलापाशी आलो तिथे दुय्यम मॅनेजर-बाई व इतर अनेक नोकर बायका होत्या या सर्व पस्तीस ते पन्नास वयाच्या होत्या काल रात्री भेटलेल्या बहुतेकजणी तरुण व सडसडीत होत्या आजच्या बायका पोक्त, वजनदार आणि चेहऱ्याने प्रेमळ वाटल्या आज आम्ही दोघींनी बुटीवर सुंदर रेशमी भरतकाम केलेल्या साड्या नेसल्या होत्या कानात रिंगा, गळ्यात माळा आणि हातात रंगीबेरंगी बांगड्या असा माझा वेश, त्या प्रौढ बायांना भलताच आवडला त्या साडीचे पोत,

डिझाईन पाहू लागल्या भाषा एकमेकींची येत नव्हती पण खाणाखुणा व भावदर्शन पुरेसे होते त्या आमचे असे कौतुक करत असताना दुसऱ्या मजल्यावरून सुगावा लागलेल्या आणखी काही बायका आल्या त्यांनीही आम्हाला घेरले एक दोघी म्हातान्यांनी आमचे मुकेच घेतले आपल्या देशात दृश्य, भावव्यक्ती ठाऊक नसल्याने मी तर लाजून गेले मग आम्ही न्याहारी केल्यावर बसमधे बसलो आमची बस आधी सुटली म्हणून पोरकट आनंद झाला तोच आत बसलेल्या सौ दिकोंडा म्हणाल्या, 'अहो, आमचे हे चष्मा आणायला परत खोलीवर गेले होते ते मागेच राहिले ' कमल देसाईंनी ड्रायव्हरला बस वळवायला सांगितली कोणी म्हणाले ते आपल्याला टॅक्सीने येऊन गाठतील पण कमलताई ह्या ज्या शिक्षिका व समाजकार्यकर्त्या ग्रुपमधील एकाला मागे टाकून पुढे जाणे त्यांना पटले नाही. त्यांनी बस मागे घ्यायला लावली मी पुन्हा एकदा हिरमुसले मास्को-दर्शन लांबतच होते पण कमल देसाईंचा सर्वांना सांभाळण्याचा हा गुण मात्र मनाला पुढे मास्को प्रदर्शनात मी हरवले असे जेव्हा त्यांना वाटले तेव्हा त्यांनी व मॅनेजर सक्सेना यांनी मला शोधण्याची खूप कोशिश केली असो अखेर दिकोंडांना घेऊन आमची गाडी दुसरीच्या मागून निघाली लेनिनहिल सुंदर झाडीने आच्छादलेली आहे ही झाडे बारीक बुध्याची असतात, उंच असतात डेरेदार वृक्ष कुठे दिसले नाहीत या लेनिनहिलवरच रशियाच्या मन्त्र्यांचे बंगले आहेत आमच्या हॉटेल इगलेटला लागूनच पंतप्रधान कोसिजीन यांचा बंगला होता प्रत्येक बंगल्याचे आवार प्रशस्त दाट झाडी, मधे बाग काळ्याकुळकुळीत गजांचे कुंपण रस्त्या-कडेला त्यावर सरकारी खूण म्हणजे हातोडा-कोयता कोरलेला असे दारात कडक पहारा आमच्या शेजारच्या कोसिजीनच्या बंगल्यावर एका सायंकाळी मराठवाड्याचे चार-पाच प्रतिनिधी गेले मलाही त्यांनी येण्याचा खूप आग्रह केला परन्तु मला एक दडपण वाटे आपण अतिक्रमण करतोय असे वाटून कुणा पहारेकऱ्याने गोळी झाडली तर काय करा अखेर ते माझा फोटो असलेली कादंबरी घेऊन गेले तीवर मी 'कोसिजीन यास भेट असे लिहिले ते पहारेकऱ्याला विचारून बंगल्यामध्ये जाऊ शकले मात्र कोसिजीन महाशय घरात नव्हते.

तर ते असो आम्ही लेनिनहिलवरचे मन्त्र्यांचे बंगले पहात गावात आलो समोरच मास्कवा नदी उजवीकडे आणि डावीकडे सुप्रसिद्ध मास्को युनिव्हर्सिटी होती तिचे उंच शिखर आणि भव्य बांधणी पाहून तो भव्य राजवाडाच वाटला युनिव्हर्सिटीचा परिसर प्रचंड आहे तसं पाहिलं तर इथली वाचनालये, ग्रंथालये, संग्रहालये, रुग्णालये, विद्यालये आणि सरकारी कचेऱ्या या सर्व वस्तू भव्य आणि जुन्या बांधणीच्या आहेत आणि याला कारण रशियन क्रांतीनंतर राजेरजवाडे, अमीरउमराव, सरदार-दरकदार ह्यांच्या प्रासादांची मालकी सरकारकडे आली सोव्हिएट सरकारने या इमारतींचा सार्वजनिक हितासाठी उपयोग केला ह्या मास्को युनिव्हर्सिटीतील एक मुलगी महाराष्ट्रीयन असल्याने आम्हाला भेटण्यास आली तिच्याबरोबर रशियन मैत्रिणीही होत्या तिने सांगितले की,

'आमच्या युनिव्हर्सिटीत अत्यंत विशाल ग्रंथालय आहे येथे बेचाळीस हिंदी विद्यार्थी शिकत आहेत रशिया व त्याच्या सोशालिस्ट मित्रराष्ट्रांमधे प्रत्येक शहरी विद्यापीठ आहे. ह्या शहराजवळील सर्व कॉलेजे त्या विद्यापीठाची असतात आपल्याप्रमाणे अनेक शहरांना एक विद्यापीठ नसते मात्र शिक्षणाचा दर्जा व अभ्यासक्रम सर्व देशभर एकच असतो. मास्को युनिव्हर्सिटीत संस्कृत व मराठी सेक्शनही आहेत संस्कृतचा अभ्यास एम् ए, पी एचडी पर्यंत करता येतो इतकेच काय पण येथे संस्कृत उच्चार शिकवण्यासाठीही एक कोर्स आहे आणि हे प्रोफेसर रशियन आहेत ' हे ऐकून तर मला फारच आश्चर्य वाटले. अशा मास्कोत आठ शिक्षण संस्था व चौसष्टशे विद्यार्थी आहेत

मास्कवा नदी शहरातून अनेक शाखांनी गेली आहे गावाच्या मध्यभागी इमारतींना जागा मिळावी म्हणून तिचे उंच काठ भक्कम बांधले आहेत एका बाजूला झाडी आहे दुसऱ्या बाजूला नवीन बांधलेल्या उंच इमारतींचा व्यापार विभाग आहे पुढे परदेशी वकिलाती आहेत त्याही इमारती नवीन आहेत या नदीतून लाँचेस् चालत होत्या रहदारीचा काही बोजा ह्या लाँचेस् उचलतात रस्त्याने खाजगी मोटरकार्स फारशा दिसत नव्हत्या रस्ते रुंद होते त्यांचे मधोमध विस्तीर्ण फुटपाथ होता तर कुठे बाजूला फुटपाथ होते जाणाऱ्या व येणाऱ्या बाजूला तीन-तीन ट्रॅक्स होते त्यापैकी कडेचा ट्रॅक हा ट्राम्ससाठी होता. रशियात खाजगी गाड्या नसल्या तरी या ट्राम्स अत्यंत सोईस्कर व सुखद आहेत त्या गर्दीने भरून सांडत नसतात एका पाठोपाठ एक लवकर लवकर येतात सर्व लोकांना आपापल्या ठिकाणाहून कुठेही जाण्या-येण्याची सोय या ट्राम्सनी होते आम्ही पाहिलेल्या युरोपातील प्रत्येक शहरी या ट्राम्स आहेत आपल्याकडे होत्या तशा कळकट आणि मंद नाहीत शिवाय बसेसुद्धा आहेत. प्रवासी बसेस् खूपच आहेत परदेशी प्रवाशांना पाहून आजूबाजूच्या ट्राम, बसमधून अगर फुटपाथवरून जाणारी रशियन बाळे हात उंचावून टाटा करीत तिकडील सर्व टॅक्सीज्‌चा रंग पोपटी असतो त्यावर काळ्या ठिपक्यांची निशाणी असते मंत्र्यांच्या गाड्या फार भपकेदार नव्हत्या त्यांचा रंग एकजात काळा

मास्कवा नदीच्या काठाने बस जात असता मधूनमधून चर्चेसचे कळस दिसत हे कळस चर्चचे असले तरी त्यांचे वळण मशिदीसारखे वाटे नंतर मला कळले की काही काळ या भागात मंगोलियन व तुर्क मुसलमानांनी राज्ये केली आहेत त्यामुळे मुस्लिम संस्कृतीचे वळण कुठेकुठे दिसते काही कळस मोदकासारखे तर काहींच्या रेषा तळाकडून कळसाकडे तिरप्या लहरीदार होऊन येत शुभ्र रंगावर सोनेरी नक्षी असलेले उलट्या घमेल्याच्या आकाराचे, लोंगटीसारखे, हिरव्या रंगाचे, नक्षीचे असे अनेक कळस दिसले

आमच्या गाईडने असे सांगितले की, मुसलमानी अंमल असताना चर्चच्या कळसावरील क्रूसाच्या वरती चांदतारा असे झारच्या काळात ख्रिश्चनधर्म प्रभावी असल्याने क्रूसाच्या खालच्या बाजूला चांदतारा असे, तरीसुद्धा ख्रिश्चन राजा असताना क्रूसाच्याखाली



...२

तरी चांदतारा का ठेवला असा प्रश्न मला पडलाच पण त्याचे उत्तर मिळाले नाही

ही सर्व चर्चेस् आता प्रार्थनास्थळे नाहीत रशियामध्ये धर्माला महत्त्व नाही राष्ट्रीय पातळीवर धर्माचे स्तोम माजवले जात नाही तरीपण लोकांवर कोणतीही सक्ती नाही त्यामळे काही थोडी चर्चेस् अजून ठेवली आहेत ज्याचा धर्मावर विश्वास आहे त्याना तेथे जाऊन प्रार्थना करता येते लग्नही धार्मिक पद्धतीने करता येते मात्र अधिकृत नोंदणी करावीच लागते उरलेल्या चर्चेस्मधून पुराण वस्तू प्रदर्शने, आर्ट गॅलरीज्, संस्था, शाळा हे चालविले जाते शहरभर फिरताना वेगवेगळ्या प्रकारच्या अॅकॅडमिजची कॉलेजे व वसतीगृहे लागली एखादी नवी इमारत सोडली तर बाकी सर्व इमारती जुन्या पद्धतीच्या होत्या. मास्कोतील या इमारती अनोळखी वाटल्या नाहीत कारण त्या रोमन गॉथिक पद्धतीच्या होत्या

आपल्या मुंबईत फोर्टमध्ये अशाच बहुतेक इमारती आहेत रुंद स्तंभ, त्यावर आडव्या रेषा, कमानीदार खिडक्या, दरवाजे, वर त्रिकोणी दर्शनीबाजू, ग्हुरांडचाचे खांब गोलाकार, रेघारेघाचे आणि त्यावर वरखाली नक्षी फरक एवढाच की आपल्याकडे दगड विपुल त्यामुळे दगडच तासून त्या पद्धतीने रचून बांधलेले आहेत आणि तिकडे विटांच्या बांधणीत तसे आकार बसवले आहेत, अगर चुन्याच्या गिलाव्यातून कोरले आहेत एखादी इमारत संपूर्ण लाल रंगाची असे गावातून आम्ही तीन दिवस फिरत होतो गमत अशी की रोज ठराविक मार्गाने बस लाल किल्ल्याशी जाई व परत येई काही ठराविक भाग जवळून व काही दुरून दाखविले जात कित्येक वेळा संध्याकाळी असे वाटे की येथे डिनर लवकर होतो. या थंड हवेत कितीही फिरले तरी दमायला होत नाही तेव्हा रात्री सात ते दहापर्यंत खूपखूप फिरावे आणि टॅक्सी करून परत यावे परतु माझ्या विचाराला कुणीही पाठिंबा दिला नाही आणि मला एकटीलाही जाऊ दिले नाही सोव्हिएट देशात फिरताना माणसाला एक धाकधुक कायम असते सोव्हिएट व त्याच्या सोशालिस्ट मित्रराष्ट्रामध्ये कुठल्याही हॉटेलात तुम्ही उतरलात की उतरल्याबरोबर आपला पासपोर्ट आणि व्हिसा घेतला जातो. त्यामुळे गावात हिंडताना तुमची ओळख पटवणारे साधनच तुमच्याजवळ नसते असे हे निराधार हिंडताना आपण अज्ञानामुळे जर एखादा रस्ता चुकीने ओलांडला किंवा एखाद्या निषिद्ध ठिकाणी प्रवेश केला तर पोलिस पकडील आणि मग नसत्या कटकटी आपल्या दौऱ्यात येतील म्हणून कुतूहल दाबून स्वस्थ बसावे लागते बरे येथील नियम फार कडक असतात येथे फुटपाथची सोय उत्तम असते रस्ते ओलांडण्यास, भुयारे किंवा झेब्रा क्रॉसिंग किंवा सिग्नल असेल तेथेच नियमाप्रमाणे ओलांडावे लागतात फुटपाथ सोडून रस्त्यात चालणे हाही गुन्हा होतो वाटेल तिथे थुकणे, हातातील कपटे टाकणे या आपल्या सवयी ! याही गोत्यात आणू शकतात भाषेची सर्वांत मोठी अडचण असायची रशियन लोकांचे देशप्रेम अफाट आहे ते रशियन भाषेखेरीज बोलत नाहीत मी जाण्यापूर्वी महिनाभर गाईडस् आणून घेतली भाषा शिकण्याचा प्रयत्न केला परतु इग्रजीसारखी दिसली तरी ती

लिपी बरीच भिन्न आहे व उच्चार तर फारच वेगळे आहेत उदा आर् म्हणजे पी मास्कोचे स्पेलिंग MOCKBA एच् चा उच्चार न काही अक्षरंच वेगळी आहेत दक्षिण युरोपमध्ये फ्रान्स, जर्मनी, इटली येथे माणूस जेव्हा फिरतो तेव्हा त्याला भाषा कळली नाही तरी ठिकठिकाणच्या पाट्या वाचून अदाज तरी येतो इथे पोस्ट आणि लेनिन हे दोन शब्द शिकायला आठ दिवस लागले

भाषा येत नसताना नवख्या गावात हिंडणे अखेर धोक्याचेच मला असे कळले होते की, युरोपात इग्रजीपेक्षा जर्मन जाणणारे लोक अधिक आहेत बहात्तर साली मी जर्मन शिकले होते निघण्याआधी ते धडे उजळले होते रशियामध्ये शाळा-कॉलेजात दुसरी भाषा जर्मन घेतात तथापि त्यांच्या मनात असेल तरच ते त्या भाषेत उत्तर देतात तेव्हा पासपोर्ट नाही आणि भाषेची अडचण यामुळे मला एकटीला जाऊ दिले नाही स्वतंत्रपणे काही बघावे, नागरिकांशी बोलावे अशी सधी मिळेना आमच्याप्रमाणे त्याही लोकांना काही भीती असावी आम्ही परदेशी लोकांशी जितके मोकळेढाकळे वागलो तसे निदान हे लोक तरी आमच्याशी वागले नाहीत रशियन कामगाराचे, मध्यम वर्गियांचे, असे एखादे घर बघावे अशी फार इच्छा होती परतु नागरिकांच्या खाजगीपणाला व्यत्यय आणायचा नाही म्हणून त्यांनी आम्हाला कुणाच्याही घरी जाऊ दिले नाही आमची गाईड तानिया ही एक विवाहित गृहीणी होती आणि किएव्हला गेलो होतो तेथे तिचे घर होते प्रवासभर तानिया आमच्याशी अत्यंत सौजन्याने व आपुलकीने वागली आमचे व्हेज-नॉनव्हेज मेनू तिने हॉटेलला समजावून देऊन सोय पाहिली या आपुलकीमुळे आम्ही पाच सहा दिवसांच्या सहवासाने धिटावून तानियाला जेव्हा विचारले की, 'तू आम्हाला फक्त तुझे घर दाखव आमच्या अठेठ्चाळीस जणांच्या ग्रुपला तू चहा-पाणी काही देऊ नको' (कारण चहा फार महाग असतो )

त्यावर ती म्हणाली, 'मी बरेच दिवसानी घरी येत आहे माझे घर स्वच्छ नसेल' आम्ही म्हटले, 'आम्ही तिकडे लक्ष देणार नाही' परंतु तिने गोड शब्दात नकार कायम ठेवला

अठरा तारखेला सकाळी वेगवेगळ्या रस्त्यांनी नेऊन लाल चौका दाखवला चौकात खडबडीत दगडांची फरशी आहे जुन्या चुनेगच्ची बांधकामाने दगड वेगळ्यावेगळ्या डिझाईन्स्‌मध्ये बसवलेले आहेत नक्षीदार शिपल्या शेजारीशेजारी ठेवल्यावर दिसतील तसे हे दगड आहेत चौकाच्या मधोमध एक गोल चबुतरा आहे क्रांतिपूर्वी इथे राजेलोक फाशीच्या शिक्षाचे कैदी फाशी देत १९१७ मध्ये आक्टोबर क्रांतीच्या वेळी येथेच झार शाहीतील राजेरजवाडे व उमराव यांचा वध करण्यात आला त्या जागेजवळ मी दहा मिनिटे रेंगाळले समोर एक चर्च होते त्याच्याभोवती बांबूच्या पराती लावून दुरुस्ती चालली होती रशियात अनेक ठिकाणी महत्त्वाच्या इमारतींची डागडुजी व रंगरंगोटी

चालू आहे कारण ऑलिंपिकच्या वेळी शहरे चकाचक दिसावीत आम्ही ज्या सर्व इमारती पाहिल्या त्या नव्या किंवा जुन्या असल्या तरी त्यांना सुंदर रंग नाही हे सरकार आवश्यक व महत्त्वाच्या गोष्टींवर खर्च करते भपक्यावर नाही त्यामुळे रंग मूळ चुन्यासिमेंटचे काय असतील ते किंवा फार तर स्वस्त पिवळ्या मातीचे इमारतींमधील काही काही गल्ल्यांमध्ये, अगदी सदाशिवपेठी, जुन्या पेशवाई थाटाचे वाडे असतात, तसे वाडे पाहिले. मात्र सर्व रस्त्यावर दुतर्फा पडकेझडके, गलिच्छ असे काही आढळले नाही रस्त्याकडेच्या इमारती त्याच्यापलीकडच्या भागाला झाकण्याइतक्या पुरेशा उंच असत मग बसमधून जाताना मी एक युक्ती केली, 'जे न देखे रवि ते देखे कवि !' मागल्या वस्तीमधून रस्त्यावर येण्यास मोठेमोठ्या कमानी असत या कमानींच्या आत ठरवून नजर टाकायची पुणे, सातारा, वाईसारखे जुने वाडे, चौक, चाळी दिसत.

कधी कधी आम्हाला शॉपिंगसाठी एका रोडवर नेत बाजारपेठेची टोके दाखवून 'एवढ्या भागात तास–दीड तास फिरा आणि बस नंबर लक्षात ठेवून बरोबर वेळेत परत या' असे सांगितले की तेवढा वेळ मोकळा मिळे ह्या वेळात मी दुकानाच्या दिंडीदरवाजाच्या आतमध्ये काय वस्ती आहे ते पाहून येई तेथील घरांना दर्शनी भिंत मोठ्या काचेच्या झडपांची असते कायम थंडी असल्यामुळे काचा बंद असतात या शिवाय त्या खिडक्यांतून डोकावून (दुरून) आतल्या खोल्या कशा दिसतात ते पाहिले बहुधा काचेच्या आत लेसचे शुभ्र पडदे असत. दिसलेच तर फर्निचर व पुष्पगुच्छ दिसत छोटे छोटे बंगले गावाबाहेर मोकळ्या जागी खाजगी वचतीतून बांधता येतात तेही पाहिले गावामधील बहुतेक भाग दाखविला तो शाळा, कॉलेज, हॉस्टेलस्, म्युझियम्स्, ग्रंथालये व नाना प्रकारची ऑफिसे रहाण्याच्या वस्त्या व कामाच्या जागा या एकात एक असतात नवीन वसाहती दाखविल्या त्या आपल्याकडील ब्लॉक्स असलेल्या इमारतीप्रमाणेच होत्या त्यांच्या बाल्कनीमधून कुंड्या, वेल वाढविलेले होते काही गृहिणी काचा पुसताना व झाडांना पाणी घालताना दिसत या देशातून कोणाचेच शोषण नसल्यामुळे खाजगी मालकी व खाजगी नोकरी नाही तुम्हाला स्वतःपुरते भरपूर बचत करून घर बांधता येते पण भाडोत्री ठेवून उत्पन्न कमवता येत नाही घरकामाला खाजगी नोकर ठेवता येत नाही घरकामे ही स्वतः किंवा यंत्रावर करावी लागतात

मास्कवा नदीकाठीच ऑलिंपिकसाठी बांधलेले भव्य स्टेडियम आहे आपल्या आर्यभट्ट उपग्रहाच्या आकाराचे वाटले दोन वाट्या एकावर एक ठेवाव्यात तसे काचेच्या छत्र्या असलेले दोन बंद स्टेडियम्स् होते आणि दोन खुले होते मास्को ऑलिंपिक एकट्या मास्को शहरातच होणार नाही मास्कोमध्ये चार स्टेडियम्स व किएव्ह, लेनिनग्राड, मिन्स्क व तालिन येथे प्रत्येकी दोन दोन असे आठ मिळून बारा स्टेडिअम्स् बांधलेत

स्टेडिअमजवळच्या एका रस्त्याने आमची बस जात असता तानियाने सांगितले,

'ऑलिंपिकसाठी सहाच महिन्यापूर्वी येथे झाडे लावली खास निवड केलेल्या रोपांची निगा राखून ही आता बारा फूट झाली आहेत. सामन्याच्या वेळेपर्यंत ती आणखी सात आठ फूट वाढतील ' केवढी ही सार्वजनिक सौंदर्यदृष्टी पाहा ! बसमधूनच आम्हाला सिने-स्टुडिओ दाखवला सिनेधंद्याचे राष्ट्रीयीकरण झाले आहे या स्टुडिओत आठ हजार कामगार काम करतात पुढे युक्रेन हॉटेलजवळ युक्रेन कवि ' तारास शेरशेवको ' याचा पुतळा आहे या भागात मोठमोठी सिनेमागृहे, सुपरमार्केट, ओपनएअर मार्केट, सर्वात मोटी बुक हाऊसेस् आहेत अठराशेचोवीसमध्ये बांधलेले सुप्रसिद्ध बॉलशॉई थिएटर हे सर्वात मोठे आहे तिथे तीन हजार प्रेक्षक बसतात जवळच विलओपात्रा, चिल्ड्रेन्स थिएटर आहेत

जवळच जगातील दोन नंबरची लायब्ररी, राजवाड्यासारख्या इमारतीत आहे हीच लेनिन लायब्ररी हिच्यात जगातील सर्व भाषाची पुस्तके आहेत. हिंदी, मराठीही आहेत ' हे ग्रंथालय पहाच ' असे इथे सर्वांनी सांगितले होते माझीही तीव्र इच्छा होती येथील मराठी विभागास भेट देण्यासाठी मी माझी पुस्तकेही आणली होती परंतु आम्हाला बाहेरूनच तीन चार वेळा लायब्ररी दाखवली हे ग्रंथालय व मास्को युनिव्हर्सिटी पहाण्या-साठी मी व आणखी काही व्यक्तींनी फार हट्ट केला. परंतु त्यांनी आखलेल्या यादीबाहेर काहीही दाखविले नाही

आमचा दुसरा गाईड हा लहान विद्यार्थी होता वागायला फारच गोड ! त्याला मी अखेर म्हटले,

' वादिन, मी टॅक्सीचा खर्च करते तू मला लेनिन ग्रंथालयात घेऊन जा. मोठा ग्रुप म्हणून सर्वांना सोडत नसतील पण एक ग्रंथकार म्हणून तुझ्या हमीवर मला एकटीला तरी सोडतील का ?'

' वेल्. आय विल् टेक यू देअर पण तुम्हाला आत प्रवेश देणे माझ्या हातात नाही इथल्या अधिकाऱ्यांना तुम्हीच विचारा ' असे वादिन म्हणाला

मी कपाळाला हात लावला. तेथील अधिकाऱ्याशी मी काय रशियन भाषेत युक्ती-वाद करणार ?

युनिव्हर्सिटीबाबत अनेकांचा आग्रह होता सर्वच खट्टू झाले तेव्हा आमची टुरिस्ट बस युनिव्हर्सिटीच्या रस्त्यावर उभी करून आमचे नेते प्राणलाल व्होरा म्हणाले, ' ही पाहून घ्या युनिव्हर्सिटी '

व्होराजीसारखे थंड डोक्याचे व अडचणीतही शांतपणे राहून मार्ग काढणारे नेते बरोबर होते म्हणून बरे झाले मी फार लवकर थकून जाई अपेक्षित गोष्ट घडली नाही किंवा सोय झाली नाही की चिडून जाई मास्कोत हॉटेल ' ईगलेट ' मध्ये शिरताशिरताच मी नव्हते का भडकले ? पुढे बर्लिन भिंत ओलांडण्याच्या वेळीही मी अशीच होड घेतली.

पण या साम्यवादी देशात युक्तिवादाचा उपयोग नसतो नाही म्हणजे नाहीच !

तर लेनिन लायब्ररी दुरून पाहिली बॉलशॉई थिएटरमध्ये आमचा एक प्रोग्रॅम पाहण्याचा बेत आखलेला होता त्याऐवजी सर्कस ठरली बॉलशॉई अखेर दुरून पाहिले, म्हणून आमच्यामधील काही मडळी रात्री एक कॉन्सर्ट पहायला तिकीट काढून गेली. बायकाही गेल्या मी ती वेळ कपडे धुणे व झोप विश्रांती यात घालवला मला पाश्चात्य सगीताची चढी धून सोसत नाही.

रात्री सारे त्या कार्यक्रमाच्या नावाने कोकलत आले

'का, काय झाले हो ?' मी मैत्रिणींना विचारले

'छी' हल्लागुल्ला नुसता ! नुसती ठणाणा वाद्ये ! अन् त्याच्या सगीताचे शब्द आपणाला काय कळतात ?'

मी हसले.

'तू काय केलेस ?'

त्या बसमध्ये खाली बसल्या तेव्हापासूनच मी जनसंपर्क साधण्याच्या बेतामध्ये होते मला रशियन व पाश्चात्य जनतेशी सौहार्दाचे नाते जोडायचे होते पुढील वर्षी ऑलिंपिक-साठी प्रचंड प्रमाणावर परकीय पाहुणे येणार होते कॉमसॉमॉल, फ्रेंडशिप सोसायटचा, प्रवासी सस्था हे सर्व त्याची तालीम म्हणून यदा अतिथींची आवक वाढती करून व्यवस्था करण्याची सवय करीत होती म्हणून ७९ साली उदारपणे व्हिसाज् दिले गेले पश्चिमेची-पूर्वेची राष्ट्रे व रशियाची मित्रराष्ट्रे यातून टूरिस्टस् येत होते आम्ही मास्कोत हिंडलो त्यावेळी गावात सहा हजार टूरिस्टस् होते यामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींची सख्या मोठी होती खुद्द आमच्या ईगलेटमध्ये मुलामुलींच्या अनेक सहली आल्या होत्या त्यांचे मास्तर-मास्तरणी खडूस नव्हत्या त्यामुळे मुले खूप हिंडत, बोलत होती खाली लाऊजमध्ये मी एकटी सर्व मुलात फिरले. भाषेवाचून नडत नव्हते मला जर्मन येत होते. ते जाणणारा एकादा विद्यार्थी असेच मुलामध्ये आले ती हातात भारतीय तिकिटांची वही घेऊन त्यात दुर्मिळ जुने स्टँपस् होते शिवाय एक खोकाभर गांधी, नेहरू, वाघ व मोर याची चित्रे असलेले अलीकडील स्टँपस् बरोचशी दहा, पाच, तीन, दोन, पैशाची नाणी अन् रावळगाव चॉकलेटस्

प्रथम माझी साडी व कुकू पाहून लिफटपासूनच सर्वजण 'इंडिस्की ?' असे विचा-रीत. मी हो म्हटले (नेवढे दा) हो व न्येत (नाही) इतपत थोडे रशियन येत होते शिकले थोडेसे निघण्यापूर्वी मात्र इग्रजी लिपीत शिकलेली वाचताना तारांबळ ! म्हणजे दात विचकून जबडा हालवीत च्युइगम आहे का विचारीत च्युइंगम इकडे भलतेच आवडते. तिकडे जाणारांनी ते भरपूर नेले तर फार लोकप्रिय होता येईल मी त्याऐवजी चॉकलेट दाखवी तेही त्याना आवडे. माझे स्टँप त्याना दिले तिथे रशियाचे जॉर्जिया, आर्मेनिया,

कझाग वगैरे प्रांतांतले विद्यार्थी आले होते त्यांना ह्या वस्तू देत मी त्यांना इंग्लिश किंवा जर्मन जाणणाऱ्यामार्फत त्यांचे कसे काय चालते, काय मिळते, काय नाही विचारले.

त्यानी स्पष्ट म्हटले नाही तरी कळून आले तिकडे चहा, कॉफी, साखर, मसाले भलतेच महाग त्यामुळे टॉफी वगैरे मिठाया व खमग वस्तू नाहीत देश गरजेच्या वस्तू सर्वांना समान वाटप करून देते त्यामुळे रोज कोपऱ्याकोपऱ्यावरच्या केन्द्रात जे येईल ते घ्यायचे आठवडयाचा बाजार शनिवारी दुपारी करायचा पुस्तके बहुधा मात्र चांगल्या व भरपूर विद्यार्थ्यांना शिक्षण फुकट आणि पाहिजे तो कोर्स निवडण्याचे स्वातंत्र्य मिळे. कुणीही बेकार रहात नाही त्यामुळे विद्यार्थी असंतुष्ट नव्हते सिनेमा नाटके मुलांना सवलतीत. सहली, सर्कशी यासाठी खूप सवलती आहेत विश्रामधामात खास विद्यार्थ्यांना स्वस्तात जागा ठेवतात त्याचाच फायदा घेऊन मुले सुटीत फिरतात ही मुले अशाच सवलतीने आलेली क्यूबाचे व अरबी विद्यार्थीही आले होते

अर्थात चैनीच्या निरर्थक वस्तूचे इथे उत्पादनच करीत नाहीत. त्यामुळे चुइंगम नसतो मुलींना आमच्या रंगीबेरंगी बांगडया, माळा, डूल, खडयांचे नेकलेस आवडत मी त्याना बांगडया देऊ केल्या पण व्यायामपटु युरोपियन मुली त्या आमच्या मनगटाच्या मापाच्या बांगडया त्यांच्या पाच बोटातूनसुद्धा जाईनात, अगदी त्यांच्या करंगळीत चढेना स्क्रूची कर्णफुले देणार तर त्याचे कान टोचलेले नसत मात्र मण्यांच्या माळा फार आवडत ह्याना त्या भेट म्हणून दिल्या, नाणी तिकीटे यांचे नमुने त्यानीही मला दिले.

माझ्याकडे लेनिन जन्मशताब्दीनिमित्त भारताने काढलेली तीन टपाल तिकिटे होती ती मात्र सर्वानाच हवी होती साऱ्या मुलामुलींनी मला गराडा घातला अखेर लकी नंबर काढून ती दिली कुणी कुणी आमचे एकत्र फोटो काढले भाषेची फारशी अडचण न येता पत्ते दिले घेतले व दोन तास मजेत काढले नंतर कपडे धुऊन झोपले तोवर कॉन्सर्टला गेलेले लोक चालत तणतणत परतले

अठरा सप्टेंबरला सकाळी गाव फिरलो व सायंकाळी क्रेमलिनचा किल्ला पहायला निघालो कित्येक इमारतीवर चकचक नळीची कौले होती थिएटर स्क्वेअरमध्ये कार्ल मार्क्सचा पुतळा होता निळया काचाची डौलदार भव्य इमारत ' हॉटेल नॅशनल ' हे हिटलरने पूर्वी रशियावर विजय मिळवून बांधले होते तास 'चे ऑफिस पाहिले सोव्हिएट चौकात एका छोटया बागेत सुंदर कारंज्याजवळ एका लढवय्या सरदाराचा पुतळा होता तर कवि पुष्किन चौकात अशीच बाग व कारंजे होते कवि पुष्किनचा पूर्णाकृती भव्य पुतळा आहे मार्क्सचा हितचिंतक स्फूर्तिदाता स्नेही एंजल्स याचा पुतळा तर सर्वात मोठा आहे एवढा मोठा पुतळा कसा घडवला असेल ?

जगप्रसिद्ध क्रेमलिनमधे लांबलचक पायवाट चालत जावे लागले जरा पाऊस पडून गेला होता इकडे नेहमीच कोडाकोडा पाऊस भुरभुरतो या लोकांचे ओव्हरकोटस् एका

बाजूने लोकरी व दुसऱ्या बाजूने जलरोधक आवरणाचे असतात त्यामुळे थंडी व पाऊस दोन्हींमध्ये ते चालतात

आमची गाईड तानिया म्हणाली,

'इथे पाऊस असाच किंचितसा पडतो थंड हवेने सदा हिरवळ सतेज रहाते फुले टवटवीत असतात हा झिमझिम पाऊस त्यांना पुरतो'

'मग नद्यांना पूर कसले येतात ? वाचतो पुराबद्दल'

'उत्तरेकडील बर्फ वितळले की मोठे पूर येतात इतरत्रही बर्फ असतेच ते वितळले की नद्यांची पातळी वाढते'

तर क्रेमलिनचे तट चक्क विटांचे आहेत वरून गिलावा होता लाल रंग वरून देत असणार इथे रंग टिकतात क्रेमलिनच्या आत मैदाने व सूचिपर्णी झाडेच जास्त होती मात्र तिथे राजवाडा फक्त दाखवला नाही की तेथला वाडा आधुनिक होता ? की क्रांती-मध्ये तो पाडवला ? एक मोठी इमारत होती तिच्या कडेकडेनेच नेले मात्र त्या भव्य इमारतीचे खांब अप्रतिम कोरीवकामाने नटलेले होते पोर्सलीनला डिझाइन चांगले होते प्रवेशद्वारावर व आत पंचकोनी आकाशकंदिलासारखे पाच माणकाचे तारे होते आकाश-कंदिलाला लाल जिलेटिन कागद लावून कडांना सोनेरी बेगडीच्या पट्ट्या लावाव्या तशा या लाल चांदण्या दिसत होत्या अन् या सर्व खऱ्या माणिकरत्नाच्या ? वर सोन्याची बेलबुट्टी ? बापरे !

आमच्या मैत्रिणीने मंगळसूत्राच्या पदकामध्ये दहा–बारा माणकाचे बाजरीएवढे तुकडे बसवले तर त्याची किंमत म्हणे दीड हजार झाली तर ह्या भल्यामोठ्या आकाश-कंदिलाएवढ्या माणकाला काय पडले असेल ? स्वस्ताईतही लाखात मोजले असले पाहि-जेत काटकोनातून कॅथेड्रल स्क्केअरमध्ये आलो इथेच ते सुप्रसिद्ध क्रेमलिन कॅथेड्रल होते एक मोठे व एक छोटे मोठ्याला मध्यवर्ती उंच कळस व भोवती चार कळस होते. हे पाचही भव्य कळस म्हणे सोन्याचे होते छोट्या चर्चलाही असेच पाच सोन्याचे कळस होते मी विचारून घेतले– सोन्याचे की सोनेरी ? पण सोन्याचेच होते या देशात एवढ्या उघड्यावर सोने माणके टिकतात हे केवढे प्रशंसनीय आहे ? आमच्याकडे दिव्य तेज असलेली प्रत्यक्ष देवमूर्ती चोरीला जाते इथे सुरक्षितता आहेसे दिसते श्रेय इथल्या लोकांच्या दानतीला व चोख पहाऱ्यालाही दिले पाहिजे

आत क्रेमलिनमध्ये आले खरी समोरचे ते चर्च ! त्याचे कोरीवकाम थक्क करणारे. त्याच्या आत सुंदरसुंदर काचेची नक्षीदार झुंबरे आहेत असे वाचले होते चित्रे पाहिली होती पण इथे तर त्या मोठ्या चर्चभोवती बांबूच्या पराती लावून दुरुस्ती चालवली होती. त्यामुळे दोन्ही चर्चेसमध्ये प्रवेश देत नव्हते चोवीस तासांनी पुन्हा वैतागाची वेळ ! माझ्या-इतका कुणाला हिरमोड वाटला नाही पण मी मनात म्हटले, बाहेरचे चर्च नि ही

आतली दोन अशी सारी एकदम दुरुस्तीला कशाला काढली ? अन् सारे प्रवेश बंद ठेवले तर हजारो रुपये खर्चून एवढ्या दूर येणाऱ्या मुसाफिरांनी काय पहावे ? बाहेरून दिसणाऱ्या इमारती ?

वेळ होता म्हणून त्या चौकासाठी दिलेली शेड्यूल्ड पधरा मिनिटे सारे गाइडभोवती गोळा होऊन माहिती ऐकत होते मी मनात म्हटले, मास्कोला येऊन हे मुख्य कॅथेड्रल न पाहिले तर मुंबईस येणाराने समुद्र न पहाण्यागत होईल काशीला जाऊन काशी-विश्वेश्वर न पहाणे ठरेल मी हळूच निसटले उजव्या बाजूला चर्चला बोळामधे दरवाजा होता तेथे गेले एक म्हातारा तिथे देखरेखीला होता रशियन माणसाला थोडे जर्मन कळतेच कारण कैकदा जर्मन लोकांशी त्यांच्या लढाया झाल्यात तर मी जर्मन बोलत हातवारे करून त्याला समजावले की, 'मी इंडिस्की आहे बॉम्बेहून दूरवर आले हे कॅथेड्रल नि झुंबरे न पाहिली तर गेल्यावर माझ्या बांधवांना काय सांगू ? नुसताच क्रेमलिनचा विटांचा तट पाहून नि इमारती दुरून पाहून परतू ? मी पुन्हा येणारी नव्हे ते शक्य होत नाही' माझे बोलणे तो म्हातारा हिरवे डोळे बारीक करून ऐकत होता चटकन् त्याने माझा हात धरला तोंडावर उभे बोट ठेवून खूण केली 'हा हॉल चटाचट बघून घे बोभ करू नको'

आतली स्टुले, शिड्या, रंगाचे डबे, घडवच्या चुकवीत मी आत नक्षीदार आल्टर कोरीव खांब हे सर्व अधाशागत पाहिले भिंतीवरली चित्रे पाहून मग नजरेने अधाशागत ती प्रचंड झुंबरे पहात बसले चिनीमातीचे गोल पेले, काचेचे नक्षीदार आकार असे मणबत्त्याचे घर असलेली ती झुंबरे किती पाहिली तरी पुरे वाटेना ही झुंबरे पेटवल्यावर केवढी आभा फाकत असेल ? चला ! क्रेमलिनचे वैभवाचे अवशेष तर पाहिले !

तेवढ्यात प्रवेशद्वारापासल्या बाबूच्या अडथळ्याशी येऊन काहीजण आत येणार असे पाहताच म्हाताऱ्याने मला खूण केली मी 'स्पसीबा' म्हणून त्याला धन्यवाद देत माझ्या शरीराला न झेपेशा चपळाईने खारीगत बोळातून जाऊन आमच्या ताफ्यात मिसळले म्हातारा दाराशी उभा राहून पाहारा देऊ लागला

लाल चौकाच्या अगाला एक भव्य नवी इमारत आहे देखणे सुंदर आधुनिक शिल्प आहे संगमरवरामधले लहरीदार डिझाइन जुळवून साधे पण सुबक बांधकाम केलेले हीच ती 'ऑल काँग्रेस ऑफ कम्युनिस्ट पार्टीची व ट्रेड युनियन' ची इमारत ! इथे १९६१ मधे मोठे अधिवेशन भरले ही नव्वद मीटर्स उंच इमारत बांधण्याचे डिझाइन केले होते पण चर्चचा कळस ८१ मीटर्स (एक्याऐंशी मीटर्स) उंच आहे त्याच्यावर या आवारातले बांधकाम जाऊ नये, लोकांच्या भावना दुखावतील म्हणून चौदा मीटर्स जमिनीखाली इमारतीला सुरुवात केली त्यामुळे तिचा जमिनीवरचा भाग सहात्तर फूट म्हणजे चर्चच्या कळसाहून ५ फूट खाली राहिला या इमारतीत आधुनिक इतिहास घडत असतो.

क्रेमलिनच्या ह्या दाराशी एक प्रचंड घंटा पडली होती तशा आत कॅथेड्रल्समधेही मोठ्या घंटा होत्या पण ही घंटा म्हणजे २०२ टनाची होती पण ही कधीच वाजली नाही कारण ही मोठ्या खटपटीने ओतली व वर चढवली तोच तिचा साडेअकरा टनाचा तुकडा पडला बिचारी ! द्वाराच्या दुसऱ्या बाजूस अठराव्या शतकातील एक प्रचंड तोफ होती ही तोफसुद्धा मोठी कुशलतेने बनवली पण ती कधीच उडवली गेली नाही कारण ज्या युद्धात १८ व्या शतकात शत्रूवर मारण्यासाठी ती बनवली तो शत्रू इथवर पोचलाच नाही ती घंटा नि तोफ कुवारच राहिली ! तोफ चांगली चाळीस टन वजनाची आहे या तोफेच्या शेजारी एक हजार किलोग्रॅम्सचा तिचा तोफगोळा आहे तोंडाखाली गर्जणारा सिंह कोरलाय कडाना दुतर्फा सिंह कोरलेत कडाना फ्रीहॅण्डड्राईंगमध्ये शोभावी अशी नक्षी कोरलीय या तोफेचा गोळा म्हणे ४० मीटर्स दूर जाऊन पडला असता

या प्रवेशद्वारासमोर ट्रिनिटी टॉवर आहे एक हिरवी इमारत पूर्वी झारशाहीतले हॉटेल होते. आता तेथे सुप्रीम कोर्ट भरते

तेथून मग एका चबुतऱ्याशी थांबलो तिथे एक अखंड ज्योत पेटत होती ही म्हणे दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पतन पावलेल्या व ओळख न पटलेल्यांची शवे दफन करून कबर बांधली गेली तिथे कधी मेणबत्ती पेटते पण ओळख न पटलेल्यांसाठी ही एकच मोठी ज्योत आहे ही बारमास अखंड तेवते खाली दाब दिलेला गॅसचा साठा आहे त्यामुळे वाऱ्या-पावसातही ती विझत नाही

या स्मारकावर अनेक प्रवासी व गावकरीही फुले वाहून जात होते पुष्पचक्रे क्वचितच दिसली आपण पाश्चात्याच्या अनुकरणाने राजघाटावर व इतर समाध्यावर आपल्या संस्कृतीत नसलेली पुष्पचक्रे वाहतो पण इथे पुष्पगुच्छ पुष्कळ होते अशाच अमरज्योति दरेक युद्धभूमीत होत्या पुढे कीएव्ह, लेनिनग्राड, बर्लिन, वार्सा येथेही होत्या आम्हीही या शूराच्या स्मारकापुढे नतमस्तक झालो या चौकात पूर्ण नीरव शांतता पाळतात.

या देशात सर्वात जास्त आदर योद्धयाना आहे ही युरोपी राष्ट्रे ! अखंड युद्धे चालतच असतात कधी लादली जातात त्यामुळे शूरवीरांना मोठा मान या देशातून सर्वांत जास्त स्मारके, पुतळे, रस्त्यांची नावे शूराची आहेत त्या पाठोपाठ तत्त्वचिंतक, देशनेते, कवी व लेखकांची आहेत सिंहासनावर बसून राजसत्ता भोगून गेलेले राजे व आधुनिक काळात मंत्रिपदे भोगणारे राज्यकर्ते यांचे पुतळे, रस्ते, चौक नाहीत

रशियन क्रांतीचा उद्गाता लेनिन हा मात्र राष्ट्रपिताच त्याची स्मारके व पुतळे मात्र आहेत कवी, लेखक, तत्त्ववेत्ते यांनीही इथे क्रांतीकार्याचा सहभाग उचलला होता

परतताना मास्को बुलेवार्ड (हायवे) ने आलो लेनिन हिलवरून मास्कोच्या दिव्यांची रोषणाई दिसत होती शहरभर लडिवाळ विळखे घालणारी नदी काठाने दिव्यांचा रत्नहार लेवून चमकत होती तिचे अनेक पूल आम्ही ओलांडले होते.

एकोणीस सप्टेंबरला सकाळी परत लाल चौक ! काल सकाळी नुसता चौक दाखवला, सायंकाळी क्रेमलिन आज लेनिनची समाधी पाहायची होती तेथे लेनिनचा संपूर्ण देह रसायनानी टिकवला आहे त्याला मॉसलिअम म्हणतात काल दोनदा येथील प्रवेशद्वाराशी असलेला खडा पहारा न्याहाळला होता दाराच्या दुतर्फा दोघे गार्डस् दगडी पुतळ्यागत पापणी न हलवता उभे असतात दर अर्ध्या तासाने त्याची सुटका होते

काल सकाळी हा ' चेंज ऑफ गार्डस् ' विधी पाहायला लोक गर्दी करून उभे होते दुसरे दोन गार्डस् प्रमुखासह येतात पहिले गार्डस् टर्न होतात दुसरे त्याची जागा घेऊन पुतळे बनतात

राष्ट्रपित्याच्या समाधीला आदर म्हणून ते मूक राहतात हे ठीक पण न हलणारे हे पहारेकरी चोर, घुसखोर, गनीम याचा प्रतिकार कसा करणार ! की हे एक शोपीस म्हणून असतात ! मग मातीचे तांब्याचे पुतळे का करीत नाहीत ? पुरी तीस मिनिटे पापणी न हलवता, माशी न हकलता उभे राहणे ही भयंकर शिक्षा वाटली अशी शिक्षा अखंड वर्षानुवर्षे दोघे दोघे एकावेळी भोगतात

समाधीच्या दर्शनासाठी मोठी रांग लागली होती त्या रांगेत आम्ही उभ्या राहिलो. आमच्या जन्मजात बडबडीच्या सवयीला इथे आवर घालावा लागला कबरीच्या परिसरात संपूर्ण शांतता होती ती राखण्यासाठी दर पाच पावलांवर पोलीस होते. ते रांग व शांतता नियंत्रित करीत होते ही शांतता योग्य वाटली एका दाराने जाऊन तळघरात लेनिनदर्शन घेऊन दुसऱ्या दाराने शिस्तीत बाहेर पडायचे या मॉसलिअमसाठी मुद्दाम दूरवरून दगड आणलेत एरव्ही या देशात दगडी बांधकामे नाहीतच इथे दगडच दिसत नाहीत गॉथिक इमारती मुंबईत दगडाच्या आहेत तिकडे विटांवर गिलाव्याने तसा आकार आणतात फक्त लेनिनग्राडचे राजवाडे, विंटर हर्मिटेज खास दगडाने बांधवलेत झारला वाटले, आपलाही एकादा वाडा विदेशी राजांसारखा दगडी असावा पण दगड कुठून आणावे ? मग त्याने युक्ती केली—

लेनिनग्राड बंदरात माल आणणाऱ्या प्रत्येक जहाजाने कस्टम ड्यूटीऐवजी त्या किंमतीत त्यांनी ठरविलेल्या वजनाइतके दगड आणायचे अशा तोडी जमवून हर्मिटेज बांधले

लेनिन समाधीसाठी खास आणवलेले संगमरवरी दगड होते त्यात पाचूसारखा पारदर्शी व चकचकीत दगड होता त्याला ग्रॅनाइट म्हणतात असे हिरवे व काळे दगड वापरले होते समाधी फार उंच नव्हती पायऱ्या उतरून तळघरात गेले समोर काचपेटीत तो राष्ट्रपिता चिरनिद्रा घेत होता एका राजेशाहीचा अस्त करून श्रमजीवींना सुखाने व प्रतिष्ठेने जगायला देणारे राष्ट्र निर्माण करणारा हा नेता डोळ्याना प्रत्यक्ष दिसला त्याची ठेंगूशी कृश यष्टी, पण निश्चयी कपाळ त्याची योग्यता दर्शवीत होते मन भारावले व मान झुकली काही भारतीयांनी नमस्कार केला

समाधीच्या मागील प्रांगणात जमिनीवर शिळा रोवून त्यावर देशातील महत्त्वाच्या व्यक्तींचे चेहरे कोरले होते त्यावर कायम टिकावू प्लॅस्टिकचे पुष्पगुच्छ प्लॅस्टिक थैल्यातून वाहिले होते सर्व मुद्रांखाली नावे होती पण ती रशियन भाषेत अक्षर कळेना फक्त चेहरे ओळखून युरी गागारीन कळले शेवटची शिळा स्टॅलिनची !

दोन दिवस मास्कोभर फिरलो सर्वत्र पुतळेच पुतळे दिसले पण स्टॅलिनची कुठेही नावनिशाणी नव्हती शासनाने एकदा एकादे नाव निपटायचे ठरवले की त्याचे समूळ खनन करून टाकते स्टॅलिनग्राड गावाचेही नाव बदलले इथेच काय ती एकमेव स्टॅलिनची निशाणी होती

रागेमधून दूरच्या मोकळ्या प्रांगणात आले इथे देशोदेशीचे टुरिस्ट मजेत फिरत होते थंडा भरपूर होती तरी मी मुद्दाम नुसत्या साडीब्लाऊजवरच फिरत होते मुळात मी तो जड ओव्हरकोट नेलाच नव्हता कारण त्याने माझी बॅग अर्धी भरली असती आम्हाला तर सांगितले होते की, युरोपात हमाल नसतात तुमचा भार तुम्हीच वहायचा इथे माझाच भार जास्त मला वजन उचलण्यास डॉक्टरची मना होती म्हणून मी बावीस दिवसांना चव्वेचाळीस साड्या घेण्याऐवजी फक्त अर्धीच बॅग भरली दुसरे काहीही ओझे घेतले नाही आणि निघाल्यापासून भसाभस वजनदार वस्तू खरेदी करत सुटले नाही माझ्याजवळ फक्त दोनशेचोवीस डॉलर होते त्यातले एकशेनव्वद डॉलर मी शेवटच्या मुक्कामाला फँकफुर्टला येईपर्यंत अबाधित ठेवले कारण माझ्या आवडीच्या दोनचार वस्तू फक्त त्यामधून येणार होत्या सोव्हिएट व सोशालिस्ट देशात मुंबईकरांना भुरळ पाडणारे विशेष काही मिळत नाही डॉलर्स शॉप्समधून प्रवाशांना सोडतात तिथे त्या त्या देशाच्या हस्तकलेच्या नमुन्याचे दर्शन होते पण त्यांचा एक रुबल म्हणजे आपले तेरा रुपये साध्याशा बाहुलीला ५–६ रुबल काय परवडणार ? तिकडे चांदीच्या टीसेटवर उत्तम मीनाकारी केलेली असते. पण तेवढ्या किंमतीत जर्मनीमध्ये एक मोटारकार येते मी प्रसिद्ध रशियन फरची उंची टोपी व अस्वल फक्त घेतले तेवढ्यानेही एअर एक बॅग भरलीच

सांगायचे तात्पर्य, मी भर थंडीतही फक्त एक स्वेटर बरोबर घेत असे गेल्यावर आजारी पडाल म्हणून कळवळून सांगणाऱ्यांकडे दुर्लक्ष करीत मी पंचविशीची थंडी अनुभवित स्वेटरशिवाय फिरले चौकामध्ये जर्मन येणाऱ्या बायका भेटल्या त्यांच्याशी प्रेमाने बातचीत केली उझबेक आणि जॉर्जियन स्त्रियांना उर्दू बोललेले कळत होते त्यांनी आम्हाला पहाताच टाळ्या पिटून ' हिंदी, रुसी भाय भाय ' म्हटले आम्ही गप्पा करीत असताना त्यांच्यामधील पुरुषांनी आमचे फोटो घेतले शोध करूनही कुठे वदेवाईक फोटोग्राफर मिळेना काही बायका ऋषीकपूर, राजकपूर म्हणून टाळ्या पिटू लागल्या त्यांना संगमचे गाणे हवे होते मी ' बोल राधा बोल ' म्हणू लागले आणि त्यांनीही साथ केली नंतर ' आवारा हूँ ' व ' मेरा जूता है जपानी ' ही गाणी कोरस झाली. परदेशात लोक-

प्रिय होणारा राजकपूर हा मोठा सांस्कृतिक दुवा आहे. त्या बायकांनी विचारले, ' तुम्हाला थंडी नाही का वाजत ?"

मी म्हटले, " ही सुंदर गार हवा मी एन्जॉय करते आहे माझ्या देशात मुंबईमध्ये खोलीत अशी हवा मिळवण्यासाठी हजारो रुपयाचे मशिन घेऊन दरमहा शेकड्यामध्ये विजेचे बिल भरावे लागते मला ते परवडत नाही म्हणून मी ही हवा चाखते आहे जनसंपर्क साधायचा तर परकेपणा, प्रौढपणा, अबूल चेहरा हे बाळगून चालत नाही मी प्रवासभर मला जमेल ती भाषा वापरून विदेशी लोकांशी संपर्क साधत गेले गाणी, फोटो छोट्या छोट्या भेटींची देवाण-घेवाण असे करून, पोलादी पडद्याआड अधिकृतपणे कोणीही तोंड उघडत नसल्याने, अशी अवांतर माहिती मिळवली. माझे हसणे, गाणे, इतरांत मिसळणे हिंदुस्थानी प्रौढपणाला रुचणारे नव्हते आमच्या ग्रुपमधे मला कोणी नावेही ठेवली असतील पण मी पर्वा केली नाही कारण मला परदेशात खरेदीऐवजी निसर्गाचे आणि माणसाचे अवलोकन व अभ्यास करणे यात रस होता समोर कॅथेड्रल बेझॉल्स होते तेथे मीनीन व प्रझास्की या योद्धयांचे पुतळे लढाईच्या पवित्र्यात उभे होते पोलडने केलेल्या स्वारीत हे दोघे देशासाठी लढून धारातीर्थी पडले होते त्या पुतळ्याशी व क्रेम-लीनसमोर आमच्या ग्रुपधील डॉक्टर हेमचंद्र गुप्ते यांनी सहप्रवाशांचे फोटो काढले मी त्यावेळी जनसंपर्कात गढले असल्यामुळे माझी ती संधी हुकली

दुपारी पुष्किन म्युझिअम पाहिले हे म्युझिअम रशियन कवयित्री मेलिना स्वेतायेवा हिला बांधायचे होते तिच्या प्रोफेसर नवऱ्याने तिच्या स्मरणार्थ एकोणिसाव्या शतकात ते बांधले आतमध्ये दि टेरेट्टो याचे मोझॅकमधील मेरी मातेचे चित्र फार सुंदर वाटले सिरॅमिकमधील येशूसह मेरीचे चित्र फारच सुंदर होते या म्युझिअमभर युरोपमधील दोन शतकांतील ख्यातनाम चित्रकार व शिल्पकार यांची अनेक चित्र व शिल्पे होती. त्यातील बहुसंख्य येशूख्रिस्त व मेरी अथवा ते दोघे मायलेक अशी होती काही चित्रे विशेषत शिल्पे अत्यंत भव्य होती जॉन मस्कार्टच्या एका चित्रातला काटेरी मुगुट घातलेला वेदना-पिडीत येशू मनाला भिडला त्याच्या मस्तकावरील काटे व गालावरील अश्रू हुबेहुब जिवंत वाटले किंग सॉलोमन व बायशेबा याचे चित्र होते एका हॉलमध्ये पार्शी धर्मातील बरीच शिल्पे होती एक भव्य हॉल उत्कृष्ट पेंटिंगने नटला होता वरती ग्रीक पद्धतीचे शेकडो पुतळे होते आणि हे सर्व पुतळे संपूर्ण नग्न होते फक्त स्त्रीला वीतभर वस्त्र कंबरेवर असे या पुतळ्यांची कलात्मकता नग्नतेहून अधिक वेधक होती पूर्ण पुरुषाच्या पुतळ्यात त्याच्या पाठीचे स्नायू, दंड, मनगटे, मांड्या, छाती या वरचे पीळ जिवंत वाटत होते नुसता जांग्या लावून शरीर सौष्ठव दाखवणाऱ्या मल्लाप्रमाणे ते सारे उंच पिळदार पुरुष मर्दानी वाटत होते स्त्री शरीरातही नैसर्गिकता होती त्यांचे सौंदर्य सजीव वाटावे इतके अप्रतिम कोरले होते. सर्वात नवल वाटले ते हे की, ज्या पुतळ्याच्या अंगावर एखादे वस्त्र दाखविले असेल,

ते चुण्यासह हुबेहुब दाखविले जाई खांद्यावरून बोटापर्यंत पकडलेला पदर हंर्दुगर फडफड-ताना दगडामधेसुद्धा भासत होता तेथील तज्ज्ञाने सांगितले, 'आमचे चित्रण व शिल्पकाम हुबेहुब असते' आपलेकडील शिल्पांच्या वेगळेपणाबद्दल तो म्हणाला, 'तुमचेकडील चित्रा-तील पुरुषाचे स्नायू असे पीळदार दाखवत नाहीत अंगावर झिरझिरित वस्त्रे व दागिने आहेत असे कल्पून अवयव गोलगोल दाखवतात गाल, ओठ सुजल्यासारखे दिसतात. स्त्री-पुरुषाचे डोळे कानापर्यंत ओढतात आणि नाके कृत्रिम वाटतात स्त्रियांच्या स्तन व नितं-बाचा आकार अवाजवी आणि अवास्तव वाटतो

मी म्हटले, 'उत्तर हिंदुस्थानी कला अशीच दिसते ' त्याने म्हटले 'तुमची कला आदर्श चित्रकला दाखवते प्रत्यक्षात एवढे लांब डोळे नसतात अवयवही असे मोठे नसतात त्यामुळे तुमची चित्रे पुराणातील अतिमानवांची वाटतात ते लोक आपल्यामधले वाटत नाहीत '

मी हे येथील चित्रकारास सांगितल्यावर ते म्हणाले, आमच्याकडे स्त्री ही मातृत्व प्राप्त झालेली दाखवतात त्यामुळे तिचे अवयव थोराड वाटतात तिकडे अविवाहित तरुणीचे चित्र दिसते म्हणून ते सडपातळ वाटते '

मला हे पटले नाही

पुष्किन म्युझिअममध्ये छपरावरही रंगीत चित्रे होती हे फारच मेहनतीचे काम होते कारण ते बघणारालाही मान मोडून बघावे लागते मग रंगवणाऱ्यास किती कष्ट पडले असतील ?

त्या रात्री आम्ही रशियन सर्कस पाहिली हा सर्कशीचा तंबू कायमचा बांधलेला होता त्यामुळे त्यात तांत्रिक सोई भरपूर होत्या प्रेक्षकानाही भरपूर जागा होती. येथे मी दुर्बिण पहाण्यासाठी घेतली त्याचे भाडे आगाऊ दिले तरीही ती बाई दुर्बिण हातात देईना ती म्हणे, 'तुमचा ओव्हरकोट ठेवा पण मी तर शाल नेली होती ती म्हणे, 'तुमची पर्स ठेवा किंवा काहीतरी इथे ठेवा आणि मग दुर्बिण न्या' नंतर माझ्या लक्षात आले की, आपण दुर्बिण घेऊन पळालो तर धोका नको, म्हणून ती बाई वस्तू डिपॉझिट मागत होती. अखेर मी शाल दिली इतर प्रवासी व आमचेही लोक नेहमी आईस्क्रिम खात मला कळत नसे की, रक्त गोठवणाऱ्या थंडीत ह्यांना कसे आईस्क्रिम खाववते ? शिवाय तुटपुंजे डॉलर्स खर्चून तिथले आईस्क्रिम खावे असे विशेष त्यात काही नव्हते

रशियन सर्कस ही तर जगद्विख्यात समजतात तशी आहेही व्यायाम आणि कसरत यात येथील तरुण-तरुणी निष्णात असतात सर्कशीमधे तर विशेष निवड करून घेतलेली तरुण-तरुणी असतात या सर्कशीमधे रंगीबेरंगी प्रकाशझोतांचा मनोहर विलास पाहिला येथे आकस्ट्राप्रमाणेच मॅनेजरची कॉमेंट्री चालू असते रशियन तरुणी मुळातच सुंदर तिचे सरळ लांब नाक, मोहक ओठ, दक्षिण युरोपियन मुलीप्रमाण, बसके नसलेले गोबरे गाल आणि

पुढे वळलेली लाम्डीक हनुवटी त्यामुळे ती फार सुंदर दिसते त्यांच्या देशात कपड्यांचा व्यापार व उत्पादन सरकारच्याच हाती असते त्यामुळे तेथे सरकारी दुकानात येईल तोच कपडा घ्यावा लागतो भडक रंगांचे, फुलाफुलांचे, झिरझिरीत असे कापड कोणाच्याही अंगावर दिसले नाही वस्त्राचा उपयोग अंग उठावदार करून किंवा अर्धनग्न करून दाखवण्यापेक्षा शरीर झाकण्यासाठी केलेला आढळला कपड्यांचे रंग मळखाऊ असत तरुणींचे कपडेही सभ्य वाटत

इथे सर्कशीत मात्र तशी काटकसर नव्हती तंग कपडे, झगझगीत प्लॅस्टिक जरीची बिकीनी किंवा तंग वनपिस यामधे त्या मुली छानच दिसत होत्या दुर्बिणीतून न्याहाळता आले शिवाय त्या जरीवर वेगवेगळ्या रंगांचे प्रकाशझोत पाडून अधिक सुंदर दाखवित रिंगणात काम चालू असेल तेवढ्या भागावर प्रकाश पडे रशियन सर्कस वरचढ ठरते याला कारण त्यातील कलावंतांचे बांधेसूद व नागासारखे लवलवणारे चपळ शरीर पुरुष कलावंत कोलांटया उड्यांची व तोलाची कामे इतकी अचूक करतात की त्यांचे शरीर स्प्रिंगचे आहे असे वाटते ते रिंगणात येतानाच कोलांटया उड्या घेत येतात हवेमधे किती तरी गिरक्या घेत उडतात व पुन्हा अलगद दोन पायांवर उभे रहातात रशियाच्या अठरा प्रांतातील कलाकारांचे प्रातिनिधिक कार्यक्रम झाले एका उंच मचावर उषा राणी व तिच्या सख्या झगझगीत लाल मॅक्सी घालून नाच, गाणे करून गेल्या अशी ही काही आकर्षणे होती कॉमेडी करणारा रशियनप्रमाणेच जर्मन व इंग्रजीही मधूनमधून बोले प्राण्यांच्या खेळामधे सुप्रसिद्ध रशियन अस्वले होतीच ती खूपच गरीब आणि माणसाप्रमाणेच दोन पायांवर चालणारी होती वाघ भरपूर खाणे मिळत असल्याने चांगले धष्टपुष्ट होते त्यांच्या पाठी लकाकत होत्या मांजरेही कसरती करून गेली अस्वलांचे काम झाल्यावर एक छोटे व मोठे अस्वल रिंगमास्टरच्या मदतनीसाप्रमाणे काम करीत होते त्याला स्टुले, काठ्या, कडी वगैरे आणून देणे, ते परत ठेवणे असे ती करत छोटे अस्वल तुरुतुरु आत बाहेर करी मोठे लटलट अंग सावरीत जाई प्रत्येक प्राण्याचे काम संपल्यावर रिंगमास्टर प्रेमाने त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याच्या तोंडात खाऊ भरवी छोट्या अस्वलाला तर बरेच वेळा खाऊ मिळाला व कार्यक्रम संपताना ते रिंगमास्टरच्या हातात हात घालून हवाबात गेले हा खाऊ म्हणजे मटणाचे चौकोनी तुकडे होते सर्कस सुटल्यावर मी बसेसच्या ताफ्याशी बराच वेळ थांबले परंतु आमचे गाईड, मॅनेजर कोणीच दिसेनात पाच मिनिटात सर्व बसेस निघून गेल्या तंबू निर्मनुष्य झाला आमचाही ग्रुप खूप लांब चालत गेलेला मी गडबडून विचारले, 'हे काय ?'

कुणीतरी सांगितले, 'परतीला बस नाही लेनिनहिल इथून जवळ तर आहे पुढे निघालेले लोक लांब दिसेनासे झाले उरलेल्या आम्ही बायका चालू लागलो मी दोन दिवस उत्साहाने बरीच फिरले होते पण एका दिवसात एवढी धावपळ झेपणारी नव्हती

उघड्यावरून वाऱ्या थंडीत रात्री चालणे मला सोसणार नव्हते लेनिनहिल्स जवळ असली तरी तो चढ चढवेल का ? फुटपाथ वरूनच चालायचे नियम फुटपाथवर हिरवळ ती पावसाने चिकट आणि निसरडी झालेली शिवाय रात्रीच्या वेळी गवतात विषारी जीव, किडे चावतील ही भीती तिकडे साप नसतात हे मी विसरलेच होते अखेर मी निर्जन रस्त्यान एकटीच मागे रखडले तेव्हा दादरचे श्री तासकर यांनी स्त्रीदाक्षिण्य दाखविले तासकर म्हणाले,

' तुम्हाला चालवेल तशा चाला. मी तुमच्या पाठीमागून येत राहिन ' इतर स्त्रियाही पुढे गेल्या होत्या

मी म्हटले, तुम्ही सोबत आहात ना ? मग टॅक्सी करायलाही भीती नाही कारण माझ्या पायात वांब आला तर इथेच बसावे लागेल '

तथापि एकही टॅक्सी आमच्या बाजूने जाणारी दिसेना उलट दिशेची थांबेना अखेर मी मागून येणाऱ्या कार्सना ' पाझल्स्ता, इगलेट, इगलेट ' म्हणत लिफ्ट मागितली इकडे कार्स थोड्याच तेव्हा बऱ्याच वेळाने एका सज्जनाने कार थांबविली तासकर पुढे बसले मी मागे बसल्यावर शिल्लक जागेमधे बसण्यासाठी पुढे गेलेल्या बायका मागे आल्या पण सात जणी मावणे शक्य नव्हते अखेर उरलेल्यांना सोडून आम्ही कारने हॉटेलात सर्वांआधी पोचलो मॅनेजरने परतीच्या बसचे अगोदर सांगितले असते तर थंडीसाठी पुरेसे गरम कपडे घालून मग एकवेळ चालले असते इथे हीच गमत होते हॉटेलमधील खोल्या भोजनगृहे, बसेस्, स्टेशने, रेल्वे गाड्या, दुकाने या सर्वांमधे हीटरस् असतात त्यामुळे लोकरीचे स्टॉकिंग्स, गळपट्टे, हातमोजे हे नकोसे वाटतात उघड्या रस्त्यावर मात्र लगेच अंग गारठते

वीस सप्टेंबरला आम्ही सकाळी रशियाच्या अठरा प्रातानी बांधलेले प्रदर्शन पहायला गेलो प्रचंड लांबी रुंदीच्या क्षेत्रामधे हे प्रदर्शन कायम चालू असते येथे शेतीचे व जनावरे पाळण्याचे प्रायोगिक केन्द्र आहे घोड्यांची उत्कृष्ट पैदास येथे होते अठरा प्रांतांचे अठरा पॅव्हिलियन्स आहेत त्या त्या प्रांतातील कलाकृती तेथे विकतात एका अर्थी हे एक्झिबिशन कम् सेलच असते शिवाय मधेमधे खाण्यापिण्याचे स्टॉल्स् असतात या प्रदर्शनाकडे जाताना टी व्ही चा टॉवर दिसला एखाद्या निमुळत्या स्तंभावर मधोमध चेन्डू असावा तसे या टॉवरच्या मध्यावर गोल आकाराचे फिरते हॉटेल आहे त्याच्यापुढे एका हिरव्या मैदानात स्पेस मॉन्युमेंट आहे हे पहिल्या रॉकेटचे स्मारक म्हणून बांधले आहे डावीकडे फ्रान्स व युगोस्लाव्हिया यांनी मिळून बांधलेले सुंदर कॉसमॉस हॉटेल आहे प्रदर्शनाच्या दारातून आत गेल्यावर एक अतिशय देखणे कारंजे लागले यावर मधोमध उंचावर एक दगडी तबक होते आणि त्याच्या काठावर अठरा स्त्रिया उभ्या होत्या त्यांच्या हातातील घटांतून पाणी उडत होते. या सर्व स्त्रिया सोनेरी होत्या प्रत्येकीचा पोशाख वेगळा होता रशियाच्या

अठरा प्रांतातील स्त्रियांच्या पारंपारिक वेशभूषा त्यांनी दर्शवल्या होत्या. दुसरे कारंजे फारच देखणे होते त्यावर दगडामध्ये नाना प्रकारची फुले कोरली होती एकेक फूल छत्रीएवढे. त्याच्या परागातून पाण्याचे तुषार येत होते पॅव्हिलियन खूप मोठा असल्यामुळे त्यात ट्रामने फिरायचे होते ह्या इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट एक्झिबिशनमध्ये फळबागात क्रॉसब्रीडिंगचे प्रयोग चालतात ट्रामने एक चक्कर मारल्यानंतर आम्हाला एका ठिकाणी उतरवले येथे थोडा पाऊस पडत होता गारठा वाढला होता जवळच्या स्टॉलवर फक्त हॉट डॉग्ज मिळत होते नॉनव्हेज व चहा न पिण्याबद्दलची शिक्षा मी या प्रवासात अनेकवार भोगली. कॉफीची फार तलफी मी नाही पण थंडीमधे अंग गरम कसे होणार ?

जवळपासच्याच स्टॉल्समधन आमच्या भगिनी खरेदी करीत होत्या मला त्यात रस नव्हता पण बाहेर कुठेही उभे राहिले तर थंडीने जीव काकडत होता पुन्हा पाऊस आला मी आमच्या ग्रूपमधील काही पुरुष उभे होते त्यांना म्हटले, मी ह्या ट्राममधून गेटशी जाते तेथे छप्पर तरी आहे '

यानतर त्या आवारात गोलगोल फिरणाऱ्या चित्राचा सर्करामा नावाचा चित्रपट पहायचा होता मला वाटले सर्वजण गेटशी येतील व त्याच्याबरोबर मी कुठल्या त्या थेटर-मधे जाईन परतु त्या लोकानी मला खूप शोधले मी ज्यांना सागून गेले होते त्यानी माझा निरोप दिला नाही कमल देसाई, मॅनेजर व गाईडस यांना माझ्या काळजीने सर्करामामधे चैन पडले नाही

इकडे मी गेटशी काकडत अर्धा तास वाट पाहिली तेवढ्यात ऊन पडले तेथील जमीन ही थाळवट असते त्यामुळे ती लगेच कोरडी झाली मग मी सर्करामा, सर्करामा असे विचारीत निघाले जर्मन येणाऱ्या काही बायानी मला 'किनो, किनो असे म्हणत एका दूरच्या थिएटरकडे बोट दाखविले मी झपाझप गेले चागले चार रुपयाचे तिकीट काढून आत गेले तर तिथे सोव्हिएट देशाच्या प्रगतीची मोठमोठी पोस्टर्स फक्त लावलेली होती शिवाय नेत्याचे फोटो होते तिथे एकजण इग्रजी बोलणारी भेटली पण तिलाही सर्करामाचे ठिकाण सागता येईना अखेर मी इकडे-तिकडे चालत एका गेटाबाहेर आले. तो समोर आमच्या बसेस उभ्या होत्या त्या तरी मी ओळखू शकले, कारण आमच्या ग्रुप-मधील श्री देशपांडे एका बसमधे होते

ते म्हणाले, ' मी असल्या प्रचारी गोष्टी पहायला गेलो नाही त्या ऐवजी मी फोटो घेत फिरलो '

थोड्याच वेळात सर्व मंडळी आली कमल देसाईंची प्रेमळ दटावणी मी ऐकून घेतली मात्र ज्यांना मी निरोप देऊन ट्राममधे बसले त्यांनी निरोप देण्याऐवजी सर्वांना काळजीत का टाकले हे मी विचारले नाही कारण अशी कामे काही सक्तीने करून घ्यायची नसतात

मास्कोतील आज शेवटचा दिवस आजचे कार्यक्रम भरगच्च होते जेवल्यानंतर लगेच सोव्हिएट फ्रेंडशिप सोसायटीमध्ये बोलावले होते तेथे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची भाषणे झाली त्यांनी दहा पंचवार्षिक योजनांची माहिती सांगितली आपल्या राज्यात हिंदी शिकवणाऱ्या शाळा असल्याचे सांगितले पावसाच्या अनियमितपणामुळे पिकाची निश्चिती नसते यावर आमच्या नेत्यांनी उत्तर दिले तिथून थेट आम्ही रशियातील भारतीय राजदूत इंद्रकुमार गुजराल यांचेकडे आलो तशी सायंकाळ झालेली नव्हती मला वाटले, त्यांच्या कचेरीत मला काही भारतीय लोक भेटतील परंतु का कोण जाणे ते ऑफिस रिकामे होते मी व आणखी काही जण नुसतेच फिरून आलो तेथील एक कर्मचारी मिश्रा यांचेकडे माझ्या शेजाऱ्याने एक महत्त्वाचा निरोप दिला होता मिश्राजी ऑफिसात नव्हते, म्हणून तेथील ऑपरेटरकडून त्यांना घरी फोन करविला तर ते घरीही नव्हते मला मोठे चमत्कारिक वाटले

असाच अनुभव आणि हिरमोड मास्को रेडिओवरच्या श्री सिनकर यांना शोधताना आला इंग्लेटसारख्या वड्या हॉटेलातून हवे तेवढे फोन करता आले असते परंतु तेथे डिरेक्टरीच मिळत नव्हती इथे डिरेक्टरीची पद्धत नाही म्हणे कुणी सांगितले की रिसेप्शनिस्टकडून नंबर मिळवा परंतु ती काही दाद देईना त्यानंतर तिसरे दिवशी गाईड तानिया हिने ती नोकरीला असलेल्या रेडिओ स्टेशनचा नंबर दिला तोवर आम्हाला जी महाराष्ट्रीयन मुलगी भेटली तिने सांगितले की,

'सिनकर आजारी आहेत व रजा घेऊन घरीच आहेत ' त्यामुळे त्यांच्याशीही संपर्क साधता आला नाही इथून अनेकांनी त्यांना भेटण्यास सांगितले होते पण ते राहिले असो

भारतीय वकिलात ओळखण्याची सोपी खूण आहे इतर वकिलातींच्या इमारती काचा व रंग यांनी लखलखलेल्या आधुनिक धर्तीच्या उंच अशा आहेत तर भारतीय वकिलात ही पुणे, सांगलीच्या एखाद्या जुनाट पेशवाई वाड्यासारखी आहे खुरटी, गिचमिड, जुनाट

राजदूत श्री गुजराल यांनी आमचे स्वागत केले आम्हा सर्वांना त्यांच्याशी बोलायचे होते माहिती विचारायची होती पण त्यांनी आमच्या घोळक्याच्या कडेला उभे राहून एक औपचारिक भाषणच ठोकले नंतर त्यांच्या पत्नीशी ओळख करून दिली

सौ गुजराल यांचे व्यक्तिमत्त्व सौम्य व प्रसन्न आहे त्यांनी अबाडा घातला होता आमच्यासाठी त्यांनी शेव-चिवडा व खमंग अलूबोंडा असा मेनू ठेवला पाव, लोणी, चीज खाऊन विटलेल्या जिभांना हा फराळ फारच आवडला त्या बायकांशी मोठ्या सौजन्याने बोलल्या त्या स्वतः कवि आहेत आणि मास्को लेखक संघाच्या अध्यक्षा आहेत हे ऐकल्यावर चवदार खाण्यापेक्षाही मला जास्त आनंद झाला

मास्कोतील भपकेबाज इमारतींच्या मानाने राजदूताचे ऑफिस साधे होते तसेच घरही हॉटेलमधून, दुकानातून भिंतीला हीटर्स असत इथे हॉलमधे एक फुंकणीसारखा

लाल हीटर कोपऱ्यात होता आमच्या साड्यांचा घोळ त्याला लागला तर त्या जळतील म्हणून आम्ही दुसऱ्या टोकाला पळालो

अर्थात दूतावासाची इमारत कशीही असली तरी गुजराल पति-पत्नींनी आम्हाला आपुलकीने वागविले व आम्हालाही बरे वाटले

रात्री जेवण झाल्यावर किएव्हला जाण्यासाठी बसेसनी किएव्ह नावाच्याच स्टेशन-वर आलो मास्कोत म्हणे गाडी ज्या गावी जाते त्या गावाचे नाव त्या स्टेशनला देतात म्हणजे गीतांजली एक्स्प्रेस सुटते त्या स्टेशनला कलकत्ता नाव द्यायला हवे महालक्ष्मी व पंचवटी सुटतात त्यांच्यासाठी कोल्हापूर व नाशिक स्टेशने म्हणावयास हवे पण आपल्याकडे सर्व गाड्या एकाच स्टेशनातून सुटतात मास्कोला अशी नऊ स्टेशने आहेत. ज्या ज्या गावी गाडी जाते तिचे नाव स्टेशनला दिलेले आहे.

आमची बस जिथे थांबली तिथून खूप पुढे चालत येत, थोड्या पायऱ्या चढत मग प्लॅटफॉर्म आला तानिया सर्वांना सांभाळून नेत होती माझी बॅग चाकांची होती व्ही आय पी सारखी वजनदार नव्हती शिवाय ती उभी धरून चालवता येत असल्याने पट्ट्याशिवाय हँण्डल धरून नेता येई तरीपण पायऱ्या आल्या की मी थबके अखेर ह्या देशात चोर व उचले नाहीत याची खात्री पटल्यामुळे मी बॅग सरळ खालीच ठेवून उरलेले सामान जिन्यावर ठेवले व परत खाली येऊन बॅग नेली इथे स्टेशनामधे भयानक गर्दी, धूळ, माणसांचा कलकलाट असला काही त्रास नव्हता ह्या अफाट लांबी-रुंदीच्या देशाला लोकसंख्येचा बुजबुजाट नाही त्यामुळे रेल्वे गाड्या बसेस ट्राम्स यामधे जीवघेणी गर्दी नसते सोयी भरपूर आहेत

गाडी वेळेआधी फक्त दहा मिनिटे स्टेशनात आली. माणसांची धुसाधुशी, जागा पकडण्याची लठ्ठालठ्ठी, ओरडा, वशिल्याने किंवा हमालाला पैसे देऊन जागा मिळवणे असली काही कटकट नव्हती डब्याच्या दारात बोगी कंडक्टर स्त्री उभी होती तानियाने आम्हाला चाराचारांच्या गटात उभे केले होते ती एका वेळेला चार-चार जणांना आत घेई व त्याना कंपार्टमेंट नंबर देई ते आत गेले की दुसरे चार 'लेडिज फर्स्ट' हे सौजन्य युरोपात पाळतात पण आमच्या लोकांना पुरुषांनाच महत्त्व देणाऱ्या समाजात मुरल्या-मुळे ते बघवत नाही एका वागेत तानिया आम्हाला माहिती सांगत असता अचानक पाऊस आला आमचा दुसरा गार्ड वादिम् याने आपली छत्री स्त्रीदाक्षिण्य म्हणून तानि-याला दिली आम्हीही भिजतच होतो तिने सौजन्याने म्हटले, 'तुम्हीही आत या'

यावर आमचे काही खेड्यातील देशबांधव म्हणाले, 'ही पार्शलिटी आहे.'

त्यावर तानिया म्हणाली, 'लेडीज फर्स्ट'

मला या सर्वांची इतकी शरम झाली की, मी पुढची बाग बघण्याचे सोडून बसच्या निवाऱ्याला जाऊन बसले

तर बोगी कंडक्टरने पाच मिनिटात चाळीस माणसांना अचूक जागा दिल्या व ठीक वेळेवर गाडी सुरू झाली.

हा आमचा जनता क्लासच होता तरीही आपल्या फर्स्ट क्लासच्या सर्व सोई इथे होत्या बाकावर गाद्या डनलॉपच्या, तक्के, सर्वांना शुभ्र अभ्रे, ब्लँकेट (त्यालही अभ्रा) आणि टॉवेल्स जणू एक कंपार्टमेंट म्हणजे पंचतारांकित हॉटेलची खोलीच होती. कडांनी भरपूर हूक्स, फोल्डिंग टीपॉय, दरवाजाला आत मोठा आरसा, असा सर्व थाट होता दार आतून लॉक करून निर्धास्त झोपता येत होते. रशियन उताऊ आमच्याहून रसिक ! त्यांनी त्या टिपॉयवर सोडा लेमनच्या रिकाम्या बाटल्यात फुले खोचून पुष्पपात्रे सजविली होती.

प्रवास रात्रीचा असल्यामुळे रस्त्यांच्या कडेने आजूबाजूचा प्रदेश पाहता येण्या सारखा नव्हता अर्थात ती हौस पुढे रशियाचे दक्षिणोत्तर टोक जोडणारी किएव्ह लेनिन-ग्राड रेल्वे हिच्यामधून जाताना भरपूर फिटली

रशियाच्या युक्रेन ह्या समृद्ध प्रांताची राजधानी किएव्ह हिला आम्ही निघालो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ क्रमांक (स्थळ ...)

# ३ : फळाफुलांची बहारदार किएव्ह नगरी

युक्रेन हा प्रांत रशियाचे गव्हाचे कोठार आहे वाटेवर बायलो-रशिया (पांढरा रशिया) हा प्रांत ओलांडून आम्ही किएव्हला आलो २१ सप्टेंबर पहाटेस. मला झोप चांगली मिळाल्यामुळे पहाटे चारपासूनच जाग आली त्यावेळी बाहेर धुके होते रस्त्याच्या कडेने जवळचे दिसत होते रस्त्याच्या दुतर्फा चांगली दाट झाडी होती. झाडे बारीक खोडाची उंच व आकर्षक डेरेदार झाडे शेवटपर्यंत दिसली नाहीत येथील माती व बर्फवृष्टी यामुळे निसर्गाने असा आकार ठेवला असावा मात्र रेल्वेच्या दुतर्फा असलेली ही झाडे मी सर्व प्रवासात पाहिली रेल्वे प्रवाशानाही थडावा आणि डोळ्यांना सुखद गारवा मिळावा यासाठी छान सोय आहे. पण त्याबरोबर रस्त्यापली-कडला भूभाग दिसू नये व परकीयाना ठराविक रेषेच्या आत नाक खुपसता येऊ नये म्हणून तर पोलादी पडद्याऐवजी हा हिरवा पडदा लावला असेल का? ही झाडी मात्र आकर्षक रगाची होती या झाडाना फुले नव्हती परंतु झाडांमधूनच लाल, पिवळा आणि हिरवा असे रगाचे पट्टे दिसत होते काही पाने आकाराला सुंदर होती. रशियाभर या तिरगी झाडीमुळे निसर्गाचे रूप आकर्षक वाटले

आमच्याकडे पानझडीचा मौसम येतो पण झाडाचे खराटे बनत नाहीत मात्र ही तिरगी किमया आपल्याकडे नाही येथे पाने प्रथम हिरव्याची लाल होतात. नतर पिवळी-

जर्द होत जातात, आणि मग बरेच दिवसानी ती पडतात त्यामळे झाडामधून तिरंगी रगविलास दिसतो

आपल्याकडे उष्णतामान फारच आहे पाने पिवळी होताच लवकर गळतात म्हणून हिरव्या पानाच्या बरोबरीने पिवळी पाने दिसत नाहीत या तिरंगी झाडांखाली कुठे कुठे निळया रानफुलाचे गालिचे दिसत सबंध उष काल मी एकटीच युक्रेनचे प्राकृतिक सौंदर्य पहात होते हा गव्हाचा सुपीक प्रांत परतु जमीन काळी चिकट दिसत नव्हती पांढरट रगाची आणि वाळवट अशी जमीन सर्वत्र दिसली रस्त्याच्या कडेला कुठेकुठे घोडागाडीच्या चाकोऱ्या दिसल्या त्यावरून जमीन वाळवटासारखी भासते कारण चिकण्या जमिनीच्या चाकोऱ्या वेगळ्या दिसतात. क्वचित दूरचा भूभाग दिसे तिथे ट्रॅक्टर दिसत तसेच नांगराला जुपलेले घोडेही दिसले बरोबर सूर्योदयाला गाडी किएव्ह स्टेशनात आली

उष कालच्या प्रकाशाप्रमाणे गोऱ्यापान रगाच्या आरक्त चेहऱ्याच्या आणि भुरभुरत्या सोनेरी केसांच्या पधरा–वीस युवकयुवतीनी सुहास्य मुद्रेने आमचे स्वागत केले आम्हीही प्रफुल्ल मुद्रेने स्मित करून हस्तांदोलन केले त्या तरुणींनी सुरेख रगाच्या टवटवीत फुलांचे गुच्छ आणले होते पुढे आलेल्या पॅसेंजर्सना त्यानी ते गुच्छ वाटले त्या फुलांप्रमाणेच त्या मुलामुलींची हसरी उत्फुल्ल मुखकमळे मनोहर होती मनाला फार बरे वाटले हे तरुण–तरुणी युक्रेन फ्रेंडशिप् सोसायटीचे सभासद होते

मास्को विमानतळावर कपाळाला आठया घालून त्रासिक मुद्रेने तेथील कर्मचाऱ्यांनी आमचे जे थडे स्वागत केले त्यामानाने हे स्वागत फार उबदार वाटले उल्हासाने मी बसकडे निघाले माझ्या हातात एका तरुणीने भला मोठा गुच्छ दिला होता तो मी निरखते आहे एवढ्यात कुणी सासवा कुजबुजल्या,

' ज्याना गुच्छ मिळाला नाही त्याना त्यातली फुले दे ' मी ताबडतोब ती फुले वाटून टाकली व एकच लहान कळी चक्क भारतीय पद्धतीने केसात खोचली.

मनात मात्र आले की केवढी उतावळी आणि कुचकेपणा हा ! एवढा मोठा गुच्छ वाटेने सांभाळून नेण्यास माझे हातसुद्धा मोकळे नव्हते कारण सामानासह बसकडे जायचे होते पण फुले माझ्या हातात पडताक्षणी मत्सराने हा जो आगाऊ सल्ला मिळाला त्याची मला भयकर चीड आली दुसरीला गुच्छ मिळाला असता तर मी असा आगाऊ उपदेश केला नसता प्रवासाला सर्वजण सारखेच पैसे देऊन आलेले असतात गरीब–श्रीमत असले तरी ते आपापल्या घरी वयाने आणि ज्ञानानेही माझ्यावर कुणी वडिलकी गाजवण्याचा प्रश्न येत नव्हता तरीसुद्धा काही लोक स्वत ला जास्त शहाणे का समजतात मला कळत नाही ? स्वत जवळ जे नाही ते गटस् दुसऱ्याने दाखविल्यावरसुद्धा मत्सराने त्याला शाब्दिक चिमटा घेऊन त्याचा हिरमोड करणे हे आपल्याच लोकाना शोभते !

असाच प्रयत्न पुढील काळात आणखी दोनदा केल्यावर मग मी भडकले मी तड-

कावून सांगितले,

'मलाही भलेबुरे कळण्याची अक्कल आहे मी तुम्हाला आत्तापर्यंत अवाक्षराने उपदेश केला नाही, मीही ऐकून घेणार नाही मला कुणी शहाणपणा शिकवू नका मला कुणाचे बॉसिंग चालणार नाही आणि केलेत तर मी फाडकन उलट उत्तर करीन!'

बोलायचेच झाले तर मला इतराब्यात बरेच दोष काढता आले असते पण ही ट्रीप शाळकरी मुले आणि मास्तर यांची नसून जबाबदार प्रतिनिधींची होती येथे एकाने दुसऱ्याला अक्कल शिकवण्याची जरूर नव्हती कोणी ऐकून घेतले नसते

किएव्ह हे गाव थोडे दक्षिणेकडे आले येथे फुलांची खूपच शोभा दिसली वस्तीच्या फ्लॅटस्‌मधील गॅलऱ्या फुलांनी डवरल्या होत्या, ठिकठिकाणी खिडक्यांतून, इमारतीतून पुष्पपात्रे सजली होती काही फुलेही फार सुंदर होती कमळाएवढ्या आकाराची पण अगदी बारीक पाकळ्याची, अनेक रंग छटांची ती फुले सर्वत्र शहरभर ताटव्यांतून हसत होती फुलांमुळे किएव्ह जास्त देखणे वाटले छोट्या कमळाएवढी परंतु प्रश्नचिन्ह व स्वल्पविरामासारख्या नखनख पाकळ्या असलेली गुबगुबीत फुले मी फोटो काढून घेण्याइतकी मला आवडली आम्ही ही भरतकामातच रंगविली होती जॉर्जिना ही चिमुकली कमळासारखी लाल फुलेही फारच आवडली.

आम्ही उतरलो ते हॉटेल 'मिर्' ( Mir ) मिर म्हणजे शांती हे हॉटेल फारच सुंदर व प्रशस्त होते त्याचे आवार खूप मोठे, मोकळे होते ते चढणीवर होते. पायऱ्यांच्या दुतर्फा बाके होती पायथ्याशी बस थांबली तेव्हा ह्या पायऱ्या व वरचे अंगण यात आबालवृद्ध प्रवाशांचे घोळके विखुरले होते कडेच्या वाफ्यांतून जांभळा झिनिया रंग उधळीत होता त्याच्याभोवती पिवळ्या, केशरी मेरी गोल्डचे ताटवे म्हणजे चक्क-झेंडूच! या जांभळ्या पिवळ्या फुलांचेही पुष्पपात्रात उपयोग केले होते

हा प्रांत थोडा दक्षिणेकडे असल्याने छानदार पिवळी उन्हे चमकत होती. गारठाही कमी होता येथील माणसांचे ओठही शिष्टपणे घट्ट मिटलेले नव्हते तर हसनमुख होते

किएव्ह हे, आमचे गाईड वादिन व तानिया यांचे गाव स्टेशनवर तानियाचा नवरा पुष्पगुच्छ घेऊन तिच्या स्वागताला आला होता आम्हाला हॉटेलात सोडून ती घरी गेली. मात्र तानियाने आम्हा शाकाहारी लोकांच्या जेवणाची फारच छान सोय ठेवली रशिया सोडल्यावर शेवटचे पाच-सहा दिवस रोज बदलते गाव व गाईडस् यामुळे शाकाहारी जेवणारांना फार हाल काढावे लागले वास्तविक ट्रीपच्या वेळी आम्ही नीट विचारून घेतले होते का, 'शाकाहारी जेवण मिळेल ना?' त्यावर शाकाहारी व मांसाहारी यांच्या व्यवस्थित याद्या करून मॅनेजरकडे दिल्या होत्या तरीसुद्धा अनेक घोटाळे झालेच

किएव्हला गेल्यागेल्या गरम पाण्याने बाँश घ्यायला मिळाला. नंतर मात्र तीन दिवस गरम पाणी मिळाले नाही कारण सर्वत्र ऑलिंपिकचा तयारी चालू होती ना? त्यामुळे

हॉटेलचा बॉयलर रिपेअर करण्यास घेतला होता थंडी कमी असली तरी गार पाण्याने आघोळ करण्याइतकी नव्हती.

आमचे नेते श्री प्राणलाल व्होराजी व त्यांच्या पत्नी प्रा धैर्यबाला हे दांपत्य अत्यंत शांत व दिलदार होते अडचणी आल्या की व्होराजी त्यातून मार्ग काढीत विनोदाने त्रास उणा करीत ते म्हणाले,

'गरम पानी नसला तर काय झाला ? थंड पान्याने न्हावा'

'अन् सर्दी, खोकला झाला मग ?'

'मग न्हाताना तोंडामदी लवंग ठेवायची'

'लवगा विमानात संपल्या'

'मग शेंगदाणा ठेवायचा'

'शेंगदाण्याने काय होणार ? तो काय लवंगेसारखा गरम आहे ?'

यावर व्होराबाई गंभीर चेहऱ्याने म्हणत,

'शेंगदाणा पण उष्णता देतो त्यात हाय प्रोटीन कन्टेन्टस् आहेत'

त्यांच्या गभीर बोलण्याने आणखीच मजा वाटे

हॉटेल 'मिर' मध्ये न्याहरी करून आम्ही पायथ्याच्या एका तलावाकाठी गेलो तेथे नौकाविहाराची सोय होती ते तळे हिरवे असल्यामुळे मला शेवाळ्याचा संशय होऊन मी नौकाविहारास गेले नाही त्याऐवजी तळ्याकाठच्या झाडीत न्हातान्या आज्या किंवा प्रौढवयी नातलग यांच्याबरोबर आलेली सुरेख रशियन बाळे पहात बसले ही मुले फारच गुटगुटीत ! आरोग्याने एकदम तब्येतदार ! गाल नुसते चेंडूगत लाललाल नी गुबगुबीत त्याचे अगही थोराड, वर्षाचे मूल अडीच वर्षाचे वाटे तीन वर्षाचे मूल तर चांगलेच तगडे

खरोखरच रशियन मुले मला इतकी आवडली की कोठेही लहान मूल दिसले की पाय थबकत. मुलांचा घोळका पाहिला की भाषाविरहीत जमेल तेवढा संवाद साधू पाही त्या मुलाच्या गालावर हात फिरवावा आणि हसावे तेही बेटे वेगळी माणसे पाहिली की टाटा करीत चालत्या बसमधून हात हलवीत त्यांचे गर्द निळे डोळे लुकलुकत मोठ्या गालामुळे ते बटाट्यामधल्या भोकासारखे वाटत रशियन मूलच मुळी खूप मोठे कलिंगड वाटे रशियातून निर्जीव खेळणी आणली, त्याऐवजी प्रॅममध्ये पहुडलेले एखादे गोड, गोंडस बाळच आणावेसे वाटले विशेष म्हणजे मुलाच्या चेहऱ्यावरचा कोवळा, निष्पाप, मधूर भाव हवाहवासा वाटला

दुपारी युक्रेनच्या फ्रेंडशिप सोसायटीत मीटिंग होती येथील 'युक्रेनियन सोसायटी फॉर फ्रेंडशिप अॅन्ड कल्चरल रिलेशन्स विथ् फॉरिन कंट्रीज्'चे अध्यक्ष श्री व्हिक्टर बोगोमोलाव्ह हे होते येथे चर्चा बरी झाली त्यानी काही माहिती सागितली त्यांनी फ्रेंडशिप् सोसायटीतर्फे चाललेले शैक्षणिक व ग्रथालयाचे कार्य सागितले ही सोसायटी १९७७ पासुन

भारतीय प्रजासत्ताकदिन साजरा करते हिचे काम सरकारी नसून विधायक आहे येथे आमची व यजमान रशियनांची प्रश्नोत्तर रूपाने चर्चा झाली. मी प्रथम विचारले, 'येथील कमाल व किमान वेतन किती असते ?' त्यांच्या सांगण्याप्रमाणे कामगार, शेतमजूर व पदवीधर यांच्या पगारात जमीन–अस्मानाची तफावत नसते पदवीधराच्या इतकीच मजूरांच्या श्रमाची प्रतिष्ठा बाळगतात उदाहरणार्थ–शेतकऱ्याला महिना पगार १७० ते २२० रुबल्स् असतो रोजीवर नऊ रुबल रोज मिळतो स्त्री–पुरुषाना मजुरीचा दर एकच आहे कामगारानाही तेवढाच मिळतो तंत्रज्ञ व कुशल कामगार याना ४०० रुबल्सपर्यंत. डॉक्टर, प्रोफेसर, आर्टिस्ट, इंजिनीयर ह्यांना ५०० रुबल्सच्या आसपास टायपिस्ट, कारकून, शिक्षक, गवंडी, सुतार, मेकॅनिक यांना २०० ते ३०० रुबल्स यावरून येथे सर्वांच्या श्रमाची किंमत सारखी मानतात आणि डॉक्टर, इंजिनीयर याना इतरांच्या कित्येक पट कमाई करता येत नाही स्त्रियांना प्रसूतीसाठी सहा महिने रजा भरपगारी मिळते. शिवाय आणखी सहा महिने रजा हवी असल्यास अर्धपगारी मिळते व नोकरीवर क्लेम टिकतो स्त्रियाना पुरुषाच्याआधी पाच वर्षे पेन्शन मिळते. स्त्रियाना घरकामात जास्त राबावे लागत नाही एकतर अर्धे अन्नप्रकार शिजवलेले मिळतात दुसरे, इकडे नोकर ठेवण्याची पद्धत नाही त्यामुळे पति व मुले मदत करतात

एक रुबल म्हणजे तेरा रुपये या कोष्टकात पगार जास्त वाटले तरी वस्तूही तशाच महाग वाटतात आमच्या गाईडने तेव्हाचे काही बाजारभाव सांगितले–

(एक रुबल म्हणजे शभर कोपेक्स)

| वस्तू | वजन | किंमत रुबलसमधे |
|---|---|---|
| चहा | ५० ग्रॅम | ३७ (९६२ रु किलो) |
| तांदूळ | १ किलो | ८० |
| साखर | १ किलो | ८४ |
| टोमॅटो | १ किलो | १० |
| मीठ | १ किलो | १० |

म्हणजे वस्तूही महागच मात्र कुणालाही दारिद्र्य भोगावे लागत नाही. दोन टोकाना राहाणीमान नाही. प्रत्येकाला आपल्या आवडीचा कोर्स निवडून शिकता येते. तसेच हायस्कूलपर्यंतचे शिक्षण सक्तीचे आणि फुकट उच्च शिक्षणाला भरपूर स्कॉलरशिप याशिवाय प्रत्येकाला शिक्षण संपताच नोकरीची हमी असते त्यामुळे शिकणाऱ्याला उत्साह वाटतो आणि बेकारीमुळे आपल्याकडे तरुणात दिसणारी निराशा आणि चिडचीड तिकडे दिसत नाही यानतर मी दुसरा प्रश्न विचारला होता की,

आमच्या देशात लेखक, कवि, चित्रकार, वक्ता आणि नट यांना आपल्या कलेच्या आविष्काराचे स्वातंत्र्य आहे. तुमच्याकडे स्वतःला वाटेल तसे लिहिता, बोलता आणि

चितारता येते का ?'

ते म्हणाले,

'आमच्याकडेही कलावंत स्वतंत्र आहेत गायक आणि नट आपला ग्रुप बनवून स्वतंत्र कार्यक्रम करू शकतात आमचा देश कम्युनिस्ट नाही सोशालिस्ट आहे त्यामुळे विचारस्वातंत्र्य आहे ' मात्र निघताना मी त्यांचा निरोप घेऊन माझे कार्ड दिले तेव्हा त्यांचे कार्ड देत ते म्हणाले,

'स्वातंत्र्याबरोबर इथे सेन्सॉरशिपपण आहे !'

२२ सप्टेंबरला आम्ही शिक्षणसंस्था पहाण्यासाठी निघालो मास्कोमध्ये आम्ही तेथील युनिव्हर्सिटी पहाण्यासाठी बराच आग्रह धरला परंतु त्यांनी ठरवल्याप्रमाणे आम्हाला किएव्हचे मॅक्झिम गॉर्की टीचर्स ट्रेनिंग कॉलेज, दाखवण्याचे ठरले होते येथे स्त्री-पुरुष सर्वांना प्रवेश आहे येथे चाळीस हजार विद्यार्थी आहेत त्यातील अर्धे विद्यार्थी फुलटाईम शिक्षण घेतात दरवर्षी पाच हजार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो विद्यार्थ्यांत मुलींचा भरणा जास्त आहे आम्ही गेलो तो शनिवार होता सर्व कॉलेज भरले आहे, विद्यार्थी शिकत आहेत, असे काही बघायला मिळाले नाही हे युक्रेनमधील मुख्य ट्रेनिंग कॉलेज आहे इमारत खूप मोठी आहे त्याची स्थापना १९२० मध्ये झाली आहे कॉलेजच्या डीन बाई ह्या भारदस्त प्रौढा संस्थेला सर्वस्व वाहू न घेणाऱ्या आहेत त्या सोशल सायकॉलॉजीच्या डॉक्टर आहेत येथे सर्व विषय शिकवतात बी. एड् चे ट्रेनिंग चार वर्षांचे आहे चार भाषांच्या माध्यमातून शिकवतात परदेशी भाषाविभागसुद्धा आहे हे सर्व शिकवणारे रशियन शिक्षक आहेत टीचर्स रिसर्चिंग-सुद्धा चालू आहे काही फ्रेंच शिक्षक येथे शिकवतात येथील प्रोफेसरच पाठ्यपुस्तके बनवतात ती पुस्तके रशियाभर चालतात येथे रशियाबाहेरची इतर मित्र-राष्ट्रांची मुले-मुली येतात. झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, क्यूबा, मंगोलिया, इजिप्त अरबस्थानापासून मध्य आशियातून असे लांबलांबहून विद्यार्थी येतात या कॉलेजात व रशियातील सर्व युनिव्हर्सिटीत अनेक विषय शिकवण्याची सोय आहे इतिहास, भूगोल, गणित भाषा याप्रमाणे सायन्सचे अनेक भाग आहेत त्यात सोशल सायन्स, नॅचरल सायन्स, लेबर एज्युकेशन वगैरे विषय वेगळे वाटले. शिवाय संगीत विभाग समृद्ध आहे

आमचा कार्यक्रम ठरविणाऱ्या स्पुटनिक संस्थेने भरलेले कॉलेज काही दाखविले नाही एका हॉलमध्ये संस्थेच्या अध्यक्षा व डायरेक्टर आणि डीन यांनी आमचे स्वागत करून भाषणातून माहिती दिली त्यानंतर आमच्यातर्फे प्रा सौ व्होरा यांनी भाषण करून आपल्या शिक्षणसंस्थांची माहिती दिली नंतर त्यांना शिक्षणाची वर्षे व वयोमर्यादा विचारली त्यांनी सांगितले,

'एक ते तीन वर्षांपर्यंत नर्सरी, तीन ते पाच वर्षे के जी, सहा व सात प्रिपरेटरी इयत्ता, सात ते दहा वर्षापर्यंत प्रायमरी शिक्षण आणि दहा ते पंधरापर्यंत सेकंडरी.'

यानतर आम्ही दुय्यम शिक्षणानतर उच्च शिक्षणासाठी कोणत्या निकषावर वेगवेगळे कोर्सेस देतात ? असे विचारले त्यांनी सांगितले,

'एस एस सी नतर कॉम्पिटिटिव्ह एक्झामिनेशन घेऊन, ज्यात विद्यार्थ्यांची अधिक गुणवत्ता आहे हे पाहून त्याप्रमाणे तो तो कोर्स देतात पदवी परीक्षेला चार वर्षे, टेक्निकल कोर्सला चार वर्षे, मेडिकल व इंजिनियरिंग पदवीसाठी सहा वर्षे लागतात'

त्यानतर आम्हाला कॉलेजच्या हॉस्टेलमधे नेले हॉस्टेल बाहेरून साधे पण आत सर्व सुखसोईनी युक्त होते तेथील डायनिंग हॉल पाहिला आपल्याकडील उची डायनिंग हॉलसारखा सुदर व चकचकीत होता मीही एके काळी टीचर्स ट्रेनिंग कॉलेजमधे होते तेथाल पाटावर बसून मिळणारे जेवण आठवले आणि वाटले पुन्हा विद्यार्थी होऊन इथे यावे येथील हॉलमधे अठ्ठावीस विद्यार्थिनी व दोन विद्यार्थी याच्यासमवेत आमची बातचीत झाली मास्तरणी म्हटल्या की आपल्या डोळयासमोर काकूबाई उभ्या रहातात आणि त्यांनी काकूसारखे रहावे असे आपल्याही लोकांना वाटते ह्या मास्तरणी अतिशय उत्साही, तरतरीत आणि हसतमुख होत्या त्यांच्यातील एका प्रतिनिधीने आमचे स्वागतपर भाषण केले.

आतापर्यंत जी भाषणे व बोलणी ऐकली, त्यामधे रशियन उच्चार फार खरखरीत वाटले आवाजात जोर आणून व भरपूर रूकार असलेले असे ते भाषण असे बायकाही र अनुच्चारित ठेवत नसत फ्रेंचसारखी ही गुळगुळीत भाषा नाही इंग्लिश मडमा 'र'चा उच्चार गाळून बावडे उच्चार करतात पण आमचे स्वागत करणाऱ्या मुलीने युक्रेनियन भाषेत फार गोड भाषण केले तिने उच्चारलेले रकारसुद्धा कर्कश वाटले नाहीत जरा किनऱ्या आवाजात एज्यु इन द सोव्हिएट युनियन' बद्दल ती उत्साहाने बोलली या सर्व मुली गुलाबासारख्या वर्णाच्या, निळ्या डोळयाच्या व सोनेरी केसांच्या होत्या पुरुषही जवळ जवळ तसेच त्यानी आमच्या स्वागतासाठी एक ऑर्केस्ट्रा बसविला होता दोन सुदर तरुणी युक्रेनियम पारपारिक वेशात सजल्या होत्या मुगुटाप्रमाणे त्यानी केसात कापडी फुले घातली होती त्याच्या अगावरच्या स्कर्ट ब्लाऊजवर वैशिष्टयपूर्ण भरतकलेचे डिझाईन होते. ऑर्केस्ट्राबरोबर त्यांनी नृत्य केले त्या कार्यक्रमानतर त्यांनी आम्हाला तेथील चित्रांचे सेटस् भेट दिले मी त्या नृत्य करणाऱ्या मुलींना मोत्याची माळ व अगठी भेट दिली. त्यांच्याबरोबर माझा फोटोही निघाला

नतर आम्ही गाव बघत निघालो किएव्ह येथील विद्यापीठाचे नाव 'सूचेन कॉनमी युनिव्हर्सिटी' हा सूचेन कानमी कवी होता

युनिव्हर्सिटीची इमारत लालेलाल आहे किएव्हमध्ये दरवर्षी पाच हजार विद्यार्थी नवीन दाखल होतात ट्रेनिंग कॉलेजमध्ये कुणी भारतीय विद्यार्थी नव्हते पण युनिव्हर्सिटीमधील दोन सिंहली विद्यार्थी हिंदी प्रवासी आल्याचे ऐकून रात्री आम्हाला भेटायला आले त्यातील मुलगी माझ्या खोलीवर गप्पा मारीत बसली होती ते 'इंटर नॅशनल लॉ'चा

अभ्यास करीत आहेत तरुण सिंहली विद्यार्थ्याला खायची पाने इथे कधीही मिळत नसत. त्याने आमच्या ग्रुपकडे चौकशी केली मी त्याला कुटलेली सुपारी दिली त्या मुलाना आम्हीही खूप जवळचे वाटलो

२२ सप्टेंबरला दुपारी आम्ही तेथील कॅथेड्रल बघायला गेलो जाताना किएव्ह शहरातून बऱ्याच रस्त्याने नेले येथे लेनिन टॉवर्स व टॉलस्टॉय चौक आहे त्यामध्ये लालभडक गुलाबाचे व इतर फुलांचे खूप ताटवे होते टॉलस्टॉयला फळाफुलाचे समृद्ध किएव्ह फार आवडत असे चौकामधल्या एका बैठ्या घरात तो येऊन रहात असे

किएव्हमध्ये चेस्टनेट झाडे ही त्या गावाची प्रतिक समजतात त्याच्या कवचावर धोत्र्याच्या फळासारखे काटेरी आवरण असते सुकल्यावर आतून गारबीच्या बी सारखे तपकिरी फळ निघते मी ती फळे किएव्हची आठवण म्हणून घेतली किएव्हमध्ये नीपर नदी वळणावळणांनी फिरते ही मास्कवापेक्षा मोठी आहे आणि खोलही

किएव्ह तीन टेकड्यांवर वसले आहे कुठल्याही टेकडीच्या माथ्यावरून बस जाताना सुंदर दृश्य दिसे या टेकड्यांच्या पायथ्यांकडेनी नीपर वळणे घेते

त्याबद्दल अशी आख्यायिका आहे की, इ. स पूर्वी पाच हजार वर्षे हे शहर तिघा भावांनी वसविले त्यांची नावे की ( Kiy ) शेक ( Tshek ) खॉरिव्ह ( Horiv ) अशी आहेत त्यांची लाडकी एकुलती एक बहीण लिबिटस् (हंसा) ही सासरी गेल्यावर त्यांना भेटायला होडीने येई तिला तीन टेकड्यांवरील तिघे भाऊ भेटावेत म्हणून तिने नीपरला तिन्ही टेकड्यामधून जाण्यास सांगितले त्यामुळे नीपरने वळणे घेतली.

पूर्वी किएव्ह ही बायलोरशिया व युक्रेनची राजधानी होती. १०१९ मध्ये 'यारोस्लाव्ह द वाईज' याने इथे पस्तीस वर्षे राज्य केले नंतर तेराव्या शतकापर्यंत पेगेन हूर्सने जिंकलेले किएव्ह मुसलमानी अमलात होते नंतर प्रिन्स ओलेग या रशियन राजपुत्राने किएव्ह राजधानी केली होती तेथे एका भकास कॅथेड्रलमध्ये आम्ही गेलो भोवतालचा परिसर चांगला होता पण तो बघण्यात आम्हाला रमू दिले नाही. कॅथेड्रलमध्ये पितळेचे स्तंभ होते व उत्तम भरीव धातूची नक्षी केलेली मखरे होती ही धर्मस्थाने अर्थातच आता ऐतिहासिक वास्तू या नात्याने दाखवतात या कॅथेड्रलची फरशी नक्षीदार पोलादी तुकड्यांनी बनविली होती त्यामध्ये तीन चांद व चांदण्या चौरसात गुंफल्या होत्या व ते अत्यंत कौशल्याचे काम होते हे डिझाइन मुसलमानी पद्धतीचे वाटले यामध्ये जुनी पेंटिंग्ज व जुनी नक्षीकामे आहेत तेथून आम्ही अडीच कि मी लांब पूल पाहिला तेथे आक्टोबर क्रांतीचा स्तंभ आहे, त्याच्याभोवती चार पुतळे होते ते मला मोठे अर्थपूर्ण वाटले ते समाजाचे चार महत्त्वाचे घटक—योद्धा, स्त्री, कामगार व शेतमजूर याचे होते ह्या चार घटकांनी आक्टोबर क्रांतीत महत्त्वपूर्ण कार्य केले होते नंतर आम्हाला किएव्हची नागरिक वस्ती दाखविली

आम्हाला एकाही नागरिकाचे घर आतून दाखविले नाही, तर रस्त्यातून हिंडवून त्यांची वस्ती दाखविली किएव्हचे क्षेत्रफळ ३ हजार कि मी आहे आणि येथे लोकसंख्या १५ लाख आहे भाडोत्री लोकांसाठी अपार्टमेंट हाऊसेस आहेत आणि दूर निवांत नदी-काठी स्वत:ला राहाण्यापुरते घर बांधण्याची सवलत आहे आपला पगार वाचवून अशी घरे बांधता येतात ही घरे टुमदार नीटस व रेखीव आहेत.

तेथून आम्ही नीपर नदीच्या काठी असलेली 'अमरज्योत' पाहिली ती अमरज्योत दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या योद्धयांच्या स्मरणार्थ तेवते आहे युद्धाच्या वेळी किएव्हची लोकसंख्या नऊ लाख होती त्यातील एक लाख पुरुष युद्धात कटून मारले गेले. दोन लाख लोक निरपराध नागरिक होते त्यांना हिटलरने किएव्ह जिंकल्यावर कापून काढले असे आम्हाला सांगितले गेले म्हणजे गावची एकतृतीयांश लोकसंख्या मृत झाली त्यात बहुतेक पुरुष होते त्यावेळी किएव्हमध्ये असे एकही घर उरले नाही की ज्यातला माणूस यात बळी पडला नाही

आमच्या बसशेजारी फुलांनी किंवा कागदी माळांनी नटविलेल्या अनेक गाड्या येऊन थांबल्या होत्या त्यातून नवविवाहित जोडपी उतरत नातलगांसह ते अमरज्योतीकडे जात व पुष्पगुच्छ वाहात नवविवाहित जोडपे त्या ज्योतीपुढे माना झुकवून आदर दाखवी !

दुसऱ्या महायुद्धात हुतात्मा झालेल्या असंख्य लढवय्यांची व नागरिकांची ही ज्योत हे प्रतिक आहे त्यांच्यापुढे विनम्र होऊन नवदापत्ये भावी जीवनासाठी त्यांचा आशीर्वाद मागतात इतरही नागरिक ज्या ज्या वेळी या अमरज्योतीशी येतात त्यावेळी फुले वाहून, माना झुकवून त्या शूरांना आदरांजली वाहातात

आपल्याकडे लग्न लागल्यानंतर गावातील देवळात वरात नेतात देवाच्या पाया पडतात वडीलधाऱ्यांना नमस्कार करतात दिवंगत पूर्वजांच्या फोटोंना नमस्कार करतात. या सर्वांचे आशीर्वाद घेऊन संसाराला सुरवात करतात रशियामध्ये नवीन पिढ्या धर्माचे स्तोम मानीत नाहीत चर्चमध्ये लग्न करून देव आणि धर्मगुरु यांचा आशीर्वाद घेण्याची फारशी पद्धत नाही लग्न रजिस्टर होतात त्यानंतर आशीर्वाद घेण्यास नवविवाहित या अमरज्योतीशी ( इटर्नल फ्लेम ) येतात आम्ही पाहिलेल्या सर्व शहरात अशा अमर-ज्योती आहेत आणि तेथे वंदन करण्यास आलेले नागरिक आणि नवविवाहित आम्ही पाहिले अंधश्रद्धा टाकून देऊन ही डोळसपणाने केलेली उदात्त पूजा मला आदर्श वाटली याशिवाय लेनिनच्या कबरीचेही दर्शन घेणारे नागरिक दिसले नवविवाहितसुद्धा त्या रांगेत लग्नवेशात होते

त्यादिवशी रात्री भोजनानंतर आम्हाला फ्रेंडस् सोसायटीत बोलाविले होते तेथील तरुण तरुणींनी आमचे हार्दिक स्वागत केले त्या मुलामुलींनी आपल्या पॉकेटमनीमधून आमच्यासाठी केकस् व चॉकलेटस् दिली सोडा लेमनच्या बाटल्या दिल्या. मला वाटते दर

टेबलावर एक मद्याची बाटलीही होती

त्या उत्साही किशोरकिशोरींच्या या अगत्याने आम्हाला लाजल्यासारखे झाले. त्यामानाने दरेक गावी मोठे नाव असलेल्या फ्रेंडशिप सोसायटीत पोलंड वगळता इतर ठिकाणी आम्हाला फक्त सोडा मिळाला तोही नुसते पाणी इथे पीत नाहीत म्हणून कुठे सिगारेटस् असत फ्रेंडशिप सोसायटीत खेळमेळीची बातचीत होण्याऐवजी त्यांची औपचारिक भाषणे, आमच्या नेत्यांचे औपचारिक आभार प्रदर्शक उत्तर असा ठराविक कार्यक्रम चाले आमच्या आग्रहामुळे प्रश्नोत्तरे तरी चालत यजमान देशाच्या सौजन्याबद्दल वाद नाही परंतु आम्हाला इथेही त्यांचे भरपूर सदस्य भेटले नाहीत पाहुणे अठ्ठेचाळीस तर यजमान दोन किंवा तीन असत त्यामानाने मी इथे इंडोजर्मन सोसायटीतील जर्मन पाहुण्यांच्या स्वागतासाठी झालेल्या गेट टू गेदर्सना गेलेली आहे, त्यावेळचे दृश्य वेगळे होते चहा फराळ तर नेहमीच असे भारतीय नागरिक तीस--चाळीसच्या आत कधी नसत पाहुण्यांच्या व यजमानांच्या औपचारिक भाषणाचा कार्यक्रम पधरा-वीस मिनिटात उरकला जाई बुफे डीनर किंवा स्नॅक्स यांच्या आस्वादाबरोबर खेळीमेळीच्या गप्पागोष्टी तासभर चालत

असा अनौपचारिकपणा आणि स्वागत क्वचितच दिसले बर्लिन फ्रेंडशिप सोसायटीत चर्चा चांगली झाली वार्सा येथील सोसायटीत बरीच आपुलकी आढळली फारशा समृद्ध नसलेल्या या देशात माणसामाणसात अगत्य फार आहे तेथे आम्हाला कॉफी दिली इतकेच नव्हे तर कॉफी बनवणाऱ्या बाईजवळ जाऊन मी ' फार चविष्ट कॉफी केलीत हं ! ' अशी पसंतीची पावती देताच ती गुलाबी बाई लाजून लालेलाल झाली भारतीय गृहिणीप्रमाणे माझ्यापुढे आणखी एक पेला धरत म्हणाली,

' ही आणखी माझी आग्रहाची म्हणून प्या '

पोलीश फ्रेंडशिप सोसायटीत शोकेसमध्ये गांधीजींचा पुतळा वगैरे हिंदी संस्कृतीच्या निशाण्या होत्या आमच्यातील लोकानीही त्याना चंदनाचा हत्ती दिला पोलिश सोसायटीने यंदा १९८० च्या जानेवारीत मला एक ग्रीटिंग कार्ड पाठविले होते मी माझा पत्ता त्यांना दिला होता त्याचे अगत्य त्यांनी ठेवले मीही त्यांना अजिंठ्याचे चित्र पाठविले

तर युक्रेन फ्रेंड्स् सोसायटीने त्या रात्री खाणेपिणेच नव्हे तर सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करून फार बहार आणली त्यानी स्वतःचा ऑर्केस्ट्रा व लोकगीते सादर केली ही गीते गाताना ते तरुण अगदी तल्लीन होऊन गेले होते ते उड्या मारून गात होते त्यानी भरतकाम केलेले पारंपारिक पोशाख केले होते आमच्यातर्फे श्री देशपांडे यांनी महाराष्ट्रीय लग्नसोहळ्याच्या स्लाइडस् दाखविल्या सौ व्होरा यांनी गुजराथी गीत म्हटले श्री दौलतराव भोसले यांनी एक समयोचित गाणे निवडून म्हटले त्याचा अर्थ तानियाने प्रेक्षकाना रशियनमध्ये सांगितला ते गीत म्हणजे कवी कुसुमाग्रजांचे गर्जा जयजयकार

क्रांतीचा, गर्जा जयजयकार' ते ऐकत असता येथील अमरज्योतीच्या दर्शनाने चेतलेली आमची हृदयेसुद्धा उचंबळून आली सर्वांनी पालुपदाला कोरस दिला

अशा प्रकारे किएव्हूचा हा सांस्कृतिक कार्यक्रम अविस्मरणीय झाला

२३ सप्टेंबरला सकाळी आम्हाला बसने किएव्हपासून काही मैलावर असलेल्या ॲग्रिकल्चरल म्युझिअममध्ये नेले. हे म्युझिअम म्हणजे एखादा हॉल नव्हता रशिया एखाद्या प्रदर्शनीय प्रोजेक्टवर किती खर्च करू शकते त्याचा तो नमुना होता. ॲग्रिकल्चरल म्युझिअम म्हणजे आठ शतके रशियात शेती, शेतकरी आणि त्यांच्या वसाहती यात झालेल्या प्रगतीचा प्रत्यक्ष नमुना होता एकशेचाळीस हेक्टर क्षेत्रफळामध्ये सहा विभाग पाडून त्यात माणसाच्या बदलत्या रहाणीचे व शेतीकामाचे नमुने दाखविले होते सभोवती भरपूर मोकळी जागा होती एका अर्थी हे एक पिकनिकचे स्थान सुरू झाले होते आणि विदेशी लोकांप्रमाणे तेथील नागरिकही येत होते प्रवेशद्वाराशी खाणे-पिणे व खरेदी याचे स्टॉलस् होते. आतमध्ये जागोजाग तहानेसाठी सोय केली होती वजनाच्या यंत्रासारखी दोन यंत्रे असतात तिथे खाचात दोन ग्लास असतात पायाने पट्टी दाबली की ग्लास धुण्यास पाणी येते साधे पाणी अर्थातच इथे प्यायचे नसते कारण येथील पाण्यात या भूमीमध्ये विपुल असणारी खनिजे विरघळलेली असतात पिण्यासाठी पाणी हे सोडयाच्याच रूपाने प्यावे लागते एका यंत्रात तीन कोपेक्सचे नाणे टाकले की सोडा मिळतो दुसऱ्या यंत्रात पाच कोपेक्सचे नाणे टाकले की सोडालेमन मिळते अशी यंत्रे रशियाभर सार्वजनिक ठिकाणी पाहिली. रशियात सर्वांत स्वस्त हे सोडा-लेमन आहे ट्रेनमध्ये मात्र लेमनपेक्षा दारू स्वस्त आढळली पाण्यासाठी जास्त पैसा खर्चणाऱ्या माझी युरोपियन उतारूंनी कीव केली

ॲग्रिकल्चरल म्युझिअममध्ये सहा विभागात उलट्या क्रमाने नमुने मांडले आहेत. म्हणजे प्रथम सतरावे, नतर सोळावे अशा क्रमाने शेवट बारा, तेराव्या शतकातील राहाणी दिसते पूर्वी युक्रेनमधे पवनचक्क्या होत्या त्याचा नमुना प्रथमदर्शनीच आहे आतमध्ये कौलारू घरे, विहिरी, गोठे, सुतार-लोहाराची घरे, छोटेसे चर्च असे गाव बनवले होते आधुनिक काळाकडून जुन्या काळाकडे जात चाललो पुढे बाबूने पाणी काढण्याच्या विहिरी, कोबड्यांचो खुराडो, गोठे हे सर्व असलेल्या झोपड्या लागल्या घरावर वातकुक्कुट होता गरीब व श्रीमताच्या झोपड्यांचेही नमुने होते शेवट शेवट गवती झोपड्या लागल्या या सर्व झोपड्यांचे वैशिष्ट्य असे की त्याच्या भिंती लाकडी असोत, मातीच्या असोत किंवा गवताच्या, छप्पर कौलारू असो किंवा गवताचे, त्यात एक प्रकारचा रेखीवपणा आणि सुबकपणा होताच कमीत कमी फर्निचर होते उभ्या वाशावर फळ्या ठोकून केलेले का होईना पण पलग होते पुष्पपात्रे आणि साधे तरी जेवणाचे टेबल होतेच चहाचा सरजाम किटलीसह होता उबेसाठी शेगडी होती घराच्या रचनेत लहानात लहान झोपडीतही

हॉल, बेडरूम, डायनिंगरूम, किचन असे सर्व भाग व्यवस्थित मांडलेले होते तेरा चौदाव्या शतकातील झोपड्यांना जमीन व छप्परही गवताचे होते तरीही त्यात किमान फर्निचर होते बाळासाठी कठडे असलेला पलंग होता या गवती झोपड्या बांधायचे कारण त्यावेळी रानटी लोकांचे वारवार हल्ले होत असत अशा हल्ल्यांच्या वेळी घर सोडून जावे लागे म्हणून ते फार किंमती नसे या म्युझिअममधून अगदी टोकाचा भाग लांबूनच पहात मी एकटीच गाईडला सांगून परतले कारण परतताना मला आजूबाजूला दिसणाऱ्या घोळक्यात जमल्यास बोलायचे होते आपणहून कोणी थांबून जिज्ञासा दाखवली तर इंग्लिश किंवा जर्मनीमध्ये बोलण्याला प्रतिसाद मिळाला म्हणजे काही माहिती विचारता येईल रशियन मुले तर शब्दांशिवाय हसून, बोलून जात निग्रो व अरब प्रवासीही होते निग्रो बिचारे फार प्रेमाने बोलत त्यांना इंग्लिशही चांगले येत होते

एक पेन्शनर पूर्वी भारतात नोकरी करून गेलेला होता हा साठीपलीकडचा रशियन चांगला टुणटुणीत होता त्याची सून, मुलगा नोकरी करत हा नातवंडाकडे बघे त्याचा शाळकरी नातू त्याच्याबरोबर आला होता, त्याला मी भारतीय नाणी व तिकिटे दिली तो फारच लाजत होता

आमची गाईड तानिया हिच्या मुलाला पाहण्याची आम्हाला फार इच्छा होती तिच्या नवऱ्याला आज सुट्टी असल्यामुळे तो मुलाला घेऊन आला होता हा अडीच वर्षांचा मुलगा चांगलाच उंच होता त्याला उचलून घेता येत नव्हते तीन चार मैल प्रदर्शन तो चालत होता मधूनमधून त्याचे वडील त्याला खांद्यावर उचलून घेत ते इंजिनियर होते या देशात नोकर नसल्याने मुलांचे संगोपन स्वतःच करावे लागते तानियाचा मुलगा नर्सरीत जात होता छान बोलत होता गोंडस होता त्याचे नाव सर्योरोव्ह मात्र तो माणसे जवळ आली की लाजायचा दुपारी ॲग्रिकल्चरल प्रदर्शन किंवा डोंगरातील केव्हज् बघण्याचे ठरले होते आमच्या मूळ प्रोग्रॅममध्ये आमच्यामधील प्रगतीशील शेतकऱ्यांसाठी कलेक्टिव्ह फॉर्मसना भेट देऊन सहकारी पद्धतीने चालणारी, यंत्राच्या सहाय्याने केली जाणारी आधुनिक शेती पहाण्याचे ठरले होते. परंतु स्पुटनिकने असे कळविले की, 'सध्या कापणीचा हंगाम असल्यामुळे तुम्हाला तेथे नेता येत नाही कारण ते लोक कामात आहेत त्यांच्या कामात अडथळा येईल'

त्यावर आमच्यातील प्रमुख शेतकरी म्हणाले,

'आम्ही त्यांना त्रास देणार नाही किंवा त्यांचा वेळ मोडणार नाही आम्ही नुसते पाहू तरी'

तरीसुद्धा त्यांना कुठल्याही परिस्थितीत शेतावर जाण्याची संधी मिळाली नाही मूळ आमची सफर योजताना शेतीमध्ये रस असणाऱ्यांचा एक ग्रुप आणि सांस्कृतिक व शैक्षणिक जिज्ञासा असणारांचा दुसरा ग्रुप अशा दोन सहली ठरल्या होत्या परंतु सांस्कृ-

तिक सहलीस पुरेशी नोंदणी न झाल्यामुळे आमचा सांस्कृतिक ग्रुप शेतकी ग्रुपमध्ये मिसळला. आम्हाला शेती न पाहिल्याबद्दल फारसे वाईट वाटले नाही. परंतु मुद्दाम ग्रामीण भागातून आलेल्या, स्वतःची शेती असणाऱ्या बांधवांचा हिरमोड झाला. शेतीऐवजी त्यांना ॲग्रिकल्चर म्युझिअममध्ये नेले होते. माणसाची सर त्याच्या चित्राला येत नाही हे म्हणजे समजूत घालणे होते. किएव्हच्या म्युझिअममधे आमच्या शेतीतज्ञांनी तेथील शेतीच्या मॉडेलमधील माती तपासून पाहिली होती. ती माती पांढरट व आपल्यापेक्षा कमी दर्जाची होती. अशा मातीतून युक्रेन प्रांत समृद्ध गव्हाचे पीक कसा काढतो हे बघणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. पण ते काही त्यांना पहायला मिळाले नाही. तरीपण ते म्युझिअम बघायला गेले. त्यात रस नसणारे जवळच्या डोंगरातील गुहा बघायला गेले. तेथे म्हणे प्राचीन काळी मेलेली माणसे आणून त्यांच्या ममीज्प्रमाणे देह-स्मृती ठेवीत. आता तेथे म्हणे सांगाडे उरले होते. मला मात्र शेती आणि सांगाडे या दोन्हींपेक्षा वेगळ्याच गोष्टीत महत्त्व वाटत होते. ते म्हणजे जनसंपर्क. तो आम्ही सकाळी साधला होता आणि मी एकटी हॉटेलवर राहून आताही तेच करणार होते.

या हॉटेलमध्ये खूप प्रवासी उतरलेले होते. त्यात आर्मेनिया, जॉर्जिया या प्रांतातील तसेच हंगेरी, युगोस्लाव्हिया या देशातील काही प्रवासी ओळखीचे झाले होते. त्यात तरुणी व प्रौढा खूपच मोकळ्या वागल्या. परवा सकाळी बसमधून उतरून, 'आपापले ओझे आपणच न्यायचे' या न्यायाने बॅग नेऊ लागले. पण हॉटेलसाठी बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागत होत्या. मी माझ्या पद्धतीने जेमतेम दोनचार पायऱ्या चढल्यावर बॅग तिथेच ठेवली आणि पायऱ्यावर मोठ्या अंगणात पर्स आणि एअर बॅग टाकून मोठी बॅग आणायला मागे वळते तोच त्या मिर हॉटेलमध्ये उतरलेल्या प्रवाशांपैकी एका तरुणाने ती बॅग झटक्याने आणून माझ्या हाती दिली. स्टेशनवर ज्याप्रमाणे प्रसन्न स्वागत झाले त्याचप्रमाणे येथील प्रवाशांनीही आल्या आल्या सौहार्द जोडले. शनिवारी सकाळी ब्रेकफास्टनंतर याच उंचावल्या अंगणामध्ये आम्ही सर्व प्रवासी स्वतः एकमेकांच्या ओळखी करून घेत होतो. आमच्यामध्ये जे चार सरदारजी होते त्यांच्या दाढ्या आणि फेटे हे आमच्या ग्रुपचे मोठे आकर्षण ठरले. त्यांचे लाल, केशरी, निळे फेटे पाहून लहान मुले गमत वाटून टाळ्या पिटत. त्यांचे खूप फोटो काढीत. शनिवारी सकाळी आमच्यातील एकीने भलामोठा पिळदार स्विच केसावर लावला होता. त्या केसरचनेचेही फोटो काढले अन् त्याहीपेक्षा म्हणजे हे सर्व प्रवासी मोकळेपणे बोलत होते. त्यांपैकी बऱ्याच जणांना इंग्लिश किंवा जर्मन येत होते. शनिवारी दुपारी आम्ही वरच्या मजल्यावर लिफ्टशी असताना पूर्व जर्मनीमधील ॲथलेट् मुली भेटल्या. त्या पुढल्या वर्षी ऑलिंपिकला येणार होत्या. त्यासाठी सराव म्हणून त्या येथे आपले क्रीडानैपुण्य स्पर्धांमधून व फिनीक्स शोजमधून दाखविणार होत्या. आम्ही त्यांना त्यांचे नैपुण्य कशात आहे हे विचारताच त्या लिफ्ट समोरील कॉरिडॉरमधील गालिच्यावर करून दाखवू लागल्या. काळ्याभोर तंग पोशाखात एका मुलीने पाय हवेत झोकून हातावर

चालून दाखवले दुसरीने चमत्कारिक उड्या मारल्या तिसरीने भराभरा कोलांट्या उड्या मारून दाखवल्या रात्री भोजनानंतर मी त्यांना माझ्या खोलीत घेऊन गेले त्यांना खाऊ दिला व खूप गप्पा मारल्या याशिवाय आणखी काही मुली सरदारजीच्या ग्रुपमध्ये खूप मिसळल्या होत्या

आज सकाळी ब्रेकफास्टनंतर आम्ही इतरांची वाट बघत उन खात त्याच उंच अंगणात उभ्या होतो त्यावेळी असाच सामूहिक थट्टामस्करीला जोर आला फोटो काढणेही चालू झाले आमच्या सरदारजींना भांगडा म्हणण्याचा आग्रह झाला ते बेटे भलतेच लाजले मी त्यांना म्हटले, 'काल रात्री फ्रेंडशिप् सोसायटीत आपण आणखीही काही कार्यक्रम करणार होतो वेळेअभावी ते राहिले ते इथे करा ' मग मात्र सरदारजीने खड्या सुरात गात भांगडा नाचून दाखविला मग आम्ही त्यांना म्हटले, 'आता तुमची पाळी '

त्या पाश्चात्य तरुण तरुणी आणि प्रौढा यांनी कोरस गाणे म्हणत समूहनृत्य केले त्या बायांनी मला व कमल देसाईंना हात धरून आपल्याबरोबर नाचात ओढले तर त्या जर्मन तरुणींनी सरदारजीच्या गळ्यात हात टाकून नृत्य सुरू केले आमच्यातील एक सरदारजी अगदीच छोटा कॉलेजचा विद्यार्थी होता उंच मात्र होता त्याच्या गळ्यात तिघीतिघी हात टाकून नाचत होत्या आणि नाच संपवायलाही तयार नव्हत्या त्यांचे नृत्य झाल्यावर त्यांनी आम्हाला आग्रह केला आम्ही त्यांना मंगळागौरीतली गाणी म्हणत झिम्मा खेळून दाखवला फेर धरला 'मैं तो भूल गई बाबूल का देश' हे गाणे म्हणत गरबा केला काल रात्री फ्रेंडशिप् सोसायटीत आम्हालाही या पुराण्या लोकनृत्याची झलक दाखवायची होती पण देशपांड्यांच्या स्लाइडस्-शोमध्ये बराच वेळ गेला आणि आमचा आयटेम राहिला आम्ही कोळ्यांचे गाणेही म्हटले आमचे सरदारजी व आम्ही बायकांनी संकोच सोडला आमच्यातील प्रोफेसर, डॉक्टर, ॲडव्होकेट, आमदार साऱ्या मिसळल्या, पण पुरुष मात्र लांबच उभे राहिले शेवटी आम्ही फुगड्या खेळलो हा प्रकार परदेशी बायकांना भलताच आवडला त्यांनी पुन्हा पुन्हा फुगड्या खेळून पाहिल्या मी आणि माझ्याच आकाराची एक हंगेरियनबाई फुगडी खेळत असता आमचे फोटोही काढले त्यांना वाटले आम्ही दोघी कोसळणार पण तसे न होता आम्ही आणखी तिघी चौघींबरोबर खेळलो

तेव्हा दुपारीही कृत्रिम शेते आणि गुहांतील सांगाडे पाहाण्याऐवजी लाऊंजमध्ये मी ह्या विविध देशातील लोकांशी गप्पा मारल्या त्यांच्या देशात महागाई व रहात्या जागेची टंचाई आहे काय वगैरे चौकशी केली त्यांनी सांगितले, तुमच्या नाण्यामध्ये आमची मिळकत हजारो रुपये होते हे खरे पण येथे वस्तूचे दरही महाग असतात आमचा रुबल तुमच्या रुपायाएवढीच वस्तू देतो यांत्रिक वस्तू काहीशा स्वस्त आहेत परंतु बाजारात मिळेल तेच घ्यावे लागते चैनीच्या वस्तु मुळीच मिळत नाहीत मात्र शिक्षण फुकट, बेकारी

नाही पतिपत्नींना नोकरी करता येते त्यातून पैसा साठवून ते बऱ्याच गोष्टी घेऊ शकतात लहान मुले सांभाळण्यास नर्सरीज् आहेत त्यामुळे तयार खाद्ये मिळत असल्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांना फार कष्ट पडत नाहीत मुलांचे शिक्षणाची फी इच्छा असल्यास एक पचमांश द्यावी नर्सरीमध्ये त्यांचे खाणे-पिणे होते शिवाय रहाण्याच्या जागेसाठी भेदाभेद नाहीत सर्वांना जागा मिळते कामगार आणि प्रोफेसर, एखादा साधा विक्रेता आणि डॉक्टर या सर्वांना खोलीच्या बाबतीत सारखीच संधी मिळते मूल नसणाऱ्या जोडप्याला वन रूम किचन, एक मूल असल्यास टू रूम किचन, जास्त मुले असल्यास तीन, चार खोल्यांचेही फ्लॅट मिळतात म्हणजे देशाला मुलांची फार कदर आहे मुलासाठी लागणाऱ्या वस्तू म्हणजे कपडे, टॉनिक्स, वह्या, खेळणी, पुस्तके, मासिके, चित्रांची पुस्तके ही सर्व अत्यंत स्वस्त मिळतात मुख्य म्हणजे या देशात वैद्यकीय खर्च कुणालाच येत नाही. मुलांपासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना औषधउपचार मोफत हॉस्पिटलमध्ये पैसे पडत नाहीत ' यावर मी विचारले,

' सर्व लोक सुखी, सतुष्ट असतील नाही ?'

' मनुष्य स्वभाव जगभर सारखाच आहे चैन कुणाला नको असते ? जगातील कित्येक देशात आम्हाला मिळतात इतक्याही सुखसोई मिळत नाहीत भिकारी इतर देशात आहेत रशिया व इतर सोशालिस्ट राष्ट्रे यात तुम्हाला पोटासाठी भीक मागणारी माणसे आणि देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांचा बाजार दिसत नाही प्रत्येक कष्ट करणाऱ्याला कमाई करून मानाने जगता येते उच्च-नीच भेद आमच्यात येत नाहीत पण त्यामुळेच इतरापेक्षा आपण जास्त श्रीमंत असावे, चैन करावी, स्वत. कमी काम करून नोकर म्हणून दुसऱ्याला राबवावे, या इच्छा पुऱ्या करण्यासाठी काहींना दुसऱ्या प्रकारच्या देशात जावेसे वाटते परंतु इथे तुमच्या लोकांप्रमाणे परदेशी सहलीचाही व्हिसा चटकन् मिळत नाही. कारण परदेशात गेलेले काही लोक तेथेच त्या देशाचा आश्रय घेऊ पाहातात. येथे पासपोर्ट व्हिसा यासाठी बराच खर्च पडतो व्हिसा देताना बऱ्याच अडचणी येतात आणि परदेशी शिक्षणासाठी एखाद्या विद्यार्थ्याला जायचे असेल तर त्याला आपल्या शिक्षणाचा खर्च स्वत करावा लागतो त्यासाठी लागणारे डॉलर्स किंवा परकीय चलन स्वत मिळवावे लागते, आणि ते तर सर्वात कठीण आहे त्यामुळे काही नाराज असतात शिवाय चैनीच्या वस्तू परदेशियांना विकण्यासाठी डॉलर्स शॉपमध्ये ठेवतात त्या आम्हाला मिळत नाहीत म्हणूनही काहींना वैषम्य वाटते तथापि इतर देशांच्या मानाने आम्हाला किती तरी सोई अधिक आहेत '

या भाषणानंतर मी दुसऱ्या काही व्यक्तींजवळ चौकशी केली तेव्हा असे कळले की, डॉलर मिळवण्यासाठी बऱ्याच युक्त्या केल्या जातात डॉलर्सचा अधिकृत दरामध्ये ' पाच डॉलर्सना ३ ७६ रुबल्स ' असा दर त्यावेळी होता. परंतु परदेशी प्रवाश्यांशी सबंध

येणारे काही लोक म्हणे डॉलर्स मिळवण्यासाठी याच्या चौपट रुबल्स् प्रवाश्याना डॉलर्स-बदली देऊ करतात बँक रेटच्या तिप्पट दराने ते डॉलर्स घेतात ते या डॉलर्समधून डॉलर शॉपमध्ये मिळणाऱ्या चैनीच्या वस्तू घेतात की परदेशी जातात ? कोण जाणे ? इथे स्थानिक लोक चाकोरीबाहेर काहीच बोलत नाहीत. परक्या गावचे टूरिस्ट म्हणून इतपत आणि बद खोलीआड बोलू शकले

सध्याकाळी मी जेवणघरात आधीच जाऊन बसले होते शेती प्रदर्शन बघायला गेलेले लोक आले त्यानी दुसऱ्या ग्रुपला विचारले,

' काय सांगाडे बघून आलात ?'

त्यानी ह्यांना विचारले

' काय लुटुपुटुची शेते बघून आलात ?'

नतर मला विचारले,

' तुम्ही काय झोपा काढल्यात ?' मी म्हटले,

' मी जिवंत काही मिळवले ' जेवून पर येते तो माझ्या खोलीच्या दारात सुदर अक्षरात जर्मन भाषेत लिहिलेली चिठ्ठी अडकवली होती ती त्या जर्मन क्रीडापटू मुलीनी लिहिलेली होती.

" Liebe Freunde !
Vielen Dank fur die Quarz Uhr Da ich euch nieht melhr gesehen habe muss ich es auf diesem Wege tun. Ihr seid gute freunde leh wunsehe Euch noch Viel spass und Aufwieder sehen.
Es grusst Euch ganz herzlich

– Lile "

" प्रिय मैत्रिणी,
आपण पाच तास ( एकत्र होतो ) त्याबद्दल धन्यवाद ! ( जी कसरत ) तुला कॉरिडॉरमध्ये करून दाखवली ती ( परिपूर्ण व फार ) प्रेक्षणीय नव्हती तू चागली मैत्रिण आहेस मी तुला खूपखूप मजा ( लुटण्याचे भाग्य ) चिंतिते आणि पुन्हा भेटण्याची आशा बाळगते
मनापासूनच्या भरपूर सदिच्छा

–लिली "

जेवणानंतर आम्ही लेनिनग्राडला जाण्यास निघालो किएव्ह ते लेनिनग्राड ह्या प्रदीर्घ अंतराच्या सुपर एक्स्प्रेसने पधराशे किलोमीटर्स जायचे होते ही सुपर एक्स्प्रेस आमच्या दिल्लीइतकी जलद वाटली नाही कारण दिल्ली ते मुंबई अंतर राजधानी एक्स्प्रेस याहून लवकर कापते रात्री दहाला आम्ही गाडीत बसलो प्रवास साडेएकतीस तासांचा होता किएव्ह नगरीचे आतिथ्य एखाद्या प्रेमळ सुग्रणीप्रमाणे वाटले येथील लोक चेहऱ्यावर परीट-घडी न ठेवता हसून, बोलून, खेळून वागले त्यांनी आमच्याशी अकृत्रिम स्नेहाने वागून आम्हाला जिंकले येथील मुक्कामात हॉटेलमधील खाण्यामध्ये भाज्या, फळे यांची रेलचेल होती तानियाने तर एकदा इथे महाग असणारा भात सर्व्ह करायला लावून खूष केले शहर व त्यांची माणसे यांची जी संयुक्त प्रतिमा मनावर उमटते तिच्याप्रमाणे मास्को सरकारी शिष्ट अधिकाऱ्याप्रमाणे वाटले किएव्ह हे प्रेमळ, मध्यमवर्गीय, खाऊनपिऊन सुखी व आतिथ्यशील गृहिणीप्रमाणे वाटले लेनिनग्राड हे गतवैभवाचे अवशेष सांभाळणाऱ्या प्रतिष्ठित मानी, खानदानी स्त्रीप्रमाणे वाटले. वार्सा नगरी दु.खांतून सावरून जिद्दीने धड-पडणाऱ्या हसतमुख निष्कपट स्त्रीप्रमाणे वाटली प्राग, बर्लिन व ड्रेसडेन ही शहरे जखमांचे घाव बुजल्यानंतर पुन्हा दंड थोपटून गर्जना करणाऱ्या शेराप्रमाणे भासली ।

फळाफुलांच्या समृद्ध हसऱ्या किएव्हचा मी तृप्तीने निरोप घेतला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. शाखा (स्थळ प्र.)

# ४ : अभिजात सुंदर लेनिनग्राड–पुतळे, झुंबरे न् पूल

रविवारी २३ सप्टेंबरला रात्री किएव्ह सोडले २४ सप्टेंबरची सकाळ गाडीतच उगवली सबंध दिवस गाडीमध्ये जाणार होता लवकर उठण्याचे काही नडले होते का ? पण उठले थंड हवेमध्ये थोड्या तासांच्या झोपेतच थकवा भरून निघून सकाळी ताजेतवाने वाटते असाच अनुभव हिल् स्टेशनला येतो आता मला उत्तर रशियातील चिमुकली खेडी दिसत होती येथील घरांना प्रचंड पावसाला तोंड द्यावे लागत नाही आपल्याकडेही चिमुकली घरे असतात. पण ती अशी शोभिवंत का दिसत नाहीत ? लाल मातीने सारवूनही घर छान दिसायला हवे आपल्या झोपड्या व छोटी घरे यातले दोष आता माझ्या लक्षात आले आपल्याकडे कोकणात प्रचंड पाऊस ! त्यामुळे रंग टिकत नाहीत उतरती छपरे छान दिसतात पण ती पावसात शेवाळून काळपट बनतात शिवाय छपरे चौपाखी चारही बाजूच्या पडव्यांनी तर आपली घरे आतून कोंदट, अंधारी आणि बाहेरून गबाळी वाटतात दुपाखी घरे असली तर छपराचा त्रिकोण बाजूला असतो

युरोपमध्ये दुपाखी घरे छपराचा त्रिकोण दर्शनी बाजूला करून बांधतात तिकडे पावसाऐवजी बर्फवृष्टी जोराची असते त्यासाठी छपरे खूप निमुळती असतात त्यामुळे ती अधिक चांगली दिसतात. शिवाय छपरामध्ये व्यवस्थित बांधलेली गोल किंवा चौकोनी चिमणी असते काही वेळा छपरामध्ये सुबक दिसणाऱ्या दोन चौरससूची छपरांच्या छोट्या

खोल्या असतात. शिवाय लहान-मोठ्या सर्व घराच्या खिडक्या ह्या काचाच्याच असतात त्यामुळे व पडद्यामुळे घराना अधिक शोभा येते, शिवाय घराची सतत निगा राखणे हे काम ते लोक स्वत खपून करतात त्यामुळे घराचा रग नेहमी ताजा दिसतो अगदी विन गिला-व्याचे विटाचे घर असले तरी बर्फाचा हगाम संपताच त्यावर लाल काव फासून विटांच्या मधल्या रेघा चुन्याने आखतात छपराला दर हंगामात लाल रग देतात

अशा तऱ्हेने ही घरे आकाराने चिमुकली असली तरी नीटस, सुबक आणि आकर्षक दिसतात काचांमुळे खिडक्याही छान वाटतात शिवाय भोवती आवारात निसर्गाने दिलेली अखड हिरवळ असते त्याशिवाय भाजी-पाल्याचे वाफे, फळझाडे यानी आणखी शोभा येते. फुलझाडांचे ताटवेसुद्धा हे चित्र अधिक रम्य बनवितात

आपल्याकडे कोकणातील घरे निदान कौलारू असल्यामुळे आणि झाडीमुळे बरी तरी दिसतात पण पठारी प्रदेशात रखरखीत परिसर आणि त्यातील पाढरट मातीने सारवलेली सपाट धाब्याची वसकट घरे डोळयाना मुळीच सुखवीत नाहीत यूरोपमधील लोकांना सौंदर्यप्रेम असल्यामुळेच ते घरांची एवढी निगा राखतात आणि ती सुरेख ठेवतात शिवाय त्या देशातील सर्व भूमी अखड हिरवी असते या कायमच्या हिरव्या पार्श्वभूमीमुळे वरील घरांची चित्रे जास्त खुलतात हे खरेच आहे बागांनी नटलेली ती छोटी घरे तासन्तास पहात होते पहातापहाता मी मनाशी ठरवून टाकले की, आपणही केव्हातरी नदीकाठच्या दाट हिरव्या झाडीतील उचवटयावर एक चिमुकले घर विश्रांतीसाठी बाधायचे. ह्या घराच्या बागांतूनच मला विपुल प्रमाणावर सफरचदांची झाडे दिसली.

लाललाल लटकणारी सफरचदे पाहूनच तोंडाला पाणी सुटले पुढे काही स्टेशनावर सकाळच्या भल्या थडीतही काही म्हातारे व म्हाताऱ्या प्लॅस्टिकच्या पिशव्यातून पॅकबद्ध केलेली सफरचदे मोठ्याशा रगीत वादलीतून घेऊन येत सफरचदे दिसायला अत्यत सुदर होती केवळ रगाच्या शौकापायी मी चौकशी केली एक पिशवी एक रुबलला त्यात दहा-बारा सफरचदे होती. फुटकळ मिळत नव्हती भर थडीत काकडत ती विकणाऱ्या सुर-कुतल्या चेहऱ्याच्या त्या म्हाताऱ्या बघून माझ्या पोटात ढवळले मी एक पिशवी घेतली.

चार-सहा सफरचंदे वाटून मी एक खाऊ लागले पण ते लालभडक असूनही भल-तेच आंबट ! शिवाय थड त्यामुळे दात आबले खाताना ते करकरीत व चोथट लागे हॉटेलमध्ये आणल्यावर ती ड्रॉवरमध्ये ठेवली वाटले, आब्याप्रमाणे ही नतर गोड होतील. पण खोलीतील हीटर्समुळे ती उलट नासून गेली

मी तानियाला शका विचारली तेव्हा ती म्हणाली,

' इथे खाजगी व्यापाराला बदी असली तरी आपल्या दारातला भाजीपाला किंवा फळे विकता येतात या म्हाताऱ्या माणसांनी तरुणपणी ही झाडे लावून ठेवली आहेत त्याची फळे विकून ते एक प्रकारे पेन्शनच खात आहेत दुसऱ्याचे श्रम विकत न घेता, कुणा-

चेही शोषण न करता स्वत:चे श्रम विकून किंवा कला प्रदर्शन करून पैसा जमवता येतो'
किएव्ह ते लेनिनग्राड ह्या दीर्घ रस्त्यात मोठेमोठे पूल, प्रचंड कुरण, काही वाळवंटही लागली वाटेने काही औद्योगिक शहरे लागली इकडे वस्तीमध्ये कारखाने काढून देत नाहीत बंदर किंवा स्टेशन जवळ असेल तेथे मुद्दाम कारखान्याची गावे उभारतात कामावर येणारे लोक काही अंतरावर असलेल्या गावातून बसने किंवा ट्रेनने येतात यामुळे माणसांच्या राहात्या जागेजवळ प्रदूषण होत नाही रशिया हासुद्धा प्रचंड उद्योगधंद्यांचा देश आहे परंतु त्याच्यापाशी युरोप आणि आशिया खंडामधील सर्वांत जास्त जमीन आहे म्हणून माणसांची गर्दी आणि वस्तीमधील कारखाने इथे दिसत नाहीत सहाजिकच त्यांच्याकडे आरोग्य चांगले रहाते वाटेने छोट्या स्टेशनावरून गाडी जलद जाई मोठ्या स्टेशनात थांबे सारीच लहान मोठी स्टेशन अत्यंत स्वच्छ होती लहानमोठ्या लाकडी केबिन्ससुद्धा रंगीत आणि सुबक होत्या क्वार्टर्स फारच छान

ही स्टेशन सुंदर राहाण्याचे कारण त्या लोकांची दक्षता व शिस्तपालन हेच होय कोणीही कचऱ्याचा कणही सार्वजनिक जागी फेकत नाहीत स्टेशनामध्ये चहा, खाद्यपदार्थ विकायला येत नाहीत चहाचे स्टॉलही स्टेशनामध्ये नसतात कचरा फक्त कचऱ्याच्या डब्यातच टाकला पाहिजे हा नियम कडकपणे पाळला जातो. याशिवाय सार्वजनिक जागी थुंकणे हाही गुन्हा आहे माणसांचा बुजबुजाटही कमीच त्यामुळे सारे कसे स्वच्छ सुंदर वाटायचे

स्वच्छतेचे नियम आपल्याकडेही असतात पण ते मोडणाऱ्याला शिक्षा मात्र नसते त्यामुळे ते कोणीच पाळीत नाही परिणामी आपल्याकडे सार्वजनिक जागा गलिच्छतेचे उकीरडे बनतात एस टी स्टॅन्डस्, सिनेमागृहे, शाळा, रेल्वे स्टेशन्स येथे टॉयलेट लिहिलेल्या जागा दुर्गंधीच्या नरक बनलेल्या असतात पगारी नोकर सफाई करतात पण थोड्याच वेळात सर्व घाण होतात

आपण स्वत:चे घर स्वच्छ ठेवतो स्वत दोन-दोनदा आंघोळ करतो पण सार्वजनिक ठिकाणी मात्र पाणीही ओतण्याची तसदी घेत नाही वैयक्तिक स्वच्छतेइतकीच सार्वजनिक स्वच्छता जपली पाहिजे आपल्या अंगणातील केर काढून दुसऱ्याच्या अंगणात टाकणारे आम्ही लोक ! भारतदेशात समाज सुधारण्यासाठी गांधीबाबापासून ते गाडगेबाबांपर्यंत व सानेगुरुजींपासून फाटक गुरुजींपर्यंत सर्वांनी झाडू आणि घमेलेच प्रथम हातात घेतले तरीही आम्ही अजून आहोत तिथेच आहोत

इथे प्रत्येक स्टेशन येण्याआधी पाच मिनिटे बोगी कंडक्टर (ही स्त्री असते) टॉयलेटस्‌ना कुलपे लावते आणि स्टेशन गेल्यानंतर पाच मिनिटांनी कुलपे काढते आपल्याकडे मोठ्या स्टेशनामधे गाडी थांबली असताही लोक ' विधी ' करतच असतात

मंगळवारी २५ सप्टेंबरला सकाळी साडेपाचला लेनिनग्राड स्टेशन आले याही शह-

राचे दर्शन सुप्रभाती झाले येथे थंडी जास्त आहे उत्तर ध्रुवाच्या जवळ आम्ही आलो होतो या कल्पनेने अंगावर रोमांच येत होते इथे धुके होतेच मधेच आकाश ढगाळ तर मधेच प्रकाश दिसे

येथे आम्ही 'किव्हकाया' या हॉटेलात उतरलो हेही एक उंची हॉटेल आहे येथील लोकसंख्या पंचेचाळीस लाख आहे मास्को प्रांतातील हे दोन नंबरचे शहर. येथे साठ म्युझिअम्स्, एक युनिव्हर्सिटी आणि पंचेचाळीस शाळा आहेत येथे न्याहारी करून आमच्या बसेस् रामप्रहरी लेनिनग्राडमधून फिरू लागल्या इथे तानियाच्या जोडीला आन्या ही इथली माहितगार गाईड होती वादिन व ही आन्या हे कॉलेजविद्यार्थी कॉलेजमधे त्यानी इंग्लिश विषय घेतलेला असल्याने त्या इंग्रजीचे, प्रात्यक्षिक म्हणून हे विद्यार्थी फावल्या वेळी गाइडचे काम करतात.

लेनिनग्राडचे पहिले नाव सेंट पीट्स्बर्ग होते जर्मन सम्राट 'पीटर द् ग्रेट तिसरा' याने सोळाव्या शतकात नीव्हा नदीवर हे शहर स्थापन केले तीन शतके रशियाची राजधानी हीच होती पुढे झार क्रेमलीनमधे राहावयास गेला पीट्सबर्ग हे नाव जर्मन असल्याने रशियनांनी आपल्या भाषेत त्याचे नाव पेट्रोग्राड ठेवले १९२४ ला त्याचे नाव पेट्रोग्राड ऐवजी लेनिनग्राड केले गेले लेनिनचे घर येथेच आहे

आक्टोबर क्रांतीची सुरवात येथेच झाली १९१७ मधे

लेनिनग्राडमध्ये आल्या आल्या ब्रेकफास्ट करून शहर पाहाण्यास बसेस् निघाल्या. येथेही भुयारी रेल्वे आहे ती दुसऱ्या महायुद्धात मुद्दाम बांधली आहे ज्यावेळी बॉबिंग होई त्यावेळी रेल्वेच्या भुयारी स्टेशनाचा आसरा नागरिकाना घेता येई कित्येक तास तेथे राहाता येई शिवाय भुयारात गरम हवा खेळवलेली असे त्यामुळे उघड्यावरले लोक काकडून मरण पावले पण भुयारातले लोक जगले ही भुयारी–रेल्वे ८० कि मी. लांब आहे

रशियामधे युद्धाची सर्वात जास्त झळ किएव्ह आणि लेनिनग्राड याच शहराना बसली हिटलरने दक्षिणेकडे किएव्ह आणि उत्तरेकडे लेनिनग्राड अशा दोन बाजूने हल्ला करून मास्कोला चिमटचामधे चिरडण्याचा प्रयत्न केला परंतु किएव्ह पडले तरी लेनिनग्राडवासी हरले नाहीत लेनिनग्राडच्या भयानक थंडीने हिटलरचेच सैनिक गारठून गेले. आमच्या ह्या दौऱ्यात दुसऱ्या महायुद्धाची केंद्रस्थाने आम्हाला पाहायला मिळाली हाच त्याचा विशेष

लेनिनग्राड हे अनेक शतके राजधानी असल्यामुळे येथे सरदार अमीर–उमराव याचे पुष्कळ वाडे आहेत अर्थात या सर्वांचा ताबा आता सरकारकडे असल्याने त्यांचा उपयोग सार्वजनिक संस्थासाठी केला आहे या जुन्या इमारती पिवळट रंगाच्या व रोमन गॉथिक पद्धतीच्या आहेत

या शहरात बस, फिरू लागताच डोळ्यांना अतिशय अल्हाद झाला सारे शहरच अत्यंत कलात्मक आणि सुदर आहे एक तर हे गाव अत्यंत थंड आहे बहुतेक इथे धुकेच असते. पण आमच्या नशिबाने मगळवारी, २५ सप्टेंबरला दिवसभर सूर्य स्वच्छ प्रकाशत होता येथे नेहमी बर्फ वितळल्यावर नीव्हा नदीला पूर येतो. नीव्हा नदी बाल्टिक समुद्राच्या फिनलडच्या आखाताला जाऊन मिळते बर्फ वितळल्यावर येथे जोराचे वारे येतात आम्ही येण्यापूर्वी पधरा दिवस येथे प्रचंड वारे येऊन वादळ होऊन गेले आम्ही सुदैवी ! आज उबदार सूर्यप्रकाश होता

लेनिनग्राड शहरातून फिरताना वाटोवाट नदीचे प्रवाह लागत होते. नीव्हा नदी अनेक फाटयांनी या गावात सर्वत्र पसरली आहे ह्या नीव्हा नदीच्या जाळयामधे वसलेले लेनिनग्राड हे अतिशय रम्य वाटते शिवाय येथे सर्वत्र पुतळे, कोरीव कामे, नक्षीकामे, याचे नमुने रस्तोरस्ती दिसतात साधे रस्त्याकडेचे किंवा पुलाच्या कडेचे कठडे नक्षीदार आहेत रस्त्यातील दिव्याचे खांबसुद्धा अतिशय शोभिवत आहेत या सर्व नैसर्गिक आणि मानवी सौंदर्यामुळे आणि नद्यांच्या जाळयामुळे हे शहर सर्वात सुदर वाटले लेनिनग्राडला उत्तरेचे 'व्हेनिस' म्हणतात

झारशाही नष्ट केल्यानतर लेनिनचे अनुयायी उत्साहाच्या भरात लेनिनना म्हणाले,

'झारशाहीचे हे पुराणे अवशेष मोडून, तोडून जाळून टाकूया का ?'

लेनिन त्यांना थोपवीत म्हणाले,

'बाबानो, रशियन जनतेवर अन्याय करणाऱ्या झारला आपण नष्ट केला परतु ही सुदर बांधकामे, कोरीव कामे, कलाकौशल्याच्या वस्तू हे सर्व आपल्या देशातील कारागिरांनी आणि कलावंतानी निर्माण केलेले कलाकृतींचे भांडार आहे. रशियन सस्कृती व कलेचा वारसा म्हणून पुढील पिढयांना पाहाण्यासाठी आपण हे सर्व जतन करूया'

झारच्या राजवाडयात देशोदेशीच्या उत्तम कलाकृती होत्या. त्या व त्याने जोपासलेली सग्रहालये यांचेही रक्षण करण्यात आले त्यामुळे लेनिनग्राड हे मोठेच कलासस्कृतीचे केंद्र बनले आहे

प्रथम न्येम्सकी ॲव्हेन्यू हा इ स अठराशेमध्ये बांधला आहे. तो साठ मीटर रुद आहे रस्त्याच्या कडेने भव्य सुदर आणि दिमाखदार इमारतीमधून पुस्तकाची दुकाने आणि ग्रथालये होती या देशात पुस्तकाचे नशीब थोर आहे म्हणायचे ! ! मुबईच नव्हे तर पुण्यासारखे विद्येचे माहेरघर आणि ग्रथाचे आगर असलेल्या शहरीसुद्धा पुस्तकांना एवढया सुदर, प्रशस्त वास्तु लाभल्या नाहीत आमच्या शहरांमधे रस्त्याने गेले, तर दिमाखदार दुकाने लागतात ती कपडेलत्ते, भांडीकुंडी, शोभेच्या वस्तु, चैनीच्या वस्तु यांचीच हॉटेल, फळांची दुकाने हीसुद्धा बरी म्हणायची सर्वात खुरटे केविलवाणे दुकान असते ते पुस्तकाचे !

त्यातसुद्धा पाठ्यपुस्तके घेणाऱ्याचीच गर्दी जास्त. याशिवाय ग्रंथ खरीदणारे विरळाच. ग्रंथालये अशीच धुळकट, कळकट

येथे काही चर्चेसही सार्वजनिक कामासाठी वापरलीत सर्व चर्चेस् प्रार्थनेसाठी वापरत नाहीत थोडी प्रार्थनामंदिरे ठेवून उरलेली सार्वजनिक संस्थांना घेतलीत

लेनिनग्राड हे समुद्रकाठी असलेले रशियाचे मोठे बंदर पीटर् द ग्रेटने प्रथम आरमार स्थापन केले येथील पॅलेस स्क्वेअर हा अतिशय भव्य आहे ह्या चौकात झारचा अतिभव्य असा हिवाळी राजवाडा आहे त्याला ' विंटर हर्मिटेज ' म्हणतात याचा रंग सुंदर सी–ग्रीन छटेचा असून सभोवार नक्षीदार खांब व सुंदर शिल्प आणि पुतळे आहेत येथे लहान नीव्हा व मोठी नीव्हा यांचा संगम आहे त्याला ' स्पीट ऑफ द आयलंड ' म्हणतात. येथेच बोटी नांगर टाकीत येथे स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग आहेत ती मूळ ग्रीक मंदिर होती.

या स्पीट ऑफ दी आयलंडमध्ये दोन लाल स्तंभांभोवती दोन सुरेख पूर्णाकृतीत उडत्या मत्स्यकन्या आहेत आपल्या दीपमाळेप्रमाणे या स्तंभाला दगडात कोरलेल्या घमेल्याएवढ्या पणत्या आहेत बंदराच्या तोंडाशी नांगर टाकण्याच्या जागी हे स्तंभ असल्यामुळे त्या स्तंभावर बोटीचे नांगरही कोरलेले आहेत दुसरे दोन भव्य स्तंभ होते त्यात एकमेकांकडे पाठ केलेले एक स्त्री व पुरुष यांचे पुतळे होते आणि वर अशाच नक्षीदार दगडी पणत्या होत्या हे दोन पुरुष व दोन स्त्रिया ही नद्यांची प्रतिके आहेत या दोन स्त्रिया म्हणजे व्होल्गा आणि नीपर या दोन नद्या आणि ते दोन पुरुष म्हणजे नीव्हा व वोल्कोफ हे नद या स्तंभामुळे या परिसराला फारच शोभा आली होती या नदीतून सर्रास जलवहातूकही चालते या नदीचा एक फाटा फार विस्तृत व खोल आहे त्यावर आठ पूल आहेत हे आठही पूल अंतर्भागातून बाल्टीक समुद्रात जाणाऱ्या बोटींसाठी रोज रात्री बारा ते दोन यावेळी दुभंगतात या नदीकाठी आम्ही पुतळे वगैरे पहात असता मला नदीचे पाणी कापीत जाणारी छोट्या जेट विमानासारखी आकृती दिसली

मी अजाण बालकासारखी आनंदाने ओरडले, ' अय्या ! या समुद्रात विमानेही उतरतात वाटते ?'

एखाद्या प्रेमळ काकाप्रमाणे तासकरांनी मला सांगितले,

' ही हायड्रोप्लेन बोट आहे ही खूप वेगाने जाते '

या नदीच्या आणखी काही पुलांवर एका सम्राज्ञीचा पुतळा व एक पीटर द ग्रेटचा अश्वारूढ पुतळा होता राजाच्या पायाखाली साप होता तो त्या सापाकडे बोट दाखवून म्हणे सांगत होता की, ' मी हा साप–म्हणजेच दुर्जनता–पायाखाली तुडवीत आहे.'

आपल्या कालियामर्दन या चित्राचा असाच अर्थ लावता येईल

झार निकोलस चौकात हॉर्स रायडिंग स्कूल आहे त्याच्या प्रवेशद्वाराशी दोन प्रचंड अश्व पुढले पाय उचलून फुरफुरताहेत असे वाटते त्याच्या शेजारी एका प्रचंड पुरुषाचा

(की पूर्ण पुरुषाचा ?) संपूर्ण नग्न पुतळा आहे त्याच्या पाठीवर मात्र उडणारे वस्त्र आहे त्याच्या चुण्या अतिशय सुंदर आहेत

एक निमुळती उंच वेधशाळा पाहिली तिच्या समोरील घाटावर दोन अतिशय भव्य आणि देखणे सिंह कोरले होते पुढे रशियातील चार नंबरचे भव्य चर्च दिसले याला एकशेबारा स्तंभ आहेत याचे आर्किटेक्ट फ्रेंच होते याचा कळस एकशेएक किलो वजनाचा, भरीव सोन्याचा आहे मला हे कळत नाही की इथे सोन्याचे कळस रहातात आणि आमचे देवसुद्धा कसे चोरीला जातात ? सोन्याचे देवच नव्हे तर दगडी देवाचे चांदीचे डोळेही चोरण्याइतके दारिद्र्य आमच्याच देशात असावे !

येथे १८२५ मध्ये गुलामी मुक्ती झाली त्याच्या स्मरणार्थ एक भव्य आणि कलात्मक स्तंभ उभारला आहे तो मुक्ती चौकात आहे या भव्य स्तंभावर शिरोभागी एक योद्धा आहे तो ज्या घोड्यावर बसला आहे तो घोडा दोन पायावर उभा आहे त्याच्या खाली चार बाजूला चार पूर्णाकृती पुतळे आहेत त्या प्रत्येकाच्या हातात अनुक्रमे आरसा, क्रूस आणि पुस्तक, ढाल व भाला अन् तराजू अशा वस्तू आहेत ' या वस्तू कशाची प्रतिके आहेत ?'' असे मी आन्याला विचारले तेव्हा ती म्हणाली,

' या चार आकृतींच्या हातात मोठ्या अर्थपूर्ण वस्तू आहेत ढाल–भाला म्हणजे शक्ती पुस्तक व क्रूस म्हणजे विद्वत्ता (धर्म आणि शहाणपणा हे प्राचीन काळी सर्व देशातच एकत्र जोडले होते असे दिसते ) तराजू म्हणजे न्याय आणि आरसा म्हणजे अजिंक्य वैभव '

मला त्या पुतळ्यापासून हलावेसे वाटत नव्हते कारण त्या स्तंभावर आणखीही बरीच बारीक बारीक चित्रे कोरली होती पण आमच्या ग्रुपला मी एवढ्या बारकाईने गाईडकडे तपशील विचारते हेच पसंत नव्हते ते तेवढ्यात पलीकडच्या बागेतील फुलांचे रंगीबेरंगी ताटवे आणि गोऱ्या तरुणींचे रंगीत ताडे पाहाण्यास गेले. मी बस भरून घटा वाजेपर्यंत त्या पुतळ्याभोवती रेंगाळले.

रशियामध्ये पुतळ्यातील घोडे हे फारच बळकट आणि देखणे असतात येथे घोड्याच्या पैदाशीची कित्येक केंद्रे आहेत रशिया हा अखंड युद्धे करीत आला आहे अशा युद्धभूमीमध्ये घोडा हा प्राणी फार महत्त्वाचा असतो परकीय हल्ला आल्यास आम्ही सदैव प्रतिकाराला सज्ज आहोत हे जणू सांगण्यासाठी येथे दोन पायावर सज्ज असलेला फुर-फुरणारा घोडा दाखवितात एका उंच कळसाच्या राजवाड्यासमोर कारंजे असलेली सुरेख बाग होती येथे एका दगडी स्तंभावर एक छोटे जहाज आणि दोही बाजूंना दोन नांगर दाखविले होते लेनिनग्राड हे रशियातील सर्वांत मोठे बंदर आहे नांगरासह जहाज हे लेनिनग्राडचे बोधचिन्ह आहे.

परत बस विन्टर हर्मिटेजवरून निघाली हा खरा पीटर द् ग्रेटचा हिवाळी राजवाडा. मला त्या पीटरची गमतच वाटली लेनिनग्राड हे मास्कोच्या उत्तरेकडे तेथे हिवाळ्यात मास्कोहून थंडी जास्त समुद्रसुद्धा गोठलेला असे आम्ही गेलो तर उन्हाळा असूनही थंडी भयकर होती वाऱ्याची झुळूक थंड चावरी असे वारा आला की रक्त गोठून जाई मग हा पीटर त्या कडाक्याच्या थंडीत लेनिनग्राडला मुद्दाम येणारा ग्रेटच राजा म्हणायचा! शिवाय त्याच्या राजवाड्याचे नाव 'हर्मिटेज' हर्मिटेज म्हणजे आश्रम दुसऱ्या दिवशी तो आतून पाहिल्यानतर वाटले, हा आश्रम कसा? समृद्ध वैभवाने नटलेला हा एक प्रासादच होता! आमच्यातील काहीजण बुधवारी हर्मिटेज बघायचा आहे असे म्हटल्यावर, तो बहुधा विनोबाच्या आश्रमाप्रमाणे असावा असे वाटून तिथे बहुधा शेळी, चरखा व दाढीवाले असावेत असे वाटून, त्याना काय पहायचे? अशा विचाराने ते हर्मिटेजला न येता शॉपिंगला गेले आणि मागाहून हळहळले

झारने थंडीमधे खरे तर किएव्ह किंवा सोचीला जायचे! तर हा पीटर १७१० मधे मास्कोहून लेनिनग्राडला आला त्याला मास्को आवडत नव्हते कारण तेथे लाकडी इमारती असत आणि त्याना वारवार आगी लागत लेनिनग्राडला पीटरने दगडाच्या इमारती बांधल्या हे दगड गलवतांकडून कस्टम फीच्या बदली घेतले, हे मागे सांगितलेच आहे पुढे शेवटचे झार परत क्रेमलीनमधे गेले

ह्या विन्टर हर्मिटेजचे आता स्टेट म्युझिअम झाले आहे याच्या प्रवेशद्वारावर सहा घोड्यांचा सोन्याचा रथ आहे दुसऱ्या कमानीशी नेपोलीयनवर विजय मिळवणारा योद्धा पिमेनोटेरिबेनियक हा सहा घोड्यांच्या रथातून ध्वज घेऊन निघाला आहे असे दृश्य दगडात कोरले आहे झार अलेक्झांडर पहिला, याने नेपोलियनवर विजय मिळवल्यानतर असे अनेक विजयस्तभ उभारले त्यात नदीकाठी दोन उंच दगडी स्तभ आहेत त्यावर अलेक्झाडर देवदूतासह उभा आहे असे दाखविले आहे

विन्टर हर्मिटेजचा रग हिरव्या, पांढऱ्या रगांनी खुलविला आहे पिवळी, पांढरी रगसगती खांबावर साधली आहे वाटेत दोन समाधी लागल्या एक युद्धात बळी पडलेल्या दहा वर्षांच्या मुलाचे थडगे होते तर दुसरे रशियन जनरल एन्होरा याचे होते हा कधीही हरला नाही

पुढे क्राती चौकामधून आम्ही नीव्हा नदीच्या मुखाजवळ फिनलडच्या आखातात— म्हणजेच बाल्टिक समुद्रात— कायम उभ्या असलेल्या 'अरोरा' क्रूझरवर (युद्धनौकेवर) गेलो तेथे प्रवाशाची भली मोठी गर्दी होती बोटीवर चढण्यासाठी दोऱ्याची झुलती शिडी होती या शिडीवरून जाताना साडी पर्स वगैरे साभाळीत हलत्या शिडीवर तोल साभाळायची कसरत करावी लागली पण गेल्यावर मनाला धन्यधन्य वाटले! एकतर मी बाल्टिक समुद्रात उभी होते अक्षरशः मुबईपासून सातासमुद्रापलीकडे उभी होते! आणि

हीच ती अरोरा-क्रूझर, जिच्यावरून १९१७ च्या आक्टोबर क्रांतीच्या इशाऱ्याची पहिली खूण म्हणून तोफ झाडली गेली ती तोफ अजूनही तेथे आहे रशियन लोक महत्त्वाची स्मारके प्राणपणाने जपतात त्या तोफेसमोर मी भावनाव्याकुळ होऊन उभी असता काही प्रवाशांनी माझे फोटो काढले या क्रूझरवरून आक्टोबर क्रांतीनतर लेनिनने पहिले भाषण केले येथे छोटेसे रेडिओ स्टेशन आहे अर्थात आक्टोबर क्रांती एकदम झाली नाही क्रांती-नंतर एक तात्पुरते सरकार आले आणि नतर सोव्हिएट सोशालिस्ट सरकार स्थापन झाले

येथे दुसऱ्या महायुद्धात विध्वस झालेला भाग परत उभारला आहे जुन्या ऑफिसांच्या भागात आर. सी सी च्या इमारती उंच उच उभ्या आहेत त्यात कार्यालये आहेत थोड्या जुन्या ठेंगू इमारती पण आहे

१७४८ मधे पीटर द ग्रेटची राणी झरिना हिने एका ख्रिस्ती मठाचे स्त्रियांसाठी पहिले हायस्कूल बनविले अर्थात ह्यामधे येणाऱ्या विद्यार्थिनी सरदार, अमीर–उमराव, अशा बड्या घरच्याच असत हा जो मठ आहे तो शुभ्र रंगाचा आहे त्याच्यावर अतिशय सुदर अशी सोनेरी रंगामधे नक्षी कोरली आहे ह्या मठाचा वरचा भाग कमानीकमानींचा आहे त्याच्यावर निमुळत्या भागात तिरप्या नक्षीचा मोदकासारखा घुमट आहे घुमटावर एक गोल आणि अत्यत आकर्षक नक्षीचा क्रूस आहे पांढरा शुभ्र रग व वर सोनेरी नक्षी असे हे असंख्य आकृतींचे सुबक नमुने लेनिनग्राडमधे पाहिले चकचकीत पांढऱ्या रगावरची ही नक्षी पाहून असे वाटले की निरनिराळ्या तऱ्हेच्या किटल्या, कपबश्या यांच्यासाठी हे आकार व नक्ष्या छान उपयोगी पडतील !

तेथून बस लेनिनच्या घराजवळ गेली हे ठिकाण रशियन लोकाना तीर्थक्षेत्राप्रमाणे वाटते येथे शाळकरी मुलांच्या अनेक सहली येत होत्या त्यापैकी एक घोळका सहा-सात वर्षांच्या मुलाचा होता त्यानी आम्हाला हात हलवून अभिवादन केले मी त्यांचा शिक्षिके-सह फोटो काढला

लेनिन ह्यांचे घर साधेसे एकमजली आहे फार मोठे नाही लेनिनग्राडच्या इतर घरांच्या मानाने लेनिन याचे घर साधे होते हे असेच असते देशाला वैभव मिळवून देणारा स्वत: वैभव भोगत नसतो ! देशाच्या कल्याणाचे नाव घेणारे पुढारी स्वत: वैभव भोगू लागले की देश वैभवाऐवजी अवनतीकडे जातो अहमदाबादमधे सर्वात साधे घर गांधीजींचे आहे हे राष्ट्रपुरुष सर्वात साधे राहिले लेनिन याच्या घरापुढे लाल गुलाबांचा मोठा ताटवा आणि बाग आहे ताटव्यामध्ये एका चबुतऱ्यावर लेनिन यांचा पूर्ण पुतळा आहे ते भाषण देण्याच्या पवित्र्यात उभे असून त्यांनी एक हात लांब करून बोट रोखले आहे लेनिन यांच्या ह्या घरात १९१५ ला पहिली व १९१७ ला दुसरी 'कॉंग्रेस ऑफ सोशालिस्ट पार्टी' भरली होती

तेथून दुपारी तेथील म्युझिअम बघण्यास गेलो येथे बायलोरशियातील कला विभाग प्रथम लागला बायलोरशियन याचा अर्थ शुभ्र रशियन हे स्लाव वंशाचे असतात हे गुलाबी नसतात केस व डोळ्याचा रंगही भिन्न असतो येथे संगमरवराच्या भिंती व भव्य असे नक्षीदार खांब आहेत या विभागात बायलोरशियामधील लोकांचे जीवन काचेच्या मोठ-मोठ्या शोकेसमधून दाखविले आहे या शोकेसेस म्हणजे छोटया छोटया खोल्यांचेच नमुने होत. वेगवेगळ्या काळातील जेवणघरे, लोहारकामाच्या शाळा, घरे उष्ण ठेवण्याच्या वेगवेगळ्या काळातील भट्टया, लाकडी घरे, सूत कातणारी माणसे, घोंगडया आणि गालिचे विणणारी माणसे अशी त्या काळातील जीवनाची स्वरूपे दाखविली होती यातील माणसे खऱ्या माणसांच्या आकाराची व तशीच जिवंत रंगानी रंगविलेली होती क्षणभर हसून त्यांच्या शेजारच्या खुर्चीवर बसून चहा प्यावा असे वाटले. त्यावेळचे कलाकौशल्याचे नमुने मांडले होते त्यात गालिचे, भरतकाम केलेले पोशाख, हातमागावर डिझाईन विणलेली वस्त्रे, जुन्या पद्धतीच्या टोप्या, गोंडे लावलेले कपडे, हे सर्व होते याशिवाय त्यावेळच्या स्त्रियांच्या गळयातील माळा, डूल, केसातील दागिने हेही होते हल्लीच्या रशियन मुलींच्या अंगावर दागदागिने नसतात कारण ते अनावश्यक आहेत म्हणून इतर गरजेच्या वस्तूंच्या मानाने फारच महाग आहेत

या जुन्या घरांत दैनंदिन कामे करणारी माणसे दाखविली आहेत पाळण्यात मुलाला ठेवून स्वेटर विणणारी आई आहे आपल्यासारखेच जाते, पण ते उंच स्टँडवर ठेवून उभ्याने दळणारी खेडूत बाई आहे गळ टाकणारा कोळी आहे याशिवाय एक आई आपल्या मुलीला नटवताना दाखविली आहे या मायलेकींची वेशभूषा व नट्टापट्टा, आम्ही किएव्ह ट्रेनिंग कॉलेजमधे युक्रेनियन वेशात नटलेल्या ज्या मुली पाहिल्या तशीच होती म्हणजे पांढऱ्या खमिसावर जाकीट आणि स्कर्टवर एप्रन हे, नक्षी केलेले– केसावर मुगुटा-सारखी कापडी फुले, अंगावर दोन रंगीबेरंगी दुपट्टे, अशी होती. एका दालनात गलबते होती नांगर, खलाशी, कोळी व त्यांची गलबते असा सारा सागरी जीवनक्रम होता पुढे लाकडी घरांचे अनेक नमुने ठेवले होते जुन्या काळच्या वापरातील वस्तू त्यात मांडल्या होत्या कुठे हातमाग होता कुठे गवती आणि लाकडी बूट ठेवले होते कुठे मण्यांनी भरलेले जोडे होते कुठे लेस लावलेल्या सपाता होत्या पुरुषी बुटावरदेखील जरीची व मण्याची नक्षी होती

समाजवाद नसलेल्या प्राचीन काळात कलावंत अशा कलेच्या वस्तू जमिनदार, श्रीमंत यांच्यासाठी करून, त्या विकून पोट भरीत असावेत गरीबाच्या लाकडी घरामध्ये डाव, भांडी, वाडगे हे सर्व सामान लाकडी होते काही सुखवस्तू घरातून लाकडाची कोरीव कामे, सिरॅमिकची पुष्पपात्रे आणि चिनीमातीची भांडी होती एका घरामधे 'समर हॉली-डे फिस्ट' दाखविली होती टेबलावर मेणबत्तीचा स्टॅन्ड व छतावर झुंबर होते नवरा

बीयर पीत होता केसावर फुलाची टोपी घातलेली त्याची बायको चीजची प्लेट घेऊन पाहुण्याना वाढीत होती अशी घरे हुबेहुब सामानासह व पूर्णाकृती माणसासह प्रचंड दालनातून माडली होती त्यात पाळण्यातील बाळापासून काठी टेकणाऱ्या माणसापर्यंत सर्व होते एका ठिकाणी डोक्याला रुमाल बांधलेली एक स्त्रीआकृती पाहून मी तिला चाचपून पाहू लागले मी म्हटले,

'वा' हिच्या गालावरच्या सुरकुत्या काय हुबेहुब रंगवल्यात !' पण मी हात लावताच ती उठून उभी राहिली ती व्यक्ती इतकी स्तब्ध बसली होती की, ती इतर पूर्णाकृती पुतळ्यापैकीच एक वाटली ! दरएक दालनात अशी एक वृद्ध बाई पहाऱ्याला बसलेली असते एवढी वृद्ध स्त्री काम काय करणार ? म्हणून त्यांना अशी बैठी कामे चार तास देतात त्या स्वस्थ बसून लक्ष ठेवतात तिकडील लोक शिस्तप्रिय असल्याने त्या म्हाताऱ्याना फारसे उठावे लागत नाही परंतु आमच्यासारखे लोक वस्तू हातात घेऊन व गालिच्यावर बोटे फिरवून बघू लागतात त्यावेळी ती चटकन् येते व 'न्येत न्येत' असे म्हणून मनाई करते या दालनातून गालिचे विणणारी माणसे दाखविली आहेत तसेच भिंतीवरही गालिचे टांगले होते दक्षिण रशियात गालिच्यांचे काम फार सुंदर होते

शेवटचा विभाग हा उत्तर ध्रुवाकडील रशियाचा भाग होता त्यात लॅपलंड वगैरे बर्फाळ प्रदेशातील जीवन दाखविले होते इथे रेनडियरच्या गाड्या, रेनडियरच्या कातड्याचे तंबू व केसाळ कातडी कपडे घातलेली माणसे दाखविली होती ह्या जीवनाबद्दल फार कुतूहल होते म्हणून मी हे प्रदर्शन वेळ मोडून पाहिले आडव्या काठीवर भांडी टांगून, खाली शेकोटी पेटवून, त्यावर अन्न शिजवताना दाखविले होते बर्फातील मासे काढून भाजताना दाखविले होते बर्फावरून सरकणारी गाडी होती येथेही पुतळ्यागत स्तब्ध बायका बसल्या होत्या एका म्हातारीला विचारले,

'तुझे वय काय ? '

तिने नऊ बोटे करून दाखविली त्यावर मी कागदावर नव्वद काढून दाखविल्यावर ती हो म्हणाली मी पुढे विचारले, ( अर्थात बऱ्याचशा खुणानीच शब्द बोलले पण त्याचा उपयोग नव्हता हे ठाऊक होते )

'तू एवढ्या म्हातारपणी काम का करतेस ? '

तिने पंजे उडवून 'न्येत न्येत' म्हटले

आमचा गाइड म्हणाला, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे या बायकाना म्हातारपणी एकटेच घरात रहावे लागते त्यांच्या पोटापाण्याची सोय त्यांनाच पहावी लागते तसे ह्या देशात वृद्ध वेतन मिळते औषधपाणी फुकट आहे तरीसुद्धा या बायकाचा घरात वेळ जात नाही कारण नातवंडे, मुले घरात नसतात तेव्हा थोडासा स्वतःचा पैसाही होतो आणि वेळही जातो म्हणून असे पार्टटाईम काम करतात अशी आणखी कामे म्हणजे आइस्क्रिमचे

कोन्स विकणे, थिएटरबाहेर कोटस् सांभाळणे पुरुषांसाठी लिफ्टमन, स्टोअरकीपर, वॉचमन अशी कामे असतात

त्या रात्री आम्ही सुप्रसिद्ध रशियन बॅले पाहिला मूळ कार्यक्रमात हा बॅले मास्कोला बॉलशॉईमधे पहावा असे होते त्या निमित्ताने प्रचंड बॉलशॉई पाहून झाले असते पण बॉलशॉई बाहेरूनच पहावे लागले बॅलेनृत्य हे समूहनृत्य असते रंगमंच फार भव्य असतो या नृत्याचे विशेष म्हणजे रंगभूमीवर डझनावारी मुले किंवा मुली एकाच पोशाखात एकाच लयीमधे हालचाली करतात रांगाच्या रांगा अल्लाद सरकतात व माणसांच्या रंगीत रेषा चित्रासारख्यात अशा आकृती दिसतात एकाच वेळी शे-दीडशे स्त्री-पुरुषसुद्धा तालामधे, आखलेल्या आकृतीत असतात कलावंतांचे पोशाख पावले झाकण्याइतके लांब असतात ह्या बाया अशा चालतात की, पावलांचा आवाज होत नाही दोरीत ओवलेल्या रंगीत मण्यांच्या लांब लांब माळा, वेगवेगळ्या वेगाटयात हलाव्यात तशी ही नृत्ये दिसतात.

लाल, पिवळे, निळे वगैरे भडक रंगाचे कपडे, त्यावर रेशमाचे व जरीचे भरतकाम आणि झगझगीत प्रकाशझोत यामुळे हे नृत्य फार आकर्षक दिसते यावर रंगीत प्रकाशझोत किंवा प्रखर फ्लडस् टाकून ते अधिक प्रेक्षणीय करतात नृत्य, सर्कस, बॅले यातील पोशाखात काटकसर नसते ते जरीचे उंची असतात

एका मागून एक ओळीने कार्यक्रम होतात दर एक सीनच्या कपड्यांचा रंग वेगवेगळा असतो आणि स्टेजवर एकच प्रकारचा पोषाख घालून सर्व येतात पुरुष कलावंत स्टेजवर येतात तेच उड्या मारीत नुसत्या रंगभूमीवर उंच उडी मारून हवेतल्या हवेत कोलांट्या खाऊन अल्लाद उभे राहातात बेडूकउड्या, कडांनी मारलेल्या उड्या वगैरे नाना तऱ्हेच्या शारीरिक चापल्याच्या कसरती हे पुरुष कलावंत करीत आमच्या ग्रुपमधील कित्येक जण किएव्हला कॉन्सर्ट पाहून आले व पश्चात्ताप पावले त्या मानाने हा कार्यक्रम आम्हाला आवडला व समजलाही त्याची गाणी कळली नाहीत परंतु हालचालीवरून मतितार्थ कळला एक कोवळी तरुणी आपल्या विधवा आईची फार लाडकी असते तिचे लग्न ठरते पण आईला सोडावे लागेल म्हणून ती सारखी रडत असते शेजारणी समजूत घालतात प्रियकर तिला खुलवितो तरी लग्नाच्या वेळेपर्यंत ती रडतच रहाते दरम्यान सासरेबुवा सूनेला दागिने वगैरे घेऊन येतात त्यावेळी व्याही-विहीणींच्या गप्पा बऱ्याच रंगतात परिणामी मुलगी जेव्हा लग्नानंतर नवऱ्याकडे जाताना रडू लागते तेव्हा सासरेबुवा सुनेला सांगतात,

रडू नको तुझी आई दूर रहाणार नाही तिचं आणि माझं प्रेम जमलय तेव्हा आम्ही लग्न करणार आहोत आणि तुझी आई आपल्याच घरात रहायला येईल'

बुधवार तारीख २६ सप्टेंबरला सकाळी अंधारून आले होते झिरीमिरी-कोंडा

कोंडा पाऊस पडत होता हवा उदास वाटत होती आणि निघालो होतो ते ठिकाणही मनाला उदास करणारे होते हे लेनिनग्राडच्या टोकाला असलेले Musium of Revolution, म्हणजे सामाजिक कबरस्थान होते दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मरण पावलेल्या वीरांच्या आणि नागरिकाच्या प्रचंड कबरी या भल्यामोठ्या माळावर आहेत त्यात १९४२, १९४३, १९४४ असे तीन विभाग आहेत दुसऱ्या महायुद्धात हिटलरने मास्कोवर प्रथम चढाई केली नाही तर दक्षिणेकडून किएव्ह व उत्तरेकडून लेनिनग्राड असा चिमटा लावून त्याला तो चिमटा आवळीत मास्को जिंकायचे होते. पैकी किएव्ह त्याने गिळले. लेनिनग्राडचे सध्याचे जे उपनगर आहे तेथपर्यंत जर्मन आले होते लेनिनग्राड शहराला ९०९ दिवस नाझी सैन्याने कडक वेढा घातला होता घनचक्कर लढाई झाली नाझींनी शहराची रसद (आवक) तोडली नतर विजेच्या तारा व पाण्याचे नळ तोडले लेनिनग्राडच्या नागरिकांना अन्नपाणी, उष्णता व प्रकाश देणारी वीज हे तीनही मिळेनात येथील थंडी कडाक्याची आणि खोलीत हीटर नाही अन्नच काय पण पाणीही नाही त्यामुळे नागरिक अन्न पाण्यावाचूनही मेले अन्नाचा पुरवठा संपल्यावर तेथील शास्त्रज्ञांनी शेवाळे व काही रसायने याचे कृत्रिम तंतू तयार केले आणि त्याचे पाव बनविले प्रत्येक नागरिकाला रोज १२५ ग्रॅम ब्रेड मिळे व सैनिकाला २५० ग्रॅम. पुढे प्रदर्शनात आम्ही या ब्रेडचे लाकडाचे तुकडे ठेवलेले पाहिले त्यावरून लढणाऱ्याला दोन स्लाइसेस व न लढणाऱ्याला फक्त एक स्लाइस मिळत होता पाण्यासाठी अशीच मुश्कील झाली नळ बद म्हणून त्या कडाक्याच्या थंडीतही अंधार पडल्यावर लोक नदीवर येत थंडीमुळे नदीचा पृष्ठभागही बर्फाची लादीच बनलेला कुऱ्हाडीने बर्फ फोडून, पृष्ठभागाला एक गोल छिद्र पाडून, बादलीने त्यातील पाणी काढायचे व घरी न्यायचे लोक असे उघड्यावर आले की, नाझी सैनिक त्यांना मशिनगन्सनी अचूक टिपून काढीत घरात रहाणाऱ्याना अन्न मोजके शिजवायला सरपण नाही उबेला वीज नाही इतर काही सुखसोई तर नव्हत्याच. या तीन वर्षांच्या वेढ्यात लेनिनग्राडमधे उपासमारीने, थंडीने आणि हिटलरच्या गोळ्यांनी मारलेले असे ५ लाख लेनिनग्राडवासी मृत्यू पावले दहा लाख लढून कटून मेले

आम्ही ज्या कॉमन ग्रेव्हजमधे गेलो, तेथील दृश्य पाहून तो इतिहास ऐकताना डोळ्यांपुढे ते दिवस येत व डोळे भरून येत या १५ लाख नागरिकांच्या व सैनिकांच्या मृत्यूने लेनिनग्राडची प्रचंड हानी झाली माणसे इतकी मेली की, एवढ्या माणसांना पुरण्यासाठी पुरेशी जागा मिळेना अंत्यसंस्काराला माणसे मिळेनात त्यावेळी या सामायिक कबरस्थानासारख्या भूमीमधे एका खोलीएवढे लांब, रुंद व खूप खोल असे खड्डे खणून त्यात सुमारे हजारभर देह टाकले की खड्डा भरे. तो बुजवून लगेच दुसरा खणत

आम्ही पाहिलेल्या या स्मशानभूमीत व्यवस्थित आखणी केलेले दुतर्फा लांबट चौकोन होते सर्वत्र हिरवळ होती या चौकोनावर फुलांचे ताटवे होते जणू आतील मृतात्मे त्या फुलांना जीवनरस देऊन पुनर्जन्मच घेत होते !

आणखीही काही ठिकाणी उरलेले देह आहेत यात नागरिकांच्या 'समायिक समाधी' खड्ड्याजवळ हातोडा व कोयता हे नागरी चिन्ह आहे तर सैनिकांच्या कबरीवर पचकोनी चांदणी हे लष्करी चिन्ह आहे या कबरीच्या मध्यभागी एक मोठा चबुतरा आहे त्यावर एका साध्यासुध्या नागरिकाचा (Common man) चा पुतळा आहे त्यावर एक कविता आहे ती ह्या बळी पडलेल्या लोकांची कहाणी सांगते या कवयित्रीचे नाव ओल्गा बेरगॉल्टस्. (Olga Bergolts) ह्या तीन वर्षांच्या कठीण काळात ह्या कवयित्रीने अत्यंत स्फूर्तीदायक कविता केल्या आणि लोकांचे मनोधैर्य टिकविले त्यावेळी फक्त रेडिओचे एक सेंटर चालू होते त्यावरून ही कवयित्री नेहमी भाषणे करी व नागरिकांना धैर्य देई. आणखीही काही कवी स्फूर्ती देणारी भाषणे करीत, गाणी म्हणत

ह्या तीन वर्षांच्या हाल-आपत्तीच्या काळात आणि मृत्यूच्या तांडवामध्ये रशियन माणसाच्या देशप्रेमाची कसोटी लागली पण ते त्यात उत्तीर्ण झाले मृत्यू व उपासमारीने गांजलेल्या रशियन नागरिकाना व सैनिकांना उद्देशून हिटलरचे सैनिक लाऊडस्पीकरवरून जाहीर आव्हाने देत

'आमच्याकडे या आणि सुखी व्हा आमच्याकडे येणाऱ्याला १००० रुबल्सचे बक्षीस! खाण्यापिण्यास भरपूर आणि चांगला पगार मिळेल सैनिकानो तुम्ही फुटून आलात तर तुम्हाला वरच्या जागा देऊ तुमची सर्व तऱ्हेची चंगळ होईल'

परंतु या आमिषाला कोणीही नागरिक किंवा सैनिक भुलला नाही एकही माणूस फितुर झाला नाही ते चिवटपणे नाझींचा प्रतिकार करीत राहिले

अखेर जसा नेपोलियन लेनिनग्राडला हरून परतला तसाच हिटलरचा वेढाही उठला, त्यांचीच रसद संपली उपासमारीला व लेनिनग्राडच्या थंडीला कंटाळून नाझी सैन्य माघारी गेले

या कबरस्थानात पुतळ्याजवळच अमरज्योत (इटर्नलफ्लेम) आहे इथेही पुष्पगुच्छ वाहून लोक आदराने मस्तक झुकवीत होते

आज वारा व थंडी फार होती येथे अशीच हवा नेहमी असते काल आमचे भाग्य म्हणून आम्हाला स्वच्छ सूर्यप्रकाश मिळाला असे तेथील लोक म्हणाले तेथून जवळच एक छोटे म्युझिअम होते त्यामधे दुसऱ्या महायुद्धाची डॉक्युमेंटरी दाखवणार होते परंतु ते मशिन बद पडल्याने एका माणसाने तोंडीच माहिती सांगितली तो स्वत त्या काळी युद्ध बघायला होता त्याने सांगितले की,

'मास्कोला फारच मोठा प्रतिकार झाला मास्कोपासून ५० कि मी वरच रशियनांनी नाझींना अडविले व त्यांचा पराभव केला या विजयामुळे उरलेल्या सैनिकांना वीरश्री आली कैक नागरिक आपणहून सैन्यात भरती झाले या देशाकडे हिटलरने फार मोठे सैन्य पाठविले होते अखेर हिटलरचा पराभव झाला'

येथे एका हॉलमध्ये युद्धाच्या काळातील चित्रे व वस्तू ठेवलेल्या आहेत त्यात बाँबच्या गोळ्याचे तुकडे आणि त्यावेळी मिळणाऱ्या अन्नवस्तूचे नमुने ठेवले आहेत, तसेच शूराचे फोटोही आहेत

मी विचारले, 'स्त्रियानी या युद्धात कोणती कामगिरी केली ?'

ते म्हणाले,

'झोया नावाच्या मुलीने गर्ल स्काउट संस्था चालविली आणि त्यातील मुलीतर्फे जखमी सैनिकांची शुश्रूषा केली पेट्रोव्हा नावाची बाई स्त्रियाच्या तुकडीत अत्यत शौर्याने लढली तिने कित्येक नाझीना ठार केले तिला युद्धात पकडले तेव्हा नाझी आपले हाल-हाल करतील हे ओळखून तिने आत्महत्या केली स्त्री डॉक्टर्सनी शुश्रूषापथके उभारली'

नाझींनी जी सामूहिक कत्तल केली, तिचे मोठे चित्र टागलेले होते त्यात प्रचड प्रमाणावर माणसाची झालेली हत्या दाखविली होती

लेनिनग्राडमध्ये ही जी प्रचड हत्या झाली होती त्यात पुरुषच जास्त गेले होते त्यामुळे गावभर सगळीकडे वाहानातून व रस्त्यातून बायकाच दिसत तरुण आता संख्येने वाढलेत पण पन्नाशीपुढला पुरुष औषधाला क्वचितच दिसतो. कारण त्याचीच पिढी तरुणपणी मारली गेली.

आता जे पुरुष आहेत त्यातही बहुतेक पुरुष हे सैन्य, अवजड वाहनाची वाहतूक, मोठे उद्योगधंदे यामधेच जेमतेम पुरेसे होतात सर्व नागरी नोकऱ्या स्त्रियाच करतात. अगदी सफाई कामापासून ती वेट्रेसेस, ड्रायव्हर्स, पोलिससुद्धा स्त्रियाच असतात

बुधवारी दुपारी झारच्या विन्टर हर्मिटेजला बसने नेले या वेळेला आम्ही नदीच्या बगाने न जाता गावच्या बाजूला असलेल्या प्रवेशद्वाराने गेलो प्रवेशद्वाराशीच नजर रेंगाळावी अशी शिल्पे आहेत दहा फूट उचीचे दहा पुरुषाचे पूर्णाकृती पुतळे दाराशी होते त्यांच्यामधून जे कोरीव सगमरवरी स्तभ होते ते मुद्दाम इटालीहून आणवलेले होते हाही दोन मजली भव्य प्रासाद आहे सर्व दालने खूप मोठी, प्रशस्त आहेत हे जगातील दोन नबरचे म्युझियम आहे चार प्रचंड इमारती मिळून याचे एक म्युझियम केले आहे याच्या पहिल्या दालनात मूळ ग्रीक पुतळे आहेत त्याच्या आजूबाजूला त्याच धर्तीवर इतर कलावतानी केलेले पुतळे आहेत राजे लोक १७६४ पासून हे म्युझियम बनवीत होते येथील पुतळ्याचे स्नायू दगडातही हुबेहूब जिवत वाटत होते स्त्री आणि पुरुषाच्या स्नायूची ठेवण त्यांच्या त्याच्या नैसर्गिक रूपाप्रमाणे होती स्त्रियांच्या अवयवावर गोलवा होता हे सर्व पुतळे नग्न असले तरी अभिजात कलामूल्यांमुळे वासनेला आव्हान न करता कलेकडे लक्ष वेधीत होते त्याच्या पुढल्या दालनात दहा फूट लांब व सात फूट रुद असे एक लांबट मद्यपात्राच्या धर्तीचे सगमरवराचे विशाल भांडे कोरलेले होते त्याची नक्षी बघावी की त्याच्या छतावर असलेल्या कोरीव कामाची नक्षी बघावी असा गोड सभ्रम

पडला या छपरावर एकसंध दगडात फार सुंदर नक्षी कोरली होती

या हर्मिटेजमध्ये फिरताना मला इतर रशियन गावाच्या व सोशालिस्ट मित्रराष्ट्रांच्या प्रवासाला आलेल्या स्त्रिया भेटल्या त्याची माझी– सिनेमांच्या संदर्भात म्हणा– पण छान दोस्ती जमली मी लगेच मला हवे असलेले प्रश्न त्याना विचारले आम्ही पोर्चमधे बॉबी सिनेमातील गाणीही म्हटली जिन्यावरून जाताना आणि वरच्या दालनातून सगळीकडे चकचकीत पाढऱ्या भिंतीवर उत्कृष्ट डिझाईनची सोनेरी किनार आहे या म्युझियमने दुसऱ्या महायुद्धात बॉब झेलले आहेत ह्या व अशा ज्या ज्या वास्तूची आणि वस्तूची दुसऱ्या महायुद्धात हानी झाली, ती हानी या सस्कृतीरक्षक देशानी पूर्ववत भरून काढली

म्हणजे पडलेली भिंत पुन्हा उभारणे, तिच्यावरील गिलावा मूळ सगमरवराशी जुळेल इतका चकचकीत करणे, मूळ नक्षीला जोडून उरलेली नक्षी तशीच चितारणे व ती सोनेरी रगवणे, ही कामे हल्लीच्या कलाकारानी केली पुतळ्याचे हात, पाय, नाक, डोके जे तुटले असेल ते प्लॅस्टर ऑफ पॅरीसने मूळ कृतीला साजेसे जोडून दिले आहे सांगितल्याशिवाय हे जोडकाम आहे असे कळूनही येत नाही शनि, रवी, शुक्र (व्हीनस) या नवग्रहांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत तसेच छपरावर उडणारे देवदूत उठावाने काढून रगविले आहेत. ज्या जिन्यावरून आम्ही या दर्शनी दालनात आलो त्या जिन्याला फार मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे

१९१७ च्या ऑक्टोबर क्रातीची तोफ झाडल्यानतर आरोरा क्रूझरवरून स्फूर्तीने थरारलेले स्वातंत्र्यसैनिक रूट मार्च करीत आले व ते हत्यारानिशी झारच्या सैनिकांना नेस्तनाबूत करून विजयाच्या घोषणा देत राजावर हल्ला करण्यास येथूनच गेले तोच तो ऐतिहासिक रुंद जिना दुसऱ्या महायुद्धात हा बॉबस्फोटाने बराच ढासळला होता आता बेमालूम सांधला आहे मूळची नक्षी जी शिल्लक होती ती आगीच्या धुरामुळे काळवडलेली आहे

येथपासून या म्युझिअममधील जगप्रसिद्ध रशियन झुबरे दिसू लागली या दालनामागून दालनात जात असता एकसारखी झुबरेच झुबरे लागत होती.

क्रेमलिनच्या कॅथेड्रलमधे ५–६ झुबरे पहाण्यासाठी मी जिवाचा केवढा आटापिटा केला होता ! आता येथे डोळ्याचे पारणे फिटेल इतकी शेकड्यानी झुबरे होती एकाहून एक मोठ्या विस्ताराची, एकापेक्षा एक जास्त उच थरांची, नाना आकारांची, वेगवेगळी नक्षी असलेली अशी ती झुबरे कितीही पाहिली तरी मन तृप्त होईना.

ही असख्य झुबरे हे या हर्मिटेज म्युझिअमचे सर्वात मोठे आकर्षण आहे चकचकीत पांढऱ्या रगावर सोनेरी नक्षी असलेले चर्चचे घुमट, भिंतीवरील नक्षी, आणि या झुबरामधेही तीच रगसगती होती मेणबत्तीची शुभ्र काचेची किंवा चिनी मातीची आवरणे, नक्षीदार पितळी स्टॅण्ड, ते तोलणाऱ्या कमानदार काड्या या साऱ्यांचा एक मोहक आकृती-

बध होई पांढरा आणि सोनेरी रंग एकमेकांना एवढे खुलवतात हे मला आजच कळले

काही ठिकाणी टेबलावरचे कँडल स्टॅण्डस होते एका दालनात चारी कोपऱ्यात पाच फूट उंचीची प्रचंड पुष्पपात्रे होती ती बाहेरून सुरेख आकृत्यांनी रंगवली होती एका दालनात संगमरवरावरचे अनेक प्रकारचे कोरीव काम होते त्याच्या पुढल्या दालनात संगमरवरावर काळी नक्षी होती याच दालनात विशेष म्हणजे झारचा फोटो होता !

अफाट रशियन साम्राज्याचा हा धनी ! रशियाभर कुठेही याची नामनिशाणी मला तरी दिसली नाही अर्थात हे चित्रसुद्धा ठेवले असावे ते त्या चित्रकाराची कला म्हणून असेल किंवा ऐतिहासिक संग्रह म्हणून असेल पुढे एका भव्य दालनात प्रचंड सोनेरी खांब व त्यावर नक्षी होती येथे रशियातील सर्व प्रांतांची पूर्वीची बोधचिन्हे होती परंतु थंडीमधे शेकोटीतल्या ठिणग्या उडून ती आगीत जळून गेली नंतर एक गॅलरी दिसली तिच्यावर सगळीकडे नक्षी आणि झुंबरेच होती येथे लोलक असलेली इंद्रधनुषी झुंबरे होती

दुसरा एक संगमरवरी चषक दिसला याच्या पेल्याचा व्यास आठ फूट होता हे झार लोक या प्रचंड प्याल्यातून पार्टीच्या वेळी मद्य ठेवीत होते की काय ? प्रत्येकाने आपला ग्लास बुडवावा आणि अखंड प्यावे बर असेल ! आपला हात जगन्नाथ !

पहिल्याच झार अलेक्झांडरचे चित्रही दिसले ते जॉर्ज नावाच्या इंग्रजाने १० वर्षे खपून काढले असे म्हणतात असेच एक दालन इटालियन कलाकाराने त्यांच्या पद्धतीने सजवले होते येथे सफेद संगमरवराचे खांब होते येथे आठ फूट उंच व रुंद झुंबरे होती

म्युझिअममधील प्रचंड व सुंदर सामुग्री इतकी चकचकीत नि स्वच्छ ठेवणे हे एक मोठेच काम असेल आता तर ऑलिंपिकसाठी त्यावर नवीन मुलामा देणे चालले होते एका दालनात रशियन चित्रकारांची चित्रे होती त्यात पिटर द ग्रेटचा तरुणपणचा सुंदर पुतळा होता हा पीटर द ग्रेट म्हणजेच लेनिनग्राडचा संस्थापक !

एक दालन संपूर्ण हिरव्या संगमरवराने सजविलेले होते हा दगड रत्नाप्रमाणे चकचकीत व बराच पारदर्शक आहे हे फार दुर्मिळ दगड असतात रशियाच्या उरल प्रांतातून हे आणले गेले याना ग्रॅनॉइट म्हणतात या सुरेख हिरव्या रंगावर संपूर्ण सोनेरी नक्षी आहे. मध्यावर (अर्थातच) झगमगते झुंबर आहे या हिरव्या स्टोनच्या सुंदर सुंदर नाजुक वस्तू आहेत सोनेरी कडांच्या मखमली खुर्च्या आहेत येथेच एक डायनिंग टेबलाएवढे मोठे टेबल या हिरव्या पाचूसारख्या दगडाचे आहे हे टेबल व त्या मखमली खुर्च्या या बहुधा राजे लोकांच्या जेवणासाठी वापरीत असाव्यात यानंतर एका दालनात मोठमोठ्या भिंतीएवढ्या विस्ताराची कापडावरली पेंटिंग्ज होती ही आशिया, आफ्रिका, अमेरिका व रशिया यातील ख्यातनाम कलाकारांनी रंगवलेली होती एक नुसत्याच झुंबराचे दालन लागले तेथून मला पुढे जावेसेच वाटेना आमची गाईड आन्या आम्हा भारतीय बायकांच्या मानाने उंच (सडपातळही) त्यामुळे ती भराभरा पुढे जाई व प्रत्येक वस्तूकडे बोट

दाखवून माहिती सांगे आणि पुढे पुढे जात राही या झुंबराच्या दालनात डोळ्यांना पुरेसे दर्शनसुख न वाटल्याने मी अखेर त्याचे स्केच करून घेतले एका दालनात फ्रान्स आणि पोलंडमधील कलेचे दर्शन होत होते येथील नक्षीकाम फारच अवघड आणि किचकट होते. १७ व्या शतकात चटईवर चित्रे काढीत ती होती तेथे कॅनव्हॉसवर रंगविलेल्या तेरा व बावीस चित्रातून दोन गोष्टी सांगितल्या होत्या यानंतर जे दालन लागले ते पाहून सगळ्याच्याच तोंडातून " अहाहा ! कमाल आहे ! छ येथून जाऊच नये ! " असे उद्गार निघाले या दालनातील झुंबरामधे मेणबत्तीऐवजी छोटे छोटे विजेचे लांबट बल्बज् बसवून सारी झुंबरे प्रकाशमान केली होती यात स्फटिक, दुधी काचा आणि सोनेरी नक्षी याचो रेलचेल होतो. अशी अठ्ठावीस स्फटिकाची झुंबरे या हॉलमधे लखलखत होती !

येथे बसून समोर एक रहदारीचा चौक दिसत होता. नीव्हा नदीचा मोठा फाटा दिसत होता सायंकाळचा मंद सूर्यप्रकाश समोरच्या दृश्यालाही सोनेरी करत होता बाहेर पाचूची झाडे, संगमरवरी वर्णाची माणसे, त्यांचे सोनेरी केस व सूर्यप्रकाश या अपूर्व सृष्टी-शोभेकडे एकदा बघावे आणि दुसऱ्या क्षणाला संगमरवरी मूर्ती, पाचूचे चषक आणि सोनेरी नक्षीची झुंबरे यांचा रंगविलास न्याहाळावा असे मोठे अपूर्व दृष्टीसुख मी घेतले त्यावेळी मनात आले, आपण एवढा खर्च करून जगातले भोगविलासाची साधने उधळणारे देश न पाहता, इथे रशियात आलो त्याचे आज सार्थक झाले एक लेनिनग्राड शहर अथवा नुसता हा हर्मिटेज म्युझिअम, एवढेच बघूनसुद्धा डोळ्यांचे पारणे फिटले उरलेले सर्व काही मोफत मिळाले असे समजावे

या दालनानंतर वेस्ट युरोपियन पद्धतीचे मोठ्या सोनेरी चित्राचे दालन ! हे गोल व कलायुक्त, मोठे भव्य, कलापूर्ण चित्रांनी सजलेले होते काही घड्याळातून दर तासाला पितळेचा मोर अगर कोकिळा बाहेर येई अशीही घड्याळे होती. हॉलमधील कलेचे एक दालन होते त्यात एक नग्न स्त्री दाखविली होती. तिची गोष्ट अशी की, तिच्या सासऱ्याला ज्योतिषाने सांगितले की, ह्या सुनेला जर मुलगा झाला तर तो तुला ठार करील. म्हणून त्याने तिला एका उंच खांबावर छोट्याशा खोलीत ठेवले तेथे सूर्यकिरण तिला भेटला सूर्यापासून तिला गर्भ राहिला आणि शेवटी त्या मुलाने आजोबाला ठार केले !

आपल्याकडील कुंतीची कथा थोडी अशीच आहे !

याशिवाय फ्रेंच दालनात फ्रेंच चित्रकार फ्रॉन्सेकोय याने झुबेरियन उच्च स्त्री–पुरुषाची चित्रे काढली आहेत असेच फिनलंड वगैरेच्या कलेचे दालन होते.

संध्याकाळ झाली होती आज रात्री आम्हाला लेनिनग्राड सोडायचे होते. आम्ही बसशी आल्यावर आन्या म्हणाली,

' अशी आणखीही काही दालने आहेत पण वेळ पुरणार नाही. '

मला वाटत होते, हे काही पोटभर बघणे झाले नाही. अमृताचा एक थेंब चाखावा

तसे वाटत होते कदाचित मी जर एकटी असते तर लेनिनग्राड एवढ्या लवकर सोडले नसते एकेका दालनात एकएक दिवस बसून राहिले असते वायव्य युरोपच्या ह्या अप्रतिम कौशल्याच्या आविष्काराकडे मन तृप्त होईपर्यंत बघत राहिले असते येथील कलाकृतीची चित्रे विकत न घेता स्वत रेखाटने केली असती (तशा शाळेत ड्रॉईंगच्या परीक्षा दिल्या आहेत मी ) येथे रगीत फोटो फिल्म्स् सगळीकडे मिळतात परतु सर्कस, थिएटर, म्युझिअम यामधे कॅमेरे नेण्यास व फोटो घेण्यास परवानगी नाही

तेव्हा मी काही रेखाचित्रे घेतली असती आणि उरलेले सर्व काही अत पटलावर चिरकालासाठी खोदून ठेवले असते आत्याने वगळलेले म्युझिअमचे इतर भाग आणि उरलेले म्युझिअमसुद्धा पाहून घेतले असते सकाळपासून तिसऱ्या प्रहरापर्यंत डोळ्याना रोज अशी मेजवानी दिल्यावर सायकाळी मी डोळ्यांना रुचिपालट आणि पायांना मऊ हिरवळीचा स्पर्श देण्यासाठी उद्याने व उपवने यातून मनसोक्त भटकले असते नीव्हा नदीचे रम्य पात्र निरखीत काठाकाठाने फिरले असते रात्रीच्या वेळी हॉटेलच्या गगनचुबी टेरेसवरून दिव्याने लखलखलेली ती जलनगरी पाहिली असती मध्यरात्री नीव्हा नदीच्या पात्रातून समुद्रामधे बोटी निघाल्या की, स्वत चे हृदय दुभगून घेऊन त्याना दोन हातानी सलाम करणारे नीव्हा नदीवरचे ते पूल पाहिले असते रम्य सकाळी धुक्याने गुरफटलेल्या लेनिनग्राडच्या चिमुकल्या घरांच्या वस्तीतून फिरले असते एकाद्या रशियन गृहिणीने अगत्य दाखविलेच तर पावाचा तुकडा आणि सफरचंदाचा मुरांबा खाल्ला असता बसमधून निरुद्देश भटकले असते तर कधी टॅक्सी घेऊन त्याला ती गावभर फिरवायला सांगितली असती आणि जिथे मन लोभावेल त्या स्थळी ती सोडून देऊन तेथील पुतळे किंवा कोरीव स्तभ किंवा माणसांचे थवे निरखीत राहिले असते

असे निदान महिनाभर तरी या रम्य नगरीचे दर्शन घेता यायला हवे होते परतु.. मनाचे सर्वच बेत पार कुठे पाडता येतात ? आमचा आखलेला दौरा होता ते दाखवतील तेवढेच व तेवढा वेळच बघायचे मी त्यात फक्त माझ्या जिज्ञासेला खाद्य म्हणून थोडी सधी घेतली सकाळी ब्रेकफास्टच्या खूप आधी येणे आणि सध्याकाळी डिनरनतर थाबणे अन् ह्या दोन्हीवेळा जमेल तेवढा जनसपर्क साधणे जिज्ञासेपोटी थोड्या चौकशा करणे मिळाली उत्तरे तर बरेच याशिवाय प्रत्येक गावी एकदोन वेळा काही तास मार्केटिंगसाठी देत मला त्यात फारसा रस नव्हता म्हणून मी त्या वेळामधे आजूबाजूला दिसणारी वस्ती बघे दुकानातील मुलांशी अगर खरेदीला आलेल्या बायकांशी बोलून पाही

त्या रात्री त्या सुदर लेनिनग्राडचा निरोप घेऊन आमची आगगाडी रात्री साडेनऊला परत मास्कोला निघाली कारण मास्को ते प्राग विमानाने जायचे होते मास्कोची सकाळ आम्हाला एखाद्या हॉटेलमधे काढायला मिळेल अशी मला कल्पना होती तेवढ्या वेळात मी फोनवरून तरी श्री सिनकर (रेडिओवरचे) व श्री मिश्रा (दूतावासातील) यांच्या-

साठी आणलेले निरोप फोनवरून देणार होते परंतु सक्सेनाचे व्यापारी 'डोके' त्याने हॉटेलचा खर्च वाचवला आम्हाला गावात नेलच नाही तर सकाळचा वेळ विमानतळावरच काढला त्यामुळे फोन राहून गेले

तानियाने पहाटे प्रत्येक कपार्टमेंटवर टिचक्या मारून आम्हाला पहाटे पाचला उठवले. साडेपाचला मास्को स्टेशन आले आज कणकण पाऊस होता परतु छत्रीची गरज लागली नाही सोव्हिएट देश आता आम्ही सोडणार होतो त्यामुळे कस्टम फॉर्म, बॅगा विमान-तळाच्या ताब्यात देणे वगैरे सर्व तत्रे प्रथम उरकली नंतर तेथीलच हॉटेलमधे चहा-पाणी झाले हे सकाळचे चहापान म्हणजे चहाच असे चहाऐवजी कॉफी देत नव्हते त्यामुळे मी रोज सकाळी अक्षरश घसा गरम न करता पावलोणी खाऊन कशी तरी न्याहारी नावाचे सदर भरत असे रात्री डिनरनतर क्वचित एकदा कॉफी मिळाली

मी खबरदारी म्हणून निघताना साखर, कॉफी घेत होते परतु माहितगारांनी ओझे वाढवू नका, याची तिकडे गरज नाही, असे सागितले तरी मी केशरी मसाल्याच्या डबीत थोडी कॉफी नेली ती छोटयाशा ग्रुपमधे एकाच दिवसात सपली (अकारण) जेवणाचे या प्रवासात तसे हालच झाले आणि याला कारण माझ्याच खोडी शाकाहारी म्हणून आम्ही लिहून दिले होते पण मांसाहारीना फार चागला ठोस आहार मिळे या युरोपियन लोकाच्या मते व्हेजिटेरियन म्हणजे वनस्पती खाणारेच लोक अशी कल्पना असल्यास न कळे शिवाय त्याच्या मते एक अडयाची जात व्हेजिटेरियन होती त्यामुळे ते व्हेजिटेरियनला ३-३ अडीही देत मला सर्वांनी बजावले होते, निदान अडी खात जा नाहीतर उपाशी रहाशील, आणि कमी खाण्याने अगात उष्णता कमी झाली तर थडीने बधीर होशील शिवाय चालण्याच्या श्रमाने आणि थडीने पाय गारठले तर थोडी ब्रँडी घेऊन ठेव ती पायांना चोळायला होईल

मी ब्रँडीच्या बाटलीची किमत विचारली ती ऐकून माझे डोळे पांढरे झाले. इति-उप्पर तिथे त्या ब्रँडीची जरुर पडली नाही, तर मग ती कुणाला तरी फुकट देऊन टाकायची हेही माझ्या खिशाला परवडणारे नव्हते म्हणून मी ब्रँडीऐवजी व्हिक्स आणि अमृतांजन घेऊन गेले होते तसे पाय बधीर होण्याची वेळ आली नाही लोकरी मोजे व बूट होते

हॉटेलमध खोली रात्रभर बंद असे त्यात हिटर असे शिवाय रोजचे श्रम असत या सर्वांमुळे सकाळी उठताच मला उमासे येत अशा वेळी कॉफीची मी जरी तलफी नसले तरी ती आवश्यक होती त्याने तरतरी आली असती ती नाहीच अडी वासामुळे खाववत नसत मग उरले फक्त पाव-लोणी हे पाव थोडे पिवळसर व उरलेले काळसर असत काळा हा बाजरीचा ब्रेड असतो हा म्हणे उष्ण असल्यामुळे थड देशात चांगला. परतु मी बाजरी अद्यापपर्यंत कधी खाल्ली नाही तर ती सोसणार नाही म्हणून मी माझ्या वाटयाला (गव्हाचे) येणारे पावाचे दोन स्लाइस आणि लोण्याचा तुकडा खाऊन सकाळ काढीत असे.

माझ्या वाटचे बाजरीचे तुकडे घेऊन मला तिसरा पिवळा स्लाईस कुणीही दिला नाही चीझ व जॅमसुद्धा असे सुरवातीला हे सर्व मजेत खाल्ले परंतु रोजरोज सर्व वेळा पाव म्हटल्यावर त्याचा भयंकर कटाळा येतो शिवाय लेनिनग्राडच काय पण दक्षिणेकडे वार्सा, किंवा बर्लिनलाही तेवढीच थंडी त्यामुळे किचनमधून टेबलावर आलेले पाव बघता बघता कडक होत ते लोण्याबरोबर खाण्यापेक्षा मला ते गावठी पद्धतीने चक्क कॉफीत बुडवून खावेसे वाटत होते पण कॉफीच नसल्यामुळे काय करणार ?

आपणही इथे पाव खातो पण उरलेला दिवस चमचमीत मसालेदार पदार्थ खात असतो म्हणून पावाचा कटाळा येत नाही अशी थोडीफार उपासमारच माझी झाली. अर्थात त्याला कारण माझा शाकाहाराचा आग्रह ! अंडीसुद्धा न खाणे चहा न पिणे थंडीने चावता न येणे हे होतेच अर्थात आम्ही इतके रोज फिरत होतो व इतके श्रम होत होते की, जे काही थोडेफार अन्न शरीराला मिळे त्याचे पचन होई थंड, कोरड्या हवेमुळे शरीराला काही अपायच होत नव्हता शिवाय आपोआप डाएटिंग झाले.

तरीसुद्धा पुढल्या अकरा दिवसांत उरलेल्या तीन देशामधे जे काही खाण्यापिण्याचे हाल झाले ते पाहाता रशियामधील मुक्कामात खूपच चांगली व्यवस्था होती म्हणायची कारण तानिया ही एक खरोखरच उत्तम गाईड होती ती स्वत विवाहीत गृहिणी असल्या-मुळे तिने आमच्या आवडी–निवडीप्रमाणे जास्तीतजास्त उपलब्ध होतील तेवढे चांगले मेनू दिले मास्कोमधे भाज्या असत आईस्क्रीम मिळे. किएव्हमधे तर चंगळ होती तेथे द्राक्षे, सफरचंदे, संत्री अशी भरपूर फळे मिळाली आम्ही लोक भातासाठी जीव टाकतो म्हणून तिने एक दिवस त्यांच्या पद्धतीने भाताची खीर देवविली अर्थात दूध साखरेचे प्रमाण अगदीच कमी होते तरीसुद्धा भातामुळे रात्री झोप काय छान आली ! अखेर माणसाचा पिंड बालपणी ज्या अन्नावर वाढतो त्याचीच त्याला जास्त आसक्ती असते हे बाकी खरे. येथे काही वेळा जॅमऐवजी शुद्ध मध मिळाला तर किएव्हला खाण्यापिण्याची चंगळच झाली माणसही मोकळीढाकळी वागली लेनिनग्राडला थंडीमुळे सफरचंदे खाववत नसत तर तानियाने चतुराईने गरम गरम धिरडी खाऊ घातली त्यांना इकडे पॅनकेक म्हणतात अशा तऱ्हेने तानियाने आमची खूपच छान व्यवस्था ठेवली सर्कस, बॅले, रेल्वे, म्युझिअम्स यांची तिकिटे ती व्यवस्थित अगोदर रिझर्व करून ठेवी ती ज्यावेळी अशी कामे करायला जाई त्यावेळी वादिन् एकटा आमचा प्रचंड ताफा सांभाळी सगळ्याच युरेपियन तरुणाप्रमाणे वादीन उंच होता तो भरभर चाले, पण आमच्यात काही हळू चालणारे, काही वयस्कर, यांच्यासाठी तो थबकून मागे पाही. तो देत असलेल्या माहितीच्या मी नोटस् घेत असे त्याचा एकादा उच्चार समजला नाही तर तो चटकन माझ्या वहीवर लिहून देई वादीन आणि तानियाच्या सहवासात आम्ही अकरा दिवस होतो या प्रवासात आमचे कुठेही हाल झाले नाहीत याचे श्रेय त्यांच्या स्पुटनिक संस्थेला आणि त्या दोघांच्या

शिस्तबद्ध कार्यतत्परतेला आहे.

युरोपमध्ये स्त्रिया लाजऱ्या बुजऱ्या राहिल्या नाहीत दुसऱ्या महायुद्धानंतर देशाच्या नागरी कामांचा भार स्त्रियांनी जास्त प्रमाणात उचलला तेथे मनुष्यबळ कमी आहे यंत्रबळ जास्त आहे अशा वेळी स्त्री ही मिश्र समाजात नेहमीच वावरते आणि त्याचा ती फाजिल बाऊ करत नाही वादीन् हा कॉलेज विद्यार्थी होता फार गोड मुलगा होता आमच्या अठरापगड माणसांच्या ग्रुपने त्यांना बरेच सतावले असेल आमच्या भारतीय सवयींमुळे हॉटेलवालेही नाराज झाले असतील त्या सर्वांना व आम्हाला साभाळून घेण्याचे कठीण काम या दोघांनी केले शिवाय कोणालाही त्यांनी दुखावले नाही यामागे आपल्या देशाबद्दल इतरांचे मत चांगले व्हावे ही त्यांची जागृत इच्छा होती वादिन स्वतः हसतमुख असे तो आम्हाला खरेदीलाही मार्गदर्शन करी तानिया शांत, गंभीर स्वभावाची व कर्तव्यदक्ष होती ही दोघे एकमेकांशी जादा संकोच किंवा फाजिल मोकळेपणा दोन्ही न करता वागली तिकडे स्त्री–पुरुषांचे सहकार्य सर्वत्रच नोकऱ्यामध्ये अंगवळणी पडले आहे. त्यामुळे तानिया व वादीन याच्यासारखे अकृत्रिम सहजपणे वावरणे त्यांना शक्य होते. दोन स्त्रिया किंवा दोन पुरुष आपसांत जसे बिन दडपणाने वागतात तसे वागायला शिकणे ही आजच्या भारतातील मिश्र समाजाचीही गरज आहे आम्ही त्यांच्यापासून एवढे शिकलो

एकंदर सफरीमध्ये जास्त सुखाचे आणि लक्षणीय दिवस हे रशियामधलेच गेले. पुढल्या अकरा दिवसात थोडी मजा व जास्त दगदग झाली तानियाप्रमाणे एक अखंड सूत्रधार नव्हता हे एक कारण मूळचे कार्यक्रम बदलले गेले काही गैरसोई झाल्या गाईड्सना तानियाइतका कंट्रोल जमला नाही त्यामुळे आमचीही पुढे चिडचिड वाढली

रशियातले पहिले अकरा दिवस एकेका गावी एकाच हॉटेलात भरपूर राहिलो. तसे पुढे जमले नाही रशियामध्ये आम्ही खूपच प्रसन्नचित्त होतो थट्टा–विनोद चालत. तानिया ज्या ढंगात माहिती सांगत असे त्याची आम्ही नक्कल केली तरी ती चिडत नसे तिच्या बोलण्यात र हा उच्चार स्पष्ट असे सुरवातीला तानियाच्या प्रत्येक वाक्याचे सक्सेना हिंदी भाषांतर करून देई पुढे आमच्यात इंग्लिश अजिबात न जाणणारा कोणी नाही असे त्याला ग्रामीण भागांतील बांधवांनीही सांगितले

मराठवाड्यातील केज येथील बाबूराव आडासकर यांचे व्यक्तिमत्व मोठे वैशिष्ट्यपूर्ण होते भरपूर उंची व तेवढाच थोराड देह आणि त्याला शोभेशा काळ्या झुपकेदार मिशा, यामुळे बाबूराव आमच्या ग्रुपमध्ये लक्षवेधक ठरले तसा आमचा ग्रुप इतर सर्व टूरिस्टना पटकन् ओळखू येई आमच्या चमचमत्या साड्या व अंबाडे, पुरुषांच्या गोंडेदार कानटोप्या व माकड–टोप्या, शिवाय रंग ! यामुळे आमच्याकडे सारेच पहात रहात आमच्यातील चार सरदारजी लाल, निळ्या, भगव्या फेट्यांमुळे परदेशी लोकांच्या नजरा खेचीत.

रस्त्याने जाणारी मुलेही आमचा ग्रुप पाहिला की टाटा करत सरदारजींभोवती तर गराडा पडे वार्साच्या एका चौकात शाळकरी मुलींच्या सहलीने सरदारजींना पकडून नाचायला सुरवात केली कुणी त्यांची स्केचेस् काढली तर कुणी त्याच्या सह्या घेतल्या. कुणी फोटो काढले विदेशी मुलांना फेटेवाल राजा वाटतो की काय न कळे ?

आमच्यात मोठा अबाडा असणारीचेही फोटो घेतले जात बाबूराव अडासकरांचेही कुणी कुणी फोटो काढले क्रेमलिनच्या भिंतीजवळ त्या भव्य किल्ल्याच्या पार्श्वभूमीवरील भव्य बाबुरावाचा फोटो डॉक्टर गुप्ते यांनी घेतला हॉटेलमध्येही बाबूराव फार लोकप्रिय होत तेथील तरुण व प्रौढ नोकर बायका त्याच्याशी बोलू पहात कुणी त्यांना रशियात राहा असा आग्रह करीत एका प्रौढ वेटर बाईने त्यांना चक्क लग्न करण्याची गळ घातली तर एकीने त्याच्या मिशाच ओढल्या

थोडक्यात अप्‌टुडेट पाश्चात्य पोशाख केलेले किंवा तरुण असलेले पुरुष सोडून ह्या मडमाना ग्रामीण भागात रहाणाऱ्या बाबूरावाचेच आकर्षण फार वाटले याबद्दल कुणाला त्याचा मनात हेवाही वाटला असेल आम्ही त्याची चेष्टाही केली. पण बाबूराव चिडले नाहीत ते म्हणाले,

‘ बरं तर बर मिशाच ओढल्या त्यांच्या पद्धतीने मुके घेतले असते तर पचाईत होती ’

तर सागायचे म्हणजे बाबूराव फारच सज्जन ! लाजाळू पण इतके लाजाळू की बर्लिनच्या हॉटेलमध्ये डिनरच्या प्रत्येक कोर्समध्ये ऑर्केस्ट्राच्या तालावर स्त्री–पुरुष नाचताना पाहून कुणीतरी बाबूरावाची फिरकी घेतली की,

‘ या देशात एकाद्या स्त्रीने जर नाचण्यासाठी तुमच्यापुढे हात केला तर नकार द्यावयाचा नाही स्त्रीबरोबर नाचण्यास नाही म्हटले तर ती रागावते. तिला वाटते की, नकार देऊन हा आपल्या रूपाचा व सौजन्याचा अपमान करतो आहे ’

हे ऐकताच बाबूरावानी जेवण तसेच टाकले व ताड्कन् खोली गाठली.

आमच्यात एक अप्‌टुडेट गृहस्थ कोणी नृत्यासाठी हात पुढे केल्यास येत असावे म्हणून थोडे पाश्चात्य नृत्य शिकून आले होते त्यांना कोणीच बोलावले नाही

बाबूरावांना बायांनी इतके सतावले तरी ते गभीरच राहिले शेवटी त्यानी बायाना अस्सल खाकी विडी प्रत्येकी एक एक दिली

तसे बाबूराव विनोदीही होते एकदा ते तानियाच्या ढगात कॉमेन्ट्री करीत म्हणाले,

‘ आपके सामने जो है वो मास्कोका सबसे बडा पेड है । आपके बायें बाजूसे मास्कोका सबसे अच्छा गटार बहता है ! और आपके दाहिने बाजूमे मास्को की सबसे बडी खूबसुरत लेडी बैठी है ।’

त्यावर आमच्याप्रमाणेच तानियाही खेळकरपणे हसली

आमच्यापैकी एकाने तानियाशी बोलताना एकदा 'मॅडम' असे संबोधून प्रश्न विचारला त्यावर आमच्यातीलच काहीजण ( मराठीत का होईना ) त्याला सुनावू लागले की, 'हिला मॅडम कशाला म्हणायला हवे ? ही कोणी अधिकारी आहे का ?'

मी त्याना म्हटले,

'युरोपात कुठल्याही सभ्य स्त्रीला मॅडमच म्हणतात कुठल्याही परस्त्रीला नावाने हाका मारणे म्हणजे 'अग तुग' म्हणण्याइतके अनुचित आहे शिवाय तानिया ही पदवीधर दुभाषी कम् गाईड आहे ती तिच्या देशाच्या सरकारची नोकर आहे त्यांनी तिला आपल्या मदतीला दिले आहे ती आपली नोकर नव्हे तिला मानानेच वागवण्यात आपली सभ्यता दिसून येईल'

एकदा बसमधून जात असता कुणीतरी विचारले,

'गाईड, हाऊ मेनी क्रोज् आर् देअर इन् मास्को ?'

तानियाने गंभीर चेहऱ्याने म्हटले,

'नाईन थाऊजंड टू हंड्रेड थर्टीफाईव्ह यू कॅन काऊंट, इफ यू डोंट बिलिव्ह.'

तर तानिया गंभीर चेहरा ठेवूनही मजा करीत असे व करू देत असे

तर मास्कोला कॉफी पिताना रशिया देश व ह्या जोडीचा निरोप घ्यायचा म्हणून वाईटही वाटत होते आणि निरोप घ्यायच्या वेळी निःसंकोचपणे थोडे बोलणेही होत होते वादिमने मला कस्टम फॉर्म्स देऊन चटकन् भरून घेतले मी त्याला मुंबईला येण्याचा आग्रह केला माझा पत्ता त्याला दिला व त्याचा मी घेतला त्याने सांगितले,

'तानिया भारतात येऊन गेली आहे मलाही थोडे डॉलर्स किंवा रुपये मिळाले तर मी पुढे येईनही प्रथम मी पूर्णवेळ नोकरी लागल्यावर बचत करून एक मोटर कार घेणार आहे त्या कारने मी प्रथम युरोप पाहून येईन'

नंतर मी तानियाला म्हटले,

'तानिया, आम्ही गेल्यावर तू चार दिवस विश्रांती घे तुमचे लोक मितभाषी तू अबोल आणि शांत आम्हा लोकांचे मोठ्या मोठ्या आवाजात बोलणे, गैरसोय वाटली तर कचकच करणे आणि आपसात कोकलून राजकारणावर वाद करणे यामुळे तुला फार त्रास झाला असेल मीही त्यातलीच एक आम्ही तुला बोअर केले, त्याबद्दल माफ कर तुला आम्ही गेल्यावर मात्र छान निवांत वाटेल नाही ?'

तानिया खरोखरच दमली असावी तिने जे थकलेले मंद स्मित केले त्यावरून माझ्या बोलण्याला पुष्टीच मिळाली

तरी पण आता विमानाची वेळ होत आली होती आम्हाला त्या दोघांच्या व त्यांना आमच्या विरहाने जड वाटत होते गांभीर्य दूर करण्यासाठी सदा गंभीर चेहऱ्याची तानिया नाजुकसे हसत म्हणाली,

मिस्टर बॅबुर्रेव,' आणि तिने बाबूराव अडासकराकडे पहात स्वत च्या नाकाखाली आडवी बोटे फिरवली

बाबूरावानी खेळकरपणे हसून आपल्या मिशांची टोके उचावली तिने पुन्हा आंगठा व तर्जनीने पिळण्याची खूण केली त्यांनी स्वत च्या मिशांची टोके वरच्या अगांनी पिळली, विचवाच्या नागीसारखी ताठ केली तानिया आता दिलखुलास हसली

आम्ही सर्वानी त्या दोघाना बारीक बारीक बक्षिसे व्यक्तिश व एक सामूहिक बक्षिस आणले होते पण त्यानी ते स्वीकारण्यास फार विरोध केला शेवटी निदान आमच्या देशातील बारीक बारीक कलाकौशल्याच्या वस्तू तरी तिने घ्याव्यात म्हणजे आमची आठवण राहील असे त्यांना प्रेमाने सांगितले व ते त्यांच्या बॅगमध्ये कोंबलेच त्या दोघानीही सवाई परतफेड केली. उत्तम कोको व मध यापासून केलेले चॉकलेटचे पॅकस् त्यांनी आमच्या ग्रुपसाठी दिले विमान निघण्याची वेळ झाली मी जिना अर्धा चढला. मागे पाहिले खाली हॉलमध्ये वादिन व तानिया 'दसविदानिया' व नमस्ते म्हणत निरोप देत होती, मी थबकले सातासमुद्रापलीकडील रशियन बाधवांच्या या दोन प्रतिनिधींनी दोन आठवड्यांच्या आतच मनाचा मृदु कोपरा काबीज केला होता मी खाली उतरले पुन्हा त्या दोघांचा भावपूर्ण निरोप घेत मी त्यांना म्हटले,

'आय् विल मिस यू बोथ !'

ते दोघे दिसेनासे झाले रशियन एअरोफ्लोटच्या विमानात खऱ्याखुऱ्या हवाई सुंदरीने आमचे स्वागत केले येथून पुढला मुक्काम प्राग !

सोव्हिएट संघराज्याचा निरोप घेऊन आम्ही त्यांच्या सोशालिस्ट मित्रराष्ट्रात निघालो होतो

□ □

# ५ : राखेतून उठलेला फिनिक्स–वार्सा

प्रागच्या दिशेने विमान निघाले तेव्हा पहिली काही मिनिटे मास्को शहराभोवतालची हिरवीगार राने दिसली पुढेही कित्येक वेळपर्यंत असेच हिरवे प्रचंड पुंजके दिसले हवा चांगली होती विमान पंचवीस–तीस हजार फुटांच्यावर आल्यानंतर खाली तुरळक ढग आले तरी ते पांढरे होते वर आल्यानंतर लख्ख सूर्यप्रकाश भरलेले वातावरण होते एवढ्या उंचीवर सूर्यप्रकाश शोषून घेणारे ढगाचे थर, धूळ आणि वायू यांचे आवरण नसते. पृथ्वीवर सूर्यप्रकाश जसाच्या तसा डोळ्यांना कधीच दिसत नाही तो अनेक थरातून झिरपून येतो ही सकाळची वेळ होती तरी या उंचीवर सूर्यकिरण फार तीव्र वाटत होते भोवताली आकाश होते तेही लखलखीत निळ्या रंगाच्या काचेसारखे विमानाच्या डाव्या अंगाला सूर्य होता आ[illegible] नैऋत्येला चाललेलो माझ्या बाजूला ऊन येत होते सकाळ असूनही ते डोळ्यांना झोंबत होते तरी मी जागा सोडली नाही. आणि ते बरेच झाले पुढे जे चांगले दृश्य दिसले ते त्या बाजूमुळेच दिसले

तसं म्हटलं तर या युरोपात सूर्य कधीच डोक्यावर येत नाही आम्ही इतक्या उत्तरेकडे होतो की तो कडेकडेनेच येऊन जात होता त्यामुळे सूर्यप्रकाश प्रखर वाटला तरी गरम नव्हता. खालची सुंदर दृश्ये बघत मी मजा लुटीत होते. रेल्वे स्टेशने दिसत गावे व

भोवतालचा प्रदेश दाट झाडीत जणू लपवलेला असे याचा दुसराही उपयोग होत असावा आधुनिक अस्त्रांनी या भूमीत युद्धे झाली बॉम्बर विमानांना गावाची जागा नेमकी दिसू नये म्हणून गावाच्या भोवतालीसुद्धा मोठी उपवने आणि राखीव जगले ठेवत असत या मोठ्याशा हिरव्या ठिपक्यात नेमका वस्तीचा भाग कळत नसे त्यामुळे शत्रूचे काही बॉम्ब फुकट जात असतील शिवाय एरवीच्या काळात या हिरव्या झाडीमुळे हवा शुद्ध रहाते ती वेगळीच.

या विमानातला ब्रेकफास्ट हॉटेलपेक्षाही सुंदर मिळाला सुगंधित नॅपकीन होते, केक वगैरे दर्जेदार खाद्ये होती हा प्रवास तसा फार वेळाचा नव्हता किएव्ह ते लेनिनग्राड एवढेच अतर जवळजवळ होते परंतु सुपर-फास्ट रेल्वेनेही त्या प्रवासाला ३६ तास लागले. हा प्रवास मात्र दोन तासाच्या आतच झाला

खिडकीतून पहात असता विमान थोडे खाली आल्यासारखे वाटले कारण इमारती व सडका दिसत होत्या येथील सर्वच इमारती काचेच्या दर्शनी भिंती असलेल्या. एकाएकी मला वीज चमकताना दिसते तशी सोनेरी वे ांटी दिसली पुन्हा तेच ! पुन्हा पाहते तो सोन्याच्या रसाची नदीच जणू वाहात आहे असे वाटले मी वरील दृश्ये ( प्रत्यक्षात खालील) माझ्या मागच्या सीटवर बसलेल्या आमच्या प्रवासी बंधूना दाखविली तेही काही वेळ तो अपूर्व सोनेरी विलास पहात राहिले

पुन्हा एक मोठे शहर लागले तिथे तर सोन्याच्या असख्य रेघा आणि सोनेरी तेजाचे लोळ दिसू लागले मी डॉक्टर ढवळे याना म्हटले,

आपल्याकडे थेट डोक्यावर सूर्यप्रकाश आला की उचावरून पाहाताना नदीही गर्द निळी दिसते तशा इथे नद्या सोनेरी दिसत असाव्यात आणि त्या बऱ्याच असाव्यात '

डॉ. ढवळे म्हणाले,

' नद्याच केवळ नव्हे तर सर्व ठिकाणच्या काचा आणि चकचकीत रस्ते हेही तसेच सोनेरी दिसत आहेत '

मग माझ्या लक्षात आले की, सूर्य पूर्व–पश्चिम जात असला तरी त्याच्या उत्तरेकडून आमच्या विमानाची कक्षा होती दोन्ही कक्षा समांतर येत असाव्यात या दोन कक्षांच्या बरोबर मधे येणारी परावर्तनशील वस्तू ही, प्रकाशाचा व आमच्या डोळ्याचा वस्तूशी होणारा परावर्तन कोन, सूर्याइतकाच असल्यामुळे बहुधा ही सोनेरी किमया साधली असावी हिरव्या झाडीतून डोकावणाऱ्या ह्या असख्य सरळ व वक्र रेषा, सोन्याचे लोट, सोन्याचे पत्रे, या सर्व नयनमनोहर दृश्यामधे मी पार हरवून गेले कुणाशी न बोलता सृष्टीचा तो चमत्कार डोळे भरभरून पहात राहिले

असाच चमत्कार पूर्ण इंद्रधनुष्य पहाताना निघण्याच्या वेळी दिसला होता.

प्राग जवळ आले असावे कारण विमानातून खूपशा हिरवळीत शोभणारी उंच अपार्टमेंट हाऊसेस् दिसली डोंगराच्या कडेने चिमण्या असलेली छोटी घरे डोकावत होती. त्याच बरोबर मोठमोठी शेते आणि मळे दिसू लागले ढगावर डोकावणारे डोंगर सुळकेही दिसले विमानतळ मात्र शोधूनही दिसला नाही विमान उतरल्यावर विमानतळावरल्या प्रशस्त दालनामध्ये आम्ही सर्व लोक उभे होतो येथे बरीच पुष्पपात्रे होती मात्र त्यात नाना आकाराची पाने आणि डहाळया खोचल्या होत्या किएव्हइतकी फुलाची रेलचेल इथे दिसली नाही.

विमानाने फार झटकन् सुरेख प्रवास करून दिला नेत्रसुख दिले या सुखाची किमत मोजण्यासाठी जणू एक भयानक वैतागाचा दिवस आणि रात्र आमच्या सुखाचा नाश करण्यासाठी विकट हसत उभी होती । विमानतळावर बराच काळ घोळ चालला. आमच्याजवळ एक–एक व्हिसा प्रागसाठी होता कस्टमला वाटते दुसरा व्हिसा हवा होता याशिवाय तेथे कुणीच गाईड आला नव्हता दुभाष्या नसल्यामुळे सक्सेनांचे काहीच जमेना त्याने आम्हाला बराच काळ वेगवेगळया कागदांसाठी रांगा लावण्यामधे रखडविले पाय तुटून आले दुपार चढत होती वैताग वाढत होता

महिला ग्रुपचे म्हणणे पडले, प्राग हे काचेच्या कटवर्कसाठी जगप्रसिद्ध आहे तर येथील शोकेसेस्मधून पाहूया खरेदीसाठी नव्हे पण येथील कलावैशिष्टय पहावे म्हणून मीही वरच्या शोरूममधे बघत राहिले या सर्वच देशातील दुकानाचे वैशिष्टय असे की, त्याच्या काचेआड त्या दुकानात मिळणाऱ्या मालापैकी दर एक तऱ्हेची फक्त एकेकच वस्तू ठेवतात बाकी सर्व वस्तू बंद कपाटात असतात तुम्ही वस्तू व त्या खालचे किमतीचे लेबल पाहून जे पसंत कराल तशीच हुबेहुब वस्तू आतून आणून बांधून देतात ढिगावारी नमुने बघणे नाही त्यामुळे विक्रेत्याचा वेळ व कटकट वाचते

येथे कटवर्क हे फार नाजूक व नक्षीदार होते खरेच त्याच्या किमती येथील लोकांच्या पगाराच्या मानाने फार नव्हत्या. परंतु आम्हाला सवय प्रत्येक ठिकाणी त्या रुपयांमधे ताडून पहाण्याची त्यामुळे डिशेश, बाऊल्स याच्या किमती फारच वाटल्या येथे कटवर्कची पुष्पपात्रे दागिन्याइतकी महाग होती. अॅश ट्रेचे अनेक सुंदर नमुने होते किमती मात्र त्या किमतीत चांदीचे भांडे येईल इतक्या अखेर चांदी, सोने शाश्वत । ही महागडी काचेची वस्तू जाईपर्यंत न फुटता टिकली तर उपयोग मद्यपात्रे, अॅश-ट्रे, बाऊल्स, डिशेश व सेंट-स्प्रे याची किमत अनुक्रमे रुपयांत २००, ५००, ६००, ३०० होती

तेव्हा हे प्रख्यात कटवर्क कलात्मक दृष्टीने पाहिले फक्त इथे नेकलेसेस् होते प्रागमधले प्रख्यात खडे ग्रॅनाइट याचेही नेकलेस पाहिले ते असुली रंगाचे असतात हे सर्व नेकलेसेस् फार बारीक होते मधले जडावाचे पदक सुंदर असे परंतु कडेची खड्याची

माळ फार बारीक होती तो खडा साखरेच्या दाण्याएवढा जेमतेम होता एवढी बारीक माळ गळ्यात दिसतसुद्धा नाही प्रागच्या प्रसिद्ध अमसुली रत्नाप्रमाणेच हिरव्या खड्यांच्याही माळा होत्याच एकूण उघड्या फ्रॉकवरच या माळा शोभणाऱ्या आमच्या पदराच्या गोंधळात त्या बुडायच्याच तन्मणी, लफ्फे असे ठसेठशीत नग बरे म्हणायचे !

प्रागच्या कटवर्कच्या वस्तू व हे नेकलेस काही जणींनी खरेदी करायचे ठरवले साथीच्या रोगाप्रमाणे उरलेल्याही घेण्याचा विचार करू लागल्या सौ व्होरा आपले पति श्री प्राणलालजी यांना आपण कटवर्कचे नमुने नेणार असे म्हणाल्या

'अग, आपल्याला अजून तीन देशात ग्रुपबरोबर फिरायचेय नंतर आपण दोघे लंडनला जाऊन रहाणार येताना उरलेला युरोप पहाणार एवढ्या व्यापामध्ये तुझ्या सर्व खरेद्या कशा साभाळाव्यात ? ओझे केवढे होईल ?'

धैर्यबालाबाई म्हणाल्या,

'हूं गलामा पेहरीने जाइस '

त्यावर व्होराजी म्हणाले,

'बाडगे आणि बशा गळ्यात घालून नेणार काय ? '

आम्ही असा इकडे तिकडे वेळ काढला पण आता कटाळा आला होता. पोटात कावळे ओरडत होते आणि सक्सेनांचे अजून काहीच जमले नव्हते फोन चालू होते बऱ्याच वेळाने कुणीतरी एक गाईड उगवली तिने सांगितले,

' एवढ्या मोठ्या ग्रुपसाठी प्रागमधे हॉटेल आज उपलब्ध नाही '

त्यावर बरीच वादावादी झाली कारण आमचा प्रवास आणि वेळ फुकट चालला होता युरोपमधे एकेक तास रहाण्याची किंमत शे-पन्नास रुपये असते स्पुटनिक संस्थेने आधी ठरवल्याप्रमाणे हॉटेल्स बुक का केली नाहीत ? निघताना एक दिवस वाया गेला होता आता आजचाही दिवस फुकट चालला होता अखेर बसमधून एका भुयारी स्टेशनाशी आम्हाला उतरवले इथे खूप अंतरापर्यंत बॅगा वहाव्या लागल्या नंतर भुयारी स्टेशनचा जिना आला सामानासकट जिन्याच्या पहिल्या पायरीवर मी उभी राहिले मास्कोला आमच्या ग्रुपमधले बरेचजण ही मेट्रो बघण्यासाठी एक रात्र फिरले होते, पायीच मला माहित होते की, मेट्रोतून प्रवास होणार आहे. या विचारात जिना खाली सरकत होता. एकदम नजर गेली अरे बापरे ! खाली काही दिसत नव्हते ! कुठेतरी पाताळात निघावे तसा अंधारात जिना जात होता क्षणभर पाय लटपटले. मग मात्र जिन्यावर पकड घट्ट केली आणि सामानाच्या लटांबरासह सुखरूप जमिनीवर गेले मग कळले की, इथे भुयारी रेल्वे एकदम दोन मजले खाली होती खालच्या रेल्वेला तो जिना थेट गेला होता त्यामुळे खोल वाटले

तेथे क्लोकरूममधे सामान ठेवून त्या भुयारी रेल्वेने दोन स्टेशने गेलो नतर ट्रामने शहरातल्या एका जुनाट गर्दीच्या भागात उतरलो आपल्या फोर्टमधील गल्ल्यासारख्या गल्ल्या व कळकट पिवळ्या इमारती इथे होत्या रस्ते दगडी फरशीचे होते. तेथे एका हॉटेलमधे आम्हाला लच घेण्यास सागितले यावेळेला दुपारचे चार वाजले होते जेवणाची वेळ टळून अत्यत चिडकी अवस्था झाली होती अशा वेळेला या भिकार हॉटेलात जे पहिले सूप आले त्याचा चमचा उचलताच शेजारची कल्पना म्हणाली,

'हे मटण सूप आहे ' मी चमचा टाकला व तिनेही त्या वेळी नवरात्र चालू असल्याने नॉनव्हेजमधले लोकही व्हेज खात होते कारण नॉनव्हेजमधे गोमांस असेल म्हणून शिवाय पुरुषांमधेसुद्धा नवरात्राचा उपास पुष्कळानी पाळला शेवटी आमच्या भुकेलेल्या पोटातील कावळ्यांना सकाळचे शिळे झालेले पाव आणि चीज एवढेच मिळाले. रात्रीसाठी डिनर पाकीटे बाधून मागितली होती ती उघडून पहाता त्यात दोन पावाच्या तुकड्यांमधे एक गोल मासाची चकती आणि अंडी एवढे होते हे डिनर पाकीट पाहून माझे डोकेच फिरले आमच्यातील निम्म्या मडळींनी ही पाकीटे तिथेच टाकली चरफडत बाहेर आलो तेथे फोनवर कार्यक्रम बदलत असल्याचे कळले

प्रवासामधे अनपेक्षित बदल आणि सकटे ही येणार असे धरून चालावे लागते. आपण स्वत खाजगी फिरतो तेव्हा अडचणीला खेळकरपणे तोड देतो पण इथे सर्व सुख-सोई गृहीत धरल्यानतर मग असे अडथळे आले की वैताग येतो

सक्सेनाचा पार्टनर आहुजा हा म्हणे सीरियस होता त्यामुळे आणि आमचा ग्रुप मोठा असल्याने आमची प्रागमधे राहायची सोय होत नव्हती त्याने सकाळी केलेल्या टेलेक्सचे उत्तर आले होते आम्हाला वार्साला असेच निघायचे होते

हा मात्र कहर झाला !

काल रात्री लेनिनग्राडहून निघाल्यापासून अजून स्नान तर राहोच पण निदान चूळ भरायला पाणीही मिळाले नव्हते अग आखडून गेले होते सबध दिवस उभ्याउभ्याने ताट-कळून चालला होता हॉटेलबाहेर आल्यावर जेव्हा सक्सेना म्हणाला की, ' आता आपण चालत रेल्वेपर्यंत जाऊ या ' तेव्हा मला मटकन् खाली बसावेसे वाटले आधीच बारा दिवसाच्या प्रवासाने पाय सुजले होते बूट तर चावत होते रोज रात्री झोपल्यानतर थडीने पाय सुजून येत आणि बूट आखडून कडक होत सकाळी पहावे तर पाय मोठे बूट लहान ! पुढे मग कोणीतरी युक्ती सुचवली रात्री झोपताना बुटाच्या चामड्याला तेल लावायचे व ते हीटरजवळ ठेवायचे पायानाही तेल लावायचे आणि ब्लँकेटमधे ते गुरफटून झोपायचे यामुळे पाय सुजत नाहीत आणि बूटही कडक न झाल्यामुळे चावत नाहीत युरोपला जाणाऱ्यांनी ही युक्ती लक्षात ठेवून व्हॅसलिन किंवा खोबरेल बरोबर न्यायला हवे

सांगायचे तात्पर्य, त्या कळकट इमारतींमधून दगडी फरशीवरून चालण्यास माझा मुळीच पाय उचलेना माझ्याप्रमाणे आणखी एक दोघाना चालण्याचा त्रास होत होता. सक्सेनानी आम्हाला टॅक्सीचे पैसे देऊन ठेवले तर टॅक्सीच थांबेना. एका ठिकाणी रस्त्यात मी टॅक्सीला हात करीत फुटपाथवरून जरा सरकले तोच माझ्या जवळून ट्राम जाऊ लागली कडेच्या पोलिसाने मला मागे खेचले हा रस्ता अगदी अरुंद आणि कडेला पत्र्याचे कंपाउंड होते पत्रा आणि ट्राम याच्यामधे मी अंग चोरून जीव मुठीत धरून उभी होते ट्राम गेल्यावर मी पोलीसाशी हस्तांदोलन करून थॅंक्यू म्हटले अगदी निःशंकपणे ! कारण इकडे स्त्रीपोलीस पाहिले होते आणि ही पोलीस स्त्रीच असावी असे वाटत होते पण निरखल्यानंतर हा पुरुषच दिसला हे पुरुषही गुलाबी गोरे यांचेही ओठ लाल डोळे निळे उंची तर बायकांनाही असते आणि दाढी–मिशा खूप उशीरा येतात किंवा त्या सोनेरी असतात तर हा पोलीस कोवळा तरुण असल्यामुळे मला मुलगीच वाटला हृया वेळेपर्यंत आमच्या बरोबरीचे लोक दूर गेले होते तेव्हा कपाळाला हात लावून मीही त्यांच्या पाठो-पाठ निघाले

गाडी रात्री निघणार होती त्यामुळे घाई नव्हती वाटेत एक बाग लागली तेथे सारे थांबले होते म्हणून निदान मी त्याना गाठू शकले. सक्सेनाला कोणीतरी तानियाच्या चॉकलेटस्‌ची आठवण केली मग त्याने ती वाटली मी भुकेल्या पोटामधे चॉकलेट तरी घालणार होते तेवढ्यात बागेमधे बऱ्याच छोट्या छोट्या मुली व मुलगे खेळताना दिसले मी लगबगीने तिकडे गेले त्या मुलाच्यात मिस-ळून त्यांना चॉकलेटस्‌ दिली. मुलींनी छोट्या बाबागाड्या आणल्या होत्या त्यात त्यांच्या बाहुल्या होत्या काही मुली बाहुल्यांशी खेळत होत्या एका म्हातारीला इंग्लिश येत होते मी तिच्याशी लगेच गट्टी केली म्हातारीचा मुलगा कॅनडात असतो म्हणून तिला इंग्लिश येत होते म्हातारीचा एक मुलगा व सून प्रागला नोकरीला जात त्याची मुले घेऊन आजीबाई सध्याकाळी पार्कमधे आल्या होत्या तिच्या नाती चॉकलेट घेत नव्हत्या पण आजीने सांगितल्यावर त्यानी घेतली मी त्यांच्या बाहुल्यांना कुंकवाच्या टिकल्या लावल्या तेव्हा त्या खुशीने हसल्या व चॉकलेट खाऊन त्यानी आभार मानले मी त्या वृद्धेला म्हटले,

'आजीबाई, इथले जीवन सुखी आहे की कॅनडाचे ?'

ती म्हणाली,

'तिकडल्या समृद्धीची इथे काय तुलना करावी ? तिथे दर घरी दोन गाड्या आहेत इथे एक मिळतानासुद्धा मारामार ! माझा दुसरा मुलगाही कॅनडालाच गेला इथे फक्त एक आहे '

मी म्हटले, 'युरोपमधे गाडी नसताना विचित्र वाटते खरे. कारण बाकीचा युरोप,

अमेरिका फार समृद्ध आहे पण साम्यवादी जगात जास्त बरे वाटते का ?'

ती म्हणाली,

'साम्यवाद आमच्यावर लादला आहे सान्याचे वाटप असते हवी तेवढी वस्तू मिळत नाही वाटेल ती वस्तू हवी असेल तर ती बाजारात येत नाही अखेर समता म्हणजे आवड–निवड नव्हे इथे मास, लोणी, दूध फार महाग आहे तत्त्वज्ञान ठीक आहे. पण सवय झाली नाही '

तिथून आम्ही भुयारी रेल्वेतून क्लोकरूममधे गेलो ऐनवेळेला ट्रेनचे जे डबे मिळाले त्यातून शिरलो रात्रीचे जेवण म्हणजे थडा फराळच होता शिवाय निर्जळी एकादशीपण घडली कारण या गाडीत कॅफेटेरिया नव्हता त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेण्याचीही सोय नव्हती मासाचे तुकडे असल्यामुळे डिनर पॅकेटस् हॉटेलातून निघतानाच आम्ही भिरकावून दिली पण एकेक पाण्याची बाटली घ्यायला हवी होती कारण ती स्वस्त असते विशेष म्हणजे या गाडीमधे पाण्याचे बेसिनसुद्धा कुठेही नव्हते त्यामुळे मी तर भलतीच चिडून गेले त्या रात्री मुठभर चिवडा खाऊन झोप काही येईना शिवाय हा डबा स्लिपरचा नव्हता त्यामुळे एका डब्यात आठ माणसे कोंबली होती रात्रीची वेळ, ताटकळून शरीर आंबून गेले होते ताठ झालेली हाडे व पाठीचा ठणका यामुळे माझे तोंड दुर्मुखलेले दिसत असावे आमच्या डब्यात एक सौंदर्यप्रेमी मेंबर होते त्यांनी दोन दिवसा-पूर्वी म्हटले होते, 'या ग्रुपमधे कोणीही सुदर तरुण व्यक्ति नाही ' मला त्याच्या उद्-गाराचे भलतेच आश्चर्य वाटले

ग्रूप निवडताना त्यातील पुरुषांच्या नेत्रसुखासाठी काय एखादी सुंदर तरुणी घ्यावी काय ? तसे होते तर या सौंदर्यप्रेमींनी स्वत तशी मेंबर हुडकून आणायची

आणि सौंदर्यदृष्टीच म्हणाल तर सृष्टीसौंदर्य इकडे अमाप होते शिवाय इकडे गोऱ्या गुलाबी सुदर स्त्रिया सगळीकडेच दिसत होत्या बघणाऱ्याने त्यात खूष व्हायला हरकत नव्हती

पण एकदरीत या उद्गारामागील वृत्ती मला मुळीच रुचली नाही.

हे गृहस्थ आमच्या डब्यात होते मी तोंडाने जांभई देत, कंटाळून व ठणक्यानेही 'आई ग, नको हा प्रवास !' असे म्हटले त्यावर ते भलतेच उखडले आणि म्हणाले,

'तुमच्याहून दहा–पधरा–वीस वर्षांनी मोठे असलेले वृद्ध लोक या ट्रीपमधे आहेत हेवी ब्लडप्रेशर असलेले आणि हार्ट अॅटॅक येऊन गेलेलेही लोक आहेत आणि तुम्ही किती चिडचिड करता ? ते किती शात आहेत पाहा '

ग्रुप असला तरी आम्ही सर्व व्यक्तिगत जबाबदारीवर आलो होतो इथे कोणी-कोणाचे बॉस नव्हते की मास्तर नव्हते मला तर कुणी उपदेश केलेला कधीच खपत नाही. आणि सल्ला न मागता उपदेश करणाऱ्यांचा मला नेहमीच राग येतो मी या सबध ट्रिप-

मधे कुणालाही अक्कल शिकवण्याचा कधीही प्रयत्न केला नाही परतु इतर मात्र जमेल तेव्हा टोमणे आणि उपदेश कुणालाही करीत होते

त्या गृहस्थाना मी उलट उत्तर केले नाही कारण त्यांना हेवी ब्लडप्रेशर होते आणि हार्टअॅटॅकही येऊन गेला होता असे ऐकले होते म्हणून मी विवेक केला कारण याच गृहस्थानी त्यांना ओझे उचलण्यास डॉक्टराची बंदी असतानाही एक दोनदा माझी बॅग चटकन बसमध्ये चढवली होती शिवाय असाच आणखी एकदा चागुलपणा दाखविला होता तेव्हा तोंडातून उणेअधिक जाऊ नये म्हणून मी डब्यातून उठले आणि इतर कंपार्टमेंटस् बघून आले तर पलीकडे एक कंपार्टमेंट साफ रिकामे होते मी माझी आंबलेल्या देहाची मोळी त्या बाकावर ऐसपैस पसरली दरवाजा आणि कडेच्या बाजू यावरले पडदे ओढले आणि कडी लावली झोप येणार नव्हतीच पण डोक्याला शांती होती

परतु हे सुख फार वेळ लाभणार नव्हते कारण थोडयाच वेळात झेक पोलीस सरहद्द आली कस्टम पोलीसांची माणसे आली व्हिसा पाहणारी पोलीस बाई निघून गेली होती. मी जेमतेम कस्टम फॉर्म भरला व्हिसावर पोलडच्या पोलिसाने शिक्का मारला फारसे बिघडले नाही पण एवढयाने आमच्या नशिबाचे हाल टळले नव्हते

आम्ही या गाडीत चढलो ते शेवटच्या डब्यामधे तेथे कळले की, ही झेक गाडी पोलंडच्या एका जंक्शनला थांबते तिचे पुढले दोनच डबे वार्साच्या गाडीला तेथून जोडणार आहेत त्या जंक्शनवर गाडी थोडा वेळच थांबते तेवढ्या वेळामधे सुटसुटीत सामान असणारा एखादा माणूस डबा बदलू शकेल परतु मात्र मोठी ओझी असणारे आम्ही अठ्ठेचाळीस जण गाडीच्या शेपटातून उतरून तोंडाकडे जाऊन बसणे पाच मिनिटात शक्य होणार नाही तेव्हा जंक्शन येण्यास अर्धा तास राहिला असताना चालत्या गाडीतून शेपटाकडून तोंडाकडे कॉरिडॉरमधून हे अतर काटावे पुण्याचे श्री देशपांडे यानी ही सूचना केली आणि ती योग्य होती पण प्रत्यक्ष मात्र नको हा दगदगीचा प्रवास असे वाटू लागले ! हलत्या गाडीच्या कॉरिडॉरमधून सर्व ओझ्यासह दहा डबे ओलांडणे म्हणजे केवढी हैराणी! पुन्हा डब्याचे सांधे हलते. त्यावरून बॅगेसह जाणे म्हणजे कसरतच. अठ्ठेचाळीस जणाची रांग रेशनच्या रांगेप्रमाणे हळूहळू सरकत होती त्यातच कुणी एखादा दोन दोन व्ही. आय पी बॅगा घेऊन आलेला तो एक बॅग पुढे सरकवीत नेई आणि मग धावत उलटा जाऊन पुन्हा दुसरी बॅग आणी त्या मानाने माझे सामान बेताचे होते जेमतेम वेळेवर आमची रांग सरकत पुढच्या डब्यात आली एकदाची तोवर मला ब्रह्मांड आठवल होते माझ्यापुढे नेमके ते सौंदर्यप्रेमी गृहस्थ होते पुढच्या व मागच्या गृहस्थाच्या बॅगामधून मला दुसरा पाय टेकायला जागा मिळत नव्हती म्हणून मी त्यांना म्हटले,

'किंचित पुढे बॅग घेता का ?'

ते गृहस्थ आधीच घामाघूम झाले होते त्यांनी कपाळावर हात मारून म्हटले,

'माझे आई, आता आणखी कुठे जाऊ ?'

ते लालबुंद होऊन थरथर कापत होते त्यामुळे त्यांचे ब्लडप्रेशर भलतेच वाढले असावे असे वाटून मी एका पायावर उभे रहाता येत नसूनही राहिले

वार्साच्या गाडीला आमचे डबे जोडल्यावर बसता आले पण झोप मात्र मिळाली नाही सकाळी आमच्या डब्यात एक पोलिश कुटुंब शिरले प्रौढ पति, पत्नी आणि तरुण मुलगा–मुलगी त्या पोलिश गृहस्थाला जर्मन व इंग्लिश येत होते अर्थात त्यात नवल नाही कारण तिकडचे देश म्हणजे आपल्याकडील एकेका प्रांताएवढे असतात आपल्याला ज्याप्रमाणे हिंदी, गुजराथी, बंगाली थोडे समजते तसे युरोपियन लोकाना फ्रेंच, जर्मन, इंग्लिश या भाषा साधारण येतात

भल्या सकाळी चूळ भरायला पाणीही नाही छत्तीस तासांची प्रवासाची दगदग यामुळे मला गलिच्छ वाटत होते मी डोके मागे टेकून 'आई ग ! कधी संपणार हा प्रवास !' असे म्हटले

त्यावर ते सौंदर्यप्रेमी गृहस्थ खूपच उखडले ते म्हणाले,

'कृपा करून पुन्हा आई ग म्हणू नका ' आणि त्यांनी एक व्याख्यानच दिले त्या अमक्या कशा फ्रेश दिसतात, ते तमके कसे हसून खेळून प्रवासाचा आनंद लुटतात, त्या तमक्या वेणी–फणी करून कशा तयार झाल्या वगैरे ते ऐकवू लागले मला मात्र भरपूर साबू व पाणी मिळाल्याशिवाय चेहरा प्रसन्न करणे कठीण वाटले अरे, काय आहे काय ? पारोशा तोंडाने आपण बोलतसुद्धा नाही म्हणून मी चेहरा प्रसन्न वगैरे न करता केसांना कंगवासुद्धा न लावता तशाच अवतारात वार्सामध्ये जाण्याचे ठरवले फार तर केसाला रुमाल बांधला म्हणजे झाले

मी त्या पोलिश प्रौढाशी त्याच्या देशाबद्दल बोलत राहिले. त्याने सांगितले की; 'युद्धामध्ये आमचा देश संपूर्ण नाश पावला होता नाझी सैन्याने प्रचंड बाँबवृष्टी करून आमची गावे सपाट केली वार्सा शहर म्हणजे नुसता राखेचा उकिरडा बनले होते ही सर्व गावे पुन्हा आमच्या जनतेने व सरकारने उभी केली अतिशय कष्ट आणि त्याग आमच्या देशाने केला ' मी विचारले,

'ही भोवती जी छोटी मोठी गावे दिसत आहेत त्यात मोटारी कितपत आहेत ?'

त्याने सांगितले,

'दर दहा–बारा घरात एखादी मोटार असते अजून हा देश गरीब आहे

मी त्याच्याशी थोडे जर्मनही बोलले. त्याची त्या सौंदर्यप्रेमी गृहस्थांनी 'कुलकर्ण्यांच्या क्लासमधले मराठी वर्तीचे जर्मन ज्ञान अशी टिंगल केली. मी लक्षच दिले नाही

त्या पोलिश बाईची मुलगी अगदी गोड होती तिने केसाचा जाड शेपटा घातला

होता मी त्या माय–लेकींना कुंकवाच्या टिकल्या लावल्या त्यामुळे त्या आणखीच सुंदर दिसू लागल्या

वार्सा स्टेशनमधे गाडी शिरली वार्सा स्टेशन हे युद्धानंतर पुन्हा बांधलेले आहे हे संपूर्ण थ्रू लाईन स्टेशन भुयारी आहे युरोपमधले हे एक नंबरचे मोठे भुयारी स्टेशन आहे नवे कोरे व आकर्षक आहे. दोन सरकते जिने चढून बसपाशी आलो. बसने वार्साच्या मध्यभागी असलेल्या हॉटेल एम् डी एम् मधे आलो हे हॉटेल फार सुंदर आहे येथे माणशी एक खोली मिळाली प्रथम मनसोक्त आंघोळ केली तेव्हा जरा शीण कमी झाला नंतर ब्रेकफास्ट घेऊन भरपूर विश्रांती घेतली दुपारच्या जेवणानंतर इंडो-पोलिस फ्रेंडशिप् सोसायटी येथे भेट देण्यासाठी निघालो या गावातील ऑफिसांचा भाग हा अनेक मजली इमारतींनी भरलेला आहे तथापि वस्तीचा भाग अजूनही काही ठिकाणी अपार्टमेंटस् व काही ठिकाणी जुनी चिमुकली घरे यांनी भरला आहे पोलंडमधून येताना-सुद्धा सकाळी अशा छोटया घराचीच गावे लागली युरोपची ही वैशिष्टयपूर्ण मांडणी दिसते ही चिमुकली घरे आहेत तोपर्यंत युरोपचे सौंदर्य उणे पडणार नाही

पोलंड हा राखेतून पुन्हा जिवंत झालेल्या फिनिक्स पक्षाप्रमाणे पुनर्वसन करीत आहे हे पुनर्वसन अजूनही चालूच आहे रस्त्यांच्या कडेला बांधकामे दिसतात या शहरातून फिरताना स्त्री-पोलिस भरपूर दिसले चक्क पोनीटेलवर हॅटस् घातल्या होत्या रशियाच्या मानाने वार्सामधे मोटारकार्स बऱ्याच दिसल्या या छोटया व चपटया असतात यांना माऊसवॅगन म्हणतात यांचा आकार खरोखर उंदराप्रमाणे असतो शेपूट नसते एवढेच या गाडया छोटया आणि अल्प किंमतीच्या आहेत त्यामुळे पुष्कळांना परवडत असाव्यात आमच्याकडे अशीच अल्प आणि स्वस्त गाडी करण्याचे प्रचंड नगारे वाजले पण तो शेपटी-वाला मारुती कधी बनलाच नाही नाहीतर आमच्या देशातले गरीब स्कूटरच्या किंमतीची ही गाडी घेण्यासाठी मनोराज्ये रचत होते ही माऊसवॅगन मात्र आपल्यालाही परवडेल तिची किंमत हजार बाराशे डॉलर्सच आहे जुनी गाडी तर तीन–चारशे डॉलर्सना मिळते

अरे, अरे ! एवढे तंत्रज्ञान आमच्या देशात कधी समृद्ध होईल ?

फ्रेंडशिप सोसायटीत जाताना पॅलेस ऑफ कल्चरल सायन्स आणि पॅलेस म्युझिअम या जुन्या राजवाडयातील संस्था दिसल्या त्याच्याजवळच एक पडकी इमारत होती तिच्या दोन भिंती जळक्या होत्या आगीचे डाग दिसत होते चुन्यामातीचे ढिगारे होते रशिया सोडून आम्ही पाहिलेल्या प्रत्येक गावात नाझींनी केलेल्या विध्वंसाच्या खुणा अशा दिसत होत्या. पोलिस फ्रेंडशिप् सोसायटीमधे तेथील लोकांनी आमचे फार प्रेमाने स्वागत केले तेथे एक शोकेस होती व त्यात भारतीय कलेच्या वस्तू होत्या सोलापूरच्या श्री दिकोंडांनी त्यात चंदनाचा हत्ती व हार यांची भर घातली मिस्टर गुस्ताव हे अध्यक्ष

होते त्यांनी संस्थेचे कार्य समजावून दिले ही संस्था १९५७ मधे स्थापन झाली. ऑस्कर लँडर हे पहिले अध्यक्ष होते इथे भारताची माहिती देणारी पुस्तके आहेत तसेच भारतीय नृत्य व संगीत येथे शिकवतात आपला प्रजासत्ताकदिन ते साजरा करतात दर बुधवार गुरुवार तिथे सभा भरते त्यात राजदूत व राजकारणी येतात इथे इंदिरा गांधी व मोरारजी देसाई यांनीही भेट दिली आहे येथील सभासदाना स्लाइडस् दाखवून भारताची माहिती देतात हा कार्यक्रम फार मनमोकळा झाला निघण्यापूर्वी आम्हाला मोठा मोठा ग्लास भरून बिनदुधाची का होईना पण गरम कॉफी मिळाली कॉफी देणाऱ्या प्रौढांना मी ती आवडल्याचे सांगितले त्यांनी अतिशय प्रेमाने आणखी एक ग्लास बळेबळे पाजली ही इष्टापत्तीच ठरली येथे भिंतीवर मोझॅक पद्धतीने भारताचा नकाशा केला होता व शोकेसमधे बाहेरच्या अंगाला महात्मा गांधींचा पुतळा होता या देशात २०० भारतीय रहातात त्यात १५ विद्यार्थी आहेत येथील युनिव्हर्सिटीत हिंदी शिकवतात या फ्रेंडशिप सोसायटीत हिंदी व इंग्रजी शिकलेले सभासद आहेत इथे फार प्रसन्न वाटले पोलिश लोक आपल्यासारखे मनमोकळे वाटले पोटभर हसणारे, बोलणारे अन् थोडे भाबडेही आमचा दौरा परतल्यानंतर दोनच महिन्यांनी नाताळ आला त्यावेळी फ्रेंडशिप सोसायटीचे मला एक सुंदर भेटकार्ड आले मीही त्याना पाठवले मी त्यांच्याशी लेखिकेच्या जिज्ञासेतून बरीच बातचीत केली होती माझे कार्ड दिले होते त्याची त्यांनी आठवण ठेवली

दिसायलाही पोलिश लोक नाजुक आणि हळवे वाटतात आमचा येथील गाईड मार्क हा प्रथम मला मुलगीच वाटला कारण त्याचे गाल गुळगुळीत, गोरे आणि केस लाबसडक सोनेरी होते आमच्यामागे तो फोटोत आहे तर येथील सर्वांना ती मुलगीच वाटली

तेथून निघाल्यावर एक मोठे थिएटर पाहिले शहराच्या मधोमध दाट वृक्षराजीचे छान उपवन होते रस्ते आठ ट्रॅक्सचे होते १५ फूट रुंद फूटपाथ होता ट्राम्स खूपच वेगवान होत्या त्यातून कामावरून परतलेली माणसे भराभर उतरत होती भग्न झालेल्या वास्तूतून रेखीव आरोग्यपूर्ण वास्तू उभे राहिलेले दिसले आमच्या एम. डी एम हॉटेलजवळ दहा मजली मेट्रो पॉलिटन हॉटेल होते त्यात एअर इंडियाचे ऑफिस होते. शेजारी एक गगनचुंबी इमारत होती.

परत येताना मार्कने आम्हाला शॉपिंगसाठी सोडले. इथे काहीच मिळणार नाही अशा कल्पनेने मी फक्त पाच डॉलर्स मोडले अन् तसे विशेष काही मला तरी मिळाले नाही त्या रात्री भोजन चालू असताना आर्केस्ट्रॉ चालू होता काही जोडपी नृत्य करीत होती एक प्रौढ जोडपे आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी आले होते कडेचा एक पार्टीशनचा कोपरा घेऊन आपल्या नातलगासह पार्टी दिली होती प्रथम नातलगांनी त्या दोघांच्या डोक्यावरून एक बाटली चेहऱ्याकडून पाठीकडे नेली व खाली फेकून

दिली बाटली फुटली याचा अर्थ एक वर्ष संपले वाढदिवस असलेले जोडपे नाचत होते त्या शुभ दिवशीपण त्या पत्नीने काळा गाऊन घातला होता हे मला मात्र विचित्र वाटले नाईट पार्टीला काळ्या रंगाचे पोशाख घालतात हे माहीत होते परंतु शुभ दिवशी त्यांनाही काळा रंग चालत नसतो त्या रात्री मी इतकी सपाटून झोपले की, सकाळी ब्रेकफास्टला निघालेल्या मैत्रिणींनी किती वेळ ठोठावले तरी मी जागी होईना शकुंतलाबाईंना वाटले की, कालच्या प्रवासाच्या हालामुळे माझे पाय आखडले असतील व मला उठवत नसेल किंवा न जाणो झोपेत माझा हार्टफेल झाला असेल मला मात्र अतिश्रमाने फारच झोप लागली होती मग मी घाईघाईने त्याच्या पाठोपाठ पळाले सकाळी बसेस शहर पाहायला निघाल्या बागांतून झिनिया, डेझी व आपण भरतकामात काढतो तशी नखरेदार पाकळ्याची सुंदर फुले ताटव्यांतून उमलली होती येथे भाजीमार्केटात फुलांचे मोठे गाळे असतात भाजीबरोबर बायका अगत्याने फुले घेतात

२९ सप्टेंबरच्या या सकाळी आम्ही प्रथम अमरज्योत पाहिली तिथे अनेकांनी पुष्पगुच्छ पाहिले होते फार थोडी पुष्पचक्रे होती आमच्या इथे गांधी नेहरूंच्या समाधीला पाश्चात्य पद्धतीने पुष्पचक्रे राहाण्याची काय गरज आहे ? ती वाहू नयेत असे मला नेहमी वाटते आपल्या देशातील पद्धतीप्रमाणे मृताला किंवा स्मारकाला फुले, हार, गुच्छ वहाण्यास काय हरकत आहे ? आपल्या देशाच्या पद्धतीप्रमाणे आपण वंदन करावे

वार्सोच्या अमरज्योतीनी १९४० मध्ये वॉर्सा हरल्यानंतर कत्तल झालेल्या पोलिश लोकांची आठवण झाली युद्धकाळात परतंत्र पोलंडने बंड केले तेव्हा हिटलरने नळ फोडले, घरे सपाट केली माणसांना मशिनगनने मारले व पेट्रोल ओतून माणसे व घरे जाळून टाकली हा देश आताशी मान वर करत आहे

पोलंडमधे सात जिल्हे आहेत वार्सामधे मंत्र्यांची घरे असलेल्या रस्त्याने गेलो. या इमारती साध्या चुन्याने रंगवलेल्या आहेत मात्र वास्तुकाम जुने होते तसेच परत बांधले आहे राष्ट्रपतींचे निवासस्थान बेल्वेडोर पॅलेस या जुन्या वाड्यामधे आहे. हा मूळ १७ व्या शतकात बांधला होता नंतर ग्रीक रोमन पद्धतीने सजविला गेला याचीही राखच व्हायची पण दुसऱ्या महायुद्धात प्रथम पोलंड जिंकल्यावर पुढल्या मोहिमेसाठी नाझींचे येथेच लष्करी ठाणे होते नाझी ऑफिसर हेन्री यावोयन्स्की येथे रहात असे, म्हणून हा वाडा वाचला. तसा वाडा साधा आहे पण भोवताली सुरेख जांभळी पिवळी फुले आहेत गुंजेसारख्या फळाची झुडपे भोवती आहेत येथे खूप टूरिस्ट जमले होते आम्ही बायका टूरिस्ट बायांशी मिसळलो युरोपच्या ह्या प्रांतातून रस्त्याने दारू पिऊन लोळणारा, बडबड करणारा, गोंधळ घालणारा किंवा स्त्रियांची छेड काढणारा असा कुणीही पुरुष दिसला नाही त्यापलीकडे एक सुंदर पुतळा एका उद्यानामधे होता भोवताली एक सुरेख तळे

होते त्याच्या भोवती लाल गुलाबाचे असंख्य मोहक ताटवे होते ह्या रम्य उद्यानातला हा पुतळा म्हणजे पोलंडमधील तरुणाचे प्रतीक होता हा फ्रेंच चित्रकार फ्रेडरिक शॉपेन या फ्रेंच चित्रकाराने तयार केला तो १८३० मध्ये तरुण वयातच वारला दुसऱ्या महायुद्धात नाझी सैनिकानी तो पुतळा सुरुंग लावून संपूर्ण तुकडे तुकडे करून नष्ट केला तरीपण युद्धानंतर पुनर्वसनाच्या वेळी पोलिश तरुणाचे प्रतीक असा हा पुतळा पुन्हा उभारण्याचे ठरले हे काम कोण व कसे करणार ? मूळ पुतळ्याचे फोटो होते ते बघून सॅवेरो दुनि-कास्की या शिल्पकाराने तो १९५८ मध्ये हुबेहुब परत बनविला पोलंडच्या माझोविया या भागातील सुप्रसिद्ध विलो झाड हे प्रसिद्ध आहे या विलो झाडाची फांदी वाकवून त्याखाली हा तरुण बेफिकीर ऐटीने बसला आहे वाऱ्याने उडणारी त्याची केसाची झुलपे कपाळावर रुळताना पाहून तो सजीव तरुणच वाटतो त्याच्या अंगात लखनवी झब्ब्यासारखा जो शर्ट आहे तोही वाऱ्याने उडतो आहे त्याची मान तारुण्यसुलभ आत्मविश्वासाने झुकली आहे. त्याच्या मुद्रेवर कोवळेपणा आहे पण त्या बरोबरच दृढनिश्चयसुद्धा आहे एका हाताने त्याने विलो वृक्षाची फांदी घट्ट पकडली आहे त्या पकडीवरून शिल्पकाराने त्याच्या शरीराचा कणखरपणा दाखविला आहे त्याचे स्नायूसुद्धा पिळदार दाखविले आहेत अन् हे सारे दगडामध्ये कोरलेले आहे त्या तरुणाच्या अंगावर उपरण्यासारखे एक वस्त्र आहे. (पूर्वी कोटाऐवजी युरोपियन लोक तलम शाली पांघरून थंडीपासून बचाव करीत तेव्हा शिलाईयंत्रे निघाली नव्हती त्यावेळी मूळ पुतळा घडविला गेला आहे यंत्राभावी शिवलेले कपडे कमी असत ) या वस्त्राच्या चुण्या आणि त्याचा उडता तलम पदर हासुद्धा दगडामधे दाखविणाऱ्या शिल्पकाराची कमाल आहे या उद्यानात खूपच टूरिस्ट बसले होते आम्हीही बसलो या उद्यानाच्या पाठीमागे भर शहरात खूप मोठे नैसर्गिक झाडीचे रान आहे

आमच्या मुंबईत प्रचंड प्रदूषण वाढलेय तरी अजून नवीन कारखाने निघत आहेत. झाडी मात्र सपाट्याने तुटतेय कुठे भरमसाट भाव आला की, सावलीपुरती असलेली झाडेसुद्धा तोडली जातात आणि तेथे उंच इमारती उभ्या रहातात वार्सानं मात्र उध्वस्त झालेल्या राया पुन्हा घनदाट केल्या झाडीशिवाय मनुष्याला गारवा नाही, पाखराना थारा नाही आणि शहराला शोभा नाही हे मात्र खरे

परतताना आम्हाला वेगवेगळ्या वकिलातींच्या डौलदार इमारती दिसल्या सोशा-लिस्ट जगाप्रमाणे इथेही अपार्टमेंट हाऊसेस ही सरकारी असतात ती पगाराच्या पाच टक्के भाड्यात मिळतात (हे काय थोडे झाले ? फर्निचरसकट सुसज्ज ब्लॉक पगाराच्या पाच टक्क्यामधे ! आमच्या इकडे एक ब्लॉक घेऊन त्यात फर्निचर भरताना जिंदगीची अर्धी कमाई संपते आणि त्यात रहायला लागेपर्यंत पेन्शनीची वेळ येते फर्निचरसह भाड्याने ब्लॉक घेतला तर जवळजवळ अर्धा पगार त्यातच जातो.) स्वतःच्या पगारातून बचत

करून एक हजार डॉलर्सना मालकीचा ब्लॉक किंवा चिमुकले घर घेता येते म्हणजे खूपच स्वस्त नव्हे का ?

संपूर्ण नष्ट झालेल्या देशात त्या मानाने हे बरेच आहे, नव्हे का ?

वार्सा युनिव्हर्सिटीची इमारत जुन्या पद्धतीने परत बांधलेली आहे ही १८६० मधे स्थापन झाली जवळच अनीतो ह्या पोलिश कवीचा पुतळा होता ह्या गावामधे वहाणारी नदी ही पोलंडची प्रमुख नदी आहे तिचे नाव विस्तुल हिच्याही काठी छानदार हिरवळी दाट झाडी व बोटिंग क्लब आहेत गावामधे नदीचे काठ बांधतात व गावाबाहेर मोकळे ठेवतात नदीकाठी १–२ सुंदर पुतळे आहेत त्यातील एक पुतळा ढाल तलवार घेतलेल्या रणदेवतेचा आहे तिचे पाय माशासारखे दाखविले आहेत याचा अर्थ ही रणदेवता म्हणजे आर्मी व नेव्ही यांची स्फूर्तीदेवता आहे प्राचीन काळी विमाने नव्हती तेव्हा युद्ध हे जमीन व पाणी यावर चालत असे युद्धाच्या तडाख्यातून एकच जुने चर्च वाचले आहे येथे धार्मिकता कमी झाल्यामुळे नवीन चर्चेस बांधण्याचा खटाटोप करीत नाहीत हे चर्च डॅनिश पद्धतीने बांधलेले आहे एका योध्याचा पुतळा पाहिला तो पोलंडच्या शेवटच्या राजाचा पुतण्या हा दुसऱ्या युद्धात अत्यंत शौर्य दाखवून लढला म्हणून त्याचा पुतळा आहे राजाचा पुतळा म्हणून नव्हे तथापि हिटलरने पोलंड जिंकल्यावर ह्या सेनापतीच्या पुतळ्याचे सुरुंग लावून तुकडे केले. युद्ध संपल्यानंतर पोलंडच्या मित्रराष्ट्राने–हॉलंडने–वर्गणी करून हा पुतळा पुन्हा घडविला व पोलंडला भेट दिला प्रिन्सेस रजिव्ही पॅलेस आणि काऊंट पोतोस्की पॅलेस असे दोन राजवाडे आहेत हे युद्धात भुईसपाट झाले होते, पण ते पुन्हा पूर्वीप्रमाणेच बांधले पहिल्यामधे गव्हर्नर रहातो व दुसऱ्यामधे आर्ट गॅलरी आहे

आता आम्ही वार्सामधील प्रख्यात कॅसल स्क्वेअरमधे आलो हा किल्ला म्हणजे भुईकोटच होता तो तर बराचसा पडलेलाच आहे काही तुकडे उरलेले आहेत मूळ पधराव्या शतकातील तटबंदीचे थोडेसे भग्न तुकडे उभे आहेत किल्ला अजून पुरता बांधून झाला नाही तेथील राजवाडा १७ व्या शतकातील होता तो स्पॅनिश पद्धतीचा होता. आता तो परत बांधताहेत तोही त्याच धर्तीने हा बाहेरून बांधून झाला आहे आतले काम व फर्निचर अजून व्हायचे आहे येथील कळसाला ४३ किलो सोने आहे येथेच सेंट जॉन कॅथीड्रल आणि मेट्रोपोलिटन चर्च आहे मूळ १७३० मधे बांधले होते युद्धानंतर १९५७ मधे ते परत बांधायला घेतले व पूर्वीप्रमाणेच बांधून पुरे केले येथील चर्चेस रोमन कॅथॉलिक आहेत आणि ती परत त्याच रोमन गॉथिक शैलीत बांधली आहेत चर्चमधे काचेच्या रंगीत तुकड्यांची मोझॅक चित्रे आहेत वितीएवढ्या तुकड्यापासून ते इंचभर लांबीच्या व पाव इंच रुंदीच्या तुकड्यापर्यंत असंख्य बारीक तुकडे साधून भिंतीएवढे मोठे चित्र केले जाते असंख्य रंगछटा, कपडे व नाक डोळ्यांपासूनचे सर्व अवयव या काचेच्या तुकड्यांतून

दाखविले जातात वार्सा, बर्लिन, ड्रेसडेन व प्राग येथे एकापेक्षा एक अधिक मोहक रंगछटांची आणि अधिक नाजुक बारीक काम केलेली अशी मोझॅक चित्रे मी या चर्चेसमधून व मठां-तून पाहिली ह्या चित्राना जोडकाम कसे करत असतील ? साधारण बारा फूट उंच व चार–पाच फूट रुंद अशी ही भव्य चित्रे असत मोझॅक चित्रे ही युरोपची खासियत । या चर्चमधेच ह्या राजघराण्यातल्या लोकाच्या समाधी आहेत दोन थडग्यांवर दोन लाल संगमरवराचे पुतळे आहेत हे दोघे भाऊ राजपुत्र होते ते ३३ व ३४ वर्षांचे असताना त्यांच्या सावत्र आईने त्याना विषप्रयोगाने मारले महायुद्धामधे हे पुतळे तळघरात लपवले होते म्हणूनच टिकले असे सागतात येथे तऱ्हेतऱ्हेचे मेणबत्ती स्टँड पाहिले एका सामान्य सैनिकाचा पुतळा होता हा मूळ किती तगडा होता ते दाखवणारा एक फोटो आहे आणि नाझींच्या कैदेत त्याचे हालहाल केल्यानतर तो किती कृश झाला ते पुतळ्यामधे दाखविले आहे त्याचा खगलेला चेहरा पाहून पोटात तुटले

चर्चमधील आल्टरच्या दोन बाजूला सुदर सोनेरी नक्षी होती तेथे १९१० मधे पोलंड व रशियातील युद्ध संपले तेव्हा उभारलेला स्तभ आहे. त्याच्यावर एक घटा असून त्यावर तीन गरुड कोरलेले आहेत गरुड हे पोलडच्या सैन्याचे चिन्ह आहे राजेशाही होती तेव्हा या गरुडाच्या डोक्यावर एक सोनेरी मुगूट असे आता समाजवादामधे गरुड बिन-मुगूटाचे असतात या चर्चमधे एक पोलिश क्लार्क आपल्या मुलासह आला होता त्याला जर्मन येत होते त्यामुळे थोडे बोलता आले तसा हा देश जर्मनीला लागूनच आहे आणि त्यांच्या अमलाखालीही होता त्यामुळे जर्मन बोलणारे बरेच भेटत त्याला मी डॉलर्सबद्दल काही विचारले तो म्हणाला, ' डॉलर्सना युरोपभर भाव आहे आमचे पोलडचे लोक युद्ध-काळात निर्वासित म्हणून अनेक देशांत गेले (आमच्याकडेही पोलडच्या निर्वासितांचे कॅम्प त्यावेळी होते ) त्यातील काही अमेरिकेत अजूनही नोकऱ्या करतात ते येथील नातलगांना डॉलर्स पाठवतात, येथे अप्रतिम वस्तू असलेली ड्युटीफ्री डॉलरशॉप्स आहेत त्यातील वस्तू घेणे ह्याना शक्य होते.'

किल्ल्याच्या या मुख्य राजवाड्यासमोर मोठे अगण होते मूळ राजवाड्याच्या ओवऱ्या व कोठड्या या दुतर्फा होत्या त्यात हल्ली दुकाने आहेत राजवाड्यासमोरच्या अगणात फुलाफळांचे स्टॉल्स आहेत छोटे ताटवे आहेत येथे धंदेवाईक फोटोग्राफर भेटले आम्हालाही ग्रुपचा रंगीत फोटो कधीपासून घ्यायचा होता तेव्हा त्या फोटोग्राफर मुलीने आमच्या सर्वांचा एक फोटो प्रथम काढला नतर आम्हा सात महिलाचा फोटो काढला याशिवाय आणखी बरेच फोटो काढले फोटोनतर मडळी बाजूच्या दुकानातून शॉपिंग करणे व फळे खाणे यांत गुतली तेवढ्यात आमचे कपडे बघून, विशेषत आमच्या साड्या व सरदारजीचे फेटे पाहून एक पोलिश युवती तेथे आली मला तर तेच हवे होते ती मुलगी वार्सा विद्यापीठात हिंदी शिकत होती तिच्या मैत्रिणीही भोवती होत्या ह्या मुलीमार्फत

त्या बाकीच्या मुलींशीसुद्धा मला बातचीत करता आली. तेवढ्यामध्ये खरेदीला गेलेली त्या मुलीची आईसुद्धा परतली मी ह्या मुलींना विचारले,

तुम्ही घरकामात आईला मदत करता का ?'

तर त्या म्हणाल्या,

आम्ही घरातील सर्वच माणसे घरकाम करतो कारण इकडे घरकामाला नोकर ठेवता येत नाही'

' तुम्ही धाकट्या भावंडाना प्रेमाने सांभाळता का ?' असे मी विचारले

त्यावर त्या म्हणाल्या की,

' तसा प्रश्नच येत नाही कारण दर घरात एक-दोन मुले असतात व त्याच्या वयात फारसे अंतर नसते' मलाही त्यांनी काय मजा केली ? काय खरेदी केली ? असे विचारले

मी म्हटले,

' मी मजेसाठी पैसा न उडवता माझ्या नातलगासाठी वस्तू नेण्यात तो खर्च करणार आहे'

त्यावर त्या म्हणाल्या,

परदेशी जाऊन मजा केली नाहीत तर काय फायदा ? इतरांचा विचार न करता स्वत चैन करा एन्जॉय युवरसेल्फ'

मी त्या मुलीच्या आईला म्हटले,

पाहा ही जनरेशन गॅप आहे !

ती हसली

यानंतर आमच्या बसने गावात पुन्हा एक फेरफटका मारला त्यात स्वीडनने बांधलेली स्काय स्क्रेपर इमारत पाहिली हिच्यात स्टेट ट्रेडींग कार्पोरेशन आहे विस्तुला नदीच्या एका तीराने सकाळी आलो आता दुसऱ्या तीराने आलो या विस्तुला नदीची एक बाजू सबंध दाट झाडीने भरली आहे तर दुसरी वापरण्यात आहे त्या बाजूला भिंत आहे बोटिंगसाठी व फिशिंगसाठी घाट आहेत विस्तुला नदीचे मूळ रोमन नाव विस्ताहेबोमिण आहे विस्तुला हे नाव पोलिश भाषेतले मला हे नाव संस्कृतसारखे वाटले आणि गोडही लागले आपल्याकडे काश्मिरात वितस्ता हे संस्कृत नाव झेलमचे मूळ नाव आहे त्या नावाचे मला विस्तुलाशी साम्य दिसले

पोलंडच्या नव्या उभारणीमध्ये परदेशी वास्तुकलांचे बरेच नमुने आढळले येथील कल्चरल सायन्सची इमारत रशियन पद्धतीची आहे नदीकाठी एक उध्वस्त इमारत अजूनही बांधत होते

आमच्या गाईडजवळ आम्ही त्यांना परदेशी जाण्यासाठी काय सोय आहे असे विचारले तो म्हणाला,

' तुमच्यासारखे आम्हाला वाटेल त्या देशात जाता येत नाही आमच्या राजनैतिक संबंध असणाऱ्या देशातूनच जाता येते. पासपोर्टसाठी दीडशे डॉलर्स पडतात. ( आपल्यामानाने फारच झाले ) शिवाय त्या देशाचे निमंत्रण असावे लागते परदेशी शिकण्यास जायचे असेल तर त्या देशाची स्कॉलरशिप असेल तरच जाता येते.' एकूण साम्यवादी जगांतून बाहेर जाणे सोपे नाही त्या लोकांना आपला हेवा वाटतो.

त्या दिवशी दुपारी शॉपिंगसाठी वेळ ठेवला होता आणि आपापल्या जबाबदारीवर जायचे होते मला आदल्या संध्याकाळी शॉपिंगचा अंदाज आला होता काल मी श्रमपरिहाराची झोप घेतली होती आज रात्री वॉटर बॅले पहायचा होता आणि उद्या प्रवास म्हणजेच हाल अपेक्षित असल्याने मला विश्रांती हवी होती मी कपडे धुणे, आवराआवर वगैरे करून झकास झोपले

डिनरच्या वेळी कित्येक पुरुषांच्या अंगावर रेडीमेड सूट दिसले, हे सूटस् व सफारी ड्रेसेस् अवघ्या २५ डॉलर्सना होते हे ऐकल्यावर मला हळहळच वाटली तथापि पुरुषी कपडे घालणारी माणसे इथे नसताना ते रेडिमेड नेण्यात अर्थ नव्हता

रात्री वॉटर बॅलेच्या तंबूजवळ उतरलो समोर पाहिले तो काय ? अष्टमीचा चंद्र ! जरा पिवळसर अगदी कलिंगडाच्या खापीसारखा अर्धा परंतु आपल्याकडे आडवी चंद्रकोर दिसते तसा नव्हता तर कलिंगडाची खाप उभी धरल्यावर दिसेल तसा होता मी ती उभी चंद्रकोर सर्वांना दाखविली सर्वांनाच मजा वाटली ही वॉटर बॅले कम् सर्कस एका कापडी तंबूत होती आत भरपूर मुले पालकांसह दिसली आम्ही नुकताच हॉटेलात रंगीत टी व्ही पाहिला होता. त्यात सर्कशीतल्या वेगवेगळ्या कसरती दाखविल्या होत्या तशा बऱ्याच कसरती व खेळ इंटर्व्हलपर्यंत पाहिले येथील तरुण कोलांटयाउड्यांचे अनेक खेळ खेळतात बॅले नृत्यामध्येही ते भरपूर पाहिले आज तर कोलांटया उड्यांचे व तोल सांभाळण्याचे नाना अपूर्व प्रकार बघितले एका फळीवरून एक जण उडी घेतो, ती दुसऱ्या फळीच्या उंच टोकाला ह्या फळ्या सीसॉसारख्या मधे जोडलेल्या असतात वरच्या टोकाला एकजण उडी मारून आला की, त्या धक्क्याने फळीच्या खालच्या टोकाला उभा असलेला माणूस स्प्रिंगसारखा हवेत उडतो तो हवेतच दोन कोलांटयाउड्या खाऊन तिसऱ्याच फळीच्या वरच्या टोकाला अल्लद उभा रहातो त्या धक्क्याने तेथील माणूस जो उडतो तो चौथ्या फळीच्या उंच टोकावर उभ्या असलेल्या माणसाच्या नेमका खांद्यावर उभा रहातो त्याच्या धक्क्याने फळीच्या समोरची टोकाची बाई जी उडते ती आणखीच काही कसरती करून एखाद्या लोंबत्या रिंगला धरते किंवा कुणाच्या तरी खांद्यावर अल्लद उभी रहाते तोल सावरण्याची आणि कोलांटया उड्या खाण्याची रशियन सर्कसपटूंची ( ही सर्कस रशियन होती ) ही कामे पाहून त्यांचा चपळपणा आणि स्नायूवरला ताबा

किती असेल या विचाराने मन थक्क होते

आमच्याकडेसुद्धा राजकारणात कोलांटउड्या मारणारे लोक हल्ली खूपच झालेत मात्र त्याना या सर्कसपटूप्रमाणे तोल राखणे जमत नाही त्यामुळे ते कसरतपटूऐवजी विदूषकच ठरतात

या सर्कशीत एका मांजरांच्या चमूचे काम होते माझी कल्पना होती एक वेळ वाघाला माणसाळवणे सोपे, परंतु मांजराला वाकवणे सोपे नाही पण रशियन लोकांचे काय सांगावे ? त्यांची मांजरे आगीतून उड्या मारतात दोन पायावर चालतात मध्यंतरात मी आइस्क्रिमचा मोह टाळला कारण तंबूमध्ये पाण्याचा हौद बनणाराय असे ऐकले होते आमचा गाईड मार्क हा फोटोग्राफर मुलीला रात्रीपर्यंत फोटो देता यावेत म्हणून डेव्हलपिंगला मदत करीत होता त्याच्या छोटा भाऊ आला होता भगिनीवर्गाने त्याला आइस्क्रिमवाल्याला बोलावण्यासाठी तंबूभर पिटाळले पण सर्वांनी मिळून त्याला एक आइस्क्रिम काही बहाल केले नाही !

इकडे सर्कशीच्या रिंगणामधील गालिचे नोकर लोकांनी भराभर गुंडाळले कठड्यावरची गोल मॅट गुंडाळली उरला तो एक गोल मोठा सिमेंटचा हौद काही नोकरांनी हौदाच्या बाहेरच्या अंगाने लटकत असलेल्या चौकटी सोडवल्या या चौकटी काचेच्या होत्या, हे आता कळले इतका वेळ त्यावर कार्पेट होती चौकटी बिजागिरीला लटकत होत्या त्या वरच्या अंगाला उभ्या केल्या दोन नोकर दोन बाजूंनी चौकटी उभ्या करीत करीत, त्यांचे सांधे घट्ट बसवीत दुसऱ्या टोकाला गेले रिंगणाची भिंत आणि ही काचेची भिंत मिळून सात–आठ फूट खोल असा मोठा हौद बनला काचेच्या चौकटीवरच्या हुकांतून वायर गुंफून पक्क्या केल्या आता कलावंत प्रवेश करीत त्या दारातून एक घसरगुंडीसारखा पन्हाळ आला त्या पाच–सहा फूट रुंद पन्हाळीतून अक्षरश धोधो पाणी पडू लागले हा कृत्रिम धबधबासुद्धा मजेदार वाटत होता सर्कस पहाणारी पाश्चात्य बाळे या पाण्याच्या भोवताली उभी राहिली धबधब्यांतून उडणारे तुषार हातावर घेऊन ते खरेच पाणी असल्याची त्यांनी खात्री करून घेतली पाण्यातून वाफही येत होती म्हणजे ते कोमट केलेले असणार आणि तेही बरोबरच होते कारण गार पाण्यात काम करून त्या थंड देशामध्ये दुखणीच व्हायची कलावंताना

सिमेंटच्या पातळीपर्यंत हौद भरला मला वाटले, कांच ही केवळ प्रेक्षकांवर पाणी उडू नये म्हणून उभी केली असावी परंतु आता खालचा धबधबा बंद होऊन पन्हाळ आत गेला आणि तंबूच्या दुसऱ्या मजल्यावरून दुसरी पन्हाळ पाणी ओतू लागली बघताबघता काचेच्या काठापर्यंत जवळजवळ हौद भरला आणि मध्यंतर संपल्याची घंटा झाली या हौदापर्यंत एक प्रवेशद्वार बनविले गेले तेही तिरक्या पन्हाळीसारखेच होते आता रंगीत प्रकाशझोत पाण्यात पडले मग प्रवेशद्वारातून पाण्यामधून तरंगत पाच रुपेरी कमळे आली

त्या रुपेरी कमळांच्या पाकळ्या उघडल्या आणि त्यातून सुंदर मुली दिसू लागल्या या कमळावर कागदी भुंगे येऊन बसले त्याबरोबर त्या कमलकन्या पाण्यात संचार करू लागल्या एवढ्यामध्ये आतून रुपेरी हंस आले हे हंस म्हणजेसुद्धा मुलींच्या अंगावर चढवलेल्या पत्र्याच्या आकृती असणार हंस आणि कमळे यांची क्रीडा झाल्यावर ते गेले नंतर हौदाच्या मधोमध एक गोल तबकासारखे स्टेज वर आले वरच्या मजल्यावरून त्याला एक पूल जोडला गेला पुलावरून परीचे कपडे केलेल्या सुंदर तरुणी आल्या त्यांनी त्या गोल मंचावर नृत्य केले ते चालू असताच एकाएकी त्या गोल स्टेजच्या कडांनी पाण्याच्या असंख्य उंच धारा उडाल्या गोल नळ्यांच्या तोरणाप्रमाणे ते कारंजे उडत होते आणि आतमध्ये जलधारांच्या पिंजऱ्यात त्या पऱ्या झगझगीत वस्त्रे चमकावीत मोहक नाच करीत होत्या मग कारंजे उडायचे थांबले आणि तबूतून सोनेरी ठिपक्यांचे हिरवे बेडूक उड्या मारीत पाण्यात आले हे बेडूक म्हणजे तसा पोशाख केलेली माणसेच होती पण त्यांची तोंडे आणि डोळे हुबेहुब बेडकासारखे होते ते बेडकासारख्या उड्या मारीत या बेडकांनी पऱ्यांना सतावायला सुरवात केली त्या बरोबर पऱ्या चिडल्या आणि निघून गेल्या मग बेडूकही निघून गेले आता एक कोळी येऊन मासे पकडू लागला तेव्हा विदूषकाने त्याच्या खूप फिरक्या घेतल्या नंतर मत्स्यकन्या आल्या त्यांनी पाण्यात अनेक क्रीडा केल्या मध्ययुगीन काळातील एक जोडपे येऊन गेले पुन्हा एकदा कारंजे उडू लागले यावेळी त्यात हातात मेणबत्ती घेतलेल्या तरुणतरुणींनी नाच केला यावेळी तंबूत अंधार होता आणि एकच निळसर झोत पाण्यावर टाकला होता त्यामुळे आतील मेणबत्त्यांची अग्निफुले फार सुंदर वाटत होती

पाण्यात न भिजता काही तरुणी स्टेजवरच कामे करून गेल्या आता स्टेजवर एक पुतळा मांडला हंगेरियन पोशाखातले एक जोडपे पुतळ्याखालील बाकावर हवा खायला येऊन बसले त्यातला पुरुष बाईचे प्रियाराधन करीत होता पाठीमागून विदूषक आला. त्याने तो पुतळा खाली आडवा टाकला आणि स्वतःच चबुतऱ्यावर उभा राहून तोंडे वेडीवाकडी करून मुलांना हसवू लागला त्या माणसाने दारूची बाटली, पेला, केकचा पुडा असे खिशातून काढून चबुतऱ्यावर ठेवले त्याने दारूचा ग्लास भरून पुतळ्याच्या पायाशी ठेवला तो त्या बाईला फुले आणि केक देऊन आग्रह करू लागला तोवर इकडे विदूषकाने पेल्यातील दारू पिऊन टाकली ती बाई दारू प्यायला तयार होते तर ग्लासात दारूच नाही गृहस्थाच्या काही लक्षात आले नाही त्याने परत दारू भरली व बाईच्या हातात ग्लास दिला तोवर विदूषकाने बाटलीतील पुष्कळशी दारू पिऊन टाकली. त्या पुरुषाच्या डोक्यात टपली मारली त्याने मागे पहावे तर विदूषक आपला पुतळ्यासारखा उभा ! केक खाण्यासाठी बाई आणि पुरुष 'पहले तुम, पहले तुम' असा आग्रह करीत असताना विदूषकाने पायापाशी ठेवलेला केकच खाऊन टाकला अखेर केकवरून भांडत ते जोडपे निघून गेले दोन–तीनवेळा त्या कारंजाने नाना जलविलास केले

आता पाण्यातून शिडे लावलेली गलबते आली मधल्या स्टेजवर काळे दुष्ट चाचे आले त्यानी काठावरून गलबतांना अडवले चाच्याचे गलबत दुसऱ्या बाजूला आले चाचे व व्यापारी यांची मारामारी मधल्या स्टेजवर झाली त्यात माणसांना तलवारीने मारत आणि पाण्यात फेकून देत ही पाण्यात पडलेली माणसे बहुधा पाण्याखालून पोहत तंबूमधे जात असतील नंतर चाचे व व्यापारी यांचे गोळीबार झाले त्यात एक जहाज खरेखुरे पेटले, त्याच वेळी ते खालून बुडूही लागले बुडताबुडता पेटणारी शिडे दिसली यानतर आलेली खिन्नता घालवण्यासाठी तरुण-तरुणीचे कसरतवजा कार्यक्रम झाले. त्यात माणसांचे पिरॅमिड्सही होते पिरॅमिड झाल्यानंतर हळूहळू खाली उतरण्याऐवजी त्या मुली आणि मुलगे पाण्यातच उड्या मारत. आता एक मोठा चमू पाण्यात व स्टेजवर मिळून उतरला यामधे हातात फुगे घेतलेल्या मुली होत्या तर फुग्याचाच प्रचड पोशाख केलेले आणि फुग्यामधे लपलेले पुरुष होते त्याचे आकार चित्र-विचित्र होते. त्यानी खूप गमतीजमती केल्या पुरुष पाण्यात व मुली लाकडावर नाचू लागल्या आणि त्याचवेळी अकस्मात तबूच्या छतातून सहस्त्रधारांनी पाऊस पडू लागला त्याचक्षणी तबूच्या सर्व बाजूनी अनेक रगी प्रकाशझोत पडू लागले अशी ही रोमहर्षक लीला चालू असताना कार्यक्रम सपला

हा कार्यक्रम मला फारच अविस्मरणीय वाटला कारण असा बॅले आपल्याकडे नसतो आणि दुसरे म्हणजे झटपट दृश्ये बदलणारे त्याचे कुशल कामगार फारच हुषार वाटले शरीरचापल्याबद्दल कलावंताचे कौतुक करावे तेवढे कमीच होते.

रात्र खूप झाली होती बहुतेकजण झोपायला गेले फोटोग्राफर बाई येणार म्हणून थोडे थांबले मलाही रंगीत फोटोबद्दल अत्यत उत्सुकता होती मी दुपारी भरपूर झोप काढली होती आणि प्रवास उद्या सकाळी सावकाश होता फोटोग्राफर बाईने बराच उशीर केला म्हणून मी तेथील कॅफेमधे कॉफी घेऊन आले माझ्याजवळ बऱ्याच जणांनी पैसे देऊन ठेवले होते अखेर मार्क व ती गाईड दोघे आली. वॉर्सा कॅसलमधील पॅलेससमोर आमच्या ग्रुपचा फोटो होता खेरीज एक होता आम्हा बायकांचा आणि मी व सरदारजी मिळून एक काढला होता मी तर तीनही फोटो घेतले माझे हे पहिलेच रंगीत फोटो ! अन् ते चागले आलेत असे इतरांचेही म्हणणे पडले

सकाळी ब्रेकफास्ट झाल्यावर वार्सा स्टेशनातून बर्लिनला जाण्यास ट्रेनने निघालो वार्सा ते बर्लिन प्रवासात मी विचार करीत होते की तीस वर्षांमधे भग्न झालेला पोलंड पुन्हा सावरला आम्हालाही स्वातत्र्य मिळून तीस वर्षे झाली त्यासाठी घनघोर लढाई, रक्तपात, बॉबवृष्टी असे काही झाले नाही तरी आमचा देश अजून तत्रज्ञानाने परिपूर्ण आणि समृद्ध का होत नाही ? कडक शिस्तीच्या रशियाने आपली घडी बसवली जखमी पोलंड हसतमुखाने कोकरासारखा उडू लागला आहे युद्धाचे कारण असलेला जर्मनी, जखमांचे शेकडो घाव चाटूनपुसून डरकाळ्या मारणाऱ्या वाघाप्रमाणे, पुन्हा ताठ मानेने

छाती पुढे काढून उभा आहे फक्त आम्ही अजून स्थिरावलो नाही पोलडची हद्द सपली. दिमाखदार जर्मन खेडी लागू लागली गुलाबी रंगाची उंच धिप्पाड जर्मन माणसे दिसू लागली

आम्ही चागल्या मुहूर्तावर आलो होतो उद्या दसरा होता इथे पूर्व जर्मनीच्या डेमॉक्रॅटिक रिपब्लिकचा तिसावा वाढदिवस आला होता त्याचा सप्ताह आजपासून सुरू होत होता जिकडे तिकडे पूर्व जर्मनीचे झेंडे फडकत होते खास रोषणाई केली होती आणि हवेत सुखद गारवा होता जो जर्मनी पहाण्यासाठी दुसऱ्या महायुद्धापासून सुप्त इच्छा धरली होती त्या जर्मनीच्या राजधानीत मी पोचले होते ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९०
ग्रं. क्र. २३९८८
१५।५।८९
शुक्रवार
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ६ : युरोपमधला शेरळा बच्चा–जर्मनी

डेमॉक्रॅटिक रिपब्लिक जर्मनीचा तिसावा वाढदिवस नुसत्या सरकारी पातळीवरच साजरा होत होता असे नाही तर नागरिकांच्या वस्त्यांमधूनही झेंडे आणि दिव्याच्या माळा यांनी रोषणाई केली होती. आमचे ' इटर हॉटेल स्टाट बर्लिन ' हे गावाच्या मध्यभागी होते संगमरवरी फरशा असलेले हे हॉटेल युरोपात आल्याची जाणीव करून देत होते येथे सामान नेण्यासाठी चाकाच्या पांगुळ-गाड्यासारख्या गाड्या होत्या त्यावर सामान ठेवून लिफ्टमधून आपल्या खोलीपर्यंत न्यायचे या गाड्या नोकर पुन्हा जाग्यावर ठेवत देनात. हॉटेलच्या खोल्या सोशॅलिस्ट राष्ट्रातील असूनही त्यानल्यात्यात उजव्या होत्या जेवणानंतर मॅनेजर व ग्रुपलीडर यांचा बराच वाद चाललेला दिसला अजून सात दिवस होते आमचा आग्रह हंगेरी, वेस्ट बर्लिन वगैरे सर्व ठरल्याप्रमाणे झाले पाहिजे असा होता तर मॅनेजरला एकेका गावी एवढे दिवस हॉटेल्स मिळत नव्हती त्याची मिस्‌मॅनेजमेंट प्रागपासूनच दिसून आली. तो या ट्रिपला प्रथमच येत होता त्याला इकडल्या भाषा येत नव्हत्या

सक्सेना आम्हाला एक आक्टोबरला ड्रेसडेनला नेत होता हंगेरीला जायचे तर फ्रँकफुर्टला फक्त दोनच तास मिळणार होते आम्ही तर खरेदी हा कार्यक्रम फ्रँकफुर्ट-साठीच ठेवला होता. हिंदुस्थानातील राजकारणी लोकांप्रमाणे आमच्या गटातही एकमत

नव्हते कोणी म्हणे 'हंगेरी व्हायला हवे' कोणी म्हणे, 'त्यापेक्षा फ्रँकफूर्टला जाऊन खरेदी करूया' मला एक देश कमी बघायला मिळणार याचे वाईट वाटले इम्रेनाजचा हंगेरी मला बघायचा होता किएव्हला भेटलेल्या हंगेरीयन टूरिस्टना मी तिकडे येणार असे सांगितले होते काहीजणांचे पत्तेही घेतले होते म्हणजे एक देश कमी पाहून आम्ही फ्रँकफुर्टला खरेदी करणार हे मला पटत नव्हते माहितगाराने सांगितले फ्रँकफुर्टला विमान फक्त दोन तास थांबेल त्या दोन तासात तुम्हाला विमानतळावर मिळणाऱ्या वस्तूच तेवढ्या मिळतील अखेर फ्रँकफूर्टवाल्यांचा जय झाला एक देश आणि एक दिवसाचा विमानप्रवास याच्या बदली फ्रँकफुर्टला रहाण्याचे ठरले

मी सक्सेनाला म्हटले,

'मग ड्रेसडेन आणि प्रागचे दिवस तरी वाचवा पुन्हा प्रागला कशाला जायचे? ड्रेसडेन, प्रागऐवजी बर्लिनच आणखी दोन दिवस पाहू आणि हंगेरीही घेऊ'

परंतु याचा काहीही उपयोग झाला नाही शेवटी सक्सेना बर्लिनच्या भिंत ओलांडून जाण्याच्या कार्यक्रमालाही चाट देऊ लागला पुरुषाची व त्याची वादावादी चालली होती. तो सारखा म्हणत होता, 'रूममध्ये काय तें बोला उघड्यावर नको आपले हिंदी हेरांना कळते' पण कोणीच एवढ्या शांत मनःस्थितीत नव्हता नंतर मी म्हटले,

'आता मला जरा बोलून द्याल काय? सक्सेनाला अडचणी काय आहेत ते विचारूया.'

सक्सेनाने सांगितले,

'आपले कार्यक्रम ठरवणारी संस्था आपणास बर्लिनची भिंत ओलांडून पश्चिम बर्लिनमध्ये जाऊ देत नाही.'

यावर मी बराच वादविवाद केला मुक्त युरोपच्या भूमीवर आम्हाला पाय टेकण्याची इच्छा आहे ती ऐतिहासिक बर्लिनची भिंत पहाण्याची आम्हाला फार उत्सुकता आहे त्या भिंतीच्या फाटकातून पलीकडे जाण्यासाठी मी धडपडत इथपर्यंत आले आहे तर आधी भिंत ओलांडून पलीकडे जाण्याचे ठरले असताना आता का नेत नाही? काय अडचण असेल ती सर्वांनी दूर करूया

यावर सक्सेनाने आमच्याबरोबर ज्या दोन तरुण मुली गाईड म्हणून आल्या होत्या त्यांना सांगून त्याच्या प्रमुखाला बोलाविले त्यानंतर बराच वाद झाल्यावर गाईडने असे सांगितले की,

'आमच्यातर्फे गेला असतात तर आम्ही बससकट तुम्हाला भिंतीपलीकडे नेऊन वेस्ट बर्लिन दाखवून आणले असते आता तुमचा हट्टच असेल तर बर्लिन-विभाजक भिंतीच्या गेटपाशी आम्ही तुम्हाला सोडू तुम्ही आपल्या जबाबदारीवर परवाना काढून जा व या.'

एवढे गरमागरम वाद झाल्यावर व बराच हिरमोड झाल्यावर लगेच झोप येणे शक्य नव्हते बाहेर समाजसत्ताकाच्या रोषणाईचा झगझगाट होता सर्व इमारतीवर अखंड झेंडे फडफडत होते मी बाहेर जायचे ठरवले मधा आल्याआल्या मी न्हाणे उरकत असताना बाकीचा स्त्रीवर्ग हिंडून आला होता काही पुरुष बाहेर पडत होते परंतु त्यांचे उद्देश वेगळे होते कदाचित त्यांना माझी अडचण झाली असती म्हणून मी रूमपार्टनरला व सक्सेनाना सांगितले की,

'मी थोडा वेळ एकटी फिरून येणार आहे काळजी करू नका मला जर्मन येते मी चुकणार नाही शिवाय या देशात भलत्या गुन्हेगारीचे भय नाही'

हॉटेलच्या जवळच टी व्ही टॉवर होता हा वार्सापेक्षा खूपच मोठा होता दरेक टॉवरप्रमाणे याच्याही मध्यावर गोल मण्यासारखे गरगर फिरणारे फिरत हॉटेल होते ही खूण लक्षात ठेवून मी निघाले प्रथम हॉटेलच्या मागच्या अंगाला दोन कारंजी लागली त्यातील एक अनेक सिमेंटच्या पानांचे होते त्या मोठ्यामोठ्या पानांतून फवारे उडत होते दुसरे कारंजे फारच सुंदर होते त्यात शिखरावर शंकराची मूर्ती होती. त्याच्या जटेतून गंगेप्रमाणे पाणी उडत होते खाली मोठमोठ्या शिंपल्या (सिमेंटच्या) चहूबाजूला होत्या. त्यातून ते पाणी खालीखाली वेगवेगळ्या शिंपल्यातून झिरपत जात होते येथे शंकर पाहिला यात नवल वाटले नाही जर्मनीमध्ये पूर्वीपासून संस्कृत विद्येचा अभ्यास चालतो मॅक्समुल्लरसारखे संस्कृत विद्वान या देशात होऊन गेले येथे हायडेलबर्ग बर्लिन, ड्रेसडेन, लाइप्झिग् अशा अनेक शहरी तेथील विद्यापीठात संस्कृत विभाग आहे संस्कृतचे अध्ययन व अध्यापन येथे चालते त्यामुळे शंकर व त्याच्या जटेतील गंगा ही कल्पना त्यांना संस्कृत ग्रंथातून माहीत असावी त्याच्यापुढे बऱ्याचशा दुकानांतून व गल्लीबोळांतून फिरले दुकानांच्या शोकेसेस्‌मधून माल व किंमती लिहिलेल्या होत्या युरोपमध्ये अमेरिकन जीन पॅंटस् सध्या भलत्याच लोकप्रिय दिसतात मुले–मुली आणि तरुणतरुणी सर्वच त्या वापरतात या जीन पॅंटस्‌च्या किंमती चाळीस मार्क व अधिक अशा होत्या मला त्या स्वस्त वाटल्या नाहीत आपल्याकडे याहून स्वस्त आहेत दुकानांच्या दर्शनी तावदानाचा तळाचा दोन फूट भाग पोस्टर्सनी भरलेला होता डी डी आर ३० या समारंभानिमित्ताने पूर्व जर्मनीची ३० वर्षातील प्रगती या चित्रातून दाखविली होती. दुसरे महायुद्ध चालू असताना आणि शेवट नाझींचा पाडाव करताना शत्रूंनी जर्मनीचाही पार विध्वंस केला होता त्या मानाने तीस वर्षांत त्यांनी कितीतरी तांत्रिक प्रगती केली आहे.

तरीसुद्धा गावात कुठेकुठे युद्धात पडलेल्या इमारतींचे अर्धवट अवशेष ठेवलेले आहेत समोरच्या अंगाला डावीकडे एक भव्य इमारत दिसली ही किंडर–स्पील (बालक्रीडा) या मुलांच्या मासिकाची इमारत होती मुलांच्या मासिकाचे हे वैभव बघून मी थक्क झाले तशी तिकडची मासिके सुंदरच असतात गुळगुळीत कागद, फोटो व

मजकुराचे उत्तम प्रिंटिंग यामुळे ती आकर्षक वाटतात रंगीत फोटो हे आणखी आकर्षण. मुलांची मासिकेही अशीच दर्जेदार असतात

आपल्याकडे मोठ्यांची मासिकेही न्यूजप्रिंटवर काढायची वेळ येते रंगीत ब्लॉक कव्हरसाठी मिळताना मारामार बिचाऱ्या मुलांची तर स्वतंत्र मासिके हाताच्या बोटावर मोजावी एवढीच आहेत बिचाऱ्या बाळांना स्त्रियांच्या मासिकातील मुलांसाठी असलेले सदर वाचून संतुष्ट व्हावे लागते या हॉटेलच्या भागात मोठ्या महत्त्वाच्या इमारती होत्या कार्ल मार्क्स रस्ता जवळच होता मार्क्सच्या नावाचा चौक व पुतळाही येथे आहे. हा भाग मूळ १८५० मध्ये बांधलेला होता दुसऱ्या महायुद्धात हा साफच नष्ट झाला. आता ह्या भागात टी व्ही टॉवर, हॉटेले, रेस्टॉरन्टस्, थिएटरे वगैरे इमारती गजबजल्या आहेत अलेक्झांडर स्क्वेअरमधे फुगे, पताका, दिवे लावून उत्सवाची खूपच तयारी केली होती जवळच युद्धात नष्ट न झालेले एक जुनाट चर्च होते. तसेच अडीच महिन्यापूर्वी बांधलेले अलिशान स्वीस हॉटेल होते. आमच्या इटर हॉटेलमधेसुद्धा आज २००० प्रवासी होते.

बालक्रीडा मासिकाचे कार्यालय पाहून समोरची दुकाने पहातपहात मी रस्ता ओलांडणार होते रस्ता खूपच मोठा होता पण यावेळी बराचसा निर्जन होता. मी तो ओलांडणार इतक्यात एका जर्मन स्त्रीने म्हटले,

' हा रस्ता भुयारातून ओलांडायला हवा. '

मी म्हटले,

' परंतु वर वाहने नाहीत. '

तिने सांगितले,

' रस्ता भुयारातून ओलांडावा असा नियम असेल तर कोणत्याही वेळेला तो भुयारातूनच ओलांडायला पाहिजे नाहीतर दंड होईल '

युरोपच्या ह्या देशातून देशाचे कायदे कायदे आणि नियम हे तंतोतंत पाळावे लागतात. न पाळल्यास पोलिसचौकीत नेणे, मॅजिस्ट्रेटकडे नेणे, खटला भरणे वगैरे घोळ नसतो. जिथल्या तिथे दंड करण्याचा अधिकार पोलिसाला असतो. म्हणून नियम मोडणाऱ्यालाही धीर होत नाही

वार्सामधे मार्कच्या जोडीला एक मोठ्या वयाचा गाईडही होता. पॅलेस स्क्वेअरला निघताना तो उशीरा आला त्याने म्हटले,

' सॉरी, आय ॲम लेट आय वॉज कॉट बाय द पुलिस '

आम्ही सर्वच हसलो कारण तेथील पोलिस या तरुण स्त्रिया होत्या मी त्याला म्हटले,

' तिने तुला गोड शिक्षा केली असणार तिने काय घेतले व तू काय दिलेस ?'

'युनिफॉर्ममधे स्त्री असो पुरुष असो कर्तव्य पालन प्रथम! त्या स्त्रीपोलिसाने मला चक्क दंड केला ही पहा पावती!'

नियमांचे काटेकोर पालन व्हायला हवे असेल तर त्यातील विलंब आणि घोळ टाळला पाहिजे तरच कायद्याची आणि नियमाची शिस्त लोकांना लागते आपल्याकडे कायदे हे झाले रे झाले की वकील प्रथम त्यातल्या पळवाटा शोधतात नियम कितीही केले तरी तिकडे लक्ष देत नाहीत साधा रांगेने बसमधे चढण्याचा नियम मधल्या थांब्यावर मुळीच पाळला जात नाही तिथे रेटारेटी चालते आणि जो घुसेल त्याला बस मिळते. तीच गोष्ट रेल्वेतील स्त्रियांच्या डब्यातील हे डबे सर्व वेळ स्त्रियासाठीच आहेत, असे सर्वत्र लिहिलेले असते शिवाय स्टेशनवर तशी घोषणाही देत असतात (निरक्षरासाठी) तरीसुद्धा रात्री नऊनंतर ह्या डब्यात आपला हक्कच आहे असे समजून राजरोसपणे पुरुष लोकलने प्रवास करतात रात्रीतर राहोच दिवसासुद्धा डब्यात जागा असेल तर खुशाल घुसतात फर्स्टक्लासच्या स्त्री व पुरुषांच्या डब्यात असेच घुसखोर लोक येतात कायद्याचे रक्षक गुंडासमोर गप्प रहातात किंवा हप्ते घेतात नागरिकांनी कुणी कुरकुर केली तर गुंड त्यांनाच दम देतात किंवा सुरा दाखवतात कुठलीही यंत्रणा आमच्या देशात कायदे तोडणाऱ्याचा, नियम मोडणाऱ्यांचा, गुंड व मवाल्यांचा पुरा बंदोबस्त करू शकत नाही!

अजूनही भारतात कायदे पाळणारा कायदे मोडणाऱ्यांना भितो।

मी त्या जर्मन स्त्रीला म्हटले,

खूप रात्र झाली आहे भुयारामधे काही भलतेसलते तर नसेल?' कारण मला भारतातल्या अशा गोष्टींबद्दल ऐकून ठाऊक होते काही काळापूर्वी मुंबईत काही गजबजलेल्या चौकात पादचाऱ्यांसाठी भुयारी क्रॉसिंग ठेवले पण रात्रीच्या वेळी ती भुयारे कुकर्माचे अड्डे बनली जुगार मटक्यापासून वेश्या व्यवसायापर्यंत सर्व धंदे तिथे रात्री चालू लागले त्यामुळे कायदे पाळणाऱ्या भित्र्या नागरिकाला तेथून जाणे अवघड झाले

त्या जर्मन स्त्रीने मला सांगितले,

'तू पलीकडे निघून वर येईपर्यंत मी इथे उभी राहून लक्ष देते तू हात केलास की मी जाईन पाच मिनिटात तू दिसली नाहीस तर मी तुला शोधायला खाली उतरेन'

मी भुयारात गेले पाच रस्त्यांना भुयारी रस्ते पोचत होते पण जो तो भराभरा येत होता आणि जात होता कुकर्मासाठीच थांबलेले लोक तर नव्हतेच पण गळ्यात गळे घालून गुलुगुलू गोष्टी करणारी प्रेमी युगुलेसुद्धा नव्हती ह्या चारही राष्ट्रांमधे सार्वजनिक ठिकाणी उत्तान प्रणयदृश्ये कुठेही दिसली नाही सार्वजनिक बागा, थिएटरे, रेल्वे, नदीचे काठ अशा ठिकाणी कबुतराप्रमाणे घुमणारी आणि मिठ्या मारणारी तरुणतरुणी शोधूनही सापडली नाहीत उरलेल्या युरोप व अमेरिकेच्या मानाने या देशाची वागणूक फार सयमी दिसली. स्टेशनवर पोचवायला येणारे व स्वागताला येणारे चुंबने घेत नव्हते, तर फुलांनी

स्वागत करीत होते दरेक स्टेशनात उतरणाऱ्या मंडळीच्या स्वागताला पुष्पगुच्छ घेऊन येणारे नातलग दिसत हस्तांदोलन किंवा फार तर पाठीवर हात ठेवणे एवढाच प्रेमाचा आविष्कार !

मी भुयार ओलांडून पलीकडे गेले व तेथूनच हात हलवीत त्या भल्या स्त्रीला धन्यवाद दिले

स्वत· नियमाचे काटेकोर पालन करून, इतराकडूनही सौम्य शब्दात सांगून ते करून घेणारी ही जर्मन स्त्री मला संस्मरणीय वाटली

बर्लिनच्या भपकेबाज वस्तीच्या पलीकडे अजूनही मोडक्या इमारती आहेत. युद्धामध्ये पडलेली काहींच्या आवाराची भिंत तशीच पडून आहे आपल्याकडील मध्यम शहरांमधे पेशवाईकालीन वाडे आणि बैठी घरे दिसतात तशीपण येथे घरे दिसतात

रशियाच्या मानाने जर्मनी दक्षिणेला आहे तरी थंडी तितकीच कडाक्याची होती. पण या थंडीतही फिरण्याची मी और मजा चालवली या दौऱ्यामधे मी कित्येकदा उद्यानामधे शाल किंवा स्वेटर भिरकावून थंड ताजी हवा चाखत असे. कुणी बायका खुणेने विचारीत,

'अग कापत नाही का थंडीने ?'

मी मोकळे हसून भोवताली हात फिरवून सांगे,

'तुम्हाला उष्णतेसाठी वीज जाळून खर्च करावा लागतो ती उष्णता आम्हाला कायम फुकट मिळते परंतु ही जी थंडी आहे अशा सुरेख कोरड्या थंडीसाठी आम्ही मुंबईकर वर्षभर तडफडत असतो आमच्या खोल्या थंड करणारे एअरकंडिशनर्स फार महाग असतात ते आम्हाला परवडत नाहीत म्हणून मी सुरेख शुद्ध हवा साठवून घेते आहे '

यावर माझ्या मैत्रिणी म्हणत, 'गेल्यावर तुला न्यूमोनिया होईल पहा

मी हट्टाने म्हणे, 'चालेल होऊ दे '

पण काहीही झाले नाही

तर अशी भरपूर हवा चाखून, अवलोकन करून, मी उशीरा हॉटेलात आले आणि झोपले

एक ऑक्टोबर उजाडला आज दसरा होता सकाळी उठल्या उठल्या गरम दुधाची कॉफी मिळाली आणि फार बरे वाटले आम्ही गावात फिरायला निघालो स्टेट कौन्सिल व पीपल्स चेम्बरची इमारत भव्य आणि उंच आहे तिथेच सरकारची मंत्रालये आहेत. एका जुन्या ठेंगू इमारतीत आर्ट गॅलरी होती 'चेंज ऑफ गार्ड' असणारी जुनी ऐतिहासिक इमारत पाहिली मास्कोप्रमाणे इथेही मधोमध झाडीचा हिरवा फुटपाथ असलेला बुले वार्ड पाहिला. या शहरामधून स्प्री नदी वहाते. तिचेही काही पाट काढलेले आहेत

आणि ते सर्व कडेने बांधलेले आहेत स्प्री नदी गावभर पसरलेली आहे तिचे पाणी काळ-पट दिसले हिला बर्फ वितळल्यावर फार मोठे पूर येतात म्हणे माझ्या लहानपणी मी बर्लिनला प्रचंड पूर आल्याचे वाचले होते त्यावेळी माणसे छपरावर रात्रभर चढून बसली होती जी माणसे मेली ती पुरात वाहून मेली नाहीत तर ओल्या अंगाने भयंकर थंडीत रात्रभर बसावे लागल्यामुळे थंडीने काकडून मेली या स्प्री नदीच्या काठावरील बर्लिनचे आज दोन तुकडे झाले आहेत पूर्व आणि पश्चिम बर्लिनच्या कायदेकानू व रहाणीमध्ये दोन ध्रुवांइतका फरक पडला आहे ही बर्लिनविभाजक भिंत आम्हाला मधेमधे दिसत होती

या भिंतीबद्दल माझी मोठीच उत्सुकता होती हिंदी सिनेमाप्रमाणे त्या भिंतीत काही-तरी भव्य, भीषण, रहस्यमय असेल असे वाटले होते तशी ती भिंत दहा फुटाहून उंच नव्हती साधी चुन्याने रगवलेली ओबडधोबड भिंत ! परंतु तिचे सामर्थ्य अफाट आहे कारण दर शभर फुटावर या भिंतीची एकेक गार्ड आहे तो आपला शभर फूटाचा परीघ काटे-कोर रक्षण करतो या भिंतीपासून शभर फुटावर माणसांना थोपविले जाते. त्या कुपणाच्या आत जाणाऱ्याला तात्काळ गोळी घालून ठार केले जाते चुकून किंवा अजाणता गुन्हा केला तरी क्षमा नाही हा पहारा अखंड कडक असतो कुणी म्हणतात धक्क्यावरून प्रचंड दाबाची विजेची वायर खेळवलेली आहे एकंदरीत ही भिंत ओलांडणे म्हणजे मृत्यू आहे या भिंतीला एकच दार आहे तेथेच आम्ही दुपारी जाणार होतो अर्थात असा पहारा आणि बंदोबस्त हा फक्त पूर्व जर्मनीच्या ताब्यातील बर्लिन शहराच्या अंगाला आहे

एका बाजारपेठेतून बस चालली असता थांबली डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये सकाळची कामे उरकून बायका आता खरेदीला आल्या होत्या तान्ही मुले प्रॅममधे घालून येत होत्या प्रॅमच्या खाली एक कप्पा असतो. त्यात पिशव्या ठेवता येतात. ही मुले बाबागाडीसकट स्टोअरच्या बाहेर ठेवून बायका खुशाल आत जात होत्या आपले मूल कोणी पळवील अशी भीति कशी वाटत नाही ? अथवा येथील लोकांची जीवनमूल्येच उच्च आहेत ? ही बाळे रशियन मुलांच्या इतकी लाल नाहीत, तर गुलाबासारखी दाट गुलाबी आहेत ही मुले खाली पडू नयेत म्हणून त्यांना छातीशी पट्टा बांधलेला असतो काही बायका येत प्रॅममधे दोन मुले असत. त्यांनी आपसात मारामारी करू नये म्हणून आई मोठ्या मुलाला उचलून त्याचे बोट धरून त्याला दुकानात नेई गाडीत एकेकटी राहिलेली बाळे आई नजरेआड झाली म्हणून लगेच भोकाड पसरत नव्हती मी पाहिलेल्या या सर्व युरोपमधे जेवढी मुले दिसली ती सर्व निरोगी आणि गुटगुटीत होती निरोगी मूल नेहमी खेळकर असते सबंध प्रवासात कुठेही मूल रडताना ऐकले नाही हे सर्व देश आपली सर्वात मोठी संपत्ती म्हणजे बालके असे समजतात देशातील सर्व मुलांचा पत्कर सरकारने घेतलेला असतो देशाच्या बजेटमधे सर्वात जास्त रक्कम भावी पिढीचे शिक्षण आणि कल्याणकारी योजना यासाठी खर्ची टाकलेली असते देशातले सर्वात चांगले उत्पादन मुलासाठी राखले जाते शिवाय ते

कमी किमतीत विकले जाते त्यामुळे सर्व मुलाच्या पालकाना ते विकत घेता येते

मुलासाठी सुदर सुदर कपडे सेल लावून विकले जातात एरव्ही दोनशे रुपयाला मिळणारा कपडा मुलांच्या सेलमधे पाहिला तो तेथे बावीस रुपयाला मिळतो शिवाय सेल म्हणून घाणेरडा माल खपवीत नाहीत मुलांप्रमाणेच त्याच्या बाहुला-बाहुलीसाठी छोटे रेडीमेड शर्टस्, फ्रॉक्स, टीशर्ट, जीन पॅट, मोजे, बूट, टोपी असे चिमुकले कपडेही विकायला असतात याचप्रमाणे देशातील सर्वांत उत्तम कागदावर शाळेची पुस्तके छापतात वह्यांना उत्तम कागद देतात मुलासाठी खेळणी, कपडे आणि पुस्तके यानी भरलेली प्रचंड चिल्ड्रेन डिपार्टमेंटल् स्टोअर्स पाहिली इतर दुकानातूनसुद्धा मुलाचा एक विभाग असतोच दर शनिवारी कौटुबिक खरेदीबरोबर मुलांसाठी खाऊइतक्याच अगत्याने खेळणी व पुस्तके खरेदी करणाऱ्या आया दिसल्या

मुलांसाठी मासिके, साप्ताहिके, अवांतर वाचनाची पुस्तके हीसुद्धा गुळगुळीत कागदावर छापून चित्रांनी सजवलेली असतात, नाक्यानाक्यावर टेलिफोनचे व आइसस्क्रिमचे बूथ असतात तसेच मुलासाठी पुस्तके आणि नियतकालिके विकणारी बूथ्स असतात.

आम्ही रस्त्यावरच्या बाबागाड्यातील मुले पहात असता ती मुले पट्ट्याला हिसका मारून उड्या मारू पहात होती पण पट्टा व गाडी दोन्ही भक्कम होती एक-दोन आया आतून आल्या गाडी ढकलीत निघाल्या वाट पहाणाऱ्या मुलाला बक्षिस म्हणून त्यानी एकेक पाव दिला मोठ्याशा कवडीच्या आकाराचा मुठीसारखा तो पाव होता असे पाव ही इकडली स्पेशालिटी होती आमच्या ग्रुपला हे पाव आवडत मला मात्र स्लाईसचा पाव बरा वाटे हे गोल पाव कडक असत ते मूल मात्र तो पाव आनंदाने खात होते ही पावाची तिकडली उची क्वालिटी होती मला वाटते, खादीच्या बाबतीत आमच्या देशात खूपच चंगळ आहे याच दुकानाच्या पुढे जर्मनीने स्वत बाधलेले भव्य असे इटरनॅशनल ट्रेड सेंटर आहे या रस्त्याला नियतकालिकांची ऑफिसे, प्रकाशन सस्था व पुस्तकांची दुकाने खूपच होती येथे मेडिकल युनिव्हर्सिटी हॉस्पिटल होते याच्या बाहेर धनुष्यबाण घेतलेल्या माणसाचा पुतळा होता याचा अर्थ डॉक्टर हा औषधाच्या बाणाने रोग्याच्या शत्रूला (रोगाला) मारणारा आहे दुसऱ्या हॉस्पिटलशी रोग हा चवताळलेले जनावर दाखविले होते आणि डॉक्टर त्याच्याशी ऑपरेशनच्या सुऱ्याने लढतो आहे असे दाखविले होते

लहान मुले घेऊन बाजारहाट करणारे पुरुषही दिसले येथे लिडन ट्रीची राई दिसली. याच्या फुलाना वास येत होता याचे मला आश्चर्य वाटले मी ऐकले होते युरोपमधे सुगध देणारी झाडे नाहीत परतु लिडन ट्रीला सुवास होता. या पुढल्या भागात परदेशी वकिलाती लागल्या त्याच्यापुढे बर्लिनच्या भिंतीचा एक जुना दरवाजा पाहिला. म्हणजे मूळ

कमान जुनी होती भिंत तिला बांधून पुढे गेली आहे या कमानीवर ग्रीक पद्धतीची नक्षी व पुतळे आहेत चार घोड्याच्या रस्त्यावरून डायना (उषा) ही देवता पूर्वेकडून येत आहे. या पुतळ्याना सुरेख निळा रंग होता ह्या कमानीच्या पार्श्वभूमीवर फोटो काढला आले. येथून पुढे ऑपेरा हाऊस लागले ही इमारत साफ पडली होती ती पुन्हा तशीच बांधली आहे त्यावेळच्या बांधकाम पद्धतीनेच मात्र रशियाखेरीज इकडील तीन देशात युद्धाच्या पडझडीचे अवशेष तसेच ठेवलेत त्याप्रमाणे मूळच्या पडक्या भागाचा एक तुकडा (वाचला होता तेवढा) गिलावा न करता सहाराची कल्पना येण्याकरता तसाच ठेवला होता ॲकाडमी ऑफ सायन्स ही इमारत फार महत्त्वाची मानतात ती किल्ल्याप्रमाणे बांधलेली आहे त्याचबरोबर सतराव्या शतकात ह्यूगोनॉटस् ह्याने बांधलेला किल्ला मात्र पडला आहे चक्क जळलेल्या दोनतीन इमारती तशाच ठेवलेल्या दिसल्या

यानंतर निकोलाईट चर्च लागले या चर्चच्या आतबाहेर गाईडने मला फिरवून आणले हे चर्च म्हणजे भग्न वास्तू होती एकेकाळच्या बर्लिनमधले हे जुने मोठे चर्च ! दुसऱ्या महायुद्धात जर्मनांचा पराभव होऊ लागला चारही बाजूने चार देशाची सैन्ये जर्मनांचा पाडाव करण्यासाठी चालून आली भयंकर बॉम्बवृष्टी झाली त्यावेळी सर्वच जर्मन नागरिक नाश पावू नयेत, निदान पुढली पिढी तरी वंशसातत्यासाठी उरावी म्हणून घाई-घाईने लहान मुलांना गोळा करून त्या मुलांना चर्चमधे ठेवले तसे हे चर्च मोठे आहे आमच्या बसमधे ज्या दोन तरुण गाईड मुली होत्या त्यांच्याखेरीज आज एक प्रौढ सिनीयर गाईड आली होती ह्या गाईडने सांगितले की,

'मी त्यावेळेला चौदा वर्षाची होते तेव्हा रोजच युद्ध चालायचे, आमचे शिक्षण व इतर रोजची कामेही काहीच धड चालत नव्हती युद्धाच्या शेवटी आमचे फार हाल झाले. जिंकायला आलेले सैन्य फार क्रूरपणे वागले त्यांनी स्त्रियांना वाईटपणे वागवले त्या वेळेला अमेरिकन सैनिकांनी या चर्चवर रेडक्रॉसची खूण असूनसुद्धा, आणि पांढरा क्रूस रंगविलेला असूनसुद्धा, निर्दय बॉम्बवृष्टी केली त्या अग्नीत तीन हजार बालके मृत्यू पावली, आणि ह्या चर्चचा विध्वंस झाला ह्या चर्चचा आता फक्त एक भग्न अवशेष उरलेला आहे ' आल्टर व त्याच्या मागील भिंत अन् कळसापर्यंतची दुसऱ्या मजल्यावरची त्रिकोणी भिंत हे उभे आहे जळक्या लाकडी चौकटीने काळचा पडलेल्या विटांच्या अर्धवट भिंती आहेत. आणि तीनही बाजूच्या तळमजल्यावरचे स्तंभ आणि कमानी एवढेच फक्त आहे वरती छप्पर आकाशाचेच उरले आहे त्या भग्न वास्तूच्या मधोमध मी जड अंतःकरणाने उभी होते मला त्या मातीमधे सांडलेले रक्ताचे पाट जाणवत होते शेकडो बालकांच्या आर्त किंकाळ्या आणि त्यांच्या मातांचे हुंदके तीन तपानंतरही जाणवत होते युद्धामधे ह्या कोवळ्या जिवांचे बळी घेऊन ह्या सत्ताधाना काय मिळते ?

ती प्रौढ गाईड ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन सैन्याचा क्रूरपणा सांगत होती त्याच-

वेळी उरलेल्या अर्ध्या बर्लिनमधे (पश्चिम बर्लिनमधे) वेगळ्या राजवटीखाली असलेल्या जर्मन देशाची एखादी गाईड तेथील एखादी उध्वस्त इमारत दाखवून तिकडल्या टूरिस्टना काय सांगत असेल ? ती बहुधा रशियन सैन्य किती क्रूर होते, त्यांनी जर्मन देशाचा किती नाश केला, आणि हे शहर जिंकताना त्यांच्या पलटणी जेव्हा विजयाने गावात फिरल्या तेव्हा त्यांनी जर्मन स्त्रियांवर किती शारीरिक अत्याचार केले हे सांगत असेल ।

मीही त्यावेळी वृत्तपत्र वाचण्याइतकी जिज्ञासू शाळकरी पोर होते. आमच्याकडे वाड्यातील सर्व पुरुष रोज जमून वृत्तपत्रांतील आणि रेडिओवरील बातम्यांची चर्चा करीत, तेव्हा गाईडचे ऐकून मला असे वाटले की, ह्या युद्धाचे मूळ कारण हिटलरची साम्राज्य-तृष्णा हे होते त्याला आळा घालण्याच्या निमित्ताने दोस्त राष्ट्रांनी युद्धात भाग घेऊन आपापले सामर्थ्य अजमावले व इतरांना जाणवून दिले या सत्तेच्या संग्रामात सर्वच देशांना हानी सोसावी लागली (म्हणजे युद्ध करणाऱ्या देशाना). जर्मनीवर शेवटचा टोला देऊन विजयाचे श्रेय घेण्यासाठी एका बाजूने इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांचे संयुक्त सैन्य कूच करत होते आणि दुसऱ्या बाजूने रशियाचे सैन्य

थोड्याशा आगेमागे चारही देशानी बर्लिनला तडाखा लगावला आहे त्या विध्वं-साचे खापर या चारही देशांवर फोडले पाहिजे रशियन सैन्याने तेथील स्त्रियांवर अत्या-चार केल्याचे मी स्वत वाचले आहे पुढे ड्रेसडेनला तीन हजार लोक एका रात्रीत ठार करून त्या शहराचा विध्वंस स्वत नाझींनीच केला असे तेथे कळले आपले सुंदर शहर शत्रूला जसेच्या तसे मिळू नये म्हणून पराभव होताना जित सैन्य तेथील धान्याचे साठे जाळते आणि पूल व शहराचा स्वत च विध्वंस करते

जर्मन राष्ट्र आणि समृद्ध बर्लिन शहर कुठल्याही शत्रूला मिळू नये म्हणून खुद्द नाझी सैन्यानेदेखील विनाशाला हातभार लावला असेल निदान विजयी राष्ट्रांनी सर्वां-नीच नासधूस केली होती फक्त पूर्व जर्मनवासी इंग्लंड अमेरिकेच्या सैन्याने नाश केला म्हणत असतील तर पश्चिमेत रशियाकडे बोट दाखवित असतील यानंतर आम्ही इंडो-जर्मन फ्रेंडशिप सोसायटीत गेलो या सोसायटीच्या अध्यक्षा एक कर्तबगार स्त्री होत्या सव्वासहा फूट उंचीच्या तरतरीत व आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या या प्रौढेने आमचे स्वागत केले दसऱ्यानिमित्त आम्हीही छानशा मूडमधे होतो तिथे आमच्यापैकी एकाने युद्धानंतर राहत्या घरांचा प्रश्न कसा सोडवला ? असा प्रश्न केला उपाध्यक्ष म्हणाले,

हा प्रश्न देशाने सामाजिक निकडीचा म्हणून हाताळला त्यात आम्ही माणसांचे हक्क राखले आमच्या गृहनिर्माणाचे काम १९९० मध्ये संपेल, अशी अपेक्षा आहे युद्ध संपल्यावर झपाट्याने बांधकामे केली मनुष्यबळ अपुरे होते स्त्री–पुरुष सर्व आपापली आठ तासांची नोकरी पुरी करीत घरी आल्यावर डिनर घेऊन लगेच सार्वत्रिकरित्या चाल-

लेल्या घरबांधणीच्या कामाला ते जात मंत्र्यापासून तो स्त्रियापर्यंत सर्व थराच्या लोकांनी घरे बांधली

घरे देताना मूल नसलेल्या जोडप्याला वन रूम किचन देतात व नंतर मुलाच्या प्रमाणात जास्त मुले त्याला जास्त खोल्या देतात दरमहा दोन हजार मार्कपेक्षा जास्त उत्पन्न असणारे लोक स्वत.च छोटेसे घर बाधतात'

सामुहिक शेतीबद्दलच्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले की, ' शेतीमध्ये शोषण नसते प्रत्येकजण आपापल्या मर्यादित शेतीचा मालक असतो यत्राच्या आणि कामाच्या सोईसाठी ते शेती करताना सहकार्याने काम करतात आमच्या इथे अशा तऱ्हेची को–ऑपरेटिव्ह शेती आहे'

मी तेथील अध्यक्षाबाईंना विचारले की, ' घटनेने दिलेले समान हक्क तुमच्या देशात स्त्रियांना प्रत्यक्षात मिळतात का ?'

त्या म्हणाल्या,

' कागदावरील समान हक्कापेक्षा आम्ही प्रत्यक्षात ते आधी भोगले कारण देशाला आम्हा स्त्रियांच्या कर्तृत्वाची गरजच पडली आमच्याकडे पूर्वी स्त्रिया शिकलेल्या होत्या परंतु त्या तीन 'के' मध्ये अडकून पडल्या होत्या ते तीन 'के' म्हणजे किचन, किंडर (जर्मन भाषेत किंडरचा अर्थ–मुले) आणि ख्रिस्त (म्हणजे आपल्याप्रमाणेच चूल, मूल व देवधर्म) त्यावेळी आम्ही वेगवेगळ्या ऑर्गनायझेशन्स काढून चळवळ करीत होतो 'वुमेन्स फेडरेशन ऑफ जी डी आर' ही सस्था असाच प्रयत्न करीत होती अखेर आम्हाला समान हक्क परिस्थितीने दिले आणि आमच्या कर्तबगारीने आम्ही ते टिकवले दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देशातील सर्व पुरुष एक तर युद्धावर किंवा युद्धोत्पादन कारखान्यातून काम करीत होते

सब नागरी आघाड्या स्त्रियांनीच सांभाळल्या त्यांनी बस ड्रायव्हरपासून ते छोट्या कारखान्यापर्यंत सर्वत्र नोकऱ्या केल्या स्त्रीशिक्षण आमच्याकडे पूर्वीही होते परतु लग्नानतर फारशा स्त्रिया नोकरी करत नसत स्त्रियांची कार्यक्षेत्रे तोवर मर्यादित होती या महायुद्धाने स्त्री सर्व ठिकाणी जबाबदारीने काम करू शकते असे सिद्ध झाले अशा प्रकारे स्त्रीने हक्कांसाठी झगडून जे मिळाले नाही ते सर्व स्वातंत्र्य, नोकरीने तिला दिले स्त्रीनेही पुरुषांचा विश्वास कमावला युद्ध चालू असताना देशातील पुरुष धारातीर्थी पडत गेले काही शत्रूचे कैदी झाले युद्ध सपले त्यावेळी देशाच्या लोकसंख्येत पुरुष फारच कमी उरले स्त्रिया व मुलेच जास्त होती पुरुषाच्या सातपट बायका देशात उरल्या अशावेळी युद्धात विध्वस झालेल्या देशाची पुन्हा उभारणी करण्याचे काम सर्वस्वी स्त्रियाना करावे लागले. सर्व प्रकारची कामे आणि तीसुद्धा दिवसाचे १४–१५ तास त्यांनी केली मुलांना नर्सरीच्या हवाली करून जेवण बाहेरच घेऊन त्यांनी बौद्धिक व शारीरिक असे दोन्हीही कष्ट घेतले

घोडवयात, त्या काळात स्त्रियांच्या अपार कष्टामुळे देश पुन्हा उभा राहिला देश-प्रेम, त्याग आणि चोख काम या तिच्या गुणाची प्रचीति ह्यावेळी आली 'वुमेन्स फेडरेशनने' स्त्रियाच्या हक्कासाठी झगडून मिळवले असते त्यापेक्षा कितीतरी अधिक हक्क, श्रेष्ठत्व आणि स्वातंत्र्य तिला ह्या कर्तबगारीमुळे मिळाले आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आलेली ही स्त्री आता परत चूल, मूल, देवधर्म यात गुतून पडत नाही

अध्यक्षाबाईंच्या या भाषणानतर उपाध्यक्ष महाशय म्हणाले,

'अहो, आम्ही काय आता या बायकांना बंधनात ठेवणार आणि हक्क नाकारणार? स्त्रिया आता कौन्सिलर्स, मॅनेजर्स, वकील, डॉक्टर्स आणि इजिनियर्स, मेयर्स अशा सगळ्या जागी काम करताहेत. त्यांच्या वर्चस्वामुळे आमचे हक्क कमी होऊ नयेत म्हणून आम्हा-लाच तुमच्या महिलामडळासारखी पुरुषमडळे काढावी लागणार आहेत'

आम्ही सर्वच हसलो आणि अध्यक्षाबाईंनी उपाध्यक्षाला एक बारीकशी टप्पल मारली आमच्या ग्रुपमधल्या काहीजणांना फ्रेंडशिप् सोसायटीशेजारच्या पडक्या चर्चसमोर फोटो काढायचा होता तेव्हा त्या आमच्याबरोबर उभ्या राहिल्या परतु त्यांचे डोके कॅमे-ऱ्याच्या बाहेर जाऊ लागले कारण त्या ६। फूट उंच होत्या शेवटी त्या गुडघे टेकून बसल्या

त्या दिवशी दुपारी विजयादशमीचे सीमोल्लघन करावे अशा इराद्याने बर्लिनची सीमा ओलांडण्यास मोठ्या उत्साहाने सर्वजण निघालो गाईडसनी आम्हाला बर्लिनच्या भिंतीमधील अधिकृत प्रवेशद्वाराशी सोडले आणि बस पाच वाजता येईल असे सागून त्या निघून गेल्या

आज बाहेर ऊन होते तरी थडी भयकर वाजली आजपासून युरोपचे घड्याळ एक तास पुढे सरकवले म्हणजे सकाळी सहाला सातवर काटे सरकावले हिवाळी सहा महिने घड्याळ असे पुढे ठेवतात कारण तेथे उशीरा उगवते व लवकर मावळते त्यामुळे संध्या-काळी लवकर घरी यावे लागते यासाठी दरेक ऑफिसच्या कामाच्या वेळा न बदलता घड्याळच पुढे सरकवतात बर्लिनच्या भिंतीशी आमचे पासपोर्ट घेऊन ठेवले परतु जाण्याचा पास चटकन् देईनात इतर लोक भराभरा येत पासपोर्ट देऊन गेटपास घेऊन जात आमच्या पासपोर्टचे चेंगटपणे काम चालू राहिले त्यातच एका माणसाचा पासपोर्ट आणा-यचा राहिला त्यावर आम्ही सांगितले की,

'त्याना इथेच राहूद्यात आम्ही उरलेले जाऊन येतो'

तर ते मानेनात, त्यांनी फोन करून इंग्लिश बोलणाऱ्या अधिकाराला बोलावले असावे दुसरे म्हणजे पासपोर्ट घेऊन काऊटरवरची बाई पासपोर्टमधील चेहरा व ती व्यक्ती ही एकच आहेत अशी खात्री करून घेत असताना आमच्या डावीकडील कोपऱ्यात लक्षात न येण्यासारखा एक स्वयचलित कॅमेरा होता ती बाई फोटो ताडून पहात असताना त्या

ल्हेया घरबांधणीच्या कामाला ते जात मन्यापासून तो स्त्रियापर्यंत सर्व थराच्या लोकांनी घरे बांधली

घरे देताना मूल नसलेल्या जाडप्याला वन रूम किचन देतात व नंतर मुलाच्या प्रमाणात जास्त मुले त्याला जास्त खोल्या देतात दरमहा दोन हजार मार्कपेक्षा जास्त उत्पन्न असणारे लोक स्वतःच छोटेसे घर बांधतात '

सामुहिक शेतीबद्दलच्या प्रश्नाला त्यानी उत्तर दिले की, ' शेतीमध्ये शोषण नसते प्रत्येकजण आपापल्या मर्यादित शेतीचा मालक असतो यंत्राच्या आणि कामाच्या सोईसाठी ते शेती करताना सहकार्याने काम करतात आमच्या इथे अशा तऱ्हेची को-ऑपरेटिव्ह शेती आहे '

मी तेथील अध्यक्षाबाईंना विचारले की, ' घटनेने दिलेले समान हक्क तुमच्या देशात स्त्रियांना प्रत्यक्षात मिळतात का ?'

त्या म्हणाल्या,

' कागदावरील समान हक्कापेक्षा आम्ही प्रत्यक्षात ते आधी भोगले कारण देशाला आम्हा स्त्रियांच्या कर्तृत्वाची गरजच पडली आमच्याकडे पूर्वी स्त्रिया शिकलेल्या होत्या. परंतु त्या तीन ' के ' मध्ये अडकून पडल्या होत्या ते तीन ' के ' म्हणजे किचन, किंडर (जर्मन भाषेत किंडरचा अर्थ-मुले) आणि क्रिस्त (म्हणजे आपल्याप्रमाणेच चूल, मूल व देवधर्म) त्यावेळी आम्ही वेगवेगळ्या ऑर्गनायझेशन्स काढून चळवळ करीत होतो ' वुमेन्स फेडरेशन ऑफ जी डी आर ' ही संस्था असाच प्रयत्न करीत होती अखेर आम्हाला समान हक्क परिस्थितीने दिले आणि आमच्या कर्तबगारीने आम्ही ते टिकवले दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देशातील सर्व पुरुष एक तर युद्धावर किंवा युद्धोत्पादन कारखान्यातून काम करीत होते

सर्व नागरी आघाड्या स्त्रियांनीच सांभाळल्या त्यानी बस ड्रायव्हरपासून ते छोट्या कारखान्यापर्यंत सर्वत्र नोकऱ्या केल्या स्त्रीशिक्षण आमच्याकडे पूर्वीही होते परंतु लग्ना-नंतर फारशा स्त्रिया नोकरी करत नसत स्त्रियांची कार्यक्षेत्रे तोवर मर्यादित होती या महायुद्धाने स्त्री सर्व ठिकाणी जबाबदारीने काम करू शकते असे सिद्ध झाले अशा प्रकारे स्त्रीने हक्कांसाठी झगडून जे मिळाले नाही ते सर्व स्वातंत्र्य, नोकरीने तिला दिले स्त्रीनेही पुरुषांचा विश्वास कमावला युद्ध चालू असताना देशातील पुरुष धारातीर्थी पडत गेले काही शत्रूचे कैदी झाले युद्ध संपले त्यावेळी देशाच्या लोकसंख्येत पुरुष फारच कमी उरले स्त्रिया व मुलेच जास्त होती पुरुषांच्या सातपट बायका देशात उरल्या अशावेळी युद्धात विध्वस्त झालेल्या देशाची पुन्हा उभारणी करण्याचे काम सर्वस्वी स्त्रियांना करावे लागले सर्व प्रकारची कामे आणि तीसुद्धा दिवसाचे १४-१५ तास त्यांनी केली मुलांना नर्सरीच्या हवाली करून जेवण बाहेरच घेऊन त्यांनी बौद्धिक व शारीरिक असे दोन्हीही कष्ट घेतले

थोडक्यात, त्या काळात स्त्रियांच्या अपार कष्टामुळे देश पुन्हा उभा राहिला देश-प्रेम, त्याग आणि चोख काम या तिच्या गुणांची प्रचीति ह्यावेळी आली 'वुमेन्स फेडरेशनने' स्त्रियांच्या हक्कासाठी झगडून मिळवले असते त्यापेक्षा कितीतरी अधिक हक्क, श्रेष्ठत्व आणि स्वातंत्र्य तिला ह्या कर्तबगारीमुळे मिळाले आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आलेली ही स्त्री आता परत चूल, मूल, देवधर्म यात गुतून पडत नाही

अध्यक्षाबाईंच्या या भाषणानतर उपाध्यक्ष महाशय म्हणाले,

'अहो, आम्ही काय आता या बायकांना बधनात ठेवणार आणि हक्क नाकारणार ? स्त्रिया आता कौन्सिलर्स, मॅनेजर्स, वकील, डॉक्टर्स आणि इजिनियर्स, मेयर्स अशा सगळ्या जागी काम करताहेत त्याच्या वर्चस्वामुळे आमचे हक्क कमी होऊ नयेत म्हणून आम्हा-लाच तुमच्या महिलामडळासारखी पुरुषमडळे काढावी लागणार आहेत'

आम्ही सर्वच हसलो आणि अध्यक्षाबाईंनी उपाध्यक्षाला एक बारीकशी टप्पल मारली आमच्या ग्रुपमधल्या काहीजणाना फ्रेंडशिप् सोसायटीशेजारच्या पडक्या चर्चसमोर फोटो काढायचा होता तेव्हा त्या आमच्याबरोबर उभ्या राहिल्या परतु त्याचे डोके कॅमे-ऱ्याच्या बाहेर जाऊ लागले कारण त्या ६। फूट उच होत्या शेवटी त्या गुडघे टेकून बसल्या

त्या दिवशी दुपारी विजयादशमीचे सीमोल्लघन करावे अशा इराद्याने बर्लिनची सीमा ओलांडण्यास मोठ्या उत्साहाने सर्वजण निघालो गाईडस्नी आम्हाला बर्लिनच्या भितीमधील अधिकृत प्रवेशद्वाराशी सोडले आणि बस पाच वाजता येईल असे सांगून त्या निघून गेल्या

आज बाहेर ऊन होते तरी थंडी भयंकर वाजली आजपासून युरोपचे घड्याळ एक तास पुढे सरकवले म्हणजे सकाळी सहाला सातवर काटे सरकावले हिवाळी सहा महिने घड्याळ असे पुढे ठेवतात कारण तेथे उशीरा उगवते व लवकर मावळते त्यामुळे संध्या-काळी लवकर घरी यावे लागते यासाठी दरेक ऑफिसच्या कामाच्या वेळा न बदलता घड्याळच पुढे सरकवतात बर्लिनच्या भितीशी आमचे पासपोर्ट घेऊन ठेवले परतु जाण्याचा पास चटकन् देईनात इतर लोक भराभरा येत पासपोर्ट देऊन गेटपास घेऊन जात आमच्या पासपोर्टचे चेंगटपणे काम चालू राहिले त्यातच एका माणसाचा पासपोर्ट आणा-यचा राहिला त्यावर आम्ही सांगितले की,

'त्याना इथेच राहूद्यात आम्ही उरलेले जाऊन येतो'

तर ते मानेनात, त्यांनी फोन करून इंग्लिश बोलणाऱ्या अधिकाऱ्याला बोलावले असावे दुसरे म्हणजे पासपोर्ट घेऊन काऊटरवरची बाई पासपोर्टमधील चेहरा व ती व्यक्ती ही एकच आहेत अशी खात्री करून घेत असताना आमच्या डावीकडील कोपऱ्यात लक्षात न येण्यासारखा एक स्वयचलित कॅमेरा होता ती बाई फोटो ताडून पहात असताना त्या

कॅमेरातून तिला प्रत्येकाच्या फोटोची ताजी प्रत मिळत असावी आणि हे खरे असावे असे नंतर मग बऱ्याच जणांनी सांगितले

थोडावेळ आत, थोडावेळ बाहेर असे आम्ही लोक ताटकळत होतो तिथून बर्लिन-मध्ये जाण्यासाठी दुहेरी भिंत घातली होती टुरिस्ट बसेस् बाजूच्या रस्त्याने येत होत्या आणि मोटर कार्ससाठी जो रस्ता होता त्याला तीन वळणे घ्यावी लागतील अशा तऱ्हेने दोन भिंती डावीकडून आणि तीन उजवीकडून अशा भिंती बांधल्या होत्या गुरे येऊ नयेत म्हणून आपल्याकडील पार्कमध्ये झिगझॅगसारखी दारे असतात तशाप्रकारच्या या वेलांट्या होत्या

हे सर्व आम्ही बघत असता एकीकडे लोकसभेच्या येत्या निवडणूकाबद्दल काहीजण मोठमोठ्याने चर्चा करत होते हे चुकले असे मला वाटते गुपचूप गेटपासेस पदरात पाडून घ्यायला हवे होते बऱ्याच वेळाने मी आत जाऊन पाहिले तर सक्सेना ताटकळत उभा मी व तासकरांनी काउंटरवरच्या लोकांशी जर्मनीत बोलून विचारले पण ते लक्षच देत नव्हते पुन्हा बाहेर आले बाहेर व्होरा वगैरे म्हणत होते, "लोक बर्लिन पाहून परतलेसुद्धा आपण आता काय आणि केव्हा बघणार ?" मी म्हटले,

'आपण टॅक्सी करून १५ मिनिटे तरी बर्लिनमध्ये चक्कर मारूया'

तेवढ्यात एक जीप आली त्यातून एक स्त्री व पुरुष उतरले ते बहुधा पोलिस आणि दुभाष्ये असावेत आता त्यांनी आत जाऊन इंग्लिशमध्ये सांगितले की, 'तुमचे पास-पोर्ट बरेच आहेत तपासायला वेळ लागेल'

अशा आत-बाहेर खेपा चालू असताना सूर्य झपाट्याने उतरत होता आणि आमचे चेहरेही अखेर पुढारी मंडळींसह सर्वांनी विचारले तेव्हा त्या दुभाष्या बाईने सांगितले,

'तुमचे फोटो व चेहरे जमत नाहीत'

मी यावर जरा बोलले की, 'हे कसे शक्य आहे ? आतापर्यंत सर्व ठिकाणी चेकर्सनी अडविले नाही आणि आताच चेहरे वेगळे कसे दिसू लागले ?'

त्यावर ती म्हणाली, 'सांगते' आणि तिने नावांमध्ये चुका कोणाकोणाच्या आहेत ? फोटो कुणाकुणाचे जमत नाहीत ते सांगितले व्हिसा देणाऱ्याने हे सर्व करून ठेवले होते त्याने नावे आणि सक्षेप उलटसुलट केले होते तेवढ्यामध्ये त्या बाईने विचारले,

'हू इज धिस आशार्या ? त्यांचा फोटो चेहऱ्याशी जमत नाही'

मी थक्क पडले ! आणि इतरांना मला चिडवण्यास संधी मिळाली माझा तर फोटो अलीकडचाच होता आणि चेहऱ्यात बदल मुळीच झाला नव्हता मग तो जमत नाही ? हे निमित्तच असावे

असे घोळ चालू असताना साडेचार वाजून गेले आता जाऊन येणे शक्य नव्हते म्हणून आम्ही पासपोर्ट परत मागितले रस्त्यावर येऊन बसची वाट पहात बसलो आत

चावरे वारे सुटले थंडीने अंग कापू लागले शेवटी एका हॉटेलांत कॉफी घेत बसची वाट पहाण्याखेरीज इलाज उरला नाही

खरीखुरी दिसणारी सरहद्द (सीमा) ओलांडता आली नाही. मात्र आता बर्लिन पूर्वेची सीमा ओलांडून ड्रेसडेनला निघायचे होते हा संध्याकाळचा प्रवास तसा सुखद होता बसमधून सुरवातीला बर्लिनची भिंत दिसली मग गावाबाहेरची राखीव जंगले आणि क्वचित एखादे गाव दिसे अजूनही इथे दाट लोकवस्ती नाही ड्रेसडेनच्या वाटेवर पुन्हा चंद्राकडे लक्ष गेले बार्सीला उभ्या कलिंगडाच्या खापीइतका चंद्र दिसला होता आज तो जरा कलता वाटला म्हणजे आपण वीत उघडल्यावर दिसतो तसा थोडा तिरपा. ड्रेस-डेनला जाताना बुले वॉर्ड रोड होता त्याला ऑटोबॉन म्हणतात दुतर्फा छान झाडी लागत होती मोठेमोठे रिकामे माळ आणि शेतेही होती वाटेमध्ये मोटेल लागले तेथे चहापाण्या-साठी गेलो तेथे मस्त कॉफी मिळाली आपल्या हाताने कॉफीचे काळे पाणी घ्यायचे व त्यात साखरेच्या विटा आणि एका पिंपातील दूध हवे तेवढे टाकायचे दूध मात्र थंड असते. जेवतानासुद्धा ग्लासात दूध मागितले तर ते थंडच येते तर कॉफी पिऊन बर्लिन भिंती-जवळचा मनस्ताप विसरून जरा तरतरी येते तोच कळले की, येथे एक बस फेल झाली आहे तेव्हा नादुरुस्त बसमध्ये सर्वांचे सामान टाकले आणि चालणाऱ्या बसमध्ये बसून सर्वजण निघालो सामान जवळ नसल्यामुळे हॉटेलमध्ये न जाता प्रथम जेवणासाठी दुसऱ्या कॅफेमध्ये जावे लागले आम्हाला जिथे खोल्या मिळाल्या होत्या त्या हॉटेलमध्ये जेवणा-खाण्याची सोय नव्हती बर्लिनप्रमाणेच हेही पाश्चात्य धर्तीचे मेस होते येथे जेवत असताना वादक ऑर्केस्ट्रा वाजवीत होते तीन कोर्सेसच्या या जेवणात दर कोर्सनंतर एकगायक जोरजोरात गायचा वाद्ये जोर करायची आणि पाश्चात्य स्त्री–पुरुष नाचायला लागायचे आमच्याबरोबरच्या विशीमधल्या तरुण गाईड्स् आमच्या बसच्या ड्रायव्हरबरोबर नाचल्या

मी एकीला विचारले, ' तू कॉलेजमध्ये डिग्री घेऊन पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सला इंग्लिश घेतले आहेस. उद्या तू चांगली प्रोफेसर होशील तू ह्या ड्रायव्हरबरोबर कशी काय नाचलीस ?'

तिने सांगितले, ' सोशालिस्ट देशात कोणतेही काम हलके समजत नाहीत आमच्या घटनेने सर्व नागरिक समान दर्जाचे आहेत ( ही तत्त्वे आमच्याही घटनेत आहेतच की, पण अजूनही आम्ही घराणें, जात, पैसा यांची उच्चनीचता मानतोच ) आणि घटकाभर मजा करताना एवढा विचार कशाला करायला हवा ? जेवता जेवता धुंद होऊन थोडे नृत्य केले त्यात क्षणापुरता विचार करायचा आम्हा युद्धमग्न देशात आम्ही आली घडी मजेत घालवतो त्याग आणि कष्टाची वेळ येईल त्यावेळी त्याग आणि कष्टही करतो '

मी तिचे म्हणणे मानले

मध्यरात्रीनंतर कुणीतरी दार ठोकले आमची दुसरी बस दुरुस्त होऊन रात्री केव्हा-तरी आली असावी सर्व बॅगा फूटपाथवर ठेवून ड्रायव्हर गेला होता. रात्री कित्येक तास

साठ–सत्तर बॅगा आतील मौल्यवान सामानासह फूटपाथवर पडून होत्या गाईड ' डोन्ट वरी ' असे म्हणाली होती तरी आम्ही एकमेकाना उठवून सर्वांनी बॅगा वर आणल्या कुणाचे तरी लक्ष गेल्यामुळे बॅगा पहाटे वर आणल्या परंतु त्या सकाळपर्यंत राहिल्या असत्या तरी हरवत नव्हती असे गाईड म्हणाली

खरोखरच सर्वांच्या सर्व वस्तू सुरक्षित होत्या या सोव्हिएट आणि सोशॅलिस्ट देशामधे प्रामाणिकपणा व खाण्याजोगा आहे आम्ही हॉटेल सोडल्यानंतर तावडतोब चाव्या घेऊन हॉटेल नोकराणी खोल्यात शिरत. मला वाटले त्या हॉटेलची प्रॉपर्टी सुखरूप आहे का बघत असतील परंतु त्या आमच्या राहिलेल्या वस्तूही प्रामाणिकपणे आणून देत आमच्यातील एका गृहस्थाचा पासपोर्ट चक्क हरवला तो बस ड्रायव्हरने स्पुटनिक संस्थेच्या हवाली केला आणि संस्थेने तो तात्काळ पुढल्या मुक्कामावर पाठवून दिला यात प्रामाणिकपणा, दुसऱ्याची कदर तशीच पोस्टाची त्वरित सेवा या सर्वांचा चांगला अनुभव आला याशिवाय आणखी एक प्रशंसनीय गुण म्हणजे हॉटेलमधल्या नोकरानी बक्षिसी मागितली नाही आणि घेतली ही नाही पासपोर्ट शोधून देणाऱ्या ड्रायव्हरनेही बक्षिसी नाकारली हे चित्र किती वेगळे आहे !

सकाळी ड्रेसडेनमधे फिरायला निघालो आपल्याकडे जसे दर गावात काही नसले तरी देऊळ पहाण्यासारखे असते तशी इथे चर्चेस जागजागी असतात सुरुवातीलाच दोन चर्चेस दिसली एकावर खूप मोठा सोन्याचा क्रूस होता तर दुसऱ्यावर शेकडो किलो वजनाचा एका बाईचा हुबेहुब पुतळा होता एवढे सोने ! अन् ते उघड्यावर ! भोवती खडा पोलिसपहाराही नव्हता

' हे सोने चोरीला कसे जात नाही ?' मी ओरडले कोणीतरी म्हणाले, ' ते निमुळत्या सुळक्यावर आहे म्हणून '

श्री व्होराजी म्हणाले,

' आचार्यबाई, तुम्हाला हा सोना पाहिजे काय ? रात्री एक हेलिकॉप्टर भाड्याने घ्यावा हातात हातोडा घ्या अन् हेलिकॉप्टरमधून दोन चार टोले देऊन पुतळा उपटून घेऊन जावा '

मी म्हटले,

' प्लॅन योग्य आहे फक्त हेलिकॉप्टरचे भाडे देण्यासाठी पैसे नाहीत एवढाच बाधा आहे '

गावामधून ज्या इमारती दिसल्या त्या रशियाप्रमाणेच मूळ सिमेंटच्या रंगाच्या आणि काही मळकट पिवळ्या रंगाच्या होत्या

जर्मन फ्रेड्रीक द ग्रेट याचा एक जुना राजवाडा अजूनही तसाच राखलेला होता त्या भोवतालचा खदक अजूनही पाण्याने भरलेला होता ह्या ड्रेसडेन गावामधून एल्बा नदी वहाते हे नाव नेपोलियनच्या नावाशी निगडित आहे. ड्रेसडेन शहराला एल्बा नदीमुळे

आणि मधेमधे राखलेल्या झाडीमुळे फार रम्यत्व आले आहे तसे हे शहर ५०० वर्षा-पूर्वीच जन्मले आहे परंतु येथे मोठ्या मोठ्या उलाढाली झाल्या १९१८ पर्यंत राजेरजवाडे लोकांची येथे गजबज असे येथील अनेक वाडे व प्रासाद त्यांनी बांधलेले आहेत त्यात ते रहातही असत

गेल्या शतकात येथे मोठमोठे उद्योगधंदेही निघाले त्यावेळी व अजूनही येथे समृद्ध विद्यापीठ आहे येथे संस्कृतीचा ठेवा जतन केला आहे युद्धाच्या सुरवातीच्या काळात या शहराला हिटलरने इजा पोहचू दिली नाही ड्रेसडेनचे त्याने उत्तम रक्षण केले जर्मन साम्राज्याचा प्रचंड विस्तार केल्यानंतर ड्रेसडेन हे शहर हिटलरला कला व संस्कृतीचे माहेरघर म्हणून चांगले जतन करून त्याचा विकास करावयाचा होता

हिटलर युद्धात पराभव पावणार असे त्याला वाटले तेव्हा जर्मनीचे हे अमोल सांस्कृतिक धन इतर राष्ट्रांना आयते मिळू नये म्हणून १३ व १४ फेब्रुवारी १९४५ या दोन दिवसात त्याने शहराचा फार मोठा विध्वंस केला प्रचंड बॉंबवृष्टीमुळे एका रात्रीत पस्तीस हजार लोक मेले सुंदर सुंदर ऐतिहासिक वास्तु धुळीला मिळाल्या १३ फेब्रुवारी १९४५ पर्यंत हिटलरने ड्रेसडेनवर ओरखाडा पडू दिला नव्हता पण शेवटी एक रात्र आणि दोन दिवसांनी इतर गावांची चार वर्षात जी हानी झाली तेवढी हानी याही शहराची झाली अखंड बॉम्बवर्षावाने हिरोशिमा–नागासाकीपेक्षा प्रचंड विध्वस झाला येथील संपूर्ण लोकसंख्या नष्ट केली आता येथे परत शिक्षण व संस्कृतीचे माहेरघर बनविले आहे. त्याबरोबर शहराबाहेर औद्योगिक उपनगरही आहे शहराच्या मधोमध सुंदर उपवने ठेव-ल्याने हवा छान आहे येथील टाऊन हॉलची उंची ३१० फूट आहे आणि त्याच्या कळसावर सोनेरी क्रूस आहे

येथे एका गोल सिनेमागृहापुढे लेनिनचा पुतळा आहे. त्याच्या दोन्ही बाजूला सैनि-कांचे पुतळे आहेत येथील युनिव्हर्सिटीत बावीस फॅकल्टीज् आहेत येथे निरनिराळ्या ५० देशातून आलेली मुले हॉस्टेलमधे रहातात हायस्कूलमधे ३७०० मुले आहेत आणि कॉलेजमधे १६०० आहेत ह्या भागात काही जुन्या पद्धतीची सुंदर घरे दिसली त्यात विटांवर गिलावा लावीत नाहीत तर विटांच्यामधे फक्त चुना लावून विटांची रचना दाखवतात या विटा अर्धवर्तुळाकृती, लंबवर्तुळाकृती, फुलाच्या पाकळ्याप्रमाणे, शंकर-पाळ्याप्रमाणे, अशा वेगवेगळ्या आकृतीने बांधलेल्या असत ह्या लाल आणि पांढऱ्या रंगसंगतीमुळे आणि आकृत्यामुळे ही घरे सुरेख वाटत

येथे पानझडी हंगाम सुरू होत होता पाने गळण्यापूर्वी लाल व पिवळी झाली होती शिवाय गुंजेप्रमाणे फळांचे गुच्छ असलेली ही झाडे रस्त्यामधोमध रांगेने छान दिसत होती. शहरामधोमध असलेले जंगलच वाटावे असा पार्क, झू व बोटॅनिकल गार्डन होते तेथे मुलांसाठी आपल्या फुलराणीसारखी रेल्वे आहे ती ६ कि. मीटर लांब आहे अशीच मुलांसाठी एक मेरीलॅंडही आहे ड्रेसडेनच्या पूर्व भागात टी व्ही टॉवर आहे येथे नदीवर एक जुना पूल

आहे दुसऱ्या महायुद्धात बाकी सर्व पूल नष्ट झाले हा एवढाच पूल उरला याच्या दुतर्फा असलेल्या वसाहती त्या विध्वसामधे नष्ट झाल्या होत्या या वसाहती म्हणजे चार पाच खोल्याची बैठी किंवा एक मजली घरे होती विनाशानतर त्या जागी कॉंक्रीटच्या नव्या उच इमारती न बाधता पुन्हा तशीच चिमुकली टुमदार घरे बांधली जुन्या युरोपियन गावांची चित्रे आपण नेहमी पहातो ही पुन्हा तशीच उभारली आहेत मधोमध नदीच्या पुलावर बस मुद्दाम उभी केली होती नाशिकची पचवटी, माथेरानच्या झाडीतील बगले, यांची आठवण मला झाली ह्या पुलाच्या दुतर्फा लाल छपरवाली, चिमण्याची धुराडी असलेली निळा, पिवळा, गुलाबी रग लावलेली ही घरांची वस्ती अतिशय सुदर दिसत होती

पुलाच्या पलीकडे आलो तेथील टेकडीवर तीन सुरेख किल्ले होते अगदी चित्रे काढावी किंवा फोटो घ्यावे असे दृश्य दिसले विटाचे तट, बुरुज, आतील इमारतीचे अष्टकोनी किंवा गोल उच्च सुळके आणि पार्श्वभूमीला नदी आणि झाडी ! या सुदर किल्ल्यातून हल्ली अनुक्रमे हॉटेल, रेस्टॉरन्ट आणि बालकांची क्रीडानगरी आहे क्रीडानगरी २२५ चौ कि मी आहे हे ऐकून मला लहान होण्याची फार इच्छा झाली

ड्रेसडेनला अभिजात सौंदर्य देणारी ही एल्बा नदी झेकोस्लोव्हाकियामधून उगम पावून येते आणि उत्तरेस नॉर्थ सीला मिळते हिचा काठ कुठेही बांधलेला नाही दुतर्फा हिरवीगार सपाट तृणाच्छादित मैदाने आहेत ही एल्बा नदी खूप सथ वहाते. येथून आम्ही एक कोसळलेले चर्च पाहिले हे मूळ ग्रीक बांधणीचे होते इतरही चर्चेस ग्रीक बांधणीची होती मार्टीन ल्यूथर किंगने ग्रीक चर्चेसची बाधणी बदलून ती जर्मन पद्धतीची केली एका आलिशान टेरेसवर सोनेरी घोड्यावर बसून लढणारी स्त्री–सेनापती दाखविली आहे त्याच्या कळसावर पखांचे देवदूत आहेत दर्शनी भिंतीवर पोर्सिलीनच्या फरशा बसवल्या आहेत त्यावर काळ्या पाढऱ्या रगात रेखाचित्रानी एका राजाची शोभायात्रा दाखविली आहे याही भागात दुसऱ्या महायुद्धाच्या जखमा दाखविणाऱ्या दोन पडक्या इमारती ठेवल्या आहेत रशियामधे कुठेही जुनी जखम ठेवली नाही उरलेल्या तीन देशात मात्र मधेमधे असे ढीग का ठेवलेत हे कळू शकले नाही.

एक म्युझिक हायस्कूल लागले हा जर्मन सम्राटाचा प्रासादच होता तो कोसळल्यावर पुन्हा तसाच बांधला आहे त्याच्या कमानीवर चार घोड्याच्या रथात दोन ग्रीक देवता आहेत व मागे सूर्य आहे योहान राजाचा अश्वारूढ पुतळा आहे हा राजा राजकारणाऐवजी विज्ञानात रस घेई त्याला सात भाषा येत होत्या आणि तो तत्त्ववेत्ता होता त्याची पत्नी अत्यत सौंदर्यवती होती पण त्याचे पुढले कर्तुक ऐकून मी दचकलेच एवढी सुदर पत्नी असणारा हा तत्त्वज्ञानी राजा ! याला म्हणे ३६० मुले होती म्हणजेच इतरही अनेक स्त्रियाशी त्याचे सबध होते म्हणायचे ! उच्च विचार आणि सुंदर पत्नी असूनसुद्धा पुरुषाला आणखी काही हुगायला मिळाले तर तो सोडीत नाही हेच खरे ! यानतर ड्रेसडेनची विख्यात स्विगर पॅलेस आर्ट गॅलरी पाहिली

ड्रेसडेन हे जर्मनीचे मोठे सांस्कृतिक केंद्र असल्यामुळे तेथे शभर संग्रहालये आहेत ! स्विगर गॅलरीचे महत्त्व असे की ती पुरातन स्विगर पॅलेस या वास्तूमधे आहे हा पॅलेस आणि संग्रहालय हे दोन्ही प्रेक्षणीय आहेत सॅक्सन राजाने १७०९ साली हा राजवाडा बांधला याच्या मधल्या चौकात सुंदर कारंजे आहे हा प्रासाद फॅरोस टारीयाक या जर्मन स्थापत्य-विशारदाने बांधला यामधे जर्मन राजे वर्षातील काही दरबार भरवीत उत्सव समारंभ होत. युद्धामधे ड्रेसडेनचा प्रचंड विध्वंस झाला त्यात यालाही झळ पोहोचलीच पण जिद्दी जर्मनांनी तो पुन्हा तसाच बांधला मी या प्रवासात अनेक भव्य वास्तू पाहिल्या अनेक भव्य इमारती पाहिल्या त्याची युद्धात झालेली दुर्दशाही चित्रातून पाहिली आणि त्या पूर्ववत करणारी त्या राष्ट्रांची जिद्द व इतिहासाचा ज्वलंत अभिमान याचे मला कौतुक वाटले. पोलंडसारख्या नष्टप्राय केलेल्या राष्ट्रानेही दीर्घकाळ चिवट प्रयत्न करून आपले सर्व पुरातन वैभव पुन्हा तसेच उभारले या लोकांचा हा जागृत देशाभिमान आणि कठोर परिश्रम आमच्या देशातील लोकांमधे असते तर इंग्रजी अमलापासून ऊनपाऊस खात भग्न होत चाललेली आमची स्फूर्तिशाली ऐतिहासिक स्मारके आम्ही 'पुरातत्त्वखाते काय ते करील !' अशी वाट न बघता स्वयंसेवी वृत्तीने डागडूजी करून कायम ठेवली असती निदान त्यातले दगड उचलून आपल्या घराला लावले नसते राख झालेला राजवाडा पुन्हा उभारणे हे तेच लोक करू जाणोत !

दोनचार किल्ले सोडले तर आमचे किल्ले हे ढिगारे होऊन गेले आहेत. कधी 'एखादे राजकारणी प्रस्थ' किल्ल्याला भेट देण्यास येते त्या वेळेपुरती थोडी डागडुजी होते बाकी सर्व आनंद आहे एखाद्या राजाच्या सिंहासनाच्या जागी एखादा अडाणी माणूस पिचकारी टाकून जातो तर एखाद्या समाधीवर गुरे, शेळ्या, मेंढ्या विधी करतात हर हर ! देवत्व दिले की आमचा समाज शतकानुशतके शेंदूर फासलेल्या धोंड्याचे भक्तीभावे जतन व उदोउदो करतो परंतु धारातीर्थी पडलेला योद्धा व हुतात्मा यांचे असामान्यत्व आणि श्रेष्ठत्व आम्हास कधी कळायचे ?

वसईच्या किल्ल्यामधे सुंदर वास्तुकाम असलेली चर्चेस डोळ्यादेखत मातीला मिळत आहेत ज्या तटाने पेशवाईचा इतिहास घडवला तो तट नि बुरूज ढासळत आहेत तेथील एका चर्चमधला दगडी मळसूत्री जिना हा वास्तुकलेचा एक अत्यंत सुबक आणि कौशल्यपूर्ण नमुना आहे पण इकडे लक्ष देतं कोण ? पोर्तुगीज व परकीयांनी बांधलेले किल्ले असले तरी प्राचीन वास्तुशिल्प म्हणून ते जतन करायलाच हवेत नाहीतर डच, पोर्तुगीज व इंग्रज यांनी बांधलेल्या वास्तू या पाडण्यायोग्य ठरल्या असत्या मग आपण गेट वे ऑफ इंडिया व फोर्टमधल्या इमारती जपतो आणि इतर परकीयांचे किल्ले का पाडतो ? यात काय अर्थ आहे ? वास्तू कुणीही बांधली तरी ती आपल्या भूमीवर आपल्या मालकीची असणे महत्त्वाचे ! आणि तिच्या मागे जर भारतीयांच्या शौर्याचा इतिहास असेल तर तिचे अभिमानाने रक्षण केले पाहिजे वसईच्या किल्ल्यामधे पोर्तुगीज योद्ध्यांच्या कबरी आहेत

शत्रूचे झाले तरी ते रणवीर होते त्या कबरींवरून गुरे, शेळ्या, मेंढ्या मोकाट फिरत असतात आणि माणसेही !

दौलताबाद किल्ल्यात एक अष्टपैलू मीटिंग हॉल (खलबतखाना) आहे तो अजून बऱ्यापैकी टिकला आहे पुढचे सांगता येत नाही अजिंठ्याची अप्रतीम चित्रे साहेबाला सापडली त्याने त्याची निगा राखून प्रवाशांना मार्ग बांधून दिला साहेब गेल्यानंतर अनेक नोकरांचा ताफा असूनही अजिंठ्याचे रंग उडत आहेत दर दहा वर्षांनी पहावे तो कालचे आज नाही, आजचे उद्या नाही असे चालले आहे

जंजिऱ्याचा राजा किल्ल्यात रहात होता म्हणून जंजिरा किल्ला शाबूत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेथील 'बीबीके महल' हळूहळू एकएक मजला कोसळत भुईसपाट झाले संभाजी महाराजांच्या मर्दानी झेपेची शौर्यगाथा असणारा हा किल्ला पहायला प्रवासी जेव्हा जातात तेव्हा त्यांना अजून धड असलेल्या तटबंदीवर वाळण्यासाठी टाकलेल्या मासळीचा सडा दिसतो ! वास्तुच्या इतिहासापेक्षा तिची आजची उपयुक्तता महत्त्वाची वाटत असावी प्रवासी मात्र उत्साहाला विरजण लागून खट्टू होतात

युरोपभर ऐतिहासिक वास्तूचे असे विडंबन कुठेही दिसले नाही अनेकवार युद्धे होऊन प्राचीन तोफगोळे, अर्वाचीन बाँब यांनी त्यांचे किल्ले व प्रासाद नष्ट केले, तरी प्रत्येक वेळी त्यांनी ते पुन्हा पुन्हा बांधून काढले स्विगर पॅलेसमधले कारंजे पाहाताना आपल्याकडील राजवाड्यातील फुटके कारंजे, नाव असलेली केविलवाणी कारंजी मला आठवली. इचलकरंजीच्या नक्षीदार राजवाड्यांच्या चौकात, पशुपक्ष्यांच्या किनारी असलेले, मोठ्यापासून लहानापर्यंत तबके असलेले मनोहर कारंजे आहे. वरच्या संगमरवरी चिमण्या उडून गेल्यात पोपटाच्या माना मोडल्यात गरूड नि हत्ती आपल्या विनाशाची वाट खिन्नपणे पाहताहेत !!

स्विगर पॅलेसमध्ये चित्रांचा चोखंदळ संग्रह आहे युरोपच्या एकेका चित्रशैलीचे एकेक दालन आहे. उदा० इटालीयन, ग्रीक, फ्रेंच, इंग्लिश कॅनव्हासची सात मोठी चित्रे एका दालनात होती. सोळाव्या शतकातील ११९ इटालियन चित्रांचे एक भव्य दालन पाहिले त्यात एक चितातूर मुलगी दाखविली होती तिचा भाव तिच्या डोळ्यांतून व चेहऱ्यावर जिवंत रंगवला होता चित्रकार डॉमानिकोव्ह याने काढलेले आर्किमिडीजचे तैलचित्र मी मुद्दाम पाहिले शास्त्रज्ञाबद्दल आदरभाव दाखविणारे युरोपियन लोक एकटेच ! सुप्रसिद्ध चित्रकार राफेलचे मेरी व येशूचे चित्र करुणरम्य होते. क्रूसावर लटकविलेल्या येशूकडे पाहात अश्रू ढाळणारी मेरी त्याने हुबेहुब रंगविली होती बायबलवरची धार्मिक ख्रिस्ती चित्रे बरीच होती एकात योहानचे रक्तबंबाळ मस्तक ट्रेमधे ठेवले होते ते भळभळणारे रक्त अंगावर उडेल असे भासून बाजूला व्हावे असे वाटत होते याशिवाय दुसऱ्या दालनात मोहक चित्रेही होती वसंतोत्सवात नाचणारे स्त्रीपुरुष, रती–मदन वगैरे शृंगारचित्रे बरीच होती. लुकास–एरानाश याने चार फुट उंचीच्या भव्य चित्रात आदम–इव्ह व ते

ज्ञानफळ (सफरचदासारखे) ही प्रख्यात दतकथा रंगविली होती ग्रीक पुराणातील स्त्री व हस याचे युग्म पाहून आपल्या दतकथांची आठवण झाली आतापर्यंत पाहिलेली दालने गडद छटाची होती आता रोमन पद्धतीचे उजळ रगाचे दालन लागले यात अत्यत सुदर लँडस्केपस् होती तिथून हलावेसे वाटत नव्हते पूर्वीच्या चित्रात तांबूस, तपकीरी, कबरे, काळसर असे रग होते या चित्रांतून केशरी, गुलाबी, पिवळसर, पोपटी व अस्मानी असे रग होते एका तबकामधे दारूचा पेला व द्राक्षे ठेवली होती ती द्राक्षे इतकी जिवत होती की उचलून तोंडात टाकण्याचा मोह झाला शेवटी एका दालनात आम्हाला फार मजा वाटली तो सीताहरणाचा प्रसग होता रावणाला व्यवस्थित दहा तोंडे होती म्हणूनच हा पौर्वात्य सीन म्हणायचा कारण सीता पायघोळ झगा घातलेली होती रावण व राम युरोपियन पद्धतीचे मॅन्टल (अगरखे) व त्यांच्या पद्धतीचे मुकुट घातलेले होते रावणाला दाढी होती आपला राम नाजुक, गोरा वाटतो हा राम चांगला मर्द दिसत होता मिशा वगैरे असलेला धिप्पाड

यानतर आम्ही ड्रेसडेनमधील दाट झाडीतून बस फिरवली या शहराचे शांत, सुसस्कृत आणि निसर्गसुदर रूप खरोखरच मोहविणारे आहे दुपारी जेवणानतर रेल्वेने प्रागला जायचे होते त्यापूर्वी आम्ही घाईघाईने डिपार्टमेंटल स्टोअरमधे खरेदीला गेलो. येथील कटलरी चागली असते बाकीच्यात खास काही नव्हते जवळची उरलेली सर्व नाणी एका सेल्सगर्लसमोर ओतून म्हटले,

' यात येईल ते अत्तर, लव्हेंडर दे

ती खूष झाली निवड करायला तिलाच मिळाल्यामुळे तिने लिपस्टिक दाखविली. मी साभार नको म्हटले तिने निवडलेले लव्हेंडर खरोखर उत्कृष्ठ निघाले हॉटेलकडे परत येताना एका कारंज्याशी शॉपिंगला आलेल्या माता व बालके बसली होती. त्याच्याशी मी दोस्ती केली मी त्यांना म्हटले,

' मला जर्मन नवरात्रीचे एक गाणे येते आमचेही नवरात्र कालच सपले तर आपण ते गाणे म्हणूया त्या बायांनी माना डोलावल्या

मी ' ओ डू फ्रूलिंग ऽ ' ह्या गाण्याच्या ओळी म्हणायला सुरवात केली बाया म्हणू लागल्या लाजणाऱ्या मुलांना टपली देत त्यानी त्याना म्हणाय ला लावले मी चांगलीच रगले

मी आमच्या ग्रुपला ' मी परस्पर स्टेशनात येईन असे सांगितले होते त्याप्रमाणे स्टेशनच्या प्रवेशद्वारापाशी आमच्या बसमधून उतरून टाकलले माझे सामान होते बारीक-सारीक पिशव्यासकट माझे सामान सुरक्षित होते ते उचलून मी कानटोप्या शोधत शोधत आमच्या ग्रुपला येऊन मिळाले यावेळच्या आमच्या तरुण सुदर जर्मन गाईडस फार गोड होत्या रशियन मुलीची हनुवटी पुढे झुकलेली असते जर्मन चेहरे अडाकृती नि हनुवटीला खळगी असते या मुलीनी एका बाजारातून जाताना अचानक छोट्या सरदारजीला म्हटले,

'तुझ्या पँटचे बक्कल शर्टाखाली झाक शर्ट इन करू नको आऊट कर '

त्याने कारण विचारले

तिने म्हटले, 'तुझ्या बेल्टच्या बक्कलवर स्वस्तिक आहे आमच्या देशात स्वस्तिक पाहिले की, लोकांना राग येतो '

मी तिला म्हटले,

'तुमच्या स्वस्तिकाच्या उलट आमच्या स्वस्तिकाची दिशा आहे आणि आमचे हे धार्मिक पूजाचिन्ह आहे- '

गाईड म्हणाली,

'दुरून एवढे बारकाईने कोण पाहणार ? उगीच कुणाला राग आला तर बखेडा होईल '

सरदारजीने पट्टा झाकून टाकला

मी स्टेशनात त्या गाईडला म्हटले, 'तुझ्यासाठी मी एक कीचेन देणार होते. हिला चंदनाचे पदक आहे आणि त्यात हिंदु स्वस्तिक कोरले आहे मी ही भारतीय कलाकुसर असलेली सुगंधी भेट देणार होते पण तुझ्या भावना दुखावणार असतील तर रंगीत चित्रे देते '

तिने चंदन हुंगले व म्हटले,

'हे स्वस्तिक हिटलरचे नाही हे मी ओळखू शकते थँक यू '

गाडी दुपारी सव्वातीनला सुटली सुरवातीला ती वस्तीतूनच जात होती सकाळी आम्हाला आवडलेली नाशिकच्या गोदावरी नदीतीरावरील वस्तीसारखी एल्बाकाठची ती जुन्या धर्तीची वस्ती लागली नंतर ते तीन किल्ले दिसले त्यानंतर आणखी डोंगर-झाडीतली वस्ती लागली यानंतर रेल्वे एल्बाच्या किनाऱ्याने जाऊ लागली

आम्ही ड्रेसडेनहून प्रागला चाललो होतो म्हणजे एल्बा नदीच्या मुखाकडून उगमाच्या दिशेने. एल्बा खूपच लांब आहे झेकोस्लोव्हाकियातून निघून ती जर्मनी ओलांडून नॉर्थ सी मधे मिळते येथे ती फार रुंद नव्हती तथापि खोल असावी आणि प्रदेशही सपाट. कारण पाणी आरशासारखे संथ व नितळ दिसत होते प्रवासभर एल्बाचे दुतर्फा काठ बांधलेले दिसले नाहीत एकजात दोन्ही बाजूला गवताचे पोपटी गालिचे, गाडीतून उतरून त्यावर लोळण घ्यावी असे वाटणारे या गाडीत बसायला आराम होता. खाण्यापिण्याची सोय होती गप्पा मारत भोवतालचा प्रदेश पहात होणारा प्रवास फार सुखकर वाटत होता आपल्या फर्स्टक्लासप्रमाणे बाके एका बाजूला व कॅरिअर दुसऱ्या बाजूला असतो सुदैवाने नदीच्या बाजूला बाके आली व मला खिडकी मिळाली

श्रावणामधे मळवली ते तळेगाव जाताना आपल्या डेक्कन एक्स्प्रेसमधून इंद्रायणी काठाने जसे वाटते तशी आठवण झाली पण आपल्या प्रदेशातील सौंदर्य काही महिनेच टिकते येथील वनश्री आणि गवत सदाबहार ! हिरवेगार ! पुन्हा हा प्रदेश मधे नदी व

दुतर्फा डोंगर असा आहे पूर्व जर्मनीच्या सीमेवरचा नैऋत्येचा जिल्हा ड्रेसडेन हा भाग डोंगराळ आहे नदी, डोंगर, झाडी म्हटली की माझा जीव उल्हसित होतो त्यामुळे ती सृष्टिशोभा पहात एकीकडे समोरच्या डॉ ढवळयाना मी त्याचे वर्णन सागत होते. आमच्या बाजूला नदी, तिच्या पलीकडे दूरवर डोंगर, चढण नदीकिनारी त्या तीरालाही इकडल्यासारखीच दुहेरी रुळवाट शिवाय मोटार रस्ता दोन्ही बाजूला डोंगराच्या उतरणीवर झाडीमधून डोकावणारी चिमुकली घरे ती छोटी गावे तर मला इतकी आवडली की मी एकदा खिडकीतून व एकदा कॉरीडॉरमधून ती पहात राहिले ती सुबक, नेटकी, त्रिकोणी छपरांची सुदर रगांची घरे असलेली गावे मला फार आवडत होती. या घरांमधून काम करणाऱ्या गृहिणी, बागडणारी चेंडूसारखी गोंडस मुले दिसत बाजाराला जाणाऱ्या स्त्रिया, व्हॉलीबॉल खेळणारे विद्यार्थी दिसायचे आमच्या बाजूचे दृश्य फारच स्पष्ट दिसायचे याच खेड्यातील घरोघरी अगणात असणारी सफरचद व पीचची झाडे पोटभर पाहिली काही ठिकाणी हात लाब करून खुडता येईल इतक्या जवळ ती असत. कुठे कुठे अगणात वडील किंवा आजोबा झाडावर चढून सफरचदे जाळ्यामध्ये काढत. खाली ती झेलायला सफरचदासारखी मुले असत मी कधीकधी या मुलाना रुमाल बाहेर काढून खुणावलेही दुतर्फाच्या या सुदर खेड्यांमुळे व झाडीमुळे या प्रवासात मनमुराद नेत्रसुख लुटले या नदीच्या काठाला मधुनमधून बोट-क्लब दिसत शिवाय स्पोर्टिंग क्लब दिसले नदीतून प्रवासी लॉंचेस व मालवाहू टग्ज चालले होते त्यांचेही धक्के होते सुरेख पूल होते आणि या साऱ्यांना गालबोट लावणारे कारखाने नि त्यांची धुरांडी कुठेही नव्हती. सारे कसे स्वच्छ ! स्वच्छता हेच मूळ सौंदर्य !

एल्बा नदी मैलच्या मैल तशीच रुद व खोल होती डोंगराच्या फाटयाफाटयाना वळसे घालीत सुरेख नागमोडी वळणानी वाहत होती कुठेही हिच्या पाण्यात खळाळ दिसला नाही म्हणजे मैलचे मैल ही सपाटीतूनच वाहात असावी

सध्यारग आकाशात उधळले गेले. नदीचे पात्र सलज्ज तरुणीप्रमाणे आरक्त बनले ! ही शोभा पाहात मला स्वस्थ बसवेना मी डॉ ढवळयांना वर्णन सागू लागले व तेही त्यात भर घालू लागले तिकडे पुण्याचे देशपांडे दुतर्फाचे फोटो घेत होते खरोखरच एक एक दृश्य उत्तम लॅंडस्केप ठरावे असे होते बघता बघता अधार पडला. रजनीची चदेरी जादू त्या रम्य प्रदेशाला गूढ स्पर्श देऊन गेली

मी आता खूपच हळवी झाले आकाशातील तिरपी चद्रकोर खटयाळ हसून खुणावीत होती पहातपहाता मला वाटू लागले की, मी इतक्या उशीरा का बरे या स्वर्गीय प्रदेशात आले ? विशीच्या सुमाराला भावूक मन नि स्वप्नाळू डोळे घेऊन या जर्मनीत एखाद्या युनिव्हर्सिटीत शिकायला का आले नाही ? या सुदर एल्बा नदीत विशी-पंचविशीच्या रगेल रक्ताने मनसोक्त पोहले असते एखाद्या बोटक्लबमधील सुरेख नौका घेऊन अशा टिपूर चांदण्या रात्री एखादा हवाहवासा सांगाती घेऊन तासन्तास या सथ

जलपृष्ठावर नौकाविहार केला असता गाणी म्हटली असती, गुजगोष्टी केल्या असत्या मन-सोक्त हसलो खेळलो असतो मधुचंद्रालासुद्धा हे ठिकाण किती मधुर आहे ! इथे बोटिंग करावे मग काठीच्या डोंगरकड्यावरील एल्बसॅण्डस्टेनगेबर्ग हॉलिडे होममधे आराम करावा

आता मात्र जे मनात येईल ते सर्व करण्याचा धीर होणार नाही अशी परिस्थिती होती एका विशिष्ट वयानंतर, खुषी व्यक्त करण्यासाठी खूप धावावं, कंठ मोकळा करून गावं, असं वाटलं तरी या साध्या गोष्टीतही जगाला थिल्लरपणा वाटतो

अशीच हळहळ मला रशिया–जर्मनीतील बुलेवॉर्ड रोडने जाताना वाटली रशियात या रस्त्याच्या मधोमध रुंद फुटपाथ असतो. त्यावर सुरेख हिरवळ असते. मधेमधे विश्रांतीसाठी बाके असतात आणि फुटपाथच्या कडेने दुतर्फा भिंतीसारखी दाट झाडे. या फूटपाथने समव्यसनी, ( व्यसन म्हणजे छंद ) समवयी अशा मित्राबरोबर तरुण असताना तासन्तास गप्पागोष्टी करत हास्यविनोदाची कारंजी फुलवीत जायला मला किती आवडले असते ! परंतु इच्छा, काळ व संधी यांची अशीच चुकामूक होत असते.

एल्बाच्या या सौंदर्यआस्वादात मी गुंग असतानाच प्राग स्टेशन आले रात्री आठ वाजता प्रागला उणे दोन सेंटीग्रेड तपमान होते त्यामुळे स्टेशनबाहेर चालणे मुष्कील झाले सामान हातगाडीवर टाकले व धावत बस गाठली काही भगिनी मात्र माझ्याहून तरुण असून तेवढेही न चालता हातगाडीवरून बसमध्ये आल्या

प्रागला याही खेपेला आम्हाला हॉटेलात जागा नव्हती म्हणून रात्री वस्तीला प्राग-जवळच्या मेलनीक नावाच्या खेड्यात लुदूमिला नावाच्या हॉटेलात उतरलो. खेड प्रथमदर्शनी भिकार वाटलं हॉटेल लहान असले तरी सर्व सुखसोयी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होत्या

या खेड्याजवळ नियरनिक नावाचे गाव आहे तेथील बियर जगप्रसिद्ध आहे तिचे नाव लुद्मिला येथे जेवणामधेच पाण्याऐवजी ही बियर पोटभर वाटीत होते आणि मी एच टू ओ ला (पाण्याला) झेक शब्द काय असे गाईडला विचारत होते रशियामधे व्होडका फुकट तरी मिळत नसे वेगवेगळ्या देशांतील दारूच्या विशेषांकडे मी एवढे लक्ष दिले नाही पण पाण्यासाठी शब्द विचारावा लागे आणि पाणी आणून देताना ती विलायती वेट्रेस आम्ही काय मूर्ख आहोत, अशा नजरेने पाही.

लुदमिला हॉटेलची लुद्मिला बिअर वाटणारी वेट्रेस मी ते ग्लास बाजूला सारून घटाघटा पाणी पीत असताना माझ्याकडे कीव करणाऱ्या नजरेने पहात होती.

# ७ : एकात्मतेचे प्रतीक – झेकोस्लोव्हाकिया

दिनांक ३ आक्टोबर १९७९ हॉटेल लुद्मिलाच्या लिफ्टस् छोट्या होत्या. त्यात ठराविक वजनाच्यावर बोजा चढला तर बझर होत असे माझ्या जोडीला दुसरे कोणी आल्यास बझर होणार याची खात्री असल्याने मी लवकर उठून एकटीच लिफ्टमधून खाली आले ब्रेकफास्टची वेळ होत आली होती, तरी हॉलमधे चाहूल लागत नव्हती कारण येथील ब्रेकफास्टच काय पण जेवणही झटपट होते. चहासाठी पाणी उकळत ठेवले की संपले दर एक टेबलावर उकळत्या पाण्याची किटली ठेवतात. साखरेच्या वड्या व चहाची टिश्यूपेपरमधे बांधलेली पुडी या पुडीला एक दोरा असतो. कपामधे उकळते पाणी, साखरेची वडी व ही पुडी घालून ढवळले की चहा तयार. दोरीने धरून चहाची पुडी काढून टाकायची याशिवाय जेम, चीज व लोण्याची बंद पाकिटे व पावांची टोपली म्हणजे वेटरला काम फक्त या वस्तू टेबलावर आणून ठेवण्याचेच.

कदाचित त्यांची मर्जी असेल तर उकडलेले अंडे किंवा वाटाणे अगर खारवलेली काकडी उकडलेली खाद्येसुद्धा डबाबंदच मिळतात.

त्यामुळे ब्रेकफास्टआधी जेमतेम १५ मिनिटे वेटर्स आले ते स्वतःच्या कारमधून आले रशियाच्या मानाने इस्ट युरोपमधे बऱ्याच कारस् दिसल्या, ब्रेकफास्ट होईपर्यंत मी भोवताली हिंडत होते. समोर एक कारखाना होता, पण बाहेर पाटी नव्हती. इतकेच काय

पण वारूळात नजरेआड काम करणाऱ्या मुंग्यांप्रमाणे येथील कामगारही बाहेरून दिसत नव्हते हे कामगार काय एखाद्या भुयारातून येतात जातात की काय न कळे ? की अती स्वयचलित यत्रे व प्रगत कॉम्प्यूटर्स यामुळे मनुष्यबळ अगदी अल्प लागते ? रशियातही थोडे कारखाने भोवताळून पाहिले फक्त एकदाच वर्कर सूटमधले पाचसहा कामगार दिसले ते एकमेकांवर खेकसून वेल्डिंग करत होते

तर हा कारखाना चालू होता खूप मोठा प्लँट असावा त्यातील उत्पादन एका मोठ्या पुलासारख्या पट्ट्यावरून एका विहिरीसारख्या स्टोअरमधे जात होते तेवढे मात्र बाहेरच्या अगाला दिसले.

हॉटेल लुद्मिला खेड्यात असल्याने हवा फारच मोकळी व स्वच्छ होती भोवती मऊमऊ गवताची मैदाने, पलीकडे झाडीने भरलेले उचवटे यानी सकाळ कशी प्रसन्न वाटली ! बेताचे धुके पसरले होते

स्वागतिकेच्या टेबलाजवळ अनेक वस्तू विक्रीला होत्या तिच्या गळ्यात कलिंगडाच्या बियांची माळ होती तिच्या काळ्या फ्रॉकवर ती उठूनही दिसत होती एकदरीत कंठ-भूषणेही साडीवर शोभत नाहीत हे खरे त्यासाठी गडद फ्रॉक घातलेली, गोरीपान, कंबु-ग्रीवा विलायती तरुणीच शोभते मग तिने गळ्यात बैलांच्या गळ्यात घालतात तसल्या मोठ्या मण्यांची माळा घातली अगर टरबूज कलिंगडाच्या बियांची माळ घातली तरी ती तिला शोभते

ब्रेकफास्टनतर बस गावात निघाली वाटेत थोड्याच अतरावर शेते लागली आमच्यातील प्रगत शेतकऱ्यांना अजूनपर्यंत विलायती शेती जवळून बघायला मिळाली नव्हती त्यांनी पाहिली ते म्युझियमस् व नमुने. तेव्हा आमच्या गोड स्वभावाच्या गाईडला जरा विनती करून बस थांबविली बरेचसे लोक खाली उतरून शेतात जाऊन बरेच निरीक्षण करून आले काहींनी तेथील मातीचा नमुनाही पृथकरणासाठी आणला मात्र ते शेत कोबीचे होते शेतकरी (अथवा मजुरही असतील) कोबीचे गड्डे खुडून ट्रक-मधे भरत होते एकेक गड्डा कलिंगडाएवढा होता प्रौढ स्त्रियाही काम करीत होत्या

नतर बस सुरू झाली आमची अेक गाईड चांगली साडेसहा फूट उच, तितकीच गोडस व सुदर होती त्यापेक्षा विशेष म्हणजे ही खूप मनमोकळी, बोलकी, हसतमुख व विनोदी होती तिने हॉटेलपासून प्राग शहर येईपर्यंत एक कॅसेट लावली तिच्यावर चक्क पंजाबीत भांगडा गीते ऐकू आली देशभाषा ऐकू आल्याने सारे प्रवासी आणि त्याहून सरदारजी खूष झाले.

प्रागमधे मोठमोठे बगले दिसले ते १९ व्या शतकातील श्रीमंतांचे होते १९४८ मधे सरकारने श्रीमताची घरे बळकावली व गरिबांना राहाण्यासाठी वाटून दिली आमची गाईड थट्टेने म्हणाली,

' तुम्हाला फार झेक शब्द आले नाहीत तर सर्वत्र "अॅव्हॉय" शब्द वापरा त्याचा अर्थ "बरे! बरे!" त्यामुळे काही बिघडणार नाही.'

नतर तिने झेक व स्लाव असे दोन वंश आपल्या देशात कसे गुण्यागोविंदाने राहतात ते सांगितले देशच दोन भिन्न वंशीय जुन्या राष्ट्राचा बनला आहे ते एकमेकांच्या भाषा समजू शकतात ७० लक्ष झेक आहे ३० लक्ष स्लोव्हाक आहेत राष्ट्रभाषा झेक आहे शिक्षणात दोन्ही भाषा शिकवतात सध्याचे राष्ट्राध्यक्ष गुस्ताव्ह हे स्लोव्हाक आहेत. परंतु ते झेक बोलतात-- एकात्मतेसाठी! भाषीय व वंशीय कटकटी लोक करत नाहीत

गाईडने आम्हाला झेक व स्लोव्हाक भाषेतील वाक्ये म्हणून दाखविली तिनेच सांगितले की, चॉकलेट खाऊन चिक् चिक् बोला म्हणजे झेक बोलल्यासारखे भासेल! आम्ही सर्व हसलो

प्रागच्या सुरवातीला औद्योगिक वसाहती लागल्या बांधकामासाठी आतापर्यंत बांबूच्या परातीच पाहिल्या होत्या येथे मात्र लोखडी पाईपच्या पराती पाहिल्या.

प्रागही नदीकाठी आहे या नदीचे नाव वर्तावा ही नदी प्रागमधे वळसे घेत वाहते. या शहरातही मधेमधे हिरवीगार उपवने व फुलानी भरलेले ताटवे लागले जुन्या पद्धतीची कौलारू घरेही होती पण ती सुबक होती सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की घरे, रस्ते, उद्याने आणि उपवने यांची सतत डागडुजी चालते ती नेहमी स्वच्छ नि नेटकी राखण्याची सौंदर्यदृष्टी युरोपियन लोकाना आहे

एलिझाबेथ राणीचे एक उन्हाळी उपवन पाहिले हा म्हणजे प्राकृतिक जंगलाचा एक तुकडा आणि मधे राजवाडा प्रागमधे जुने मठ (मोनॅस्ट्री) बरेच आहेत. यातला एखादा मठ धर्मासाठी वापरतात उरलेल्याची सग्रहालये केली आहेत एका मठात मात्र महंत व जोगिणी आहेत यावेळी आमच्याबरोबर एक पुरुष गाईडही आला होता हा सात फूट उंच तरुण, कोवळी दाढी व मिशा आणि मर्दानी चेहेरा असणारा होता तो इंग्लिश बोलताना आतडी पिळवटून बोले व माझ्या आतड्यात उगीचच तुटे की बिचारा एवढं रक्त आटवून का बोलतो?

एकदरीत सर्व गाईडसचे व आमचे इंग्लिशच्या बाबतीत छान जुळले. कारण दोघांनीही मातृभाषेतून इंग्लिश परकी भाषा म्हणून शिकलेली त्यामुळे त्यांचे व आमचे बोलणे स्पष्ट सावकाश व सोपे असे या गाईडचे एकेक पाऊल दोन फुटावर पडे त्याच्या जोडीने चालत लक्षपूर्वक माहिती ऐकताना माझी फार तारांबळ उडे कारण येथील चौक किल्ले यात दगडी फरशा असत त्यावरून भरभर चालणे कठीण जाई

अशाच एका मठांतील सग्रहालयात आम्ही आलो हा ११४४ मधे बांधला व पुन्हा-पुन्हा वाढवीत नेला या मठाचे वैशिष्ट्य म्हणजे सबंध कम्युनिस्ट जगात फक्त येथेच महंत व जोगिणी आहेत. तसेच हे एक फार मोठे ग्रंथसग्रहालय आहे १९ व्या शतका-

पासून येथे १८ लाख पुस्तके जमविली आहेत येथे ब्रीफकेसएवढ्या मोठ्या आकाराच्या हजारो पानाच्या पुस्तकापासून तो इंच-अर्धा इंच आकारापर्यंत पुस्तके आहेत शेवट अगदी अंगठीच्या खड्याएवढे पुस्तक पाहिले ते दुर्बिणीतून वाचायचे ही छोटी पुस्तके म्हणजे बायबलच आहेत पुस्तकाखेरीज येथील प्राचीन महंतानी इतरही अनेक चांगले संग्रह जतन करून ठेवले आहेत परंपरावादी वाटणाऱ्या धर्मगुरूंनी विज्ञान, रसायन, भूगोल व जीवशास्त्र याचे संग्रह केले आहेत फुलपाखरांचे अनेक नमुने, सागरी प्राण्यांचे सांगाडे, अनेक तऱ्हेचे शंख शिंपले व सागरी वस्तू मांडल्या आहेत जहाजाचा नमुना आहे हे विशेष आहे कारण झेकोस्लोव्हाकियाला समुद्रकिनारा नाही

आपणाला धार्मिकता म्हणजे नवीन विचाराचे वावडे असलेली विचारसरणी वाटते पण हे महंत नवविचाराचे स्वागत करणारे वाटले येथे विज्ञान व धर्म हातात हात घालून आहेत फ्रेंच पुस्तकाचे दोन मजले आहेत ताडपत्रीवरील पुस्तके आहेत वैज्ञानिकांची चित्रे आहेत सॉक्रेटीस ॲरिस्टॉटल यांची मोठी तैलचित्रे आहेत

या संग्रहालयात पुस्तकांचेच रुक्ष संग्रह नसून भिंती व छतांवर सुरेख रंगांची चित्रे आहेत देशाच्या नकाशामधेच राणी इझाबेलाचे चित्र रेखाटले आहे. छतावर ज्ञानफळ खाल्ल्याने स्वर्गातून हाकललेले ॲडम व इव्ह दाखवले आहेत ते आपल्या अंगावर पडतील असे वाटते ॲलेक्झांडर हा ग्रीक सम्राट वगैरेची सुंदर चित्रे आहेत सॉक्रेटीसचे विषप्राशन करतानाचे चित्र आहे त्यात शेजारी झांटिपी आहे. झांटिपी म्हणजे या शांत तत्त्वज्ञाची कर्कशा बायको असे आपण समजतो पण येथील झांटिपीच्या डोळ्यांत अश्रू आहेत सॉक्रेटीस विषप्राशन करून मरणार म्हणून या जहांबाज स्त्रीलाही दु.ख झाले काय ? येथे एक सुरेख वेदी आहे यात अज्ञातदेवांसाठी अग्नीला आहुती देत होत म्हणे

येथील सर्व चित्रे एवढ्या चकचकीत ताज्या रंगाची कशी ? शतकानुशतके रंग एवढे जिवंत कसे राहिले ? गाईडने सांगितले,

'या भिंतीना गिलावा केला तेव्हा ते प्लॅस्टर ओलसर असतानाच अनेक चित्रकारांनी एकच चित्र भराभर रंगविले छतावरसुद्धा तसेच' बर्फाळ हवेत प्लॅस्टर वाळायलाही कित्येक तास लागत असतील असे मला वाटले या उलट आमच्याकडील चित्रांचे रंग उन्हामुळे व प्रचंड पावसामुळे लवकर नष्ट होत असावेत अजंठ्याचीच चित्रे पहा ना ! काल आहे ते आज नाही !

यापुढे सर्वत्र सोनेरी नक्षी असलेला फिलॉसॉफिकल हॉल लागला यात प्रचंड मोठा तत्त्वज्ञानविषयक पुस्तकाचा संग्रह आहे.

आता मठाच्या मागल्या बाजूला आलो इथे छोट्याछोट्या खोल्या आहेत नेपोलियन बोनापार्ट कैदेतून पळाल्यावर मेरी लुईझासह इथेच वस्तीला एक रात्र राहिला होता म्हणे

मठानंतर आम्ही मागल्या बाजूच्या अंगणात आलो खाली डोंगरउतार होता व पायथ्याला प्राग शहर होते समोरच्या डोंगरावर एक टॉवर होता. त्याची आकृती आयफेल टॉवरसारखीच होती पण उंची आयफेलच्या एकपंचमांश आहे तरीही अनेक लोक तो आयफेल टॉवर इतका उंच आहे असे मानतात ! कारण तो उंच टेकडीवर आहे आणि त्याची टेकडीच्या तळापासून तो टॉवरच्या शिखरापर्यंतची उंची आयफेल टॉवरपेक्षा अंगुलीभर जास्तच होते म्हणजे उणा पडलेला चार पंचमांश भाग टेकडीने भरून काढला म्हणायचा

येथे लेसर क्वार्टरमधे हिरव्या कळसाचे मुख्य कॅथेड्रल आहे प्रागच्या टेकडीवरून मठाच्या मागल्या अंगणातून एखाद्या गॅलरीप्रमाणे प्रागचे विहंगम दृश्य दिसते प्राग हे शहर नदी, टेकड्या, दऱ्या, कडे व किल्ले यांनी मोठे सुंदर वाटले. आणि मग मला माझ्याच उद्‌गाराची आठवण झाली

मी सक्सेनाला म्हटले होते,

' परत कशाला यायचे प्रागला ? ते काही मोठे रम्य शहर वाटले नाही ' कारण आम्ही ज्या वस्तीतून मागल्या वेळी गेलो होतो ती जुनी अरुंद रस्त्याची वस्ती मला मुळीच आवडली नव्हती.

पण आता मी प्रागच्या प्रेमातच पडले टेकड्यांचे उंच सुळके, दऱ्या, नदी व उपवने याचा लोभ पडणार नाही तर काय ?

यानंतर आम्ही शहराच्या मध्यभागी असलेल्या कॅसलमधे गेलो या कॅसलची एक बाजू टेकडीच्या मध्यावर व दुसरी सुळक्यावर आहे त्यात १७ व्या शतकात बांधलेला दीडशे मीटर लांब राजवाडा आहे त्याला तीस प्रचंड स्तंभ आहेत सध्या यात परदेश खात्याचा दूतावास आहे.

कॅसल स्क्वेअरमधे जुने मिलिटरी हॉस्पिटल आहे यात आजारी पडल्यापडल्या यारो स्लाव या लेखकाने आपले प्रख्यात पुस्तक लिहिले त्याला अनेक दारू फार आवडायची सैन्यामधे ती फुकट मिळायची म्हणून तो सैन्यात शिरला ह्या लेखकाला दारूचे घी दिसले पण शिस्त व बंदुकीचा बडगा दिसला नाही तेथील धकाधकीला कंटाळून त्याने आजाराचे सोंग केले आणि या मिलिटरी हॉस्पिटलमधे येऊन बिछान्यात पडून पुस्तक लिहिले

पुढे रशियन स्क्वेअर आहे तेथे काळ्या-पांढऱ्या रंगातील चित्रे असलेला मिलिटरीचा ऐतिहासिक म्युझियम आहे बहुधा सैन्याला रंगविलास वर्ज्य असावेत ' चौकामधे मेरीच्या कडेवर बाल येशू असलेला पुतळा आहे प्रागमधे एकदा प्लेगची साथ आली असता सगळ्या मातांनी मुलेबाळे जगावीत म्हणून मेरीला नवस केला. तो फेडण्यासाठी त्या श्रद्धाळू बायांनी हा स्तंभ व पुतळा उभारला अखेर माता व त्यांचा मुला-

बाबतचा हळवेपणा जगभर तसाच असतो !

प्राग किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी हत्यारबंद राक्षसाचे पुतळे आहेत मराया थेरेसा राणीने हा किल्ला १६ व्या शतकात बांधून घेतला किल्ल्याच्या आतील चौकामधे एक छानसे कारंजे आहे मराया थेरेसाने किल्ल्यात चर्च बांधले, सुधारणा केल्या

चौकामधे गाईडने एक विहीर दाखविली तिचे एका पिपाएवढेच तोंड उघडे ठेवलेले आहे व बाकीचे बुजवले आहे गाईड म्हणाला,

'पूर्वी ही उघडी होती त्यात बदफैली बायकांना आणून बुडवीत '

मी विचारले, ' मग बदफैली पुरुषांना बुडविण्याचे सरोवर कुठे आहे ?'

त्याने घाईघाईने १३४४ मधे बांधलेल्या सेंट गायटस् कॅथेड्रलमधे नेले इथेही वार्सासारखी काचतुकडयांची १ वाय १॥ मीटरची मोझेक चित्रे होती या चित्रात एका कपड्यावरील अनेक रंगछटा बारीक रंगतुकडयांनी दाखविल्या होत्या चेहऱ्यावरील ओठ नि नाक कसे दाखवीत असतील ? हे सगळे सांधे गुळगुळीत व सफाईदारपणे कसे जुळविले असतील ? जुनी चित्रे लहान व नवी मोठी होती हे कॅथेड्रल पॅरीसच्या नोत्रदामचा नमुना डोळ्यासमोर ठेवून बांधले नोत्रदामचा मूळ आर्किटेक्ट चौथ्या चार्लसने बोलावला, चर्च पूर्ण होण्याआधीच देश परतंत्र झाला त्यामुळे पश्चिम भाग अलीकडे पुरा केला हे चर्च ३३ मीटर उंच आहे येथे उत्सव व संगीत जलसे होतात चर्चमधे राजांना बसण्यासाठी केलेले जुने व्यासपीठ दोन टन चांदीचे आहे ! तसेच चांदीचे अनेक पुतळे आहेत राजाच्या चांदीच्या रथाला पंख लावलेले पुतळे ओढीत आहेत राजाच्या समाध्या पाठीमागच्या बाजूला आहेत त्यावरही चांदीच्या सुरेख नक्षा आहेत अशी मणावारी चांदी इथे उघडयावर राहते कशी याचे मला नवल वाटले

आता सूर्य वर आला मोझेकच्या रंगीबेरंगी काचतुकडयातून सूर्यकिरण आत आले त्यामुळे अनेकरंगी रंगछटांचा रंगविलासच जणू त्या सभागृहात दिसू लागला

या कॅथेड्रलमागे सेंट जॉर्ज चर्च आहे त्यात हल्ली आर्ट गॅलरी आहे त्यात १२ व्या शतकातील मध्ययुगीन झेक कला आहे फ्रान्सकाफ्का येथे तीन दिवस राहिला होता

तेथे एक सराफ गल्ली होती ती फारच अरुंद आहे तिच्या दुतर्फा अगदी छोटी छोटी ठेंगू दुकाने आहेत त्यांची दारे अगदीच ठेंगू व अरुंद आहेत मला तर तिथे खूपच गुदमरल्यासारखे झाले गाईड म्हणाला,

'ही दुकाने अशी खुजी व लहान बांधण्याचे कारण सात फूट उंच माणसे दागिने चोरून या ठेंगू दारातून चटकन पळू शकणार नाहीत अर्थात हल्ली या सराफकट्ट्यावर सोने, हिरे विकत नाहीत ही गोष्ट वेगळी '

पुढल्या चौकात सतरा मीटर उंचीचा एक पाचूसारखा दिसणारा भव्य स्तंभ लागला. हा स्तंभ झेक प्रजासत्ताकाच्या दहाव्या वाढदिवसानिमित्त मुद्दाम बसविला आहे मोरॉन

या झेकोस्लोव्हाकियातील मध्यवर्ती गावी असे मूल्यवान दगड मिळतात तेथून हा स्तंभ खोदून एकसंधी आणला या पाषाणाला ग्रॅनाईट म्हणतात पिवळसर शिडकावे असलेला हा गर्द हिरवा रंग फारच सुंदर दिसतो कुणी याला पाचूचा स्तंभही म्हणतात मला वाटते असा एकसंधी दगड हाच असावा

नंतर बस एका जुन्या पुलाकडे निघाली प्रागमधील रस्ते सतत चढउताराचे आहेत फुटपाथ दगडीच आहेत चौकामधे दगड वेगवेगळे आकृतीबंध साधून बसविलेले असतात. अर्धगोल, चतुर्थगोल, शिंपले, वेलांट्या अशा आकारानी ते जोडलेले असतात.

चार्लस् पहिला याचा पुतळा पाहून मग आम्ही वर्तावा नदीवरील जुन्या पुलावर आलो या पुलाचे विशेष म्हणजे याच्या दुतर्फा ३४ सुंदर पुतळे आहेत दुतर्फाच्या या पुतळ्यांमुळे, नदीकाठच्या झाडीमुळे आणि दोन्ही बाजूच्या सुंदर इमारतींमुळे हे दृश्य फारच रम्य वाटले नदीच्या मधोमध एका ठिकाणी बोटिंग क्लब होता त्या शांत नीळसर पाण्यात शुभ्र बदके पोहत होती

यानंतर आमची बस काही वळसे घेऊन एका नव्या अति उंच पुलाच्या मधोमध उभी राहिली आधी कळलेच नाही गाईडने सांगितल्यावर पाहिले अबब ! केवढा उंच हा पूल ! मी समोरच्या खुर्चीच्या पाठीला गच्च धरले जणू मी एखाद्या साकवावरून पायीच तोल सांभाळत चालले आहे हा पूल म्हणजे प्रागच्या स्थापत्यकलेचा मानबिंदू होता शहराच्या दोन बाजूचे अत्युच्च सुळके हा पूल सांधीत होता त्यामुळे त्याच्या मध्या वर आल्यावर आम्हाला खाली खूप खोलवर शहर दिसत होते खाली ट्राम व रेल्वेचे ट्रॅक्स होते रस्त्याच्या कडेने व मधेही असलेले झाडाचे पुंजके होते उद्याने होती तळाला असलेली घरे तर सोंगट्याप्रमाणे फार छान वाटली ठिपक्यांसारखी माणसे आणि पेन्सिली-एवढ्या आगगाड्या हे सारे पाहून आपण विमानातच असल्याचा भास झाला या पुलाच्या एका बाजूला आम्ही मघाशी गेलो, त्या किल्ल्याचा तट बाहेरून दिसत होता लहानपणा-पासून मी वेगवेगळ्या भेटकार्डांवर जी युरोपची असंख्य लॅंडस्केपस् व ऐतिहासिक चित्रे पाहिली होती, तशी असंख्य चित्रे माझ्या डोळ्याना चहुकडे दिसत होती. खूप वेळ पुलावर बस थांबून मग गावच्या सखल भागाकडे निघालो

वाटेत एक कारंजे लागले त्याकडे बोट दाखवून गाईड म्हणाला,

'या कारंज्यातून सुंदर गाणे आपोआप वाजत असते मात्र ते पतिव्रता स्त्रिया व पत्नीव्रत पुरुष यांनाच ऐकू येते काय आले का ऐकू ?'

यावर कुणीच नाही म्हणाले नाही !

मी त्याला विचारले, 'तू नेहमी ऐकायला येत असशील ?

तो म्हणाला, मी अविवाहित आहे लग्नानतर बायकोसह येईन '

एवढी सुंदर सकाळ घालवल्यानंतर दुपारी जेवायला मागल्याच कळकट हॉटेलमधे

आणले सकाळच्या सौंदर्यपानाची धुंदी तेथील कोरडे, कडकडीत पाव खातांना गेली ! मात्र तेथे अनेक मुलाच्या सहली आलेल्या होत्या आपल्या एन सी सी प्रमाणे इथेही नेव्ही व आर्मी असे कॅडेटकोअर्स असतात त्या मुलांच्यात गप्पा मारताना बरे वाटले

आमची स्त्रीगाईड आम्हाला शॉपिंगला घेऊन गेली एका कटलरी शॉपमधे मी सुऱ्या घेतल्या व कात्री घेऊ लागले तेव्हा विक्रेती म्हणाली,

' हिची धार कमी आहे, ही घेऊ नका '

विदेशी प्रवाशाना लुबाडण्याची वृत्ती कुठे नि आपल्या देशातील माल खराब निघाला तर आपल्या देशाची परदेशी लोकामधे प्रतिमा डागळेल म्हणून जपणारी ही साधीसुधी जागरूक लोक विक्रेती कुठे ?

यानतर तीन तास खरेदीसाठी एका मार्केटजवळ बस उभी केली एका रस्त्यापर्यंत स्त्रीगाईडने सोडले येथे ती प्रख्यात कटवर्कची दुकाने होती काचपात्रे व कटस्टोनचे अलकार ! इतर जगात विद्युद्दीपांनी व रगीबेरगी प्रकाशस्रोतांनी शोकेसेस उजळून त्यात ही क्रोकरी व ज्युवेलरी ठेवून प्रवाशाना आकृष्ट केले असते अशी लखलखती दुकाने ही स्वत च जाहिरात असतात

पण साम्यवादी जगात जाहिरातीच काय पण दुकानावर नावेही नसतात त्यातून उत्पादन व विक्री सरकारच्याच हाती त्यामुळे भाव सर्वत्र एकच दुकाने सरकारी चढा-ओढ नाही म्हटले की जाहिरातबाजी व शोमनशिप आवश्यक नाही

तर शोकेसमधे दरेक प्रकारचा एकेक नमुना मी अगदी नावापुरते खडयाचे नमुने घेतले ॲशट्रे वगैरे याचे ओझे नेणे मला शक्य नव्हते फुटायची भीती

मला शाळकरी मुलाच्या बॅगा व प्रवासी बॅगा आवडल्या होत्या पॅरॅशूटच्या मजबूत कापडाच्या चिवट व टिकाऊ थैल्या प्रवासाला बऱ्या त्याबद्दल मी अनेक लोकांकडे मुलांच्या हातातील थैल्या व पाकिटे दाखवून चौकशी केली मग त्यांनी बोट दाखविलेल्या इमारतीत गेले तर ती शाळाच निघाली वेळ भरत आली होती मी ग्रुपजवळ परत आले

बस उभी होती ती टाऊन हॉलसारखी ग्रथालयाची इमारत होती तिच्या पायऱ्यावर विखरून आमचे सहप्रवासी बसले होते तासाभराने आम्ही बसमधे बसलो त्यावेळी पाठीमागे सिगरेटची व विडयाची थोटके, टरफले व कपटे याची काय छान नक्षी पसरली होती ! तेवढयात आतून एक जख्ख म्हातारी व एक कोवळी तरुणी बाहेर आल्या. तो कचरा त्यांनी मोठमोठया झाडूनी पाचच मिनिटात साफ केला सार्वजनिक ठिकाणी थुकण्याचीही मनाई असलेल्या देशात प्रवाशाचे हे वर्तन पाहून त्यांना आमच्याबद्दल काय वाटले असेल ?

त्या रात्री आमची उंच सुदर गाईड तपकिरी साडी–ब्लाउज नेसून आली व जेवायला बसली साडीच्या वेशात ती अप्रतिम सुदर दिसत होती लोणी आणि स्ट्रॉबेरी यांच्या मिश्रणाची कांती असलेल्या त्या गाईडकडे सर्वच पहात राहिले

मी तिची प्रशसा केली

ती म्हणाली, 'मलाही हा ड्रेस आवडतो '

प्रा धैर्यबालाबाईंची ही साडी तिने विकत मागितली तर त्यांनी ती तिला बक्षीसच दिली ही गाईड खरोखरीच खिलाडू होती. सकाळी ती ब्रेकफास्टला आली तेव्हा मी तोंडात बोटच घातले तिने चक्क सरदारजीची लालभडक पगडी घातली होती जीन पँट व कोट मात्र तिचाच होता उचीने ती चौघाही सरदारांपेक्षा अधिक उंच होती. आजही तिचे सर्वांनी कौतुक केले ती झाशीच्या राणीसारखी दिसत होती

ब्रेकफास्टनंतर साताराचे खासदार विठ्ठलराव जगताप व मडळींनी कल्पना काढली की, 'आपण फ्रँकफुर्टला जातोच आहोत तिथून पॅरीस दोनएकशे मैल आहे तर आपण एक बस भाड्याने घेऊ (प्रासगिक कराराने) आज फ्रँकफुर्टला रात्री पोहोचू उद्या सकाळभर खरेदी करू आणि दुपारी पॅरीसला जायलानिघू संध्याकाळी पाचपासून मध्यरात्रीपर्यंत पॅरीस बघू, खरेदी करू थोडे काही पाहू ' हे सगळे ऐकून मलाही जावेसे वाटू लागले. एखादी वस्तू कमी खरेदी करावी पण पॅरीसला जावे असे वाटून मी चर्चा ऐकू लागले. तेवढ्यात कराडचे आ केशवराव पवार म्हणाले,

' वाटेत बस फेल झाली तर ? इथून विमान सहा ऑक्टोबरला सायकाळी बरोबर साडेसहाला जाणार तुम्ही आला नाहीत तोपर्यंत तर ? तिकिट फुकट जाईल '

बिचाऱ्या विठ्ठलरावांचे एअर इडियाचे तिकिट आधीच हरवले होते त्यामुळे घाबरून त्यांनी हा प्लॅनच सोडून दिला प्रथम ग्रासेच मक्षिकापात झाल्याने ही कल्पना सर्वांनीच सोडली

फ्रँकफुर्टहून आमच्यापैकी बरेच जण खाजगी गोल सफरीने उरलेला युरोप बघून येणार होते परतु पावलोण्याला कटाळून व घरच्या ओढीने आणि दिवाळी जवळ आल्याने फारच थोडे गोल सफरीला गेले

यानतर आमची बस थेट प्राग स्टेशनला गेली येथे आम्हाला ग्लाससकट कॉफी दीड डॉलरला मिळाली बिनदुधाची गाडी अकराला प्रागहून सुटली येथे मात्र एका कपार्टमेंटमध्ये सोळा माणसे कोंबली होती ! आता प्रवास सपत आला होता त्यामुळे गाडीमध्ये उरलेले खाणे सपवणे, एकमेकाचे पत्ते घेणे, एकमेकाच्या घरी बोलावून निरोप घेणे सुरू झाले लाबच्या प्रदेशातील लोकांशी एवढ्या दिवसात बोलायला वेळ झाला नव्हता बीड, नांदेड, नागपूर, अकोला येथील सहप्रवाशांशी खूप गप्पा मारल्या. अकोल्याचे डॉ ढवळे, रणजितसिंग, वानखेडे बधू वगैरे विदर्भी मंडळींची निमत्रणे घेतली, दिली या प्रवासात आम्ही वेळ छान घालवला

आ. दौलतराव भोसले यांच्या कुसुमाग्रजांच्या कविता आवडत्या त्यांचा आवाजही चांगला त्यांनी कुसुमाग्रजाच्या काही कविता सुरेख म्हटल्या, अखेर माझे तोंड दुखू लागल्यावर मी मागलीच युक्ती केली सोळा जणाच्या गर्दीत न बसता एका रिकाम्या

कंपार्टमेंटमध्ये गुपचूप जाऊन झोपले

पण हेही सुख फार काळ टिकले नाही हळूहळ भगिनीवर्गही तियेच आला अन् मग तोंडाची टवळी पुन्हा सुरू झाली तेवढ्यात केशवराव पवार व विठ्ठलरावही आले केशवरावांनी काही आकडेवारी व माहिती गोळा केली होती केशवरावाचा स्वभाव अत्यंत शांत, सरळ असा आहे त्यांनी फक्त एक बेतशीर बॅग आणली होती त्यामुळे ते चटाचट कुठेही सामानासह जात कित्येकदा पायऱ्या आल्यावर मी हताश उभी राहिले की, ते माझी बॅग चटकन वर टेवीत माझ्याहून वडिलधाऱ्या माणसांची मदत घेताना मला खरच संकोच वाटे

सोलापुरचे दिकोंडा पतीपत्नी बोलके तेथील कमळे गुरुजी अबोल पण सौजन्यशील श्रीयुत दिकोंडा थट्टामस्करी करुन प्रवासातील कटाळा घालवत असत भिवंडीचे तावरे दांपत्य तरुण व उत्साही आमचा सर्वच ग्रुप एकोप्याने व हसतमुखाने शेवटपर्यंत राहिला आमचे नेते आ दत्ता पाटील चपळ व उत्साहमूर्ती होते डॉ हेमचद्र गुप्ते, इंजिनियर तासकर, आ प्राणलाल व्होरा व त्यांच्या पत्नी प्रा डॉ धैर्यबालाबाई यांच्या सुसंस्कृत व सौम्य व्यक्तित्वाची सोबत पाऊण महिना लाभली रणजितसिंग चुगडे, इस्कसचे सेक्रेटरी दत्ता रहाटे, चारही सरदारजी, डॉ. जाकेरीया, अमरसेन वगैरे तरुण मंडळींमुळे कटाळा आला नाही थकल्या भागलेल्यांना त्यांची मदतही होई वाटेमध्ये

यावेळेला दोन-तीन तास सुंदर झाडी व खेडी लागली नतर घाट व दऱ्या लागल्या त्यातून खळाळणारे ओढे, नद्या यामुळे दृश्य जिवत वाटले एक धरण पाहिले त्यातून खळाळणारा ओढा फारच आल्हादकारक होता विशेष म्हणजे या सर्व दऱ्याखोऱ्यात युरोपची ती सुप्रसिद्ध सूचिपर्णी झाडी होती या सूचिपर्णी झाडांचा आकार अतिशय मोहक असतो त्यामुळे त्याचे हे जगल फारच रमणीय होते या दऱ्याखोऱ्यातून जाताना गाडी मधेच थांबली जर्मन सरहद्द आली होती

आत्तापर्यंत अनेक सरहद्दी ओलांडल्या पण त्या सर्व साम्यवादी जगातल्या होत्या ही सरहद्द नुसतीच दोन देशांची नसून दोन भिन्न विचारप्रणालीच्या जगाची हद्द होती त्यामुळे येथे तपासण्या कडक झाल्या नाहीत गाडी पश्चिम जर्मनीच्या प्रदेशातून जाऊ लागली हा रस्ता यू टाईप आकड्याप्रमाणे वळून खाली जात होता घाटातील या नागमोडी वळणांमुळे आम्ही नुकताच ओलांडलेला झेक मार्ग दिसला त्याचबरोबर झेक व जर्मन सरहद्दीवरचे कुंपणही दिसले हे म्हणजे सीमेवरील दहा फूट पट्टा होता दोन्ही बाजूला दोन देशांच्या काटेरी तारांच्या भिंती होत्या त्या दहापधरा फूट उंच असाव्यात कोणी म्हणाले, कम्युनिस्ट बाजूच्या कुंपणातून मोठ्या दाबाचा विद्युत्प्रवाह खेळवला आहे

मुक्त युरोपच्या भूमीवर आल्याची खूण एकाच मिनिटात पटली गाडी जर्मन हद्दीत धावू लागताच एक रेल्वे कर्मचारी स्त्री टाईमटेबल वाटून गेली प्रत्येक स्टेशनावर गाडी

केव्हा पोहोचणार व केव्हा सुटणार लिहिले होते स्टुटगार्ड, न्यूरेम्बर्ग वगैरे मोठी स्टेशने लागली या प्रदेशात शिरताच मोठेमोठे निऑन साईन्सचे फलक, मालाच्या जाहिराती दुकानाच्या पाटचा अशी रंगीत झगमगीत दुनिया दिसू लागली स्टुटगार्ड स्टेशनवर एक सुंदर जर्मन तरुणी मोठ्या लाडालाडात कुणाला तरी फोन करीत होती. १५–२० मिनिटे झाली तरी तिचा फोन संपेना उलट ती जास्तच लाडात हातवारे करून रंगात येत होती. तिच्याकडे बघून अनेकानी अनेक शेरे मराठीत मारले ती केबिन जवळच होती मला वाटले, खाली उतरून तिला म्हणावे, 'बये, अगं आमच्याकडे बघ. निदान भारतीय तरुणांकडे तरी बघ एवढा वेळ काय फोनवरून प्रेम करतेस ?'

रात्र पडली विजेने लखलखलेल्या जर्मन बाजारपेठा दिसू लागल्या आणि न्यूरेम्बर्गला गाडी थांबली त्या काळात भारतात न्यूरेंबर्ग हे नाव फार चर्चिले गेले होते मी गाडीतून डोके काढून न्यूरेंबर्ग शहर भिरीभिरी पाहून घेतले येथपासून जर्मनीच्या आलिशान, दर्जेदार गाड्या भरपूर दिसू लागल्या अखेर आम्ही रात्री फ्रँकफुर्टला आलो व हॉटेल आम–रूमधे उपाशी झोपलो. कारण येथील हॉटेलात फक्त ब्रेकफास्ट मिळतो पुढील दोन्ही दिवस फक्त ब्रेकफास्टवर रहावे लागले उरलेला काळ फास्ट ! (उपास)

## ८ : एक क्रमांकाच्या जगाची झलक

प्रवासात आज प्रथमच एक सुरेख आस्वादाची सकाळ भेटली रशिया, जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया येथील हॉटेलात उजाडणाऱ्या प्रभाती सुदर निसर्गदृश्ये, छान हवा अन् रम्य परिसर यांनी प्रसन्न वाटतं पण आजच्या सकाळी नाक प्रसन्न झाले हॉटेलातून कॉफीची खुशबू आली वेट्रेस 'टी ऑर कॉफी' विचारून पोटभर कॉफी पाजत होती तेव्हा भरल्या पोटी रस्त्यावर आले त्या मानाने नेत्रसुख देणारे काही कुठे नव्हते समोर 'झू' होता मॅनेजर सक्सेनाने सांगितले,

'बसला अवकाश आहे तोवर झू पाहून या.'

आता हिंदुस्तानात नाही असा प्राणी फक्त ऑस्ट्रेलियात (कांगारू) व आफ्रिकेत (गेंडा, पाणघोडा) आढळेल इथे वेळ मोडून काय झू पाहायचा ? फ्रँकफुर्टला येण्याचा हेतू वेगळाच असल्याने ताकाचे भांडे न लपवता मी व इतरहीजण हॉटेलच्या आजूबाजूची दुकाने धुंडाळू लागलो जर्मनीची खासियत तांत्रिक व यांत्रिक प्रगतीशील उपकरणे ! या रस्त्यावर कॅमेरे खूप दिसले. सर्वांनी घेतले एका दुकानदारणीने मी घेतलेल्या कॅमेऱ्यावर माझे फोटोही काढले

नतर बस आल्यावर हॉटेल डिप्लोमॅटमधे पुन्हा सामान नेले मग बसने स्टेशनवर. येथे ड्यूटी फ्री शॉप आहे त्यातले सर्व विक्रेते इग्रजी बोलतात इथे डॉलर्स मोडण्याची

अडचण नसते हॉटेलात मिळतात शिवाय दुकानातही मार्कची किमत डॉलरमध्ये झटपट बदलून ते घेतात याशिवाय दरेक बाजारगल्लीत एकेक नाणीविनिमयाचे दुकान असते विमानतळापर्यंत नाणी बदलण्याची अडचण नव्हती.

येथे दोन तास मी एकटी खूप फिरले या मुक्त युरोपात शॉपिंग हे नेत्रसुख आहे. रग व माडणी यांची मोहकता आहे अन् व्यापारी वृत्तीपण आहे दुसऱ्या जगात साम्यवादी देशात वस्तूच्या निर्मितीत दिखाऊपणा जराही नव्हता जेवढ्यास तेवढी बांधणी. रेडिओ, टी व्ही यात नक्षी, भपका किंवा कलाकुसर नव्हती तसेच इतर वस्तूतही कपड्याचे रग अनाकर्षक, मळखाऊ भारतातील उत्तमोत्तम डिझाइन्सच्या रगीबेरगी व चमचमत्या साड्या आठवल्या तर त्या मानाने तेथील कपडे फारच साधे नि मद रगाचे होते मोठी सुदर डिझाइन्स नव्हती शिलाईतही नखरेदार फॅशन्स नसत

त्या मानाने फ्रँकफुर्टला झगमगाट होता दुकानाच्या शोकेसेस माणसांना खुणावत होत्या. उपयुक्त व दिखाऊ दोन्ही माल होता त्याचबरोबर इतर व्यापारी वृत्ती म्हणजे, एका दुकानात एक भाव तर दुसरीकडे वेगळा, जुना माल स्वस्तात असे प्रकारही होते. प्रागच्या विक्रेतीने,

' ह्या कात्र्या घेऊ नका त्यांना धार कमी आहे '

असे प्रामाणिकपणे सांगितले तसे इथे नव्हते घड्याळे, इलेक्ट्रॉनिक व विजेची यत्रे यात तकलुपी प्रकारही होते अर्थात चागल्या किमतीत उत्कृष्ट मालही होता. वॉकीटाकी उर्फ मर्यादित अतरावरला फोन फारच चागला पण मला न परवडणाऱ्या किमतीत होता. कुणी ते घेतले प्रवासभर मला रेडिओ घेणे जमले नाही त्यांच्याकडे शब्द वेगळे होते ते सांगत

' हा मिडिअम वेव्हज्चा हा मिडिअम व लाँग वेव्हज्चा '

आपणाकडे लाँग वेव्हज् नसते व ते शॉर्ट वेव्ह नाही म्हणत न जाणो आपली शॉर्ट वेव्ह त्यात न पकडली तर ? फक्त फ्रँकफुर्टमध्ये विक्रेत्याने शॉर्ट, लाँग व मिडियम तिन्हीचा सेट दाखवला पण किमत फार. शेवटी नाद सोडला

इथेही माऊसवॅगन ह्या छोट्या गाड्या भरपूर दिसल्या मर्सिडिस बेंझ तर खूप होत्या. पण ही माऊसवॅगन म्हणे जुनी घेतली तर दोन हजाराला मिळेल तोंडाला पाणी सुटले पण उपयोग काय ? लकेत सोन्याच्या विटा !

मला खरेदी फारशी करायची नव्हतीच तेथे स्टेशनसमोर चर्चगेटसारखा अनेक रस्ते असलेला चौक मधोमध आहे तेथे भुयारी रस्ता व सरकते जिने आहेत भुयारातून अनेक रस्त्यावरून जाऊन आले भुयारात दुकाने खूप आहेत एकदोन रस्त्यावर फारच भडक दुकाने आहेत

ही दुकाने म्हणजे ' सेक्स किनोज ' सेक्स शोज् ' ' लाइव्ह शोज् ' यांची ! ही म्हणे सतत चालूच असतात या दुकानाच्या पुढील काचाआड उघडे भडक फोटो व चित्रे

असतात रस्त्याने जाताना दुतर्फा ही पूर्णाकृती रंगीत चित्रे होती उघड आव्हानक फलक होते स्टेशनजवळ अशी खूप दुकाने दिसली फार विचित्र वाटले इतर रस्त्यांवर चांगली फुलांची दुकाने, तर इथे ही !

इथे विंटर सेल चालू होता. त्यामुळे लोकरी, कार्डुराय व ऊबदार असेच कपडे जास्त होते बाजारात मार्गदर्शक असा कुणी गाईड नव्हता ज्याला जे जमले ते त्याने घेतले तर उबदार कापडे आपल्या इथे काय उपयोगाचे ? हवेशीर पातळ कपडे दिसले नाहीत साड्या, तागाची कापडे दिसलीच नाहीत निदान मला इथे कापड खूप स्वस्त असते म्हणे पण शिलाई चौपट महाग त्यामुळे तयार कपडे महाग पडतात पण मला मिळाली ती सारी दुकाने रेडीमेडच होती

अन् त्या धिप्पाड उचनिच जर्मनांची मापे आमच्या नातलगांना बसणारी नव्हती. त्यांच्याकडे शर्टाची मापे ही पुरुषांसाठी बेचाळीसते चौसष्ट इंच छातीची होती एवढे कोण धिप्पाड इथे असते ? उंची तशीच

फ्रँकफुर्ट आपले आपणच हिंडून पाहायचे तर मी दुसरे सकाळी ता. ६ ला सकाळी आठ ते बारा गावभर फिरले म्हणजे डायरीत आमच्या हॉटेलजवळून जाणारे ट्रामचे नंबर लिहून घ्यायचे व ते नंबर जातील तिथे जाऊन त्याच नंबरने परतायचे येथे दरेक स्टॉपवर त्याचे नाव लिहिले असते. ते नाव लिहून घेतले की झाले दर स्टॉप आला की टेपने त्या स्टॉपचा उच्चार होतो आपला स्टॉप ऐकला की उतरा

तर ट्रामने नदीच्या दोहो बाजूनी चिकार भटकले येथे गावांची आखणी मोठीशी रेखीव योजनाबद्ध नाही वेगवेगळ्या प्रकारच्या इमारतीची सरमिसळ आहे. भडकपणा आहेच मोठे सौंदर्यपूर्ण बगीचे फारसे नव्हते अन् आधी पाहिलेल्या देशासारखी मध्येमध्ये उपवने नव्हतीच कारखाने गावातच होते वस्ती, कारखाने व ऑफिसे हे तीन वेगळे विभाग ठेवण्याची रशियाची योजकता इथे नव्हती बाजार, कारखाने, घरे व कचेऱ्या सारी खिचडी त्यातच शहर गर्दीचे थोडक्यात व्यापारी, बकाल शहरासारखेच हे फ्रँकफुर्ट वाटले जसे मुंबई, सोलापूर, लखनौ, कलकत्ता तसेच अर्थात आपल्या शहरापेक्षा फ्रँकफुर्ट तरीही उजवेच अखेर ते युरोपच्या थंड हवेत आहे आम्हाला स्वच्छता टिकवू न देणारी सदा उडणारी अपार धूळ इथे नाही रस्ते कुठेकुठे फार अरुंद, कुठे वस्ती गिचमिड तरी अत्यंत स्वच्छ शहर आहे रहदारीचे नियम काटेकोर. फूटपाथशिवाय चालायचे नाही वाहन-धारकांसाठी रस्ते पूर्ण मोकळे त्यामुळे भर वस्तीमध्येही गाड्या १२० ते १५० किलो-मीटर्स वेगाने धावत होत्या मोठ्या चौकात भुयारी रस्ते ओलांडायला होते दर ट्रामच्या स्टॉपवर यंत्रातून तिकीट मिळे जिथे जायचे त्या ठिकाणची कळ दाबायची व आत पैसे टाकायचे तिकीट खाली पडते सुटे पैसे नसले तरी नोट किंवा बडे नाणे टाका मोडीची नाणी खाली येतात हा कॉम्प्युटर भलताच डोकेबाज म्हणायचा !

गावात नदीतून मोठेमोठे टगज् व लाँचेस दिसल्या हे मोठेच व्यापारी केन्द्र आहे,

पण त्याबरोबर नदी व गावामधली बकाल कळा लपत नव्हती.

इथे भडक बाजार, भडक सेक्स शोज्प्रमाणे भिकारीही दिसले हॅट उलटी ठेवून ते एखादे गिटार वाजवून गात लोक हॅटमध्ये नाणी टाकीत

हॉटेल मॅनेजरला त्याची माहिती विचारली घरगुती चौकशी केली त्याची सत्तरी उलटली होती तरी तो मोठा जाडजूड, उंच व दणकट होता

' तुम्ही पेन्शनीच्या वयात का काम करता ?'

माझ्या प्रश्नावर तो म्हणाला,

' माझा मुलगा वारला. सुनेने दुसरे लग्न केले दोन नातवंडे माझ्याकडे टाकून ती गेली बायको त्यांना वाढवते मी त्यांच्या शिक्षण व निर्वाहासाठी ही नोकरी करतो, कारण पेन्शनीत चौघांचे भागत नाही माझे घर दूर आहे चेकोस्लोवाकियात मी इथे राहतो '

' या दोन देशात जा–ये चालते का नेहमी ?'

' चालते रशियाइतके झेक कायदे कडक नाहीत '

शुक्रवारभर बाजारात फिरलो शनिवारी सकाळी मी एकटीच फीरफीर फिरले, वाटेत पोटाची सोय करावी म्हणून हॉटेल ' रामायण ' दिसले तेथें गेले तर ते इंडोनेशियन निघाले मुसलमानी पदार्थांचे सामिष वास सुटलेले आणखी एक भारतीय हॉटेल आहेसे कळले म्हणून गेले तर ते शनिवारीच सुट्टी असल्याने बंद ! जीभ तर भजी, इडली-सांबार या नावानीच विरघळत होती अखेर अरब विद्यार्थी दिसले त्यांच्या हॉटेलात गेले. व्हेज व्हेज म्हणत त्याने दोन प्रकार दिले दह्यात मोहरीपूड नि पाला कालवलेले काही-तरी योगर्ट म्हणून दिले हा योगर्टचा भिकार प्रकार मला न आवडून मी परतले योगर्टचे याहून चांगले प्रकार असतात

हॉटेलवर दोन पंजाबी तरुण आले होते ते जवळच राहात होते आमचे सरदारजी बघून ते आले छोट्या सरदाराने आज केसांचे आधुनिक कटिंग करून घेतली होती पगडी उडवली होती तो ओळखू येत नव्हता दाढीमिशा पगडीने माणूस मर्द दिसतो खराच ! आज हा सरदारजी पिल्लूच वाटला तर त्या तरुणांचे व सरदाराचे पंजाबी भाषण चालले. मग ते आमच्याशी बोलले त्या दोघा तरुणांनी एक खोली घेतली होती. त्यानी आम्हाला खोलीवर चला म्हटले दर वीकएंडला तेथें इतरही भारतीय जमतात म्हणे.

हे ऐकल्यावर मला त्या सर्वांना भेटण्याची उत्सुकता लागली मी निघाले. सायंकाळी सहाला विमान होते तीन वाजताच निघायचे होते दोन तास या तरुणांच्याकडे घालवावे म्हणून सोबत घेऊन निघाले

आतापर्यंत कुठेही खाजगी खोली, अपार्टमेंट पाहिले नव्हते. तिकडे पाहण्याची खरी उत्सुकता होती पण तिथे उपयोग नव्हता इथे गेलो. या तरुणाचे नाव निर्मलसिंग त्याचा मित्र कुलदीपसिंग हा कुलदीप कुवेत, इराण इथे टेक्निशियनच्या नोकऱ्या करीत, अनुभव

घेत इथवर आला निर्मल नोकरी करून शिकत होता. इथे साध्या तंत्रज्ञाला नऊ–दहा हजार पगार मिळतो कुलदीपची पंजाबात खूप शेती आहे हा पैसे जमवील शिवाय एक ट्रॅक्टर घेईल तो पाठवून मग एक कार घेऊन तो स्वत भरपूर पैशांसह घरी येईल बगला निकृष्ट बांधील कार, बगला, ट्रॅक्टरवर सघन शेती अशा थाट जमवील मग त्याला जीवन जगावे लागणार नाही

त्यांनी सांगितले, जर्मनीत तंत्रकुशलांना वाव आहे इथे यान्त्रिक वस्तू फार स्वस्त व उत्कृष्ट मिळतात हस्तकलेच्या वस्तू महाग असतात अन्न तसे महाग पण वाटेल ते मिळते आम्ही बोलतोय तोवर इलायची अद्रक लावलेली दाट कॉफी घेऊन निर्मल बाहेर आला अगदी आटवलेली भारतीय कॉफी पिऊन मला तरतरी आली शीण पळाला

मग ती वस्ती पाहिली ती चाळवजा ब्लॉक्सची वस्ती होती म्हणजे गॅलरीच्या आत दोन खोल्या किचन व बाथ छोटे, दोन्ही सारखेच पण बाथटब होता स्वैपाकघरात आपल्यासारखा राडा नाही फक्त आठवड्याचे धान्य, किराणा व भाज्या आणतात त्याला एक छोटे शेल्फ व फ्रीज पुरते भांड्यांना छोटी फळी बस्स कोपऱ्यात हीटिंग रेंज त्यात सब कुछ एका पलगाएवढ्या जागेत रसोई

लिव्हिंग रूममध्ये एक कोच सोफा–कम–बेडसारखा एक पलग टीपॉय, कॉर्नरवर रेडिओ, टी व्ही प्लेयर इ गॅलरीत इतर सामान थोड्या जागेतही सुबकपणे सबकुछ ससार मांडलेला तोही पुरुषानी लहान पण दर्जेदार व कलात्मक घर. पडदे डेकोरेशन-सकट, गवडी रगारी परवडत नाहीत म्हणून वॉलपेपरच जास्त गालिचाही होता

बाल्कनीतून इतर घरे पाहिली कमी पसारा हे इथले वैशिष्टच या भागात बऱ्या-पैकी झाडी होती गारवा छानच होता

मी निर्मलचे स्वैपाकघर बघत होते. एका वाडग्यात शिजवलेले मसालेदार मटार दिसले

गड्या, मी हे खाते फार दिवस जीभ बेचव झालीय '

नको मी ताजे करतो '

' अरे नको आम्ही घरीपण रात्रीची भाजी सकाळी खात नाही का ? केवळ मसा-ल्याने बरे वाटले '

तो ऐकेना इथे जेवायचा आग्रह धरलान त्याने तो मटारचा वाडगा व टमाटा रस्सा मोरीत ओतला त्याचे मला वाईट वाटले गेले २० दिवस कोबी, कांदापाती, टोमॅटो, शेपू यांच्या चकत्या कच्च्या खाऊन विटलेल्या जिभेला रस्सा वासाने आकर्षित करत होता तोवर याने भात धुऊन टाकला कांदा फोडणीस टाकून बटाटे, टमाटे चिरून वर टाकले तोवर कुलदीपने वांगी, दूध, दही आणले दही व दूध कागदी सामोश्यात पॅक केले होते

मी मदत करू लागले इनमल भांड्यांत त्यांनी भराभर रस्सा भात बनवून टेबला-वर आणला कोच व खुर्च्यांवर बसून आम्ही प्लेटीमध्ये भात भाजी खाऊ लागलो किती

काळाने दही व मिरची मिळाली !

तोवर हिंदी विद्यार्थी आले त्याच्याशी गप्पा मारल्या ते म्हणाले, 'फ्रँकफुर्ट युनिव्हर्सिटीत १३०० विद्यार्थी आहेत त्यांत ११ हिंदी आहेत' मी त्यांना तेथील नदीबद्दल विचारले

'हिचे नाव मेन्सरिव्हर' कुलदीप गंभीरपणे उत्तरला इतरजण हसू लागले त्यानी भारतीय रेकॉर्डस् सुरू केल्या. हशा बोलणी सुरू झाली

'ही पूर्ण बांधलेली आहे ?' मी म्हटले

ते हसत म्हणाले, 'ही नदी नव्हेच हा कालवा आहे हा ऱ्हाइन नदीला जोडलाय. त्यामुळे इथून मालवाहतूक थेट समुद्रापर्यंत होऊ शकते'

मी नवलच केले हा कालवा ? इतका खोल, एवढा लांब, दुतर्फा सिमेंटने बांधलेला ! हे जर्मन लोक खरे उद्योगी केवढा प्रचंड जलमार्ग खोदलाय ! अर्थात पूर्वीपासूनच यंत्रे व अवजारे यांची निर्मिती प्रचंड व दर्जेदार असल्याने त्यांना अशी सोय फार उपयुक्त ठरत असेल या कालव्यावर अनेक पूल आहेत सुरेख महिरपीची प्रवेशद्वारे कालव्याच्या तोंडाशी पुलाच्या टोकांना पाहिली

या निर्मलसिंगकडे आलेले भारतीय कुणी नुसते शिकत होते तर कुणी नोकरी करून शिकत होते तांत्रिक शिक्षणाचा फार फायदा होतो कारण येथे पूर्ववत अनेक कारखाने आहेत.

पगार बराच खर्च होतो पण बचत केली तर इथे भारतात जन्मभर पुरेल एवढी बचत होते

या सर्वांचे पत्ते घेऊन मग परतले तीनला आम्हाला सामानासकट रस्त्यावर आणले. उगीचच फूटपाथवर खडे केले. बस सवडीने आली ६।। च्या फ्लाइटला एवढे लवकर निघणे त्यांना ठाऊक नव्हते आम्हीच तीन तास आधी घाईने निघतो प्रत्यक्ष प्रवास सुरू होईतो पोटात कावळे कोकलतात मग खा दरेक स्टेशनवर वडे नि चिवडा नाहीतर सोडा शिदोऱ्या !

गाडीने येणारे साडेपाचला निघून पोचले आमची बस साडेचारला आली गावाबाहेर वीस किलोमीटर्सवर विमानतळ आहे. गाव संपल्यावर मात्र दुतर्फा झाडी लागली अखेर किती बकाल झाले तरी ते युरोपीय शहर होते तो दिवस शनिवार होता कैक कुटुंबे कार्समधून गावाबाहेरच्या या झाडीत सहलीला आली होती.

वीकएंडला घराबाहेर पडायचेच असा या सर्वच शहरात प्रघात दिसला सर्वजण सोमवार ते शुक्रवार दिवसभर घराबाहेर असतात लहान मुले शाळेत, मोठे कामावर. तेव्हा शनिवार—रविवार शॉपिंग व पिकनिक पण अखेर हे पिकनिक हाही रूटिनच झालेला दिसतो गंमतजमतसुद्धा वेळापत्रकासारखी आखून झाली की, मग त्यातला आनंद कितपत ताजा राहील ? तेही मग एक नित्यकर्मच वाटेल

कार १७ कि मी वेगाने नेतात त्यामुळे वीकएंडला जवळचे देशही पाहून होतात.

आपण पुण्याहून बंगलोरला जावे एवढ्या अंतरावर परदेश लागतो ! याच्या यूरोपमधे 'फॉरिन रिटर्न' व्हायला फार पैसा लागत नाही.

दुपार असूनही थंडी सपकारे देत होती मी नकाशा पुढे ठेवून मनात म्हणे, लेनिनग्राडपासून दहा अक्षांश दक्षिणेकडे आलो तरी थंडी एवढीच तीव्र का ? पण मग कळले की, भूमध्यसामुद्रिक हवामानही सदाशीतल असते

फ्रँकफुर्ट विमानतळावरची दुकाने सर्वच वस्तूंनी भरलेली नव्हती शिवाय माल भरपूर नव्हता आम्ही जर बुडापेस्टहून विमानतळावरूनच दिल्लीस जाण्याचा पूर्वरचित कार्यक्रम घेतला असता तर दोनच तास या विमानतळावर मिळते अन् तेवढ्या वेळात निवडीस कमी वाव मिळून महाग वस्तू घ्याव्या लागल्या असत्या कारण जवळ थोडेच मार्क उरले म्हणून बारीक खेळणी पाहिली

तर बोटभर चिमुकली पत्र्याची मोटारसुद्धा तीनचार मार्कला. तेवढ्यात काहीच येईना त्या मानाने गावात बरे दर होते वस्तूही तशा दुर्मिळ नव्हत्या तरी दर फारच ! एकूण एअरपोर्टवरची दुकाने चोखदळ व मितव्ययी लोकांसाठी नव्हेतच !

आमचे विमान तासभर लेट येणार असे कळले. पुन्हा कंटाळवाणा वेळ गेला मग निघालो पॅसेजमध्ये अमुक फ्लाइट, अमुक नंबर वाटेने असे फलक होते न विचारता जाता येत होते हा आंतरराष्ट्रीय तळ असल्याने येथे जर्मनप्रमाणेच इंग्लिश पाट्या होत्या तपासणी झाल्यावर मग बाणाकृतीप्रमाणे जाऊ लागले [illegible]
पयत जायला बस असते तिकडे सपाटीवरच सरकते पट्टे असतात मधेमधे एकदोन फूट धांवायचे पुन्हा दुसरा पट्टा वळणाशी थोडे चालायचे सरकत्या जिन्यांची सवय झालेली पट्ट्यांवरून नीट गेले या मार्गाच्या टोकाशी थेट विमानाचे दार होते !

आमच्या विमानाचे नाव 'सम्राट कनिष्क' हे एक जंबो विमान होते यात दोन खिडक्यांशी दोन दोन व मधे चार अशा आठ खुर्च्या एका रांगेत होत्या त्यामुळे उतारू शेकड्यांनी होते मला मधली सीट मिळाली पण मी दुःख केले नाही कारण आता रात्र पडली होती खिडकीजवळ बसून तरी क्वचित खाली लुकलुकणाऱ्या दिव्याखेरीज काय दिसणार होते ? दिवसा मात्र भूमध्य समुद्र, सुवेझ कालवा हे सर्व छान दिसले असते.

फार दिवसांनी भारतीय डिनर मिळाला आणि मी डोळे मिटले मी या दौऱ्यात जे जे पाहिले त्याची आणि आपल्या देशाची मनात तुलना करू लागले या प्रवासात आम्हाला सर्वत्र उत्तम हॉटेलात रहावयास मिळाले. त्यांचा व भारतीय उच्च हॉटेलांचा सुखसोईंचा दर्जा एकच होता तथापि पूर्व युरोपात (दुसऱ्या जगात) हॉटेलांभोवतीचा परिसर निवडताना आणि तो राखताना जी काळजी घेतली जाते ती आपल्याकडे आढळत नाही एका गोष्टीत भारत खूपच उजवा आहे तो म्हणजे खमंग खाद्ये ! याचाचा अर्थ ती जीवनसत्वयुक्त असतात असे नाही परंतु नाकाला व जिभेला सुखावणारी असतात आपल्या खाद्यवस्तू फोडण्या, भिजवणे, तळणे, सुके व ओले मसाले यामुळे बऱ्याच चमचमीत

केलेल्या असतात याउलट तेथील खाद्यवस्तू शक्य तो जीवनसत्त्वे नष्ट न करता देतात त्यामुळे मी नाके मुरडीत खाल्लेले अन्न शरीराला उपकारकच ठरले.

कोबी, कांदा पातीसह, शेपू, मुळा, काकडी, टॉमेटो या सर्व गोष्टी चकत्या करून तशाच कच्च्या खाव्या लागत वाटाणे व अंडी उकडून जोडीला पाव, जॅम आणि ठराविक प्रमाणात लोणी असायचे तेल, तिखट, मसालेविरहीत खाणे हे रोगांना दूर ठेवते स्निग्ध पदार्थ म्हणून आवश्यक तेवढे लोणी, अंडी व मटन असते म्हणजे त्यांचेच अन्न हे पूर्णान्न असते

आपल्याकडील तिकडे न आढळणारा आणखी एक विशेष आहे आपणाकडे मनुष्य-बळाची किंमत फार कमी आहे तिकडे ती फार आहे त्यामुळे तिकडे विजेची उपकरणे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, यंत्रावर तयार होणारी भांडी व कपडे हेच मिळतात आपल्याकडे हाताने नक्षी केलेले धातुकाम आणि किचकट पण सुंदर केलेले हातमागावरचे नक्षीकाम, भरतकाम अशा कलाकुसरीच्या गोष्टी सुंदर व स्वस्त मिळतात भारतात उष्णतेमुळे फळांना गोडी जास्त आहे व फुलांना सुगंध आहे एवढे सोडले तर बाकी सर्व गोष्टींत त्यांचे पारडे जड आहे

आपल्याही काही समाजधुरिणांना वाटते, की देशात अनेक चांगल्या गोष्टी चाला-व्यात योजकांचा अभाव नाही पण सतत फुगणारी लोकसंख्या, मतभेद, अस्थिर राजकारण आणि पैशाचा दुष्काळ यामुळे प्रत्यक्ष काही घडत नाही. विभागशः याबद्दल मी विचार केला मी अभ्यासपूर्वक दौरा करूनच याबद्दलचे निरीक्षण करून माहिती मिळवली अभ्यास केला.

दुसऱ्या महायुद्धामुळे असेलही, पुरुषाचा प्रचंड संहार झाल्यामुळे उद्‌भवलेल्या परि-स्थितीमुळे त्या देशांतील स्त्रिया आपल्या कार्यशक्तीचा पुरेपूर उपयोग करीत आहेत आज आमच्याकडे खेडयातील स्त्रिया पूर्वीप्रमाणेच कष्ट उपसीत आहेत शहरातील बायकामुली कचेऱ्या व कारखान्यातून काम करीत आहेत पण आर्थिक स्वावलंबन असूनही त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मात्र हजारात एक टक्कासुद्धा नाही स्त्रीच्या श्रमाची कदर केली जात नाही कमावत्या स्त्रीकडून प्रापंचिक कामाची पूर्वीइतकीच अपेक्षा केली जाते आमच्या सरंजामी सवयी बदलल्या नाहीत कुटुंब व समाज दोन्हीही स्त्रीबाबत अनुदार आहेत स्त्री सुशिक्षित आणि कर्तबगार झाली तरी समाजात सुरक्षित नाही

या पार्श्वभूमीवर साम्यवादी जगातील महिलांचे चित्र लक्षणीय वाटले तेथील स्त्री ही समाजात वावरताना काही वेगळी भावना घेऊन वावरत नाही तर समाजातील एक समान घटक या नात्याने वावरते. जास्त सवलती न घेता बरोबरीने काम करते कामगार स्त्रीलाही पुरुषांपेक्षा वेतन कमी नाही याहून विशेष म्हणजे स्त्री–पुरुष एकत्र काम करताना आपापले लिंगभेद सतत मनात बाळगून वावरत नाहीत तर एका विशिष्ट कार्यावलीमधला म्हणजेच एका चाकामधला आपण एकेक अरा आहोत, प्रत्येकाचे महत्त्व सारखेच आहे असे

समजून वागतात एका जागी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांत स्त्री–पुरुष भेद नाही तसाच उच्च–नीच भेदपण नाही कोणी कुठलेही काम जरूर पडेल तसे करतो

कारण या देशात खाजगी मालकी कुणाकडेच नाही त्यामुळे शोषक मालक व शोषित कामगार असा प्रश्न नाही सर्व सेवा या देशाच्याच मालकीच्या असतात आणि देश म्हणजे लोकप्रतिनिधींचे सरकार त्यामुळे आपणच आपला नोकर व धनीही

सर्वांचे किमान शिक्षण झालेले असते त्यामुळे वेतनपातळीत फारसा फरक नसतो कोणीही कोणाचे काम तात्पुरते करू शकतात कामाच्या स्वरूपावर उच्चनीचता नसते

स्त्रियासुद्धा गवंडी, सुतार, सफाईकामगार ही कामे करताना पाहिल्या त्याचबरोबर ऑफिसर, शिक्षक, प्रोफेसर अशाही जागी पाहिल्या आपल्याकडेही या जागी स्त्रिया काम करतात पण या दोन प्रकारच्या स्त्रियांत पेशाची उच्चनीचता बाळगतात तशी तिकडे मानली जात नाही

कस्टम, पोलिस, डोअरकीपर, कंडक्टर अशी कामे करणाऱ्या स्त्रिया रात्रभरही कामावर असतात पण त्यांना यत्किंचितही भीती वाटत नाही स्त्रीला सुरक्षितता असलेले हे जग मला आदरणीय वाटले मी स्वतः याचा अनुभव घेतला येथे गर्दीमध्ये स्त्रियांना धक्के देणारे, त्यांच्याकडे वखवखलेल्या नजरेने पाहणारे आणि संधी मिळेल तिथे चावटपणा करणारे पुरुष आढळले नाहीत समवयस्क विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि समाजात नांदणारे स्त्रीपुरुष यांची अतिशय सहजस्वाभाविक सौहार्दपूर्ण वागणूक दिसली स्त्रीकडे एक वासनेचे खेळणे म्हणून कुठेच पाहिले जात नाही देश आणि समाज यांच्या घडणीमध्ये एक नागरिक म्हणून आपला रास्त वाटा उचलणारी एक शक्ती असा तिला योग्य मान मिळतो

एवढे झाल्यावर स्त्रीसुद्धा निरर्थक सोई, सवलती व दाक्षिण्य अपेक्षित नाही घरातील व घराबाहेरची कामे ती पुरुषाप्रमाणेच करते पुरुषही घरकाम, मुले यांच्याकडे बघतो सोय म्हणून कामाची वाटणी होते पण कदापि पुरुष श्रेष्ठ, त्याचे श्रम मोलाचे म्हणून स्त्रीने त्याची सेवा करावी, स्वतःला न्यूनत्व घ्यावे असे तिकडे घडणार नाही

स्त्रीने असे समर्थ व्यक्तिमत्त्व स्वीकारल्यानंतर आपले परंपरागत रूप फेकून दिले आता दुसऱ्या महायुद्धात अपार मनुष्यहानी झाल्या मुळे त्या देशांना मनुष्यबळाची गरज होती अपत्याला जन्म देणाऱ्या स्त्रीला फार चांगल्या सुविधा मिळतात उदा – सहा महिने भरपगारी व सहा महिने निमपगारी रजा, ५० व्या वर्षी पेन्शन, कामावर गेल्यानंतर मुले सांभाळण्याची मोफत सोय इ रशियामध्ये तर बालक हीच संपत्ती समजतात त्याचे शिक्षण व १६ वर्षांपर्यंतची सर्व जबाबदारी देश घेतो असे असले तरी तिकडील स्त्रिया बहुप्रसू नाहीत कारण त्यांना चूलमूल यात फार गुंतायचे नाही

रशियन, झेक, जर्मन वगैरे सर्व स्त्रिया अतिशय सुंदर. या दुसऱ्या जगातील स्त्रिया आणि पाश्चात्त्य स्त्रिया या शरीरशृंगाराकडे जास्त लक्ष देतात स्त्री–सुलभ लाघव वाप-रीत वागतात उत्तान कपडे करतात. साम्यवादी जगात मुख्य म्हणजे अनावश्यक गोष्टींचे

उत्पादनच नाही त्यामुळे भडक रंगरंगोटी केलेल्या स्त्रिया दिसल्या नाहीत मला जास्तीत जास्त अंग उघडे टाकणारी, झिरझिरीत वस्त्रातील अगर उठावदार वेशभूषेची स्त्री एकही दिसली नाही फार काय ? विणले, भरलेले किंवा फुलाफुलाचे कपडेही दिसले नाहीत या स्त्रिया भारदस्त वाटल्या तरीही हसतमुख आणि प्रसन्न होत्या तरुणी उत्साही होत्या

साम्यवादी जगातील तरुणींनी सौंदर्यसाधनेऐवजी बलोपासनेला महत्त्व दिले. व्यायाम आणि खेळ याला विद्यार्थिनी नियमित वेळ देतात त्यासाठी देश विशेष लक्ष पुरवतो रशियन तरुणी सौंदर्यस्पर्धांऐवजी उत्तम ॲथलेट व उत्कृष्ट क्रीडापटू होण्याकडे लक्ष देते. जागतिक क्रीडास्पर्धांत सर्वांत जास्त बक्षिसे ती पटकावते नागिणीप्रमाणे चपळ, बांधेसूद आणि आरोग्याने सतेज दिसणारी रशियन तरुणी प्रसाधनाशिवायच अतिशय सुंदर दिसते तिचे मानसिक व शारीरिक सामर्थ्यच इतके असते की कोणी पुरुष तिचे शोषण आणि शिकार करू शकणार नाही !

आम्हाला असे व्हायचे आहे !

मानवी सौंदर्याबरोबरच देशाचे सौंदर्य हे महत्त्वाचे. हे सौंदर्य निसर्गाने त्या देशाला दिलेले वरदान आणि मानवाची सौंदर्यदृष्टी व जतन यावर अवलंबून असते भारताला व पूर्व युरोपला निसर्गाने वेगवेगळे वरदान दिले आहे आमच्याकडे उष्ण हवा व भरपूर पाऊस यामुळे हिरवीगार जंगले होती (भूतकाळ मी मुद्दामच वापरला आहे) बर्फाच्छादित हिमालयापासून, कच्छच्या वाळवंटापर्यंत सर्व तऱ्हेचे प्रदेश येथे आहेत लहानमोठ्या नद्या आहेत. अत्यंत सुपीक जमिनी आहेत सुगंधी फुले व पुष्पवृक्ष आहेत फळांची रेलचेल आहे. जगात असणारे व अन्यत्र न आढळणारेही प्राणी येथे आहेत काश्मिरसारखे नंदनवन आहे धबधबे, सरोवरे आहेत पर्वत-दऱ्या आहेत.

या तुलनेत पूर्व युरोपला निसर्गाने फार दिले नाही तिकडील झाडे आकर्षक आकाराची नाहीत फुलांना सुगंध नाही जमीन पंजाबइतकी सुपीक नाही त्यांना फक्त आपल्या इतका भयंकर उकाडा नसतो हवामानाचे थंड व अतिथंड एवढेच प्रकार ! ऋतू दोनच बर्फवृष्टीचे फायदे, तोटे दोन्ही कायम थंडीमुळे येथील भूपृष्ठ सदैव हिरवेगार असते एवढे सोडले तर पूर्व युरोपात जे अप्रतिम सौंदर्य दिसले त्याचे श्रेय तेथील लोकांच्या निगेला व जागरूक सौंदर्यदृष्टीला आहे असलेले सौंदर्य त्यांनी खुलवले आवश्यक तेथे नद्यांचे काठ बांधले रस्ते व रूळ यांच्या दुतर्फा झाडे लावली सार्वजनिक उपवने जतन केली उद्यानातील ताटव्यामधील फुले झाडावरच राहू दिली त्याच्या जोडीला कारंजी, पुतळे वगैरेची भर घातली याहून विशेष म्हणजे कुठेही नैसर्गिक सुंदर ठिकाण अगर मानवनिर्मित उद्यान याला गालबोट लावणारे किळसवाणे असे कुठे काही राहू दिले नाही, हेच महत्त्वाचे ! ! !

याच्या उलट दृश्य आमच्या देशात सर्वत्र आहे स्वच्छता व सौंदर्यदृष्टी असणारे थोडे व तिचा नाश करणारे पुष्कळ असे असल्यावर सौंदर्यस्थळे आणि सार्वजनिक ठिकाणे ही उकिरडे बनण्यास वेळ किती लागणार ? सार्वजनिक जागांची स्वच्छता ही वापरणाराने

राखायची असते हे आमच्या लोकांना केव्हा कळणार ? उदाहरणार्थ, प्रत्येक सार्वजनिक जागी असलेली टॉयलेट नावाची नैसर्गिक विधीची ठिकाणे आठवा या स्वच्छतागृहात, स्वच्छ होण्यास गेलेला माणूस नतर येणाऱ्यासाठी नरक मागे ठेवून येतो आमची स्वच्छतागृहे म्हणजे दुर्गंधीचे नरक बनलेली असतात आमच्याकडे तेथे भरपूर अखड पाणी नसते. असले तरी माणसांना स्वच्छतेचे व्यसन हवे

आम्ही वैयक्तिक जीवनात आघोळ, कपडे धुणे, घर स्वच्छ ठेवणे या गोष्टी सर्वजण करतो फक्त सार्वजनिक स्वच्छतेची जाणीव नाही स्टेशने, बाजारपेठा, थिएटरे, उद्याने, रस्ते हे सर्व घाण करताना आपल्याला काही वाटत नाही

सार्वजनिक ठिकाणी घाण करणे हा पूर्व युरोपात गुन्हा आहे तसेच रहदारीचे नियम मोडणे हाही गुन्हा आहे आणि विशेष म्हणजे कायद्याचे रक्षक या गुन्ह्यांची अमलबजावणी फिर्याद, कोर्ट, वकिल असा घोळ न घालता ताबडतोब करतात जेथल्या तेथे दंड करण्याचा अधिकार पोलिसाना आहे कायदा आणि त्याचे रक्षक यापेक्षा ते पाळण्याची आणि स्वच्छतेची नागरिकांना आवड असणे हे महत्त्वाचे.

मनुष्याचे आरोग्य हेच खरे सौंदर्य असे मला वाटते त्याप्रमाणे देशातील प्राकृतिक सौंदर्याचे जतन आणि स्वच्छता यामुळे साम्यवादी देश फार सुदर वाटतात

हाच प्रकार रस्ते, रहदारीचे नियम पाळणाऱ्याबाबत नियम हे मोडण्यासाठीच असतात असा भारतात बहुतेकाचा समज असावा ! रहदारीचे नियम उत्कृष्ट पाळल्यामुळे युरोपात प्रवास किती सुखकर होतात ते पाहिल्याशिवाय कळणार नाही प्रवासात रांग लावणे, तिकीट काढल्याशिवाय ट्राममध्ये न चढणे अशाही नैतिक गोष्टी पाळण्याचे साम्यवादी राष्ट्रातील लोकाना बाळकडू आहे त्यामुळे तेथे चेकर नसतो रशियन ट्राममध्ये शिरल्यावर आपणच यत्रात नाणे टाकून तिकीट घ्यायचे आणि हे सर्व मुलेबाळेसुद्धा काटेकोरपणे पाळतात

साम्यवादी राष्ट्रांनीसुद्धा आपला सांस्कृतिक वारसा जतन केला आहे राजे, सरदार उमराव याचे विशेषाधिकार नष्ट केले। राजेशाही नष्ट केली तरीसुद्धा त्याचे प्रासाद हे सग्रहालये व ग्रथालये याना वापरले, नष्ट केले नाहीत कलाकौशल्याच्या वस्तूची उत्कृष्ट संग्रहालये उभारून ती आजपर्यंत काळजीने जतन केली आहेत हवापाणी, इतकेच नव्हे तर युद्धे यांनी केलेली मोडतोड लगेच भरून काढली जाते अशीच जुनी स्मारके, पुतळे, किल्ले, यांची सतत निगा व सफाई चालू असते

देशात बालक हे धन सर्वांत मौलिक समजतात जे जे उत्कृष्ट ते त्यांना मिळते

सर्व मानव समाज सारख्या सन्मानाने वागवला जातो शोषण नाही शिक्षण व व्यायाम यांचे महत्त्व सर्वांना पटलेले वेश्याव्यवसाय, भिकारी, ओंगळपणा हे निपटून काढलेले व्यापारात स्पर्धा नाही, त्यामुळे जाहिरातबाजी नाही नावाचे फलकही नाहीत मालाच्या जाहिरातीसाठी स्त्रीदेहाचा कुठेही उपयोग केलेला नाही. स्त्रीला इतका सन्मान

व सुरक्षितता जगात अन्यत्र कोठे असेल असे मला वाटत नाही

या प्रवासाने मला बरेच अंतर्मुख केले माझे विचारप्रवाह जागृत केले नवीन नवीन अभ्यासाला प्रेरणा आली दृष्टी विशाल झाली.

मी असा विचार करीत असता विमान पूर्वेकडे झपाट्याने चालले होते आता घड्याळ पुढेपुढे धावत होते मध्यरात्री कैरो आले त्यावेळेला अॅलेक्झांड्रिया व कैरोचे लखलखीत दिवे दिसले कैरोच्या अलीकडेच मी डोळे उघडले पौर्णिमेनंतरची रात्र होती खाली भूमध्य समुद्र स्पष्ट दिसत होता सुवेझ कालवा मात्र स्पष्ट दिसला नाही

कैरोला विमान थांबले होते तेवढ्या वेळात अतिशय गरगरू लागले आमच्या ग्रुप-मध्ये चार चांगले डॉक्टर होते थंड प्रदेशात जाताना मला त्यांचा मोठाच आधार वाटत होता पण थंडीमध्ये काहीच विशेष वाटले नाही कैरोला रक्त एकदम उकळल्यासारखे वाटू लागले मी घाईघाईने डॉ गुप्तेंना म्हटले,

' फार चमत्कारीक होतंय डोक्यात मुंग्या चावताहेत '

ते म्हणाले, ' इथे ३१ अंश तपमान आहे चार तासात ३० अंशांचा फरक पडल्या-मुळे चमत्कारिक वाटेल शांत बसा '

तेवढ्यात नव्या गावी नवीन उतारूबरोबर आम्हालाही फळाचा रस मिळाला त्यामुळे जरा बरे वाटले

कैरोहून पुढे सर्व प्रवास वाळवंटावरून होता कारण आमचा मार्ग चक्क कर्कवृत्ता-वरून होता वाटेने जॉर्डन, इराक, अफगाणिस्तान, पाकिस्तान असा वाळवंटीच मार्ग होता मी चक्क माझी जागा सोडून एअर-होस्टेसची खिडकीजवळची खुर्ची पकडली आणि त्यातून चांदण्यात दिसणारा तांबडा समुद्र, इराकचे आखात व खालची वाळवंटे पाहू लागले वाळवंटातले छोटे छोटे डोंगर, कोळ्याच्या पायासारखे दिसत होते बघता बघता उजाडू लागले बेड्-टी आला झपाट्याने उमलणारी प्रभात व गलाबी स्मित करणारी उषा मी खालचे प्रदेश पहात निरखली ब्रेकफास्टनंतर पाकिस्तान आले हिंद-पाक सीमा हवाई-सुंदरीने मला आवर्जून दाखवली सीमेच्या कडेनेच एक रस्ता होता

पाहता पाहता दिल्ली आली लंचच्या थाळ्या आल्या. मसालायुक्त चण्याचे वास आले त्याबरोबर भारत आल्याचे पटले यानंतर बरोबर दीड तासात नाशिकमार्गे येताना झपाट्याने चेंबूरचा पूल दिसू लागला जो तो आपली गावे निरखू लागला

मुंबईला आम्ही आलो तेव्हा आमच्या घड्याळात साडेआठ वाजले होते व इथल्या घड्याळात एक वाजून गेला होता.

मी भोवताली पाहते तो जाताना पाहिलेली गॅलरी दिसेना कस्टम सोपस्कार लवकर झाले बाहेर आल्यावर कळले की, विमानतळाचा एक भाग संपूर्ण जळून गेला होता पुन्हा उभारणी चालू होती

मी लेनिनग्राडहून पत्र टाकले होते की, ' मी सोमवारी येईन तरीपण तुम्ही इस्कस

ऑफिसला विचारा ' शिवाय इस्कसनेही सर्वांना फोनवर कळवायचे कबूल केले होते होते पण त्यांनी स्वत: तर नाहीच कळवले, पण ज्यानी विचारले त्याना दोन तास आधी टाईम दिले बाहेर पुष्कळाचे नातेवाईक तीन तास ताटकळत उभे होते मी सोमवारी येते कळवल्यामुळे माझ्या घरचे कोणी आले नव्हते पण भिवंडीचे आ तावरे यांनी मला त्यांच्या कारमधून पोचवले

घरी सर्वांनी प्रवासाची चौकशी केली काय बघितले यापेक्षा काय खाल्ले याचे महत्त्व विचारणाऱ्याना अधिक होते मी उत्तर न देता आधी भात टाकला ओघानेच पंधरा मिनिटात पिठलभात समोर आला मग एकीकडे मी युरोपात खाल्लेले पाले व कच्च्या भाज्या यांची वर्णने केली व जेवू लागले

ते ऐकून काहींनी विचारले,

' एक घर बांधता येईल एवढे पैसे खर्चून, अर्धपोटी राहून तू काय मिळवलस ?'

पिठलभाताची ढेकर देत, ताकाची वाटी तोंडाला लावीत मी म्हटले,

' प्यारा वतन, ' ' होम, स्वीट होम ' हे सारे खरेच पण मी जे काही मिळवले ते अन्नपाण्यापलीकडचे आहे ! मी दृष्टीसुख मिळवलेच, शिवाय दृष्टीकोनही ! !

REFBK-0023197

६९०
२३९८०
९६६८९
भु-प्रवास

भारत सोव्हिएट सांस्कृतिक संघाच्या महाराष्ट्र राज्य समिती-तर्फे सप्टेंबर–ऑक्टोबर १९७१ मध्ये रशिया व पूर्व यूरोपच्या सांस्कृतिक दौऱ्यावर गेलेल्या शिष्टमंडळातील सदस्यांची यादी

ज्या दौऱ्यावर हे प्रवासवर्णन आधारित आहे, त्यात सहभागी झालेले सदस्य येणेप्रमाणे–

१) श्री दत्ता पाटील, (मंडळाचे पुढारी) वकील व त्यावेळचे आमदार, अलिबाग
२) श्री प्राणलाल व्होरा, (उपनेते) त्यावेळचे आमदार, विलेपार्ले, मुंबई ५६
३) प्रा धैर्यबाला व्होरा, शिक्षणतज्ज्ञ, मुंबई ५६
४) डॉ आर के उर्फ काका पाटील, खासदार, मुंबई २५.
५) श्री एल ई मनाळ, आमदार, औरंगाबाद
६) श्री दत्ता रहाटे, महाराष्ट्र इस्कसचे सेक्रेटरी.
७) श्री केशवराव पवार, आमदार, कराड
८) श्री गो द तासकर आर्किटेक्ट, मुंबई २८
९) श्री एल जी देशपांडे, पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ, पुणे
१०) श्री प्र श्यं दोंदे, ट्रेड युनियन कार्यकर्ते, वसई
११) श्री राधाकिसन जयस्वाल, नगरपिते व राजकीय कार्यकर्ते, जालना
१२) डॉ सौ सिंधू चौधरी आमदार, फैजपूर, जि जळगाव
१३) डॉ एस् एस ढवळे, अकोला
१४) श्री वि सा दिकोंडा, सहकार व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते, सोलापूर
१५) सौ सुशिला विठ्ठल दिकोंडा, सोलापूर
१६) श्री दि शि कमळे गुरुजी, समाजसेवक व राजकीय नेते, आता विद्यमान राज्यमंत्री, खाती–अन्न व नागरी पुरवठा, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय व दुग्धविकास, सोलापूर.
१७) श्री बापूसाहेब सोळंके, आमदार, जालना

१८) श्री रणजितसिंह जी चुनडे, व्यापारी, अकोला

१९) श्री एम्. जी वानखेडे, व्यापारी, प्रोप्रा राजकमल हॉटेल, अकोला

२०) श्री रमेश वानखेडे, व्यापारी

२१) श्री बी एन् सातपुते, आमदार, अंबेजोगाई

२२) सौ शकुंतला परांजपे, वकील, ठाणे

२३) सौ नयना आचार्य, लेखिका, ठाणे

२४) श्री परशुराम डी टावरे, आमदार व नगराध्यक्ष, भिवंडी

२५) सौ कल्पना परशुराम टावरे, भिवंडी

२६) श्रीमती कमल देसाई, आमदार, मुंबई ३

२७) श्री श्रीमतराव ए पाटील, पाचोर जि औरंगाबाद

२८) डॉ हेमचंद्र गुप्ते, आमदार, माजी मेयर, मुंबई १६

२९) श्री वि भा पाटील, खासदार, पुणे ३

३०) श्री बाबुराव आडामकर, आमदार, केज जि बीड

३१) श्री वर्धमान बी पांडे, व्यापारी, औरंगाबाद

३२) श्री एस् टी गिरवलकर, वकील, लातूर

३३) श्री विजयकुमार बी शेटचे, वकील, लातूर

३४) श्री भीमाशंकर जे देवनीकर, व्यापारी, लातूर.

३५) श्री अमरसेन डी पाटील, व्यापारी, लातूर

३६) श्री रामराव मारोतीराव फुलारी, चाकूर.

३७) श्री होनराव हेमतराव कल्याणराव, लातूर

३८) श्री उत्तमराव जी पाटील, लातूर

३९) श्री. दौलतराव भोसले, आमदार, पत्रकार व कार्यकर्ते, मुंबई ७०.

४०) श्री पी बी धोतरे, अंधेरी, मुंबई

४१) श्री. सुधाकर एन् मुळे, औरंगाबाद.

४२) श्री विठ्ठलराव जगताप, खासदार, मु कोंगल, जि सातारा

४३) डॉ. व्ही पी जाकेरिया, आंबेजोगाई

याशिवाय ट्रिपचे मॅनेजर म्हणून मे हॉलिडे मेकर्स, दिल्ली याचेतर्फे श्री विनोद सक्सेना होते श्री. सक्सेनानी दिल्लीहून शेतीकॉलेजचे चार विद्यार्थी सरदारजी घेतले त्यानी ग्रूपमध्ये खूप वैशिष्ट्य आणले पण ते अधिकृत यादीत नव्हते असे एकूण ४८ जण जमलो

टीप– वरील आमदार व खासदार १९७९ मधले आहेत राज्यमंत्री कमळे गुरुजींचा उल्लेख आजचा आहे

□ □